**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नाही. मी एकटाच सदस्य उपस्थित आहे.

**तालिका सभापती** : (गणना केल्यानंतर) सभागृहात गणपूर्ती नसल्यामुळे मी 15 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.30 ते 10.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

**पृ. शी.** : कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. II OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण अपूर्ण होते. त्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदया, परवा मुंबई बाजार समितीच्या विविध बाबी मी येथे मांडत होतो. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये सर्व घोळ करण्यात आला आहे. त्या बाजार समितीच्या प्रशासन मंडळाच्या नियुक्त्या करण्याच्या संदर्भात मी बोलत होतो. मुंबईच्या बाजार समितीच्या बाबतीमध्ये जे काय घडले त्याबद्दल बोलताना मी एक विषय असा मांडला होता की संबंध नसताना व कोणत्याही कायद्याची मान्यता न घेता, शेतक-यांचा कोणताही संबंध नसताना विविध संस्थांना या मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने देणग्या दिल्या आहेत. सभागृहाच्या बाहेर पडल्यानंतर आमचे एक जबाबदार मित्र मला असे म्हणाले की, आपण सभागृहात काहीही आरोप करता ? या कृषि उत्पन्न बाजार समित्या बाहेरच्या संस्थांना देणग्या देतात काय असा मला त्याचा सवाल होता. मला विचारणारे सदस्य

नवीन आहेत. त्यामुळे दुर्दैवाने त्यांना या विषयाची कल्पना आली नाही. सभापती महोदया, मी सभागृहात ज्यावेळी बोलतो त्यावेळी माझ्याकडे ठोस पुरावा असेल तरच मी बोलतो. पुराव्याशिवाय

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

बोलण्याची माझी सवय नाही. बाजार समितीने केलेला खर्च, बाजार समितीने निर्माण केलेली परिस्थिती याबाबतची एक यादी मी येथे माननीय मंत्रिमहोदयांना वाचून दाखविणार आहे. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावयाचा आहे. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी दिलेल्या देणग्यांना मान्यता घेतली होती काय, घेतली असल्यास कायद्यात देणग्या देण्याची कोणती व्यवस्था आहे ते स्पष्ट करावे. देणग्या देणे समर्थनीय कसे आहे, ते उत्तरातून सांगावे. सिद्धीविनायक न्यासातर्फे देणग्या देण्याची पध्दत होती. त्या पध्दतीचा दुरुपयोग करुन एकेका संस्थेला 50 लाख, 80 लाख रुपयांच्या देणग्या दिल्या जात होत्या. संस्थांसाठी देणगी घेणारे मंत्रिमहोदय निर्माण झाले होते. त्यामुळे हायकोर्टाला त्याच्यावर निर्बंध घालण्याची पाळी आली. सरकारची बाजू घेणे हे मी समजू शकतो. सरकारच्या बाजूला बसलेल्यांना असे वाटत असते की, आपले सरकार चांगले काम करीत आहे, दीनदलितांचा उद्धार करणारे सरकार आहे. अविकसित समाजाची निगा राखणारे सरकार आहे असा समज असू शकतो. परंतु एकीकडे माहिती नसेल तर सरकारची बाजू घेणे हे मात्र अज्ञान आहे असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. हे विधिमंडळाचे सभागृह आहे. या सभागृहात एखाद्या सदस्यांबद्दल आक्षेप घेत असताना जबाबदारीने बोलले पाहिजे. सभागृहात आता ते नवीन सदस्य उपस्थित असावयास पाहिजे होते. किंबहुना, या सदनामध्ये आपल्या अधिकारामध्ये बेछूट आरोप करण्याची पध्दत सुरु झाली त्यावेळी कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली की, आरोप करावयाचा असेल तर संबंधित सदस्यांना तशी नोटीस दिली पाहिजे. एवढेच नव्हेतर त्याबाबतची कागदपत्रे माननीय सभापतीकडे दिली पाहिजेत. त्यामुळे त्याचा परिणाम असा झाला की, मनात आल्यानंतर आरोप करुन सभागृहात वेगळे वातावरण निर्माण करण्याची पध्दत बंद पडली. ज्यावेळी या सदनामध्ये तुम्ही उभे राहून एखादी बाब मांडत असता त्यावेळी त्याची जबाबदारी सुध्दा घ्यावयाची असते. तशी जबाबदारी घेतली नाही तरी त्यामुळे फारसे काही होत नाही, परंतु या सदनाचे सदस्य म्हणून जबाबदारी घेतली तर ते संसदीय पध्दतीनुसार उचित होते. सभापती महोदया, सन 1998 ते 2006-07 पर्यंत मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने कोणाला देणग्या दिल्या आहेत त्याची मी यादी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो.

नंतर श्री.शिगम



(श्री. दिवाकर रावते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

1)अशोक मेहता इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, दुसरा माळा, अपना बाजार बिल्डिंग प्लॉट नं. 2, सेक्टर 17, वाशी, नवी मुंबई - 4 लाख 80 हजार रु., 2) मराळा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, पुणे, - या मराळा चेंबर्स ऑफ कॉमर्सला भीक लागली आहे काय ? यांना 50 हजार रु. देणगी दिलेली आहे. 3) वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान यवतमाळ, - 25 हजार रु., 4) ओम् सद्‌गुरु सीताराम शांतीस्थान,नेरुळ, नवी मुंबई, 1 लाख रु. 5) मार्लेश्वर शैक्षणिक प्रशिक्षण संस्था, जिल्हा रत्नागिरी - 2 लाख रु. 5) जयवंत प्रतिष्ठान, गुमगाव, जिल्हा सातारा- 1 लाख रु. , 6) इंदिरा समाज संस्था प्रतिष्ठान, पिंपरी, जिल्हा औरंगाबाद - 2 लाख रु. 7) सावित्रीबाई ज्योतिबा महाविद्यालय, यवतमाळ - 25 हजार रु. 8) आप्पास्वामी शिक्षण संस्था, जिल्हा वाशिम, 25 हजार रु. 9) मुधादेवी विद्याप्रसारक मंडळ, मालेगाव, जिल्हा सातारा - 1 लाख रु. 10) लोकसेवा वाचनालय, चानी, ता. दारव्हा, जिल्हा यवतमाळ - 25 हजार रु. 11) वसंत शिक्षण प्रसारक मंडळ, सावरगाव, जिल्हा यवतमाळ, 1 लाख रु. 12) नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे, 2 लाख रु.,13) राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय शिक्षण संस्था, कंधार, जिल्हा नांदेड,- 2 लाख रु. 14) शिवाजी एज्युकेशन सोसायटी, बावडा, इंदापूर, पुणे - 5 लाख रु. 15) इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, पूुणे 3 लाख रु. 16) जगदंबा एज्युकेशन संस्था, येवला, जिल्हा नाशिक,- 2 लाख रु. 17) नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पूर्णाकृती पुतळयाच्या निधीबाबत, सिंहगड जिल्हा पुणे - 3 लाख रु. 18) कै. वामन कदम-बोर्डीकर कृषी विद्यालय, सेवा भावी संस्था- ही संस्था अनुदानित आहे. या संस्थेला 2 लाख रु. दिलेले आहेत. 19) गोविंदराव पाटील शिक्षण संस्था, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - 2 लाख रु. 20) राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, नेरुळ - 8 लाख रु. 21) संत ज्ञानेश्वर एज्युकेशन ॲण्ड कल्चरल सोसायटी, नेरुळ, नवी मुंबई- 1 लाख रु. 22) गोदावरी शिक्षण संस्था, वाशी 1 लाख रु. 23) विश्वनाथ बाबा हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, वाडी, नागपूर, 1 लाख रु. 24) शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज, ता. माळसिरस जिल्हा सोलापूर, 2 लाख रु. 25) साद एव्हरेस्ट -2003 .. हे काय आहे हे कळलेच नाही. साद एव्हरेस्ट-2003 या नावाने 25 हजार रु. देणगी दिलेली आहे. 26) रोहिदास समाज पंचायत संघ मुंबई, जगजीवनराम हॉल, आईसाहेब मेहरबान, 50 हजार रु. 27) जोपासना ट्रस्ट

..2...



(श्री. दिवाकर रावते....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सामाजिक संघटना, मुंबई- अे-115, संजय बिल्डिंग नं. 5, पहिला माळा, - 5 हजार रु. 28) आनंद एज्युकेशन सोसायटी, दरी, तालुका, जिल्हा नाशिक, 2 लाख रु. 29) संत गमाजी महाराज शिक्षण संस्था, हिंगणा, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर, 1 लाख रु. सभापती महोदय, एकंदरीत 29 संस्थांची यादी मी दिलेली आहे. मराठवाडयातील जिंतूरची संस्था सोडली तर कुठे देणगी दिलेली दिसत नाही. या देणग्या कशासाठी दिल्या ? मी मॉडेल ॲक्टवर येणार आहे. मी माननीय मंत्री महोदयांशी यासंदर्भात बोलत होतो. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यामध्ये अशा प्रकारे देणग्या देण्याची तरतूद नाही. मग ह्या देणग्यांची खास व्यवस्था करावयाची असेल तर त्यासाठी मान्यता घेतलेली आहे काय ? तर ती देखील घेतलेली नाही. या सर्व राजकीय गोष्टी करणार आहात. यामधून काय घडणार आहे ? माझी शिक्षण संस्थांची यादी अर्धवट राहिली. पुढचे नाव आहे 30) कृषक सुधार मंडळ,तळेगाव, ता . धामणगाव, जिल्हा अमरावती, 10 हजार रु. 31) भरत एज्युकेशन सोसायटी, आर्वी, जिल्हा वर्धा, 2 लाख रु. 31) चंद्रशेखर शिक्षण प्रसारक मंडळ,बोरी, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ, 25 हजार रु., 32) कृषक शिक्षण संस्था, आर्वी जिल्हा वर्धा, 2 लाख रु. 33) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, मागासवर्गीय वेल्फेअर असोसिएशन यांना फक्त 25 हजार रु. दिलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

34) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, ब्लाक नं. 24, नेहरु स्टेडीयम, पुणे 1 लाख 51 हजार, 35) राजवर्धन क्रीडा सांस्कृतिक मंडळ, बावडा, ता.इंदापूर, जि. पुणे 5 लाख, शिवाजी एज्युकेशन सोसायटी, बावडा, ता.इंदूापर, जि. पुणे 1लाख 36) जयवंत प्रतिष्ठान उंबळगाव, ता.जावळी, जि.सातारा एवढया प्रचंड देणग्या देण्यात आल्या आहेत. या देणग्या कशाच्या आधारावर दिल्या, कशासाठी दिल्या, कायद्यातील कोणत्या तरतुदीखाली दिल्या, कोणत्या अधिकारात दिल्या, देण्याग्यांच्या बाबतीत कधी ऑडीट झाले आहे काय ? या सर्व प्रश्नांची माहिती माननीय मंत्र्यांनी सदनात दिली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, उधळपट्टीचा तर एक वेगळा विषय आहे. मी या खात्याचा चार, पाच महिने मंत्री होतो. त्यावेळी श्री. जंत्रे, आय.ए.एस.अधिकारी हे त्यावेळी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक होते. त्या कालावधीत पणन मंडळ 185 कोटी रुपये तुटीत होते. परंतु त्यांनी पणन मंडळ 65 कोटी रुपये शिल्लकीमध्ये आणले. परंतु आता मात्र पणन मंडळाची परिस्थिती खूपच खराब होत चालली आहे या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदया, पणन मंडळाचे संचालक आजारी पडले तर त्यांचा वैद्यकीय खचाची प्रतिपूर्ती मंडळाने द्यावी अशा प्रकारची पणन कायद्यात कुठेही तरतूद नाही. आमदारांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. परंतु त्यासंदर्भात न्यायालयात रिट दाखल झालेले आहे. या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. आमदारांना देण्यात येत असलेला वैद्यकीय खर्च हा एक चर्चेचा विषय झालेला आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक परदेशात दौ-यावर गेले होते. त्या परदेश दौ-यात एका संचालकाला हृदयविकाराचा झटका आला. त्या संचालकांवर पणन मंडळाने 11 लाख 56 हजार 72 रुपये खर्च केला. हृदयविकाराचा झटका येणे हा गंभीर आजार आहे ही गोष्ट मला मान्य आहे. संचालक मंडळाच्या सदस्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्याची कायद्यात तरतूद नसताना त्या संचालकांचा वैद्यकीय खर्च केला गेला. तरतूद खर्च केला गेला ही जबाबदारी कोणी घ्यावयाची ? अशा प्रकारच्या आजारांवर उपचार घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निधीतून पैसे मिळतात. शिर्डी संस्थान कडून आर्थिक मदत मिळते, आमच्या सिध्दीविनायक ट्रस्टकडून आर्थिक मदत दिली जाते. परंतु सदरहू सभासदाने या संस्थांकडून मदत न घेता कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निधीतून वैद्यकीय खर्च

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

केला. यासंदर्भात तरतूद नसताना संचालक मंडळाच्या सभासदावर वैद्यकीय खर्च केला गेला, तो खर्च का केला, कोणत्या नियमाखाली केला ? या गोष्टीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी सदनात करावा अशी माझी विनंती आहे. अशा पध्दतीने खर्च केला जातो यासंबंधी कोणीही वरिष्ठ अधिकारी विचारीत नाहीत काय ? याही बाबतीत खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, या कायद्यातील कलम 15 (क) अन्वये बाजार समित्यांवर प्रशासक मंडळ नेमण्याचा अधिकार शासन आपल्या ताब्यात घेत आहे. बाजार समित्यांवर प्रशासक नेमल्या नंतर काय होणार हा एक महत्वाचा प्रश्न आहे. शासनामार्फत बाजार समितीच्या बाबतीत जे निर्णय घेतले जातात, ते अंमलात येत नाहीत. ते अंमलात का येत नाहीत यासंबंधी देखील माहिती या ठिकाणी दिली गेली पाहिजे.

सभापती महोदया, बाजार समित्यांच्या संचालक मंडळाकडून वाहनांचा होत असलेला वापर हा देखील एक चर्चेच्या विषय आहे. संचालक मंडळाच्या सभासदांनी वाहन वापरावे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. संचालक मंडळातील सभासदस्यांच्या कुटुंबियांनी वाहन वापरले पाहिजे त्याबद्दल माझी काही हरकत नाही. ठीक आहे. परतु सदर वाहने कुटुंबियातील व्यक्तींनी न वापरता दुस-याच व्यक्ती ही वाहने वापरतात. गाव भोजन ज्या पध्दतीने घातले जाते, त्या पध्दतीने बाजार समित्यांची वाहन गाव वाहने होत असतील तर त्यावर निर्बंध कोणी आणावयाचे ? मुंबई कृषि बाजार समित्यांची 100 ते 150 वाहने कोणासाठी व कशासाठी फिरता आहेत हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. मुंबई कृषि बाजार समित्यांची वाहने कोणकोणत्या व्यक्ती वापरत आहेत, त्यासंबंधीची यादी माझ्याकडे आहे. प्रत्येक गाडीचे नाव, कोण वापरतो, कशासाठी वापरतो, कोणती गाडी किती वापरली या विषयीची माहिती सांगण्यास मला एक ते दीड तास वेळ लागेल. म्हणून ती माहिती या ठिकाणी देत नाही. आता एक नवीन सॉफ्टवेअर डेव्हलप झाले आहे. गाडी कोठून कुठे गेली ? गाडी कोठे किती वेळ थांबली ? वाहन चालकास पेट्रोल भरण्यासाठी पैसे देतो, त्याने किती पेट्रोल भरले,....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. कानडे...

श्री. दिवाकर रावते ....

गाडीचा प्रवास किती झाला, किती कि.मी.गाडी चालली, गाडीचा वेग किती होता याचे मिनिट टू मिनिट रेकॉर्ड या सिस्टीममध्ये येते. अशी जी नवीन सिस्टीम आलेली आहे ती सरकारने घ्यावी अशी माझी सूचना आहे. बाजार समितीमध्ये गाडयांच्या वापराबाबत हा जो भयानक प्रकार चालू आहे त्याचा अहवाल घ्यावा लागेल. बाजार समिती गाडयांचा एवढया प्रचंड प्रमाणात अपव्यय करीत आहे. 100-150 गाडया भाडयाने घ्यावयाच्या आणि त्या वापरावयाच्या. खरे पाहिले तर गाडया खरेदीवर सरकारचे निर्बंध आहेत. 6-7 लाखापेक्षा अधिक किंमतीची गाडी सरकारच्या परवानगीशिवाय खरेदी करता येत नाही. परंतु या बाजार समितीकडे 15-20 लाख रुपये किंमतीच्या गाडया आहेत. यांच्या चैनीचे प्रकार काय आहेत हे पाहिले तर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाहुणे येतात त्यांच्या आदरातिथ्यावर किती खर्च केला हे पाहिले तर पैशाचा अपव्यय किती होतो आहे हे शासनाच्या लक्षात येईल. हे कोणत्या नियमामध्ये बसते याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे. आमदार होण्यापेक्षा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पद भूषविणे बरे. आमदारांचे भत्ते थोडेसे जरी वाढले तरी वृत्तपत्रातून बातम्या येतात, लोकांची पत्रे येतात. जसा लोकप्रतिनिधींनी फार मोठा गुन्हा केला आहे अशी टीका होते. याविषयावर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी बोलेनच. आतिथ्य भत्त्याच्या खर्च किती हे पाहिले पाहिजे. 2001-2007 या कालावधीत 27 लाख 32 हजार 63 रुपये खर्च झालेला आहे. हा भत्ता कोणीकोणी खर्च केला त्यांची नांवे माझ्याकडे आहेत. एकूण 22 लोकांनी या रकमेचा वापर केला आहे. कौतुक करावी अशी नांवे आहेत. बाजार समितीच्या निवडणुका संपल्या. मुदत संपली. प्रशासक नाहीत. कोण आहेत ते कोणालाच माहीत नाहीत. कोणाची नेमणूक करण्यात आलेली नाही. नवीन निवडणुका होत नाहीत. प्रशासक म्हणून नियुक्ती नाही आणि जे निवडून आलेले आहेत त्यांचे स्थान काय आहे हे कोणाला माहीत नाही आणि ते कारभार मात्र करीत आहेत. त्यांच्या कारभाराबाबत मी नंतर बोलेनच. हे सगळे होत असताना शेवटी कंटाळून कोर्टामध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली. तरीही सरकारचे डोळे उघडत नाहीत. परवाच दै. सामनामध्ये एका सोसायटीची बातमी आलेली आहे. रिकव्हरी झालेली नाही. 3 वर्षे रिकव्हरी केली नाही शेवटी उच्च न्यायालयाने आदेश दिले आणि सरकारला सांगितले की कारवाई करा. तरीही कारवाई थांबली आहे. उच्च न्यायालयाने आदेश देऊन तीन वर्षे झाली तरी सुध्दा कारवाई होत नाही. याचा खुलासा झाला पाहिजे.

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ 11:00

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, या बाजार समितीमध्ये कुमार उर्फ विठ्ठल बाजीराव गोसावी यांनी 9.1.02 ते 1.12.2003 या कालावधीत 2 लाख 28 हजार 950 रुपये चहापान,अल्पोपहार आणि जेवण यावर खर्च केले. 1.1.04 ते 20.6.07 या कालावधीत 1 लाख 30 हजार 238 रुपये खर्च केले. एकूण 3 लाख 59 हजार 328 रुपये या महोदयांनी 2002 पासून 2007 या 5 वर्षाच्या कालावधीत खर्च केले. श्री. गोसावी ताजमहाल हॉटेलमध्ये जेवत होते काय ? तेथे भजी खात होते काय ? शेतकरी संघटनेचे लोक म्हणतात शेतकऱ्याची काय हालत आहे हे पाहिले तर शेतकरी पिकवितो आणि ताजमहालमध्ये 200 रुपये प्लेटप्रमाणे भजी विकतात.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.............

ताजमहाल हॉटेलमध्ये भजी करण्यासाठी पीठ पोहोचेपर्यंत त्यावरील खर्च तेवढा होतो. म्हणजे शेतकरी संघटनेची नेतेमंडळी भाषणात असे सांगत होती.

सभापती महोदय, श्री.सुभाष मधुकर ठोकळ यांनी 2002-03 मध्ये रु.45,006/- व 2004-07 या तीन वर्षाच्या काळात रु.1,08,174 इतका खर्च अल्पोपहारावर केला. श्री.द्वारकानाथ काकाणी यांनी फक्त 1 हजार रुपये खर्च केला. श्री.शशिकांत बिराजदार यांनी एक रुपया देखील चहापानावर खर्च केला नाही. ही व्यक्ती कणखर असली पाहिजे. श्री.शशिकांत शिंदे यांनी रु.4,90,699; श्री.रामप्रसाद कदम बोर्डीकर रु. 2,63,793; श्री.जयंतीलाल रांभिया रु.1353; श्री.भगवान बेंडे रु.1,29,005; श्री.हनुमंतराव पाटील रु.1,61,009; श्री.अंकुश डेहाळे रु.56,938; श्री.चंद्रकांत राणे रु.1,11,281; डॉ.निलीमा भुवड रु.1,22,943; श्री.प्रविण देशमुख रु.1,02,682; श्री.फत्तेसिंह माने रु.1,70,627; श्री.अशोक देवराव वाळुंज रु.1,55,353; प्रा.श्रीमती चित्राताई लोहारे रु.2,13,243; श्री.अशोक गावंडे रु.14,052, श्री.देविदास पिंगळे रु.18,705; श्री.अंकुश डेहाळे रु.1000; श्री.दिलीपराव काळे रु.33,333 अशाप्रकारे या संचालकांनी एकूण रु.27,32,062 इतका खर्च येणाऱ्या अतिथींच्या चहापानासाठी केला. हा शेतकऱ्यांचा पैसा आहे. ही खर्चाची यादी तुमच्याकडे दिल्यानंतर माननीय मंत्रीमहोदयांनी आम्हाला खुलासा करावा. कधीही कोणाच्याही डोक्यात काहीही येते. हॅण्डेड टर्मिनल खरेदीसाठी 21 लाख रुपये खर्च करण्यात आले. कशासाठी खर्च केला? कोणाला तरी पकडून आणायचे, तो कोणीतरी आप्त असतो, त्याला टेंडर द्यायचे. आपण सत्तेत असल्यानंतर लोकांच्या अपेक्षा असतात. काही अंशी प्रामाणिकपणे ते करायला हरकत नाही. परंतु ते कार्यान्वित होत नसेल तर याची चौकशी कोणी करायची? शेतकऱ्यांच्या येणाऱ्या मालापासून जे उत्पन्न मिळते त्याची अशी लूट होणार असेल तर संचालक मंडळ नेमण्यासाठी जो क्लॉज अंतर्भूत केला आहे त्या संदर्भात मंत्रीमहोदय या अनुभवातून काय निर्माण करणार आहेत? माननीय मंत्रीमहोदय याठिकाणी बसले आहेत. परभणीच्या बाजार समितीमध्ये 4 लाख क्विंटल कापसाची नोंद झालेली आहे. मार्केट कमिटीला उत्पन्न रु.1.05 कोटी मिळाले. म्हणजे 4 लाख क्विंटल कापूस तेथील आजूबाजूच्या जिनिंग प्रेसिंगमध्ये असला पाहिजे. तिथे काय चालते हे मंत्रीमहोदयांना माहिती आहे. मी काही नवीन सांगतो असे नाही.

(नंतर श्री.खर्चे.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पण बाजार समितीमधील उदाहरण म्हणून सांगतो की, नोंद न घेता बाजार समितीच्या संगनमताने तेवढाच कापूस व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून बाहेर खरेदी केला. व्यापाऱ्यांनी अशा प्रकारे बाहेर कापूस विकत घेतल्यानंतर त्यापोटी जो सेस मिळणार असतो तो बाजार समितीला मिळत नाही. जर 4 लाख क्विंटल कापसाचा सेस 1.5 कोटी जमा झाला तर 8 लाखाच्या वर खरेदी झाली असेल तर 1.5 कोटी इतका सेस व्यापारी, कर्मचारी आणि संचालक मंडळाने वाटून घेतला असा त्याचा सरळ सरळ हिशोब होतो. परभणीसारख्या छोट्या जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या पणन मंडळाच्या बाजार समितीमध्ये असा प्रकार आहे तर बाकीच्या मोठ्या जिल्हयांमध्ये कशा प्रकारे व्यवहार चालत असावेत, हा माझा खरा सवाल आहे. म्हणून बाजार समित्या कशासाठी हा माझा मुद्दा आहे. हे ज्यावेळी घडते त्यावेळी यावर अंकुश कोणाचा हा प्रश्न पडतो. माननीय मंत्री महोदयांना या निमित्ताने मला असे विचारावयाचे आहे की, सुरुवातीला हाताने वजन करुन घेणारे मापारी होते परंतु आता नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने इलेक्ट्रॉनिक वेइंग ब्रिजची व्यवस्था केली व त्यानुसार गाडीचे वजन मायनस करुन जे वजन येते ते मालाचे खरे वजन असते. अशी नवीन सिस्टम तंत्रज्ञानामुळे उपलब्ध झाल्यानंतर वास्तविक त्याच कामासाठी असलेले मापारी आपण कशासाठी ठेवत आहोत, हा माझा प्रश्न आहे. परभणीमध्ये अशा प्रकारे 1 कोटीचा सेस गायब होत असेल तर संपूर्ण राज्यात अशा प्रकारे किती तरी पैसा गायब होत असावा याचा लेखाजोखा कोणी करावयाचा, याचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी करणे आवश्यक आहे. राज्यातील बाजार समित्यांचे उत्पन्न प्रचंड स्वरुपात आहे परंतु संचालक मंडळ आपण कशासाठी नेमणार आहोत, हे मला समजत नाही. विधेयकात असे म्हटले आहे की, "सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी" म्हणजे बाजार समित्यांचे कोणते व्यवस्थापन आपण करणार आहात याचे स्पष्टीकरण खरे तर विधेयक मांडतांना माननीय मंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता होती. अमुक कलमामध्ये अशा प्रकारची दुरुस्ती आम्ही अशा अशा कारणासाठी करीत आहोत, परंतु तसे काहीच न सांगता केवळ सभागृहाला गृहित धरले, नेहमीप्रमाणे विधेयक वाचले आणि खाली बसले. मी त्यांना म्हणालो की, ही दुरुस्ती कशासाठी आणली ते आपण सांगितले नाही. परंतु अशा प्रकारची सवय सभागृहाला आणि

.......2

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सरकारलाही लागली की वेळेवर विधेयक आणायचे, त्यावर थोडाफार विचार करावयाचा आणि ते शक्य नसेल तर त्यावेळी आम्ही आरडाओरडा करावयाचा, सत्ताधारी पक्षाने सभापतींना पटवावयाचे, वेळेचा अभाव म्हणून आम्ही ओरडतो आणि गोंधळामध्ये शेवटी कामकाज संपून जाते व विधेयक पास होऊन जाते. ठीक आहे, शेवटी आम्ही माननीय सभापतींनाही दोष देऊ शकत नाही. परंतु सरकारची कायदा बनविण्याबाबतची आणि त्यावर विचार करण्याबाबतची जी कृती आहे, जी प्रवृत्ती आहे ती अधिक घातक आहे. आमच्या काही आमदारांना तर असेच वाटायला लागले की, कायद्यावरील चर्चा वगैरे आपला विषय नसून लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न आणि 93 च्या सूचना उपस्थित केल्यानंतर आपल्या भागात आपले नाव कळते. कायदा बनविणे अथवा त्यावर चर्चा करणे हा आमचा विषयच नाही, असे मी म्हटले तर त्यांनाही दोष देता येणार नाही, मग प्रश्न हा निर्माण होतो की, आपण या सभागृहात कशासाठी आलो आहोत ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

बाजार समितीच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर मला असे म्हणावयाचे आहे की, जे भाग भांडवल आपण जमा करतो त्याला सुध्दा काही मर्यादा आहेत. विधिमंडळाचे आमदार म्हणून काम करीत असतांना आम्हाला काही अस्त्र मिळालेली आहेत. परंतु या अस्त्रांना सुध्दा काही मर्यादा आहेत. परंतु विधेयकाच्या बाबतीत तशा मर्यादा नाहीत. विधेयकाच्या बाबतीत मर्यादा नाही असे नाही परंतु इतर विषयांपेक्षा विधेयकावर चर्चा करतांना तशा मर्यादा नाहीत. खरे म्हणजे ज्यावेळेस विधेयक येते तेव्हा त्या विधेयकांवर पूर्ण चर्चा ही झालीच पाहिजे. विधेयकावर चांगल्या पध्दतीची चर्चा झाली पाहिजे, विधेयकाच्या संदर्भात सर्व बाजूने चर्चा झाली पाहिजे, भविष्यात या विधेयकाचे काय परिणाम होणार आहेत यासंदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता असते. जर भविष्यात विधेयकाचे जनमाणसांवर विपरीत परिणाम झाले तर त्याची जबाबदारी माननीय मंत्र्यांवर येत असते. सभापती महोदया, हक्कभंगांचे अधिकार या सदनातील सदस्यांना कायद्याने दिलेले आहेत. हक्कभंग हे गंभीर अस्त्र आहे. तसेच या सदनात माननीय मंत्रीमहोदयांकडून जी आश्वासने दिली जातात त्या संदर्भात आश्वासन समिती देखील आहे. सदनात मंत्रीमहोदयांनी जी काही आश्वासने दिलेली असतात त्यासंदर्भात काय कार्यवाही झालेली आहे यासाठी आश्वासन समिती काम बघत असते. विधेयकाची सखोल चर्चा व्हावी यासंदर्भात घटनात्मक बंधने घालून दिलेली आहेत. परंतु असे असतांना गेल्या काही वर्षापासून या विधानमंडळात विधेयकावर सखोल चर्चा झाली असे कधीच दिसून आलेले नाही. गेल्या सात-आठ वर्षामध्ये फक्त अंधश्रध्देच्या विधेयकावर सखोल चर्चा झाली होती हे विधेयक सोडून इतर कोणत्याही विधेयकावर सखोल चर्चा झालेली नाही. मी ज्यावेळेस विधेयकावर विचार मांडण्यासाठी उभा राहतो तेव्हा मी किती वेळ बोलणार? काय बोलणार अशी चर्चा होत असते. मला आठवते जेव्हा कन्व्हेयन्स डीडबाबतचे विधेयक सभागृहात चर्चेसाठी आले होते तेव्हा अनेक बिल्डर या विधानमंडळात थैल्या घेऊन फिरत आहेत अशी टीका काही सन्माननीय सदस्यांनी केली होती. बिल्डरांनी 25-25 लाखाच्या थैल्या आणलेल्या आहेत अशीही चर्चा या ठिकाणी झाली होती. खरे म्हणजे या विधेयकाच्या संदर्भात तुम्ही व्यवसाय केलेला आहे. या विधेयकाच्या संदर्भातील सर्व बारकावे मला माहिती होते. 25-25 सॉलिसिटर यांच्या बरोबर बसून मी यासंदर्भात माहिती घेतलेली होती. मुंबईच्या लाखो जनतेच्या जीवन

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मरणाचा प्रश्न या विधेयकाच्या माध्यमातून उपस्थित झालेला होता त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात मी बारकावे मांडत होतो. ज्यावेळेस मी या विधेयकावर विचार मांडण्यासाठी उभा होतो त्यावेळेस हे विधेयक लवकरात लवकर कसे पास होईल यासाठी शासनाकडून प्रयत्न केला जात होता. मला आजपर्यंत तरी या विधानमंडळात बिल्डर लोक फिरतांना कधीही दिसले नाही परंतु अनेक सन्माननीय सदस्यांना बिल्डर लोक हातात थैल्या घेऊन फिरत असल्याचे दिसले होते. या सभागृहात बिल्डर थैल्या घेऊन फिरत आहेत, यासंदर्भात जे विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत ते या विधानमंडळाला साजेसे नाही. खरे म्हणजे विधान मंडळ हे काही बाजाराचे ठिकाण नाही. कशाही पध्दतीत हे विधेयक शासनाला मंजूर करुन घ्यावयाचे होते. कारण या विधेयकाच्या संदर्भात शासनानेच उप सूचना आणली होती त्यामुळे हे विधेयक शासनाला लवकरात लवकर मंजूर करुन घ्यावयाचे होते. त्यावेळेस सांगण्यात आले होते मुंबईतील लाखो जनता हे बील पास होईल या अपेक्षेने बघत आहे, हे विधेयक पास झाले नाही तर मुंबईतील लाखो गरीब जनता,आमच्या नावावर घरे कधी होतील यासाठी रस्त्यावर आलेली आहेत. या विधेयकाच्या संदर्भात तेव्हा जे सांगण्यात आले होते त्यासंदर्भात काय झालेले आहे? आज या विधेयकाचे काय झालेले आहे? या विधेयकाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय घेऊन मी विचार मांडत होतो. हे विधेयक पास झाले पाहिजे असे माननीय सभापतींना देखील सांगण्यात आले होते. या विधेयकाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री सुध्दा सभागृहात उपस्थित होते व या विधेयकाच्या उपसूचनेच्या संदर्भात त्यांनी विचारही मांडले होते. हे विधेयक पास होऊन दीड वर्ष उलटून गेलेले आहे. हे विधेयक जेव्हा पास झाले होते तेव्हा मी फार व्यथित झालो होतो. कारण या विधेयकाचा परिणाम 25 लाख जनतेवर होणार होता.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 11.20

श्री.दिवाकर रावते..

ती थैली 25 लाख रुपयांची होती 26 लाख रुपयांची नव्हती आणि 24 लाख 99 हजार रुपयांचीसुध्दा नव्हती. . तेव्हा हे पैसे 25 लाख रुपयेच होते असा आपल्याला वास कसा येतो ? हे पैसे कोणी मोजले होते ? विधेयकावरील चर्चेच्या वेळी जे काही म्हणणे मांडण्यात आले होते ते सगळे सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेले आहे. तेव्हा त्या विधेयकाचे नेमके काय झाले आहे ? माझ्या गृह निर्माण सहकारी संस्थेसहित अजून एकाही गृह निर्माण संस्थेचे कन्व्हेयन्स डीड झालेले नाही. परंतु त्यावेळी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी वेगळया प्रकारचे वातावरण निर्माण केले होते. त्यावेळी कन्व्हेयन्स डीड करण्यांसंबंधी जे विधेयक आणले होते त्यानुसार कन्व्हेयन्स डीड करणें् आता कठीण झालेले आहे. अगोदरच त्या निबंधकांवर अनेक जबाबदा-या टाकण्यात आल्या आहेत आणि त्या विधेयकान्वये आणखी कन्व्हेयन्स डीडची जबाबदारी देखील टाकण्यात आलेली आहे. मी या ठिकाणी इररिलेव्हन्ट असा एकही मुद्दा मांडणार नाही. गृह निर्माण संस्थेचे कन्व्हेयन्स डीड करण्यासंबंधी हिअरींग घेऊन उप निबंधकाने निर्णय घ्यावयाचा अशा प्रकारचे ते विधेयक होते. वास्तविक महसूल खात्याचे हे काम आहे. अमुक व्यक्ती ही त्या गृह निर्माण सहकारी ंसस्थेची सदस्य आहे असे सर्टिफाय करण्यासाठी तो हक्क को ऑपरेटिव्हकडे दिला गेला असेल तर माझे काहीही म्हणणे नाही. परंतु ही जबाबदारी निबंधकाकडे देण्यात आली होती अशा प्रकारे निबंधकावर जबाबदारी टाकणारे विधेयक कोठे गेले आहे, हे मला माहीत नाही.

सभापती महोदया, या नंतर मी दुसरे उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. फायर ॲक्ट संबंधी 80 पानाचे विधेयक आणले गेले होते. फायर ॲक्ट व्हावा यासाठी मी दिल्लीपर्यंत सतत पत्रव्यवहार केला होता . फायर ॲक्ट होणे आवश्यक आहे असा माझा आग्रह होता. हे विधेयक मांडण्यात आल्यानंतर त्यासंदर्भात अनेक बाबी मला सांगावयाच्या होत्या. परंतु माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, जाऊ द्या या विधेयकावर फार बोलू नका. हे विधेयक एक मिनिटात मांडण्यात आले होते आणि पंधरा मिनिटात पास करण्यात आले होते. मी त्यांना सागितले होते की पुढच्या अधिवेशनात हे विधेयक घेण्यात यावे आम्हाला त्या संदर्भात ब-याच बाबी मांडावयाच्या आहेत परंतु अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी ते विधेयक मांडण्यात आले आणि चर्चा न करता घाई घाईने ते विधेयक मंजूर करण्यात आले होते तेव्हा हा फायर ॲक्ट कोठे आहे ? विधेयकावरील चर्चा महत्वाची नाही इतर चर्चा महत्वाची आहे. अशी परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे मी

श्री.दिवाकर रावते

सन्माननीय सदस्य म्हणून येथे आलेलो आहे तो कायदा तयार करण्यासाठी आलेलो आहे ही मानसिकता आता पुसून गेलेली आहे त्याचा परिणाम असा झाला आहे की , लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना, अर्धा तास चर्चा, पुरवणी मागण्या इत्यादी आयुधासंबंधी येथे चर्चा केली जाते. परंतु विधेयकावर फारशी चर्चा केली जात नाही. सभागृहामध्ये चर्चा होऊन कायदा तयार
झाल्यानंतर त्याचे दूरगामी परिणाम होत असतात. मध्यंतरी एका विधेयकावर चर्चा करावी असे मी सांगत होतो. एखाद्या कायद्या संबंधीचे प्रकरण कोर्टामध्ये गेल्या नंतर अनेक प्रश्न निर्माण होत असतो. ते विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले होते त्यावेळी मी सांगितले होते की, या विधेयकावर सविस्तर चर्चा करु या. घाई घाईने ते विधेयक मंजूर करु नका. परंतु माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,"एखाद्या सदस्याला को-ऑप करुन घेण्यासंबंधी घोडेबाजार चालतो. अमुक होते तमुक होते. वगैरे " त्या सुधारणे बाबत सविस्तर चर्चा करावी असे मी त्यांना सांगितले होते तेव्हा त्या बाबत सविस्तर चर्चा केली गेली नाही.ते विधेयक जॉईन्ट सिलेक्ट कमिटीकडे देखील पाठविण्यात आले नाही. सन्माननीय सदस्य ॲड.अनील परब यांनी अनेक चांगल्या सुधारणा सुचवावयाच्या होत्या. परंतु त्यावेळी हे विधेयक घाई घाईने मंजूर करण्यात आले होते आणि उच्च न्यायालयाने हे विधेयक रद्दबातल ठरविले होते. पैसे देऊन जे को-ऑप झाले होते त्यांचे लाखो रुपये वाया गेले होते. एका सदस्याने तर दहा लाख रुपये खर्च केले होते होते. त्याचे नुकसान झाले होते हे आपल्याला माहीत आहे. या विधिमंडळाने निर्माण केलेला कायदा कोर्टामध्ये आव्हानात्मक रीत्या रद्द करण्यात येत असेल तर सदस्यांची ती दिवाळखोरी जाहीर होते. आम्ही परिपक्वतेने ते विधेयक तयार केले नाही व त्यावर चर्चा केली नाही,त्यातील त्रुटी शोधल्या नाहीत म्हणून अपूर्ण विधेयक मंजूर केले गेले . एखादे विधेयक जॉईन्ट सिलेक्ट कमिटीकडे जर पाठविण्यात आले तर त्या ठिकाणी प्रत्येक शब्दाचा च्छल केला जातो आणि साधकबाधक चर्चा केल्यानंतर दोन तीन महिन्यानंतर चांगले विधेयक तयार केले जाते. जॉईट सिलेक्ट कमिटीकडे विधेयक पाठविण्यात आल्यानंतर तेथे अनेक गोष्टी शिकावयास मिळतात. मध्यंतरी पणनचे एक विधेयक जॉईन्ट सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यात आले होते तेथे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख आणि श्री.विलास काका उंडाळकर यांच्या ग्रामीण भागातील अनुभवाचा फायदा कामकाज करीत असतांना मिळत होता. सन्माननीय राज्य सहकार राज्यमंत्री सुध्दा त्या विधेयकाच्या वेळी होते.
नंतर श्री.सुंबरे



KBS/ KTG/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्याला त्यातून कित्येक गोष्टी शिकायला मिळतात. अशा किती तरी गोष्टी असतात की ज्या आपल्याला माहिती नसतात, त्या आपण त्या समितीतील काजकाजातून, चर्चेतून शिकतो. संयुक्त समितीकडे अशा प्रकारे विधेयक सखोल चर्चेसाठी गेल्यानंतर जनतेच्या माहितीसाठी ते विधेयक प्रसृत केले जाते आणि त्यावर जनतेकडून, त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून सूचना, अभिप्राय, मते मागविण्यात येतात आणि नागरिकांकडून आलेल्या सूचना पाहिल्यानंतर आपण थक्क होतो. त्या त्या क्षेत्रातील, ग्रामीण भागातील अनुभवी माणसे जेव्हा सूचना करतात की, या विधेयकामध्ये अमुक अमुक असावे, अमुक अमुक नसावे, त्या खरोखरी अतिशय उपयुक्त असतात. या शिवाय आणखी एक अतिशय चांगली तरतूद या संयुक्त समितीसंबंधात आहे. एखादे विधेयक संयुक्त समितीकडे सखोल चर्चेसाठी, अभ्यासासाठी गेल्यानंतर त्यावर समितीत चर्चा होते आणि ते विधेयक सभागृहात येते. मात्र अशा वेळी ते विधेयक मागे घेता येत नाही. ही एक अतिशय चांगली तरतूद आहे. म्हणूनच मघाशी मंत्री महोदय आले आणि म्हणाले की, तुमचे या विधेयकाबाबत काय ऑब्जेक्शन आहे ? तुमच्या ज्या काही सूचना असतील, तुम्हाला यात जे काही यावेसे वाटत असेल ते आपण नियमात दुरूस्त करू. आपण असे म्हणता आहात, पण मी आपल्याला विचारतो की, नियमात आपण करणार असाल तर मग कायद्यात ते का नको ? नियमात करावयाचे असेल तर ते नियम तरी कोठे आहेत ? ते आपण आमच्या समोर आणलेच नाहीत. थोडक्यात सांगावयाचे तर असे कोणतेही विधेयक आणताना सरकारची मानसिकता हीच असते की, कसे तरी कामकाज उरकून घ्यायचे. परंतु कोणताही कायदा करीत असताना अशी घाई, अशी निष्काळजी योग्य नाही. कायदा करताना तो अभ्यास करूनच, सर्वंकष, सर्वांगीण चर्चा करूनच केला गेला पाहिजे. कारण त्या कायद्याचा परिणाम 10 कोटी जनतेच्या जीवनावर होणार असतो. म्हणूनच कायदा करताना त्यातील प्रत्येक शब्दाची, प्रत्येक कलमाची शहानिशा पूर्ण झाली पाहिजे. विधेयक जेव्हा सभागृहात चर्चेला येते ते येण्यापूर्वी सदस्याला ते वाचावयास दिले जाते, ते वाचले जात असताना प्रत्येक सदस्य ते विधेयक, तो कायदा, आपल्या नजरेतून वाचत असतो. त्यामुळे त्यामध्ये एखादी बाब राहिली आहे असे त्याला जाणवल्यावर, त्या दृष्टीने तो ती गोष्ट त्या कायद्यात, त्या विधेयकात आणण्यासाठी सूचना करतो. त्यावर मग सभागृहात साधक बाधक चर्चा व्हायला पाहिजे असते. म्हणूनच या मध्ये निबंधकाची जबाबदारी काय आहे हे मी यातील 35 व्या कलमावर येईल तव्हा बोलणारच आहे.

..... जे 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, बाजार समित्यांच्या उधळपट्टीवर बोलत असताना या बाजार समितीचे उत्पन्न किती आहे हेही पाहिले पाहिजे, त्या विषयी माहिती घेतली पाहिजे. पण ही माहिती केवळ आमच्या मंत्र्यांना आणि संबंधित अधिकाऱ्यांनाच असते. मी ग्रामीण भागातील सदस्य आहे, तेव्हा मला फक्त माझ्या भागातील, माझ्या जिल्ह्यातील बाजार समितीसंबंधात माहिती असेल. मी अमरावतीचा असेन तर मला अमरावतीच्या बाजार समितीची माहिती असेल, मुंबईच्या बाजार समितीची माहिती असेलच असे नाही. इतकेच नाही तर माझ्या तालुक्याच्या वा जिल्ह्याच्या बाजूच्या जिल्हा-तालुक्याच्या बाजार समितीची माहिती मला असेल असेही नाही. आज महाराष्ट्रात एकूण 295 बाजार समित्या आहेत. या संबंधात या विधेयकात म्हटले आहे की, या बाजार समित्यांच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यावर संचालक नेमण्याचा अधिकार सरकार घेत आहे. म्हणजे हा तुम्ही राजकीय उपयोग करून घेत आहात. यातून पुढे कोणाचा फायदा होणार आहे ? आज तुमचा होणार असेल, उद्या आम्ही सत्तेत आल्यावर आमचा होईल, पण हा भाग वेगळा. पण त्यातून शेतकऱ्याचे भले होणार आहे काय ? त्या दृष्टीने ही तरतूद योग्य आहे का ? माझ्याकडे या संदर्भात अशी भरपूर उदाहरणे आहेत की जी मी येथे सांगत बसलो तर दिवस पुरणार नाही. उदाहरणादाखल मी आपल्याला सांगेन की, बेकायदेशीर देणग्या मागितल्या जातात, वैद्यकीय खर्च कसा बेकायदेशीर मागितला जातो, हेही मी येथे यापूर्वी मांडले आहे. वाहने कशी वापरली जातात? आपण मुंबई बाजार समितीचा हिशोब पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, सतत काही ना काही दुरूस्ती विना टेंडर चालूच असते. पण त्याला कोणीही काहीही आक्षेप घेत नाही. कारण तेरी भी चूप, मेरी भी चूप. इतकेच काय पण नोकर भरती हा तर बाजार समितीतील महत्त्वाचा विषय असतो. आपण यासाठी मॉडेल ॲक्ट आणला. त्याबद्दलची माझी तळमळ आपण समजून घ्यावी. शेतकऱ्यांच्या हिताच्या बाजार समित्या कशा निर्माण होतील हे सांगण्याचा आणि त्यातील अडचणी ज्या आहेत त्या येथे मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. आपल्या महाराष्ट्रातील बाजार समित्यांची ताकद ही देशातील अन्य कोणाही पेक्षा अधिक आहे. मुंबई आणि ठाणे बाजार समित्यांचे उत्पन्न आज 60 कोटी 79 लाखाच्या वर आहे.

( यानंतर सौ. रणदिवे..... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

अहमदनगर येथील बाजार समिती मोठी आहे. तेथे 10,94,9,401 रु.इतके उत्पन्न जमा होतो. कारण तेथे सहकार आणि इतर सर्व गोष्टी मजबूत आहेत. नंदूरबार येथे 1,95,49,133 रु.इतके उत्पन्न जमा होते. जळगाव, तसेच मुंबई येथे 9, अहमदनगरमध्ये 14, नंदूरबार येथे 5 बाजार समित्या असून तेथे जवळजवळ 15,3,90,141 रु.इतके उत्पन्न जमा होते नाशिक येथे 14 बाजार बाजार समित्या असून 22,21,11,194 रु.इतके उत्पन्न जमा होते. कोकणामध्ये जमा होणारे उत्पन्न देखील काही कमी नाही. सिंधुदूर्ग, रत्नागिरी येथील बाजार समितीचे उत्पन्न 3,68,9642 रु.इतके उत्पन्न जमा होते. पुणे येथे 10 बाजार समित्या असून तेथे 27 रुपये इतके उत्पन्न जमा होते. पुणे, मुंबई आणि नागपूर येथील बाजार समितीचे उत्पन्न 62,90,287 रु.इतके उत्पन्न जमा होते. मी पणन मंत्री असताना पुण्याच्या बाजार समितीच्या बाबतीत भ्रष्टाचार शोधण्यासाठी खास समिती नेमली होती. पण त्याचे पुढे काय झाले, हे मलाही समजले नाही. कारण प्रश्नच येत नाही. सांगली येथे 6 बाजार समित्या असून त्यांचे उत्पन्न 6,36,36,250 रुपये इतके आहे. सातारा येथे 10 बाजार समित्या असून त्यांचे उत्पन्न 3,21,62,980 रुपये इतके आहे. सोलापूर येथे 10 बाजार समित्या असून त्यांचे उत्पन्न 11,75,2,901 रुपये इतके आहे. संभाजीनगर म्हणजे औरंगाबाद येथे 10 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न उत्पन्न 7,53,88,537 रुपये इतके आहे. तसेच नागपूरमध्ये मोसंब्याची बाजारपेठ निर्माण केली होती, त्यावेळी संत्री, मोसंबीचे सर्व उत्पन्न नागपूरमध्ये जमा होत असे. मी वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असताना हट्ट करुन, मंत्रिमंडळाकडे मागणी करुन ती बाजारपेठ वेगळी केली. ती बाजारपेठ दहा वर्षापूर्वी जालना येथे आणण्यात आली. नाहीतर संत्रा आणि मोसंबीचे सर्व उत्पन्न नागपूर मध्येच जात असे. आता मराठवाडयातील जालना बाजार समितीमध्ये मोसंब्याची जवळजवळ 350 कोटी रुपयांची उलाढाल होते. आहे. आता येथील उत्पन्न 6,39,8,747 रुपये इतके आहे. परभणी येथील बाजार समितीमध्ये जमा होणारे उत्पन्न 4,89,84,166 रुपये इतके आहे. हिंगोली येथील बाजार समितीमध्ये जमा होणारे उत्पन्न 2,46,33,434 रुपये इतके आहे. बीड येथे 9 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 6,17,57,438 रुपये इतके आहे. लातूर येथे 8 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 5,11,70,750 रुपये इतके आहे.नांदेड येथे 18 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 4,27,97,203 रुपये इतके आहे.उस्मानाबाद येथे 7 बाजार ....

. . . .के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 1,32,37,423 रुपये इतके आहे.अकोला येथील 7 बाजार समित्यांकडे जमा होणारे उत्पन्न 6,20,17,969 रुपये इतके आहे.वाशिम येथील 5 बाजार समित्यांकडे जमा होणारे उत्पन्न 5,01,95,581 रुपये इतके आहे.अमरावती येथे 12 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 10,44,88,882 रुपये इतके आहे. बुलढाणा येथे 13 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 11,86,89,258 रुपये इतके आहे. यवतमाळ येथे 17 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 8,10,95,013 रुपये इतके आहे. भंडारा येथील 5 बाजार समितीमध्ये जमा होणारे उत्पन्न 2,16,02,256 रुपये इतके आहे. गोंदिया येथील 5 बाजार समितीमध्ये जमा होणारे उत्पन्न 19,22,09,756 रुपये इतके आहे. चंद्रपूर येथे 12 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 4,21,21,168 रुपये इतके आहे. गडचिरोली येथे 4 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 6,74,07,985 रुपये इतके आहे. नागपूर येथे 12 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 22,47,31,762 रुपये इतके आहे. वर्धा येथे 7 बाजार समित्या असून तेथे जमा होणारे उत्पन्न 6,85,27,536 रुपये इतके आहे. एकूण 282 बाजार समित्या असून सेसच्या माध्यमातून याठिकाणी जमा होणारे उत्पन्न 296,26,58,657 रुपये इतके आहे. मी हे सगळे का वाचून दाखविले ? तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नातून अशा प्रकारे कोट्यावधी रुपये जमा होतात. हा शेतकऱ्यांचा पैसा आहे. आपण कल्पनाही करु शकणार नाही की, चंद्रपूर सारख्या बाजार समितीमध्ये कोट्यावधी रुपयांचा सेस जमा होतो, म्हणजे तेथे किती रुपयांची उलाढाल होत असेल ? याची कल्पना करावी.

यानंतर कु.धनश्री . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे... 11:35

श्री. दिवाकर रावते...

सगळया कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये किती रुपयांची उलाढाल होत असते ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, प्रत्येक बाजार समितीचे एक वैशिष्टय आहे. तेथे कोणता माल येतो, कोठून माल येतो ? या बाजार समित्यांची वार्षिक उलाढाल पाहिल्यानंतर असा प्रश्न निर्माण होतो की, हा सर्व पैसा नक्की जातो कुठे ? आपण म्हटले होते की, बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करणार, म्हणजे नक्की काय करणार आहे ? कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कोटयावधी रुपये जमा होतात. त्यांच्याकडे मी सांगितलेल्या रकमेपेक्षा जास्तच पैसे जमा होत असतील, त्यापेक्षा कमी पैसे जमा होत नसतील. या पैशाचे काय केले गेले ? शेतक-यांच्या हिताकरिता कोणत्या योजना राबविल्या आहेत ? ज्या बाजार समितीने बोर्डाला पैसे दिले नाहीत त्यांच्यावर टाच आणण्याचे ठरविले आहे. या संदर्भात मी पुढे बोलणार आहे. हे सर्व पैसे जातात कुठे ?

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांच्या उत्तराच्या भाषणास दोन - तीन तास लागले तरी चालतील. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यवस्थापन कोणत्या दिशेने चालले आहे, हे आम्हाला कळाले पाहिजे. शासनाच्या माध्यमातून कळाले पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात शासन कोणत्या उपाययोजना करीत आहेत, कोणत्या नवीन धोरणांची अंमलबजावणी करीत आहेत, याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यवस्थापन केले पाहिजे, त्यासाठी प्रशासक नेमला पाहिजे. या बाजार समित्यांकडे कोटयावधी रुपये जमा होत असताना कोणते व्यवस्थापन तेथे केले जात आहे ? सभापती महोदय मी अत्यंत खेदाने आपणास एक गोष्ट सांगू इच्छितो की, महाराष्ट्र, कृषि उत्पन्न पणन, अधिनियम क्रमांक 1963, या विधेयकात अधिक सुधारणा करण्याकरिता विधेयक क्रमांक 68 आणलेले आहे. या सर्व संयुक्त समित्यांचे अहवाल आता माझ्याकडे आहेत. या संयुक्त समित्यांमध्ये मी एक सदस्य होतो. या समित्यांच्या अहवालामध्ये सर्व विषयावर बारीक सारीक चर्चा यापूर्वी झालेली आहे. हे विधेयक येथे कशाकरिता आणलेले आहे तर जागतिक, आर्थिक करारानुसार म्हणजेच गॅट करारानुसार हे बिल तयार करण्यात आले होते. सध्या महागाई फक्त आमच्याच हिंदुस्थानात किंवा महाराष्ट्रात वाढलेली नसून सर्वच जगामध्ये महागाईचा भस्मासूर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

झालेला आहे. सर्व देशामध्ये महागाईचे प्रमाण वाढलेले आपल्याला दिसून येईल. परवा महागाईच्या संदर्भात सभागृहात देखील बरीच चर्चा झाली होती. पूर्वी मॉडेल ॲक्ट आणण्यात आला होता. हे कायदे घटनेतील कोणत्या तरतुदीप्रमाणे करण्यात येत आहेत ? केंद्र शासनाचे नाव घेऊन हे कायदे कशाकरिता आणण्यात येत आहेत ? घटनेतील युनियन लिस्ट क्रमांक 1 मध्ये केंद्र शासनाने कोणत्या विषयासंदर्भात कायदे करावयाचे आहेत याची माहिती दिलेली आहे. या यादीमध्ये केंद्र शासनाला 97 विषयासंदर्भात कायदे करण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार एक विधेयक सध्या समिती समोर आहे. तसेच या बाबत मला असे आढळून आलेले आहे की, या यादीमध्ये पणन संदर्भात काहीही उल्लेख नाही. तसेच शेतकी जमीन ट्रान्सफर करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाला कायदे करण्याचे अधिकार यादी क्रमांक 1 मध्ये आहेत.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

ॲग्रीकल्चर उत्पादनाबदल त्यामध्ये उल्लेख नाही. राज्याच्या यादीमध्ये पणन व्यवस्थापन करण्याच्या संदर्भात कायदा करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. कंकरंट लिस्ट पाहिली तर त्यामध्ये सुध्दा याचा उल्लेख नाही. फक्त राज्याचा अधिकार आहे आणि घटनेच्या आर्टिकल 252 प्रमाणे जर देशातील तीन राज्यांनी एखादा ठराव केला तर केंद्र सरकार कायदा करु शकते अशी घटनेमध्ये तरतूद असेल आणि त्याप्रमाणे विधेयक क्रमांक 68 आणले ते केंद्र शासनाने केलेल्या ड्राफ्टप्रमाणे आणले. केंद्राने सांगितले की, आपण हा कायदा ताबडतोब करावा, आपल्याला 1500 ते 2000 कोटी रुपये देणार आहोत. आम्हाला माननीय मंत्रिमहोदयांकडून हे समजले पाहिजे की, हा कायदा मंजूर झाल्यानंतर पणन व्यवस्थापनाकरिता किती पैसे आले ? पणन व्यवस्थापनाकरिता पैसे येणार होते. ते पैसे आले का ? ते पैसे कोठे आहेत ? त्या पैशाचा कसा वापर करणार आहात ? त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, जागतिक दर्जाची बाजारपेठ निर्माण व्हावी तसेच आपल्या शेतकऱ्यांनी जागतिक बाजारपेठेत आपला माल पोहोचवावा याकरिता हे विधेयक आणले. याचे उद्देश मजेशीर आहेत. ज्यावेळी हे विधेयक मांडण्यात आले त्यावेळी असे सांगण्यात आले की, केंद्र सरकार पैसे देणार आहे. केंद्र सरकार पैसे का देणार आहे ? जो जागतिक करार झाला त्या करारानुसार हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आपल्याला जे पैसे मिळणार होते ते मिळाले का ? आपल्या बाजार समित्यांचे आधुनिकीकरण करावयाचे आहे. ते आधुनिकीकरण म्हणजे संगणक आणावयाचे, ऑनलाईन भाव ठरवावयाचे, शेतकऱ्यांनी मार्केटिंग करावयाचे, ट्रान्स्पोर्ट व्यवस्थापन करावायचे, नाशवंत मालाची काळजी घ्यावयाची, ते प्रिझर्व करुन ठेवावयाचे, गोडावून निर्माण करावयाचे हे सर्व पणन व्यवस्थापनामध्ये आहे. हे विधेयक मंजूर करुन दिल्यानंतर केंद्र शासनाकडून पैसे आले की नाही, हे माहीत नाही. एकाही बाजार समितीमध्ये असे काही घडल्याचे दिसत नाही. जे 5-25 संगणक आणले ते ऑपरेटर अभावी बंद पडले आहेत. मला माननीय मंत्रिमहोदयांचे त्यावेळचे शब्द आठवतात. त्या समितीमध्ये ते असे म्हणाले होते की, आता मध्ये अडते, दलाल वगैरे कोणी असणार नाही. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर शेतकरी तिकडे येऊन स्वत: ग्राहकांना आपला माल विकू शकतील. कंपाऊंडच्या बाहेर विकला तरी शेतकऱ्यांना तशी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

परवानगी असेल आणि त्याला सेस लागणार नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. दांडेगावकर त्यावेळी उपस्थित होते. या शेतकऱ्यांना थेट मालाची विक्री करण्याचा अधिकार मार्केट कमिटीतून देत असताना त्या शेतकऱ्यांनी थेट माल विकावा म्हणून मार्केट कमिटीने पणन व्यवस्थापन निर्माण करण्यासाठी आपल्याला केंद्र सरकारचे पैसे मिळणार, खाजगी बाजारपेठ निर्माण होणार असे म्हटले होते त्याचे काय झाले ? खाजगी बाजारपेठेचा विषय मी पुढे मांडणार आहे. एन.टी.सी. असेल, रिलायन्स असेल हे सगळे भयानक आहे. माझा मूळ मुद्दा असा आहे की, या कमिटीच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात मी बोलणार आहे. हे व्यवस्थापन करण्याकरिता कोणती पध्दत अवलंबिणार ? यामध्ये प्रचंड निधी उपलब्ध आहे. 300 कोटी रुपये दरवर्षी येत आहेत. त्याचे काय नियोजन केलेले आहे. त्याचा खर्च कसा होतो ? यामध्ये काय परिस्थिती आहे हे आपल्याला माहीत आहे. ग्रामीण भागामध्ये आपण पाहात आहात. या विषयाशी जे संबंधित आहेत त्यांना हे माहीत आहे. मी संचालक झालो की, गरज असो किंवा नसो, माझी 10 माणसे नोकरीला लावतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ श्री.बरवडनंतर 11:45

श्री.दिवाकर रावते....

आता सहकारी बँकेत आणि सहकारी सोसायटयांमध्ये, कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सदस्य होण्यासाठी का चढाओढ असते ते मी सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अजितदादा पवार हे आमच्या परभणीला आले होते. त्यांनी तेथे केलेले भाषण संपूर्ण महाराष्ट्राने ऐकलेले आहे. कधी कधी ते राज्याच्या मुख्यमंत्र्यांसारखे बोलत असतात. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री असे असावेत असे वाटते. त्या व्यासपीठावर सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.दांडेगावकर हे देखील उपस्थित होते. सन्माननीय श्री.अजित पवार असे म्हणाले होते की, "मराठवाडयामध्ये सहकाराऐवजी स्वाहाकार झालेला आहे, नोकर भरतीमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे, असा भ्रष्टाचार करणा-यांना तुरुंगामध्ये पाठविले पाहिजे." मला त्यांचे म्हणणे खरे वाटले. मला असे प्रामाणिकपणे वाटले की , राज्यकर्ता असावा तर असा. सन्माननीय श्री.अजितदादा पवार हे असे वक्तव्य करुन थांबले असे नाहीत तर त्यांनी ते करुन दाखविले, त्याचे मला कौतुक वाटते.

सभापती महोदया, मी सहकार मंत्री असताना भरतीबाबतची फाईल माझ्याकडे आली असताना मी ती नाकारली होती. पण सत्तापालट झाल्यानंतर ताबडतोब ती फाईल मंजूर करण्यात आली. अशाप्रकारच्या नस्त्यांना मंजुरी कशी मिळते ते आपणाला ऐकवितो. त्याबाबतचे गणित अजून सुटले नसल्यामुळे मी व्यथित आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अजितदादा पवार बोलतात ते करुन दाखवितात. मी परिवहन मंत्री असताना माझ्यासमोर एक फाईल आली होती. एका माणसाला कामावरुन कमी केल्यावर पुन्हा कामावर घेण्याबाबतची ती फाईल होती. दुसरे एक मंत्री त्याला कामावर घेण्याबाबत आग्रही होते. त्यावेळी त्या फाईलवर मुख्य सचिव आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे नोटिंग होते. भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झालेले होते. ती फाईल माझ्याकडे आल्यानंतर "नस्तीमध्ये असलेल्या माननीय मुख्यमंत्री यांच्या शे-यानुसार विचार करता येत नाही," असे लिहून ती फाईल परत पाठवून दिली होती. संबंधित व्यक्ती त्याबाबत काय काय उपद्व्याप करीत होती ते मी रेकॉर्डवर आणू इच्छित नाही. त्यानंतर मला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बोलवून घेतले होते. ते मला असे म्हणाले की, "तू हे काम बरोबर केले." मला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते.....

इतकेच म्हणावयाचे आहे की, अतिशय काळजीपूर्वक काम करावे लागते. त्यावेळी मला अनुभव नव्हता. आमची सत्ता गेल्यानंतर मी ज्याला नोकरीवर घेण्याचे नाकारले होते ती व्यक्ती मला देवगिरी येथे भेटली. मी त्या व्यक्तीचे नाव घेणार नाही, प्रकरण सुध्दा सांगणार नाही. पण त्या व्यक्तीने मला सांगितले की, माझे औरंगाबादला पोस्टींग आहे. मला प्रश्न पडला की, ही व्यक्ती पुन्हा नोकरीत कशी काय येऊ शकते ? पण तसे घडले. मंत्रिमहोदयांना खरे खोटे करावयाचे असेल तर ती फाईल अजूनही मंत्रालयात असेल, त्यांनी ती पहावी. त्या व्यक्तीला कामावर घेताच येत नव्हते. अशा भ्रष्टाचारी माणसास सरकार कामावर पुन्हा कसे काय घेऊ शकते ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

सभापती महोदय, अशा पध्दतीने नस्त्या आणि प्रकरणे हाताळणारे माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार हे जे काही बोलले ते त्यांनी अमलात आणून दाखविले. नगर परिषदेच्या संदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत माणसे संभाजीनगरमध्ये तुरुंगात गेली.

**तालिका सभापती** : या विधेयकावर बोलणा-या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली नाहीत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आम्ही नावे दिलेली आहेत. या पध्दतीचा आम्हाला तीन-चार वेळा अनुभव आलेला आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी तपासून घेते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदया, सन्माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांनी परभणीत घोषणा केली आणि त्याची ताबडतोब अंमलबजावणी केली. बाबा तुरुंगात गेले. मला वाटते की, खरेच सहकार खाते त्यांच्याकडे असायला पाहिजे होते. किमान पश्चिम महाराष्ट्रा व्यतिरिक्त सगळीकडे साफसफाई झाली असती. विषय नगर परिषदेचा आहे. एवढे 300कोटी रु.चे उत्पन्न येत असताना हे पैसे कोणत्या व्यवस्थापनामध्ये जातात याचे उत्तर ग्रामीण भागातील शेतक-यांना अजून मिळालेले नाही. धोतर नेसून, मळक्या कपडयामध्ये आपला माल घेऊन यावयाचा, अडत्याच्या पुढ्यात बसायचे, त्याच्या ताब्यात माल द्यायचा आणि दोन पैसे हाती येतील ते घ्यावयाचे. म्हणजे आपल्या मालाचा निर्णय हा तो अडत्यावर सोपवून मोकळा होतो. व्यवस्थापन करणारे कसे असावेत, त्यांचे व्यवस्थापन कसे आहेत यासंबंधी कालच्या दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये वृत्त छापून आलेले आहे. आता निवडणुका होणार आहेत, काय होणार ते बघा. ते अधिकार आपण घेत आहात. महाराष्ट्रातील गरीब शेतक-यांचा माल ज्या बाजारपेठेमध्ये जातो त्या बाजारपेठेत शेतमालाचे भाव ठरविण्याचे अधिकार शेतक-याला मिळाला पाहिजे. अशी श्री. शंकर पाटील यांनी मागणी केलेली आहे. मॉडेल ॲक्टमध्ये आपण असे म्हटलेले हाते. परंतु हे सरकार हे अधिकार शेतक-याला कधीही मिळू देणार नाही, असे क्रांतीसिंह नाना पाटील मंडईचे श्री. शंकर पाटील यांनी सांगितलेले आहे. ....

...नंतर श्री. गिते....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आजही हीच परिस्थिती आहे. शेतात घाम घाळून भाजीपाला पिकविणा-या शेतक-याला आपल्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नाही. शेतातला माल बाजारात आल्यावर त्याची किंमत अडते ठरवितात. बाजारात आजही हात्या पध्दतीने म्हणजे हातरुमाल टाकून होणा-या व्यवहाराव्दारे भाव निश्चित केले जातात. परवा मी या संदर्भात बोललो की, हातांवर हात रुमाल टाकून भाव ठरविण्याचे काम चालले आहे. अशा व्यवहारावर बंधन आहे. त्या बाजार समितीमध्ये मंडळ नियुक्त झालेले नाही. तेथील मंडळ निवडूनही आलेले नाही. तरी देखील त्या बाजार समित्यांमध्ये अशा पध्दतीने व्यवहार होत आहे, त्या व्यवहारावर शासनाकडून कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई केली जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. तसेच असे व्यवहार रोखण्यासाठी शासनाकडून, बाजार समित्यांकडून माणसे नेमली जात नाहीत. शेतीमालाचा लिलाव झाला पाहिजे असा कायदा आहे. परंतु सरकार हा कायदा धाब्यावर बसविते. शेतक-याला माल थेट बाजारात विकण्याची संधी दिली जाईल अशी घोषणा सरकारने वारंवार केली आहे. परंतु शेतमालाचा दर ठरविण्याचे सर्व अधिकार व्यापा-याकडे असल्याने शेतक-याची लूट होते. ग्राहक नडला जातो. वारंवार आवाज उठवूनही सरकारला ही पध्दत बंद करता आलेली नाही. शेतक-यांकडून 10 रुपये किलोप्रमाणे विकत घेतली जाणारी भाजी मुंबईत तीन पट जादा दराने विकली जाते, अशावेळी कृषि उत्पन्न बाजार समित्या काय करतात ? कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये स्वच्छ कारभार करणा-या प्रशासनाची गरज आहे. कायद्यात जी तरतूद आणत आहात, त्याचे सुतोवाच या ठिकाणी झालेले आहे. जनतेचे मत फार महत्वाचे असते. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये स्वच्छ कारभार करण्याची प्रशासनाची गरज आहे, परंतु या समित्यांच्या कारभार पारदर्शक नाही आणि या समित्यांवर पणन मंत्र्यांच्या वचक नाही. ग्राहकांना रास्त दरामध्ये भाजीपाला मिळण्यासाठी सर्वप्रथम कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करुन शेतक-यांना थेट मुंबई व मोठया शहरात शेती माल विकण्याची परवानगी दिली पाहिजे, तरच भाजीपाल्याचे दर नियंत्रित राहतील. मुंबईत लहान मोठया 140 मंडया आहेत. त्या मंडयांच्या बाहेर सर्रास बेकायदा भाजीवाले व फेरीवाले बसतात. मी त्यांना परप्रांतीय म्हणत नाही. परंतु त्या ठिकाणी बसणारे हे सर्वच परप्रांतीय आहेत. रेल्वे स्टेशन व मंडयांच्या 200 मीटर परिसरामध्ये फेरीवाल्यांना बंदी आहे, पण नेमक्या याच परिसरात ते बस्तान मांडतात. हे भाजी विक्रेते सरकारला सर्व प्रकारचे कर भरतात. परंतु मंडयांमध्ये स्वच्छता आणि इतर सुविधांचा

2....



ABG/ प्रथम श्री. शिगम 11:55

श्री. दिवाकर रावते....

अभाव असतो. भाजी मार्केटमध्ये प्रचंड घाण असते अशी तक्रार आहे. आपण या ठिकाणी मार्केटच्या व्यवस्थापना विषयी चर्चा करीत आहोत. फुटपाथवर विक्री करणा-यांकडून ग्राहक भाजी खरेदी करतात या भाजी विक्रेत्यांकडून वजनात ग्राहकांकडून सर्रास लूट होते. सरकारला विकासाच्या नावाखाली भाजी मंडया खाजगी विकासकाच्या घशात घालण्याची इच्छा दिसते आहे. सरकारच्या धोरणाबद्दल त्यांनी मतच मांडून टाकले आहे. मुंबईच्या फुटपाथवर भाजी विक्रेत्यांने असेही बस्तान मांडले आहे, तर शेतक-यांना आपला शेतीमाल फुटपाथवर विकण्यास हरकत काय आहे ? बाहेरचे फेरीवाले बसतात, त्याऐवजी शेतक-यांना फुटपाथवर बसू द्यावे, त्यास काय हरकत आहे ? दादर येथे टिळक पुलाजवळ सकाळी दोन तास भाजी बाहेरुन येते, त्या ठिकाणी मुंबईतील भाजी विक्रेत भाजी खरेदी करुन निघून जातात. त्या ठिकाणी महानगरपालिकेने बुलडोझर ठेवलेला आहे. ते तेथील सगळा कचरा लगेच साफ करतात. सकाळी 8.30 नंतर त्या ठिकाणी भाजी विक्री होते हे देखील कळत नाही. त्या ठिकाणी माल शेतक-यांकडून येतो की अडत्यांकडून येतो तो विषय वेगळा आहे. बोरिवली स्टेशनला 40 वर्षे चालत असलेल्या बेकायदेशीर व्यापा-यांकडे बाजार समितीचे लक्ष नाही. त्यामुळे शासनाचा सेस बुडतो आहे. बलसाडचा आंबा व डहाणूच्या चिकुचा त्या ठिकाणी मोठा व्यापार चालतो. त्यामुळे सरकारचा लाखो रुपयांचा सेस बुडतो आहे. हे सर्वसाधारण जनतेला कळते. ते सरकारला कळत नाही काय ? संबंधित विभागास माहिती नाही काय ? निबंधकांना कळत नाही काय ? या गोष्टीमुळे सरकारचा लाखो रुपयांचा सेस बुडतो आहे. रेल्वेच्या सुरक्षा बोर्डाच्या अधिका-यांना मलिदा मिळतो. कारण त्या ठिकाणी रेल्वेची हद्द आहे. त्या ठिकाणी मोठा व्यापार चालतो. माननीय सहकार राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी एखादी फेरी मारली तर तेथील व्यापाराविषयी आपल्याला कल्पना येईल. कै.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना कांजुरमार्ग येथे मंडईसाठी एक भूखंड दिला होता. या भूखंडाचे माजी मुख्यमंत्री श्री.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी उदघाटन केले. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करावे, पश्चिम विभागात एक बाजार समिती निर्माण करावी अशी मागणी आहे. मुंबई बाजार समितीचे विभाजन करणे योग्य नाही. तसे शासनाने करु नये असे माझे मत आहे. त्याचे कारण त्याचा कब्जा दुसरीकडे जाईल. कांजुरमार्ग येथे भाजी मंडईसाठी भूखंड दिला होता,

3...



श्री. दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या भूखंडाचे माजी मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यानी उदघाटन केले होते. आज तो भूखंड कोणाला दिला काय या विषयी महसूल विभागाने कधी माहिती घेतली आहे काय ? सद्य:स्थितीत तो भूखंड कोणाकडे आहे त्याबाबतची माहिती आम्हाला सांगा.

यानंतर श्री. कानडे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

सभापती महोदय,नाशिक, पुणे, राजगुरुनगर, खेड, बारामती, निफाड, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश येथून मुंबईच्या बाजार समितीमध्ये माल येतो. व्यापारी दर वाढवितात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जिवावर सरकार निवडून येते त्यांचा मान राखला जात नाही. ग्रामीण भागातून आलेले राजकीय नेते सरकार चालवीत आहेत. तरीही शेतकऱ्यांना मालाचा दर ठरविण्याचा अधिकार नाही. उद्या शहरी भागातील नेतृत्व राज्याला लाभले तर शेतकऱ्यांना कोणीच वाली राहणार नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या बरखास्त केल्या तर अडत्यांच्या हातातून सुटका होऊन शेतकऱ्याला थेट भाव मिळेल. माल विकण्याची संधी मिळेल. महागाई वाढली म्हणून बाजार समित्यांना दोष दिला. असे हे बाजार समित्यांचे व्यवस्थापन आहे. शासनाला या कायद्यातून कोणते व्यवस्थापन निर्माण करावयाचे आहे ? व्यवस्थापनाचे धिंडवडे जाहिररित्या निघत आहेत. 300-350 कोटी रुपयांचा सेस बाजार समित्यांच्या माध्यमातून जमा होतो. या सेसच्या माध्यमातून कोणता विकास केला ? विकास का झाला नाही ? बाजार समित्यांच्या माध्यमातून जमा होणारा सेसचा पैसा कुठे गेला ? बाजार समित्यांवर बसलेले जे संचालक आहेत ते कसे आहेत ? त्यांची मालमत्ता किती आहे हे वेगळयाने सांगण्याची गरज नाही. सहकार राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, 15/20 दिवसापूर्वी परभणीच्या बाजार समितीमध्ये दंगल झाली. कशावरुन दंगल झाली आणि का दंगल झाली याचा शासनाने शोध घेतला काय ? बाजार समित्यांच्या व्यवस्थापनातून दंगल झाली. कोणाच्या हातात बाजार समित्या आहेत ? ज्यांच्या हातात ताकद आहे, मूठ आवळायची ज्यांची ताकद आहे, ज्यांच्यात ठोकायची ताकद आहे असे धन-दांडगे बाजार समित्यांच्या संचालक पदावर आहेत. आमदारकीच्या निवडणुकीसाठी जेवढी चुरस नाही तेवढी चुरस बाजार समित्यांच्या संचालक पदाच्या निवडणुकीत आहे. या निवडणुकीमधून प्रचंड प्रमाणावर संघर्ष निर्माण होतो. हे कोणते व्यवस्थापन आहे ? बाजार समित्यांचे संचालक मंडळ दौरे कशासाठी करतात ? किती दौरे करतात आणि दौऱ्यातून काय साध्य होते ? पैशाची उधळपट्टी चाललेली आहे. अडत्यांच्या संदर्भात निर्णय घ्या. विधेयक मंजूर झालेले आहे. निर्णयाला स्थगिती दिलेली आहे ती उठवा. कायदा केलेला आहे. शेतकऱ्यांच्या हिताकरिता या सरकारची बांधिलकी असेल तर अडत्यांचे हे सर्व उद्योग थांबविण्याची गरज आहे. शेतकऱ्याच्या मालाला त्याचे दाम आणि त्याबद्दलचा सेस आहे तो अडत्यांनी भरायचा आहे असा कायदा केला आहे. तुमची सत्ता आहे. कायदा केल्यानंतर आमचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सरकार दोन वर्षांनी बदलले. स्थगिती दिली आहे ती तुम्ही उठवा. गेली 8 वर्षे हे सरकार काय करीत आहे ? नपुसकत्व कशाला सिध्द करता ? आम्ही नादानपणा केला तुम्ही खोडून काढा. तुमच्या सरकारने आतापर्यंत काय केले ? प्रत्येक मंत्री म्हणतो युतीच्या राजवटीत काय केले ? मी म्हणतो आघाडी सरकारने 8 वर्षात काय केले ? खालच्या सभागृहात महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री म्हणाले की, तुम्हांला 1999 साली सत्ता मिळाली नाही. त्यावर श्री. गोपीनाथ मुंडे म्हणाले की, काकांना घरी पाठविले तेथे तुमचे काय ? त्यांनी सांगितले की, 2004 साली सत्ता दिली नाही. तुम्हांला सत्ता दिली तर आमच्याकडे बोटे कशाला दाखविता ? तुम्ही मर्दुमकी दाखवा.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

तुमचा संसार चालवा. तुम्हाला मुलेबाळे होऊ द्या. आम्ही केले नाही. परंतु तुमचे बघा ना. तुम्हाला का मुलेबाळे होत नाहीत. सतत त्यांचा संसार, त्यांचा संसार चालू आहे. विषय हा महत्वाचा असा उत्पन्न होतो की, त्या कायद्यातील अडत्यांबाबतची समस्या आहे, मला इतका आनंद झाला. रेकॉर्डवर वाक्य आले. पण मंत्रीमहोदय बसून बोलल्याचे रेकॉर्डवर येते का हे मला माहिती नाही. मी मात्र बसून बोललेले रेकॉर्डवर येते. मी बसून बोलल्याबद्दल माननीय सभापतींनी मला तंबी दिली. तेव्हा मी प्रोसिडिंग चेक करुन घेतले. त्यात "श्री.दिवाकर रावते...(बसून)..." असा उल्लेख होता. सभापतींनी समज कशासाठी दिली हे रेकॉर्डवर येण्यासाठी त्यांनी नोंद घेतली. हा त्यांचा दोष नाही. तंबी कशासाठी दिली? मी फक्त बसून बोललेले रेकॉर्डवर येते. तुम्ही बोललेलो येत नाही. परंतु मंत्रीमहोदय आपण जे वाक्य बोललात त्याबद्दल मला अभिमान वाटतो. कायद्याला स्थगिती देत असताना ती युती सरकारने दिली असे आपण म्हणालात. कृपा करुन ती स्थगिती बेकायदेशीर असल्यामुळे ताबडतोब उठवावी. आठ वर्षे झाली. का स्थगिती उठवत नाही? स्थगिती उठवा. मी तुमचे अभिनंदन करतो. एवढी कार्यक्षमता असताना आठ वर्षे स्थगिती उठविली नाही. आता ती कार्यक्षमता दाखवा आणि त्या मॉडेल ॲक्टमधून शेतकऱ्याला बाहेर काढा. कालच्या महाराष्ट्र टाईम्स दैनिकामध्ये श्री.शंकरराव पाटील यांनी मंत्रीमहोदयांबद्दल चांगले उद्‌गार काढले आहेत. पणनमंत्र्यांनी याबाबत लक्ष घालावे असे खोचक शब्द वापरले आहेत. दिनांक 4 एप्रिल, 2008 च्या सकाळ दैनिकाच्या ॲग्रोवन पुरवणीमध्ये संपादकीय लेख प्रसिध्द झाला आहे. त्याचे शिर्षक "नामा रिंगणाच्या शेतक-यांचे दु:खवर्धन" सन्माननीय पणनमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांचा उल्लेख 'दु:खवर्धन' असा केला आहे. संपूर्ण लेख मी वाचून दाखवत नाही. ॲग्रोवनमध्ये म्हटले आहे की, गेल्या दोन वर्षापासून बाजार समित्यांमधील काही बेकायदा व शेतकरीविरोधी कुप्रथा चव्हाट्यावर मांडल्या. श्री.शरद पवार सकाळ वृत्तपत्राच्या माध्यमातून ॲग्रोवनद्वारे कृषिविषयक लेख प्रसिध्द करीत आहेत. त्याचे मार्गदर्शन घ्यायचे नाही का? किमान तुमच्या नेत्यांनी सांगितलेले तुम्ही करणार आहात की नाही? ॲग्रोवनमधून सतत त्यांनी मांडले आहे. मी सगळी कात्रणे मागवून घेतली आहेत. गेल्या दोन वर्षापासून आम्ही बाजार समित्यांमधील काही बेकायदा व शेतकरीविरोधी कुप्रथा चव्हाट्यावर मांडल्या. शेतकऱ्यांना भाव न मिळणारे शेतकरी बाजार समितीमध्ये कसे लुबाडले जातात हे उघड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

केले. नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाजारात हमाल, दलाल, पोलीस आणि गुंडांची दहशत आहे. दहशत दाखवून शेतकऱ्यांना रिंगण करुन मारण्याची पध्दत आहे. म्हणजे शेतकऱ्यांना एकत्र येऊन मारले जाते.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

या विधेयकातील कलम 15 (अ) मध्ये असले म्हटले आहे की, "बाजार समित्यांच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी" पण प्रत्यक्ष व्यवस्थापन कसे चालू आहे हे सांगून काय करायचे ते सुध्दा सांगा....अडथळा....मी विधेयकाच्या बाहेर जात नाही, आपण कृपया चिंता करु नये अशी मी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांना विनंती करतो. विधेयकावर तासन्तास मार्मिकपणे बोलले पाहिजे. आपण सुध्दा बोलावे व त्यातून आम्हाला मार्गदर्शन मिळू शकेल. कायद्याच्या बाबतीत कीस काढताना अशी चर्चा झाली पाहिजे की, ज्याप्रमाणे बाळंतीण बाईला प्रसृतीच्या वेदना होतात आणि त्या वेदना झाल्याशिवाय बाळंतीणीची सुटका होत नाही तशाच प्रकारच्या वेदना कायद्यावरील चर्चेतून विधेयकाला झाल्या पाहिजेत आणि असे झाले तरच त्यातून सुदृढ कायदा जन्माला येईल. म्हणून चर्चा करताना मी काय बोलतो, तुम्ही काय चर्चा करणार आहात यापेक्षा केवळ वेळ काढण्यासाठी चर्चा व्हावी आणि या चर्चेच्या अनुषंगाने जे सांगावयाचे ते सांगणे भाग आहे. उगाचच उठून कोणालाही चर्चा करता येत नाही तर चार दिवस अगोदर विधेयक सन्माननीय सदस्यांना दिले जाते व त्यामागचा उद्देश असाच असतो की, या विधेयकाच्या बाबतीत कोणते मुद्दे मांडावयाचे असतील तर सदस्यांनी ते मांडावेत. राज्यात बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी नागवला जातो व यासंदर्भात "ॲग्रो वन" या साप्ताहिकामध्ये सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. त्यासाठी ही विदारक परिस्थिती त्यांनी मांडली आहे. शेतकऱ्याला रिंगण करुन नागविले जाते, हमाल, पोलीस आणि गुंड शेतकऱ्याचा माल आम्ही सांगू त्याच भावाने दिला पाहिजे, अशा प्रकारची दहशत निर्माण करुन फिजिकली मारले जाते, अशा प्रकारचे दृश्य नाशिकच्या बाजारपेठेत उभे राहिल्यानंतर या कामकाजाच्या व्यवस्थापनासंबंधी आपण या विधेयकाच्या माध्यमातून चर्चा करीत आहोत. त्यावेळी ही परिस्थिती कशी व कोणत्या कायद्याच्या आधारे बदलेल याचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण ज्यांनी कायद्याची अंमलबजावणी करावयाची आहे तेच गुंडांना सामील होत आहेत, हे तर आणखीच गंभीर आहे. नाशिकची शासन असलेली कोथिंबीरीची जुडी विकताना सात जुड्या कापून घेण्याची जी पध्दत आहे ती ताबडतोब थांबवावी, अशी विनंती माननीय पणन मंत्र्यांना करण्यात आली. माननीय मंत्री महोदय स्वत: तेथे गेले होते. तसेच बाजार समितीचे फळविक्रेत्या व्यापाऱ्यांनी रुढ केलेली "नामा पध्दत" थांबवा

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

अशीही विनंती केली. ही काय पध्दत आहे तर समजा फळांचा ढीग आहे त्या ढिगाचा सौदा करावयाचा आणि व्यापाऱ्यांनी तोच माल विकताना मात्र नगाप्रमाणे विकायचा ही जी "नामा पध्दत" आहे ती बंद झाली पाहिजे. मग आपले व्यवस्थापन कशा प्रकारे राहणार आहे? ह्या सर्व चुकीच्या पध्दती सुरु आहेत तर बाजार समिती कोणत्या प्रकारचे व्यवस्थापन करीत आहे? यासाठीच वर्तमानपत्रे टाहो फोडून तुमच्या मागे लागलेली आहेत. तसेच मॉडेल ॲक्टबाबत बोलावयाचे झाले तर त्यात 10 किलोमीटरची अट सहजतेने घालून जो खेळखंडोबा पणनमंत्र्यांनी केला तेवढया सहजतेने या प्रथा बंद होणार नाहीत, अशी माहिती "ॲग्रो-वन" ने दिली. शेवटी त्यांनी असे म्हटले आहे की, बाजार समिती ही सर्वांची आहे, कायद्याप्रमाणे कारभार करण्याची जबाबदारी माननीय पणनमंत्र्यांची आहे ती त्यांनी जागरुकतेचे आणि चोख बजवावी, अन्यथा तेथे कलिंगडाची नामा पध्दत, कोथिंबीरीच्या चिखलाने शेतकरी भरला तर नामुष्की यायला नको....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शेतक-यांना कशा प्रकारे नाडले जात आहे यासंदर्भातील सर्व माहिती ॲग्रो वन या साप्ताहिकाने दिलेली आहे. कांदा, बटाटा याचे व्यवहार कसे होतात याचीही माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. यासंदर्भात माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेतले जावेत, खुल्या पद्धतीने शेतक-यांच्या मालाची विक्री झाली पाहिजे यासंदर्भात निर्णय दिला होता परंतु असे असतांनाही त्यासंदर्भात मात्र काहीही कार्यवाही होतांना दिसत नाही. यासंदर्भात माननीय हर्षवर्धन देशमुख यांनी बाजार समित्यांना भेटीही दिल्या परंतु शेतक-यांच्या बाजूचे कोणतेही निर्णय त्यांनी घेतले नाही त्यामुळे त्यांना शेतक-यांचे "दु:खवर्दन" अशी पदवी देण्यात आलेली आहे. एका बाजूने पणनचे धिंडवडे निघत आहेत. व्यापारी, आडते, हमाल आणि पोलीस हे हातमिळवणी करुन शेतक-याला नागवत आहे. आपण या विधेयकाच्या निमित्ताने बाजार समित्यांवर प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार स्वत:कडे घेत आहात. आपल्याला कल्पना आहे की, अजूनही महामंडळाच्या नियुक्त्या न झाल्यामुळे दोन्ही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. आपण जर गेल्या वर्षीच्या पाडव्याचे वर्तमानपत्र पाहिले तर त्यामध्ये "पाडव्याला महामंडळाच्या नियुक्त्या करण्यात येतील" अशी बातमी छापून आली होती. महामंडळावर नियुक्त्या करण्यात येतील असे शासनाने जाहीर केले होते परंतु तरीही महामंडळावर नियुक्त्या होऊ शकल्या नाहीत. त्यावेळेस यासंदर्भात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जाहीर केले होते की, "आमच्या पक्षाच्या याद्या तयार आहेत" सभापती महोदया, याद्या तयार आहेत याचा अर्थ काँग्रेसमुळेच महामंडळाच्या नियुक्त्या होत नाही असाच त्याचा अर्थ होतो. निवडणुका होऊन 8 वर्षे होऊन गेलेली आहेत परंतु अजूनही महामंडळावर नियुक्त्या झालेल्या नाहीत. केवळ कार्यकर्त्यांना झुलवत ठेवून सर्व निवडणुकांमध्ये त्यांचा फायदा घेण्याचे काम दोन्ही काँग्रेसकडून होत आहे. आता तर सर्व निवडणुका झालेल्या आहेत परंतु तरी सुध्दा महामंडळावर नियुक्त्या झालेल्या नाहीत. आता फक्त बाजार समित्यांच्या निवडणुका शिल्लक राहिलेल्या आहेत. त्यामुळे बाजार समित्यांच्या निवडणुका होईपर्यंत कार्यकर्त्यांना किंमत मिळेल असेही दिसत नाही. या ठिकाणी मी बाजार समित्यांच्या निवडणुकांच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

बाजार समित्यांच्या निवडणुकांमध्ये शेतक-यांची नावे गळाली तर त्यांना या निवडणुका लढता येणार नाहीत. त्यामुळे बाजार समित्यांच्या निवडणुकांमध्ये शेतक-यांची नावे गळणार नाहीत याची शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे परंतु तशा पद्धतीची काळजी घेतली जात नाही. याद्या बनवण्याच्याही काही पद्धती आहेत परंतु या पद्धतीचा अवलंब शासनाकडून केला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. आपल्या शेतक-यांचा फायदा कसा होईल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीमध्ये या विधेयकाच्या संदर्भात सखोल चर्चा होण्याची आवश्यकता आहे. तसेच दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीमध्ये या विधेयकासाठी 3 महिन्यांचा कालावधी ठेवण्याची आवश्यकता आहे व तीन महिन्यानंतर हे बील पुन्हा सभागृहात आणण्याची आवश्यकता आहे. या विधेयकाच्या संदर्भात शेतक-यांना साजेसा निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे कोणाला शेतकरी म्हणावे यासंदर्भात निर्णय होण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात ज्या शेतक-याकडे एक गुंठा जमीन आहे, 2 एकर जमीन आहे, 3 एकर, पाच एकर किंवा पंधरा एकर जमीन आहे त्यालाच आपण शेतकरी म्हणणार आहात काय? त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात आपल्याला सखोल चर्चा करावी लागणार आहे. शेतकरी कोणाला समजावे यासंदर्भात सुप्रीम कोर्टाकडे दाद मागण्याची वेळ आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.20

श्री.दिवाकर रावते..

या देशात शेतकऱ्यांची नीट व्याख्या तयार केली पाहिजे. आपण जर व्याख्या केली तर ती कोर्टात चॅलेज होईल व न्यायालयात गेल्यामुळे ती शुध्द होऊन येईल. एखाद्या कायद्यातील तरतुदीसंबंधी जर न्यायालयात आव्हान दिले जात असेल तर वाईट वाटून घेण्याचे काहीही कारण नाही. न्यायालयातून ती व्यवस्थित शुध्द होऊन येत असते आणि आपल्याला जे माहीत नसते ते या माध्यमातून आपल्याला कळते. कायद्याविषयी सर्वांना सारखे ज्ञान असते असेही नाही. सभापती महोदय, परवा मी वकिलाच्या संदर्भात बोललो असताना आपल्याला वाईट वाटले होते. दोन वकील दोन्ही बाजू मांडत असतात. त्यातील एक बाजू खरी असते आणि दुसरी बाजू असत्य असते परंतु प्रत्येक वकील आपला पेशा पार पाडत असतो. खून केलेल्या व्यक्तिची बाजू घेतली जाते तेव्हा त्याने खून केलेला नाही हे सांगणे देखील वकिलाचे कर्तव्य आहे. तो असत्य सांगत आहे हे माहीत असतांना सुध्दा तो वकील त्यांची बाजू घेत असतो व आपले कर्तव्य पार पाडत असतो तसे या विधेयकाच्या बाबतीत विधि खात्याने जर काही चुकीचे सांगितलेले असेल तर ते न्यायालयात जाऊन शुध्द होऊन येत असते अशा वेळी मी असे म्हणणार नाही की, विधीज्ञाला कायद्यातील काहीही कळत नाही, त्याने चुकीचे केले आहे. त्यामुळे सरकारची नाचक्की झालेली आहे .कायद्याने थप्पड मारलेली आहे. वगैरे वगैरे " त्याने जो केलेला आहे तो त्याच्या दृष्टीने कायदाच आहे. सर्व वकील "सात आंधळे आणि हत्ती" या गोष्टीप्रमाणे कायद्याचे परीक्षण करीत असतात . म्हणूनच वकिली चालते हे माझे म्हणणे बरोबर आहे ना ? सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी यांनी होकार दिलेला आहे. म्हणजे मी बरोबर बोललो आहे असे मला वाटते. त्यामुळे हा कायदा तयार करणारे कायदेतज्ज्ञ जे काही म्हणत आहे ते बरोबर आहे असे मी म्हणत नाही. त्यामुळे माझे असे म्हणणे आह की, हे विधेयक सयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे. परंतु सन्माननीय मंत्री म्हणतात की, संयुक्त समितीपुढे हे विधेयक कशाला न्यावयाचे यातील तरतुदी किरकोळ स्वरुपाच्या आहेत, त्यामुळे चर्चा करुन येथेच ते पास करुन टाकावेत. घाई घाईने विधेयक पास केल्यामुळे नंतर ती अडचणीत आलेली अशी 25 विधेयके मी आपल्याला दाखवून देईन. प्रत्येक वेळी माननीय मंत्री महोदय सांगतात की, हे विधेयक पास करुन टाका.मला त्यांना असे सांगावयाचे आहे की," हे विधिमंडळ आहे त्यामुळे येथे बाकीच्या संदर्भात चर्चा झाली नाही तरी चालेल परंतु कायदा करण्याची जबाबदारी विधिमंडळाची आहे त्यामुळे ही जबाबदारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

प्रामाणिकपणे आपण पार पाडली पाहिजे " त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील चर्चेत भाग घेतला पाहिजे ज्यावेळी या सदनातील प्रत्येक सन्माननीय सदस्य विधेयकासंबंधी आपले मत मांडावयास उभा राहील तो या सदनाचा वैभवाचा दिवस असेल .जनतेच्या व्यथा मांडणारे अनेक विषय असले तरी कायदे तयार करणे ही बाब सुध्दा अत्यंत महत्वाची असते कारण जो कायदा तयार होत असतो तो सामान्य माणसापर्यंत, शेवटच्या घटकापर्यंत परिणाम करत असतो. म्हणून या विधेयकासंबंधी मला असे सांगावयाचे आहे की, व्यवस्थापनाच्या बाबतीत मतदार कोण असावा, शेतकरी कोण असावा, शेतकऱ्याचे हक्क काय असावेत याची सांगड मॉडेल ॲक्टशी कशी असावी हे पहात असतांना आज शेतकऱ्याला माल कसा विकावयाचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे तेव्हा त्याही बाबत विचार करण्याची गरज आहे. आज अनेक महामंडळावर नियुक्त्या करावयाच्या राहिल्या आहेत. बाजार समितीच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे या कोंबडीला बर्ड फल्यू कधी होतच नाही, ही कोंबडी कधी मारावी लागतच नाही.या कोंबडीचे पिल्ले सारखी वाढतच असतात, पोल्ट्री मोठीच होत असते. शेतकरी कसा लूटला जातो या सबंधी ॲग्रोवनच्या पुरवणी मध्ये सविस्तर वर्णन प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्याबद्दल मी ॲग्रोवनच्या संपादकांना धन्यवाद देतो. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाबाबत व व्यवस्थापनाबाबत सदनामध्ये चर्चा होत असताना त्यावेळी तेथील कामकाजावर त्यांनी प्रकाशझोत टाकलेला आहे. त्यामुळे मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.बाजार समित्यामधील जी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली जाते ती राजकीच स्वरुपाचीच असते असे मला सांगावयाचे आहे. यानंतर मी दुसरा मुद्दा मांडणार आहे. कापूस एकाधिकार खरेदी हा विषय पणनशी सबंधित आहे. सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी हे या महामंडळाचे अध्यक्ष आहेत. शेतक-याचा कापूस कोण घेतो, त्याचे ग्रीन कार्ड कोणाकडे जाते त्या ठिकणी कापसाची खरेदी कशा प्रकारे केली जाते ? हेसुध्दा पाहण्याची गरज आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना जेव्हा होती तेव्हा 100 टक्के सेस जमा होत असे आज कापूस एकाधिकार खरेदी योजना चालू पण आहे आणि बंदही आहे. त्याचा परिणाम असा झाला की 300 कोटी रुपयापैकी 100 कोटी रुपयांचा सेस आज बुडत आहे.कापूस हा एक विषय घेतला तरी पणनमध्ये तो कशा पध्दतीने बसविणार आहात ? कोणाचा कापूस घेतला जाणार आहे आणि सेस किती जमा होणार आहे ? मी परभणीचे एक उदहारण दिले होते की , चार लाख क्विंटल

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.20

श्री.दिवाकर रावते..

कापसाचा 1 कोटी 5 लाख रुपयांचा सेस होता परंतु तेवढाच कापूस खाजगीमध्ये विकला गेला आहे. तेथे अधिकारी जातात व हा पैसा जमा करतात. त्यासंदर्भात त्यांची सगळकडे साखळीच असतें. याची सर्वांना माहिती आहे. एका प्रश्नाचे उत्तर मला अजूनही मिळालेले नाही. गेल्या 20 वर्षापासून मी हे पाहत आलेलो आहे की,

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

जिंतूरमध्ये असलेल्या कापसाला आगी का लागतात ? इतर कोठेही नाही, केवळ जिंतूरमध्येच या आगी लागतात, अगदी कायम या घटना तेथे घडत असतात, या मागचे कारण, या प्रश्नाचे उत्तर वर्षानुवर्षे मला मिळत नाही, मिळालेले नाही. मी तेथे अगदी पहाटे 5 वाजता गेलो होतो आणि विचारले होते की, या आगी कशा लागतात ? तेव्हा तेथे काहींनी मला प्रत्यक्ष चकमकीने कापूस कसा पेटवितात वगैरे सगळे काही दाखविले. सभापती महोदया, जिंतूरमध्ये या घटना कायम होत असतात आणि त्यांचे पचनामे देखील व्यवस्थित होतात. शेवटी दादांनाच मला हे सांगावे लागेल. शेवटी कापसाचा हा विषय पणन व्यवस्थापनातीलच एक विषय आहे. मी हे स्वतः अनुभवले आहे, डोळ्याने पाहिले आहे. सन्माननीय सदस्य डॉ.हिराणी यांनाही याची माहिती असावी. तेथे जी काही खरेदी झाली असेल ती कागदावर चुकीची दाखविली असेल तर मग सरळ त्या कापसाला आग लावली जाते, मग त्याची मोजदाद करता येत नाही आणि चुकाही झाकल्या जातात. सभापती महोदया, मी 3 वर्षापूर्वी या सदनात सांगितले आहे. पणन मंत्री तेव्हा समोर बसले होते. मी तेव्हाही सांगितले होते की, व्यापारी शेतकऱ्याला लुटत आहेत. तेव्हा आपल्याकडे एकाधिकार खरेदी कापसाची चालू होती. त्या योजनेत तेव्हा तीन हजार कोटीचा तोटा होता. तो तोटा शेतकऱ्याच्या घरात गेला असता तर मला फारसे वाईट वाटले नसते. या संदर्भात मुद्दा येथे काढला असता पणन मंत्र्यांनी तेव्हा या सदनात आश्वासन दिले होते, ते आपल्या रेकॉर्डवर आहे. त्यांनी सांगितले होते की, 100 क्विंटलपेक्षा जास्त खरेदी झाली आहे त्यांची यादी मी पटलावर ठेवीन तसेच सीआयडी चौकशी करीन आणि गुन्हेगार असतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करीन. हे आश्वासन दिल्यानंतर आजपर्यंत ती यादी पटलावर आलेली नाही आणि कोणावरही कारवाई झालेली नाही. एक एक माणूस 5 हजार क्विंटल कापूस विकत कसा असतो ? त्याचे पैसे मिळतात कसे ? सभापती महोदया, या बाजार समित्या कोणासाठी आहेत ? शेतकऱ्यांसाठी आहेत की, शेतकऱ्यांना लुटणाऱ्यांसाठी आहेत ? आम्ही चूक केली. मंजूर झालेल्या विधेयकाला कायद्यात स्थगिती देण्याची तरतूद नसताना आम्ही ती दिली आणि आम्ही तेव्हा बेकायदेशीर वागलो, हे आम्हाला मान्य आहे. त्या संबंधातील आव्हान मी तुम्हाला दिलेले आहे. परंतु आम्ही काय काय केले या पेक्षाही महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात तुम्ही शेतकऱ्यांच्या बाजूने आसूड घेऊन उभे राहणार आहात की नाही ? शेवटी या बाजार समित्या म्हणजे ..

.... व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

शेतकऱ्यांच्या जीवनाशी अत्यंत निगडित आहेत. या समित्यांमध्येच शेतकऱ्याला फसविले गेले तर तो आयुष्यातून उठतो. आजही शेतकऱ्यांच्या ज्या 82 आत्महत्या झाल्या त्या कशा झाल्या ? या वर्षामध्ये जानेवारी पासून आतापर्यंत 225 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्या कशामुळे झाल्या ? त्याबद्दल तुम्ही चिंतन केले पाहिजे. तुमचे पणन व्यवस्थापन उद्‌ध्वस्त झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि असे असतानाही तुम्ही अशा ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांची नेमणूक करणार असाल, प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची तरतूद हाती घेणार असाल तर त्यातून काय निर्माण होणार आहे ? तेथे कोणत्या प्रकारचा प्रशासक असावा, प्रशासक मंडळ नेमताना कोणती काळजी घ्यावी ? इत्यादी गोष्टींचा आपण विचार केला आहे काय ? सभापती महोदया, हे विधेयक चिकित्सा समितीकडे का गेले पाहिजे ? आता सुप्रीम कोर्टाने देखील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत निर्णय दिला आहे, तो या दृष्टीने महत्त्वाचा आहे, त्यातून आपण काही बोध घेण्याची आवश्यकता आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर जे संचालक मंडळ निवडून येईल त्या संचालकांना 100 रूपयाचा बॉंड द्यावा लागेल. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा या विधेयकाच्या संदर्भात आपण काही विचार करणार आहात की नाही ? ...

( यानंतर सौ. रणदिवे .... डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KTG/D पूर्वी श्री.सुंबरे . . . . 12:30

श्री.दिवाकर रावते . . . .

गृहनिर्माण संस्थेचा जो सदस्य या सोसायटीच्या कार्यकारी मंडळावर संचालक म्हणून निवडून येईल, त्यांनी 100 रुपयाच्या बॉण्ड पेपरवर असे लिहून द्यावयाचे आहे की, "माझ्या कारकिर्दीमध्ये या सोसायटीत हिशोबाचा घोळ झाला तर त्याची पूर्ण जबाबदारी माझ्यावर असेल आणि मी ती रक्कम पूर्णपणे भरुन देईन." एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण उपस्थित नाहीत. त्यांना गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत माहिती आहे. मुंबईमध्ये 18 हजाराच्या वर गृहनिर्माण संस्था आहेत. पण आता कोणता सदस्य अशा प्रकारचा बॉण्ड लिहून देणार आहे ? अशा वेळी कार्यकारी मंडळाची निवडणूक लढविण्यासाठी कोण पुढे येणार आहे ? जाणुनबुजून कोणी भ्रष्टाचार करीत नाही, पण ऑडीट केल्यानंतर चुकीचा खर्च झ ालेला आहे असे दिसून येते. शेवटी गृहनिर्माण संस्थांचा जो मॉडेल ॲक्ट आहे, तो सर्वांना पाठ नसतो आणि त्याप्रमाणे कामकाज चालते असे नाही. सोसायटीच्या गरजेप्रमाणे खर्च केला जातो आणि मग हा खर्च करा, तो खर्च करा, असे होते. मग जेव्हा ऑडीट होते, तेव्हा मुद्दे उपस्थित होतात. परंतु आता संस्थेच्या निवडणुका कोण लढविणार आहे ? याठिकाणी हे सर्व सांगण्याचा मुद्दा असा आहे की, जर सुप्रीम कोर्टाने अशा प्रकारचा निर्णय दिला असेल, अशा प्रकारचे बंधन घातले असेल, मग आपण 15 (क) नुसार बाजार समित्यांच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासक किंवा प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्याची तरतूद करीत आहोत, तर ते कशा प्रकारचे असावे ? त्यांच्यावर कोणती बंधने असावीत ? त्यांच्यावर कोणते निर्बंध असावेत ? त्यांच्या कारभाराची दिशा कशी असावी ? यासंदर्भात कायद्यामध्ये तरतूद कशी करता येईल हे पहावे लागेल. नाहीतर संयुक्त समितीमध्ये याबाबत चर्चा करुन ठरवावे लागेल. मग संयुक्त समितीच्या अहवालामध्ये म्हटले जाते की, कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद करावी. असे रेकॉर्डवर आल्यानंतर देखील तशा प्रकारचा नियम तयार झाला नाही तर मग संबंधित मंत्री महोदयांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव आणला जातो आणि ते त्यास पात्र ठरतात. केवळ गंमत म्हणून हा विषय नाही. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आल्यानंतर सहकार क्षेत्रामध्ये त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे, कुठपर्यंत करणार आहोत ? हा यातील विषय आहे. म्हणून यासंदर्भात सर्वंकष आणि पध्दतशीरपणे सर्व बारकाव्यांसह नियोजन होणे हे अत्यंत गरजेचे असल्यामुळे त्या बाबतीत देखील संयुक्त समितीमध्ये चर्चा झाली तर या सर्व कामकाजाचे वेगळया प्रकारचे नियोजन

. . . .डब्ल्यु-2

श्री.दिवाकर रावते . . . .

होईल आणि त्यावर नियंत्रणही ठेवता येईल असे माझे ठाम मत आहे. माझ्याकडे नाशिक, रत्नागिरी, पुणे, औरंगाबाद, नागपूर, लातूर, अमरावतीच्या इ.ठिकाणच्या बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च,तूट तसेच तेथील आस्थापनेवर होणारा खर्च इ.बाबतचा आराखडा आहे. याबाबतीत चिंतेची बाब आहे. नाशिकमधील बाजार समित्यांचे 2006-2007 चे उत्पन्न 1156,40,34,476 रुपये दाखविले असून खर्च 97,99,49,488 इतका आहे. त्यातील जो वाढावा आहे, "वाढावा" हा बाजार समितीमध्ये वापरला जाणारा शब्द आहे. सामान्य माणसाला अर्थ सांगावयाचे असेल तर वाढावा म्हणजे उत्पन्न आणि खर्च यामधून जी रक्कम शिल्लक रहाते, त्याला वाढावा असे म्हणतात. तर याठिकाणी 2006-2007 मध्ये हा वाढावा 27,41,78,886 आहे. तूट 90,09,38,55 रुपये असून आणि आस्थापनेवरील खर्च 31 कोटी 14 लाख रुपये आहे. एकंदर सात ठिकाणचे उत्पन्न 291,42,19,844 रुपयांचे आहे. येथील एकूण खर्च 244,70,05,613 रुपये इतका आहे आणि वाढावा 79,61,28,825 रुपये इतका आहे आणि तूट 129,01,6,754 रुपयांची असून, आस्थापनेवरील खर्च 84 लाख 64 हजार रुपये आहे. एकंदर आस्थापनेवरील खर्च जवळजवळ 44 टक्क्याच्या आसपास दाखविलेला आहे. अशा परिस्थितीत बाजार समित्यांचा विकास करण्याची जी कल्पना आहे, ती आपण कशा प्रकारे अंमलात आणणार आहोत ? असा प्रश्न निर्माण होतो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) : आपण अजून किती वेळ या विधेयकावर बोलणार आहात ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मला अजून कलम 45, कलम 57 वर बोलावयाचे आहे. कलम 35 वर बोलण्यास मी आताच सुरुवात केलेली आहे व कलम 15 वरील चर्चा आताच झालेली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी दोन गोष्टी मी आपणास सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकावर किती वेळ बोलावे हा त्यांचा प्रश्न आहे. आता सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य विरोधी बाकांवर बसलेले आहेत, ते देखील एके काळी सत्तेवर होते. त्यांनी सत्तेचा अनुभव घेतलेला नाही अशी परिस्थिती नाही. सुदैवाने ज्या वेळी त्यांच्या पक्षाचे सरकार होते, त्यावेळी ते सहकार मंत्री होते. त्यामुळे प्रशासन कसे चालते याचा त्यांना चांगला अनुभव आहे. या विधेयकामध्ये काय सुधारणा करणे आवश्यक आहे या संदर्भात त्यांनी जरुर त्या सूचना कराव्यात हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्या संबंधीचा जो प्रस्ताव आहे त्या संदर्भात त्यांनी जरुर बोलावे. परंतु प्रत्येक गोष्टीचा कीस काढत असताना, सभागृहामध्ये अन्य सन्माननीय सदस्यांना काहीच माहीत नाही असे समजून ते बोलत आहेत. माननीय सदस्य येथे भाषण करीत आहेत ते ऐकायला ठीक आहे. परंतु या सभागृहामध्ये चर्चेला किती वेळ द्यावा यावर काही मर्यादा आहेत. या सभागृहामध्ये विधेयकावर 24 तास बोलणारे सन्माननीय सदस्य देखील होऊन गेलेले आहेत. त्यांची नावे रेकॉर्डवर आहेत. आपण त्यांच्याप्रमाणे रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न करीत असाल तर माझी त्यास काहीही हरकत नाही. किती वेळ बोलावयाचे याची मर्यादा आपण ठरवून घेतली पाहिजे एवढेच मला या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मला आराम मिळावा याकरिता त्यांचे विचार मांडले आहेत. बराच वेळेपासून मी बोलत असल्यामुळे मला थोडा मध्ये आराम मिळावा याकरिता ते मध्ये बोलले आहेत. उद्या सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश देशमुख बोलण्याकरिता उभे राहिले तर मी देखील असेच करणार आहे. सन्माननीय सदस्य

2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाक रावते...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना जी गोष्ट माहीत नाही ती गोष्ट मी आता येथे सांगणार आहे. तुम्हाला माहिती नाहीत अशा अनेक गोष्टी आहेत. सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना, 93 ची निवेदने येतात, एखाद्या विषयाबाबत सन्माननीय सदस्यांना त्याची माहिती असते व तो विषय ते सभागृहात मांडतात. मग त्या विषयावर सभागृहात चर्चा होते. बीड जिल्हयामध्ये शिवाजी महाराजांचा अवमान झाला. ही गोष्ट मला व सन्माननीय सदस्य श्री. नवले यांना माहीत आहे परतु ती गोष्ट इतरांना माहीत नाही. त्यामुळे सभागृहात विषय मांडल्यावर आपल्याला त्याची माहिती मिळत असते. समर्थ रामदास स्वामींनी असे म्हटले आहे की, "अज्ञाने प्रकट व्हावे, ना तरी झाकोनी असावे, प्रकटोनी नासावे हे बरे नोहे "

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आता उद्‌धृत केलेल्या वचनामध्ये मी दुरुस्ती करु इच्छितो. संमर्थ रामदास स्वामींचे वचन असे आहे की, " अभ्यासे प्रकट व्हावे, ना तरी झाकोनी असावे, प्रकटोनी नासावे हे बरे नोहे. "

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा या विषयाबाबत चांगला अभ्यास आहे मी जे शब्द वापरले ते सन्माननीय सदस्यांकरिता वापरले आहेत. एवढेही आपल्याला समजले नाही काय ? त्यांनी मला सन्मान दिल्यानंतर त्यांना देखील थोडा सन्मान दिला पाहिजे. या विषयाचा त्यांचा अभ्यास आहे यामध्ये काहीच प्रश्न नाही.

सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधील व्यवस्थापनासंदर्भात माझ्या मनामध्ये काही शंका निर्माण झालेल्या आहेत. कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर कोणते निर्बंध आणणार, त्यांच्यावर काय बंधने घालणार, याची व्याप्ती काय असणार आहे ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदया, अशा ज्या कमिट्या आहेत त्यामध्ये नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील कमिटी आहे. त्या ठिकाणी मी वेगळ्या कामासाठी गेलो होतो. त्या कमिटीने 96 लाख रुपयांचा घोटाळा केला. माननीय मंत्रिमहोदयांना ते माहीत आहे. त्या ठिकाणचे संचालक श्री. राजाभाऊ आकरे यांच्या विरोधात 2002-03 मध्ये एफ.आय.आर. दर्ज झाला आहे. परंतु त्याचा तपास थांबला. शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 93 लाख रुपयांचा घोटाळा झाल्यानंतर त्यांच्या विरोधात 2002-03 मध्ये तक्रार नोदवली जाते. आता आपण 2008 मध्ये आहोत. हा बाजार समितीच्या व्यवस्थापनाचा महत्वाचा प्रश्न आहे. एवढा मोठा घोटाळा झाल्यानंतर आणि एफ.आय.आर. दर्ज झाल्यानंतर सुध्दा त्याचा तपास का होत नाही ? एवढा मोठा घोटाळा झाला त्याची माहिती या सदनाला असेलच. तो तपास कां थांबला याचे उत्तर मिळाले नाही. नाशिकच्या बाजार समितीकडे पणन महामंडळाचे 5 कोटी रुपयांचे कर्ज थकित आहे. त्यांनी आपल्या उत्पन्नातून आपला व्याजाचा हप्ता सुध्दा दिलेला नाही. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. या विधेयकामध्ये आपण तरतूद केलेली आहे की, बाजार समितीकडून राज्य कृषी पणन मंडळाला येणे असलेली रक्कम सुध्दा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करावी. याचा अर्थ असा की, थकबाकी करणाऱ्या मंडळावर कारवाई करणे भाग आहे. यामध्ये जो पाठीशी घालण्याचा प्रकार आहे तो मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण व्यवस्थापन निर्माण करण्याकरिता प्रशासक मंडळ नेमण्याचा अधिकार आपल्याकडे घेत आहात. हे असे जे चालले आहे त्याबाबतीत आपली भूमिका काय राहणार आहे ? जर माननीय मंत्रिमहोदय हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतची माझी उपसूचना स्वीकारण्यास तयार असतील तर मी माझे निवेदन येथेच थांबवतो. तसे करणार असतील तर या ठिकाणी जास्त चर्चा करण्याची गरज नाही. त्या समितीमध्ये चर्चा होईल. मी सकाळी याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती केली परंतु नियमात करु असे माननीय मंत्रिमहोदय म्हणाले. तीन महिन्यांच्या कालावधीत सभागृहापुढे समितीचा अहवाल घेऊन येऊ आणि त्यावेळी जास्त चर्चा सुध्दा होणार नाही तसेच वेळेत बिल मंजूर होईल. ती तयारी शासन दाखवत असेल तर मी माझे भाषण थांबवतो. पण शासन ती तयारी दाखवत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

श्री. दिवाकर रावते .....

नाही. या सगळ्या गोष्टी पुढे येत आहेत. अशा प्रकारच्या बऱ्याच घटना आहेत आणि यातील काही घटना मी आपल्याला सांगत आहे. एका ठिकाणी भ्रष्टाचार झाला त्याबाबत पुढे काही झाले नाही. एका बाजार समितीकडे पणन मंडळाचे 5 कोटी रुपये देण्याचे बाकी राहिले तसेच त्याचे व्याज सुध्दा दिले नाही त्याबाबत पुढे काही केले नाही. मनमाडच्या बाजार समितीमध्ये नोकरभरतीचा भ्रष्टाचार उघड झाला. मनमाडच्या बाजार समितीमध्ये जमीन विक्रीचा घोटाळा उघड झाला. त्या ठिकाणी डॉ. सांगळे नावाचे प्रशासक नेमले. त्यांनी कारवाई करण्याचे ठरवले. त्याबाबत पुढे काय झाले ? त्याबाबत अजून काहीही झालेले नाही. नागपूर, कामठी येथील समित्यांच्या बाबतीत सांगतो. मी सुरुवातीला विदर्भाचा मुद्दा मांडला. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये कर्जबाजारी शेतकऱ्यांचा 7/12 कोरा असेल तरच तो सेवासोसायटीच्या निवडणुकीला उभा राहणार आणि मग निवडून येणार. या सर्व जंजाळातून या समित्या निर्माण होत असल्यामुळे अनेक ठिकाणी शासनाने प्रशासक नेमलेले आहेत. आता शासनाचे निबंधक प्रशासक म्हणून काम करीत आहेत. परंतु हे विधेयक मंजूर झाल्यानंतर शासनाला प्रशासकीय मंडळ नेमण्याचा जो अधिकार प्राप्त होणार आहे त्या ठिकाणी शासनाचे निबंधक राहतील तसेच आपले कार्यकर्ते राहतील. त्या ठिकाणी निबंधक प्रशासक किंवा प्रशासकीय मंडळाच्या हातामध्ये त्याचा कारभार जाईल. ज्याच्या हातात ससा तो पारधी असे मी परवा म्हणालो. या अधिकाराचा आपण वापर करणार. ते कार्यकर्ते असले तरी आपले कार्यकर्ते आहेत. ते कार्यकर्ते आमचे आहेत की आपले आहेत यापेक्षा शेतकऱ्यांचे हित करण्याची संधी मिळाली पाहिजे. परंतु ते राजकीय क्षेत्रात असलेले कार्यकर्ते आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ श्री.बरवडनंतर 12:45

श्री.दिवाकर रावते......

उडदामाजी काळे गोरे निवडावयाचे, ही तुम्हाला, आम्हाला सवय झाली आहे. हा माझा कार्यकर्ता आहे, तो तुमचा कार्यकर्ता आहे, हा माझ्या पक्षाचा आहे तो तुमच्या पक्षाचा आहे असे सांगितले जाते. मंडळामध्ये आल्यानंतर असे प्रकार मोठया प्रमाणात झालेले आहेत. विकासात्मक घटना घडवून एक वर्ष झाले आहे. शासनाला या विधेयकाच्या माध्यमातून मॉडेल ॲक्ट करावयाचा आहे. त्या अनुषंगाने शासनाने निधीची व्यवस्था केली आहे. सन्माननीय सदस्यांना माहीत नाही असे समजून मी भाषण करीत नाही. मला काही आकडेवारी पटलावर आणावयाची आहे. महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये करोडो रुपयांचा निधी उभा राहतो. तरी सुध्दा बाजार समित्या शेतक-यांचे काय देणे लागतात ते आपण सांगावे. 70 टक्के कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्रीच्या अनुषंगाने सुविधाच नाहीत. बैलांच्या चारापाण्याची व्यवस्था नाही, शेतक-यांच्या निवासाची व्यवस्था नाही, ती केली पाहिजे. काही ठिकाणी अशी व्यवस्था केली असेल तर सांगावे. शासनाला यासंबंधी नवीन प्रकल्प सुरु करावयाचा आहे. त्याठिकाणी टी.व्ही., स्कॅनिंग मशिन ठेवावी अशी कल्पना मी त्यावेळी मांडली होती. तशी व्यवस्था केली आहे का ते सांगावे. केली नसल्यास का करण्यात आली नाही ते स्पष्ट करण्यात यावे. सभापती महोदया, सध्या सुरु असलेले व्यवस्थापन हा माझा महत्वाचा मुद्दा आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्याने आपला माल आणल्यानंतर त्याला व्यवस्थापनाच्या माध्यमातून 24 तासाच्या आत शेतकऱ्यास पैसा दिला पाहिजे. मी अधिकृतपणे, अधिकारवाणीने बोलतो, एखाद दुसरा अपवाद सोडला तर शेतकऱ्याला 24 तासामध्ये कोणत्याही बाजार समितीमध्ये पैसे मिळत नाहीत. तुम्ही काय आणि मी काय आपण येथे कायदे तयार करण्यासाठी बसलो आहोत. विधिमंडळात कायदे निर्माण झाले पाहिजेत. शेतकऱ्याला 24 तासात पैसे दिले नाही तर शासन अडत्यांचे परवाने रद्द करणार काय ? त्यांच्यावर निर्बंध घालणार काय ? शेतकऱ्याचा जो हक्क आहे त्याप्रमाणे तेथे घडते काय ?

सभापती महोदया, या कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे ऑडिट हा एक गंभीर विषय आहे. ऑडिटबाबतचे एक प्रकरण माझ्याकडे आले आहे ते गंभीर आहे. जी व्यक्ती 10 वर्षे खाजगी संस्थांचे ऑडिट करते, त्यांना बाजार समित्यांचे ऑडिट करण्याचे काम सरकारने दिले आहे.

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.दिवाकर रावते.....

ऑडिट रिपोर्टमध्ये या बाजार समितीमध्ये एक रुपया सुध्दा भ्रष्टाचार झालेला नाही, असे ते ऑडिटर लिहिणार. कारण त्या व्यक्तीला सरकारने आणले असल्यामुळे ते अनुकूल अहवालच देणार. पण वस्तुस्थिती अशी आहे की, अध्यक्षांनी सही केलेल्या प्रकरणात उपाध्यक्षांनी भ्रष्टाचार केलेला आहे, अशी अनेक प्रकरणे आहेत. उपाध्यक्षांनी केलेल्या भ्रष्टाचाराचे ऑडिट एमएसईबीकडे जाते. ऑडिटसंबंधी हे शासन कोणता कायदा आणत आहे, त्या कायद्यामध्ये कोणत्या तरतुदी करणार आहात त्याची मी वाट पहात आहे. ऑडिट हा चर्चेचा विषय आहे. सरकारी क्षेत्रातील ऑडिट हा मोठा गंभीर विषय आहे. या बाजार समितीच्या व्यवस्थापनामध्ये भयंकर त्रुटी निर्माण झाल्या आहेत. संभाजीनगरच्या बाजार समितीचा विषय मी मघाशी मांडला आहे. अशा परिस्थितीवर शासन नियंत्रण कसे आणार हा प्रश्न आहे. अनुभवातून शहाणपण येते असे म्हणतात. पण हे शहाणपण सिध्द करावयाचे असते आणि शासनाने ते सिध्द करावे. सभापती महोदया, या कायद्यामध्ये आतापर्यंत आढळून आलेल्या त्रुटी मी मांडल्या आहेत, त्याच्या कित्येक पटीने अनेक सन्माननीय सदस्य मांडतील. मला जेवढे माहीत आहे तेवढेच मी सांगत आहे. मला जेवढे आकलन झाले ते मी बोलत आहे. पण मी जे बोलतो ते बरोबर आहे असा मी दावा करीत नाही. या कायद्यातील ज्या विविध त्रुटी आहेत त्याची येथे चर्चा सुरु आहे. अनुभवातून शहाणपण आले आहे हे सिध्द करणारा शासनाने कायदा करावा. सभापती महोदया, कोणताच कायदा परिपूर्ण असू शकत नाही. त्यामुळेच कोर्ट चालते, कोर्टात वकिलांचा व्यवसाय चालतो. कायद्यात त्रुटी ठेवल्या तर जनतेला न्याय मिळू शकत नाही, ही त्याच्यातील खोच आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

वकिलांची वकिली चालणे हा त्यामधील एक भाग आहे. योग्य आणि निर्णायक कायदा व्हावयास पाहिजे. कायद्यातील त्रुटीमुळे जनतेचे नुकसान होते. 70 टक्के लोकांचे जीवनमरण ज्यावर अवलंबून आहे त्या विषयाशी कायदा निगडित आहे. शेतक-याला आपल्या पत्नीच्या साडीचोळी पासून, मुलीच्या ब्लाऊज परकरापासून, पुस्तकापासून, त्यांच्या खाण्या-पिण्यापासून, जनावरांपासून, घरादाराच्या डागडुजीपासून सगळयाच गोष्टींची विवंचना असते. कृषी उत्पन्न बाजार समितीची उलाढाल आणि तिचे कर्तव्य यावर या गोष्टी अवलंबून असल्यामुळे हा कायदा अत्यंत योग्य प्रकारे करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. मी कोणाचे रेकॉर्ड तपासलेले नाही. कॉ. डांगे यांचे पार्लमेंटमधील रेकॉड अजून कोणी मोडलेले नाही. त्यांनी लेबर ॲक्टवर खूप चांगले भाषण केले होते. एकाही मुद्याची पुनरावृत्ती त्यांनी केलेली नव्हती. त्यांचे भाषण ऐकताना पं. जवाहरलाल नेहरु हे कंटाळले नाहीत. त्यांनी त्यांचे संपूर्ण भाषण ऐकले. कायद्याच्या संबंधातील भाषण करीत असताना कायदा समाजाच्या हिताच्यादृष्टीने कसा करता येईल हे फुलवून सांगण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांची भाषणे मी गॅलरीत बसून ऐकत होतो. त्यांचा एखादा नकारात्मक मुद्दा देखील ऐकावासा वाटे. तालिका सभापती महोदय, हा विषय शेतक-यांच्या जीवनमरणाशी निगडित आहे. बाजार समितीमध्ये अशा प्रकारे गुंडगिरी होत असेल तर ती येथे सांगितली पाहिजे. पुणे, नाशिक येथील बाजार समितीमध्ये होत असेलेली गुंडगिरी तुम्ही सांगितली. प्रांताप्रमाणे त्या त्या भागात गुंडगिरी चालते. परंतु ती येथपर्यन्त आली पाहिजे हा विषय आहे. हे सर्व करीत असताना या कायद्यामध्ये एक गडबड करुन ठेवलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे सहाय्यक निबंधक हे त्या बाजार समितीचे संचालक असतात. एखादा चुकीचा निर्णय बाजार समिती घेत असेल तर संचालकांनी चुकीचा निर्णय घेऊ नका असे सांगायचे असते. तरीही बाजार समितीने निर्णय घेतला तर त्याबाबतीत ती बाजार समिती दोषी ठरते.

तालिका सभापती महोदय, या कायद्यामध्ये 35(क) या नव्या कलमाचा समावेश करण्यात आलेला आहे. बाजार समितीच्या कार्यामध्ये प्रशासकीय कार्यक्षमता यावी यासाठी सहकार विभागातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

असा कोणताही अधिकारी कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्त करता येईल. हे नियुक्तीचे अधिकार राज्य शासनाने घेतलेले आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : तालिका सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विधेयकावर बोलण्यासाठी आम्ही मघाशी नावे दिली होती. आता पुन्हा नावे दिली नाहीत म्हणून अधिकारी सांगतात. हे बरोबर नाही.

श्री. जगदीश गुप्ता : मघाशी तालिका सभापतींनी या गोष्टीची नोंद घेतल्यानंतर पुन्हा तोच प्रकार घडलेला आहे.

**तालिका सभापती** : अधिकारी बदलत असताना पहिल्या अधिका-याने सभागृहामध्ये काय काय घडले याची माहिती दुस-या अधिका-यांना द्यावयास पाहिजे.

.....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सहकार निबंधक या विषयावर बोलतो आहे. तो आता संचालक होणार आहे. संचालक हा सचिव होणार आहे काय हा प्रश्न निर्माण झालेला आहे. विभागीय सह निबंधक आहे, जिल्हा उप निबंधक, सहाय्यक निंबधक, यांच्याकडे कामे कोणकोणती आहेत, त्याबाबतची मी या ठिकाणी थोडक्यात माहिती देतो. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1967 च्या अंमलाखाली येणाऱ्या सहकारी संस्थांची नोंदणी, तपासणी आणि लेखा परीक्षण हे काम त्यांच्याकडे आहे. अवसायानात गेलेल्या सहकारी संस्थांचे काम, नियम 87 चे काम, प्रशासकीय नियंत्रणाचे काम त्यांच्याकडे आहे. मुंबई सावकारी अधिनियम, सावकारांना परवाना देणे, त्यासंबंधी तपासणी करणे हे देखील काम त्यांच्याकडे आहे. ग्रामीण भागात हे फार गंभीर काम आहे. मघाशी मी एका सावकाराचे प्रकरण या ठिकाणी सांगितले आहे. सावकारी कायद्याच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले प्रमाणे सावकारी पध्दत नियंत्रणात आणणे, सावकारी पध्दत नियमात आणणे, सावकारांना सोलून काढणे, त्यांना फोडून काढणे ही कामे देखील त्यांच्याकडे आहेत. पूर्वी सावकारी पध्दतीकडे कोणी लक्ष देत नव्हते. परंतु आता त्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे, हे देखील काम या अधिका-यांना करावे लागणार आहे. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमाची तपासणीचे संचालकांकडे आहे. लेखा परीक्षणाचे काम त्यांना करावे लागणार आहे. कापसू एकाधिकार योजना ही रद्द केलेली नाही असे सरकारकडून सांगितले जाते. जर ही योजना बंद झाली असती तर आमचे डॉ. हिराणी साहेब अध्यक्ष नसते. डॉ. हिराणी हे कापूस पणन महासंघाचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांना लाल दिव्याची गाडी शासनाने दिली आहे. ते लाल दिव्याच्या गाडीत नेहमी फिरताना दिसतात. एखाद्या केंद्रावर जाऊन कापूस खरेदी-विक्री संबंधात वृत्तपत्रात फोटो छापून आणतात. एका केंद्रावर एक किलो कापूस खरेदी केला गेला त्या ठिकाणचे देखील फोटो छापून आले आहेत. ही कापूस खरेदी केंद्रे कोणती आहेत याची त्यांना देखील माहिती आहे. या केंद्रावर डॉ. हिराणी यांना बोलाविले नाही ते बरे झाले. एका केंद्रावर एक बैलबंडी आणली होती, त्या बैलबंडीतून 10 किलो कापूस खरेदी केला गेला, त्या केंद्राचा देखील फोटो छापून आला. त्या केंद्रावरच तेवढीच कापूस खरेदी झाली, त्यानंतर तेथे कापूस खरेदी झालीच नाही. परंतु केंद्रांना भेटी देऊन कापूस-खरेदी विक्री होते आहे की नाही हे पाहण्याचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमान्वये

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

तपासणी, नियंत्रणाचे काम संचालकाकडे आहेत. जिल्हा बँकेकडून शेतक-यांना देण्यात येणारे पीक कर्ज आणि त्याची वसूली हेही काम त्यांच्याकडे आहे. जिल्हयातील खतांचे गोडाऊन्सची तपासणी, त्यासंबंधी अनुज्ञापालन देणे, एवढया मोठया प्रमाणात या अधिका-यांकडे जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचा कन्व्हेयन्स डीड हा आवडता कायदा आहे. त्या कायद्याची अंमजबजावणी करण्याचे काम देखील या अधिका-यांकडे आहे. एवढी प्रचंड कामे या अधिकाऱ्यांकडे असताना त्याच्याकडे सचिवांचे काम द्यावयाचे. त्यास सचिवांचे काम द्यावयाचे अशा प्रकारची आपण या कायद्यात तरतूद करीत आहात. यातून काय निर्माण होणार आहे, हा तर मोठा प्रश्न आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. अरविंद सावंत ) : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे 'ऑन लेग' राहतील. या बिलावर अजून जे सन्माननीय सदस्य बोलणार आहेत त्यामध्ये सर्वश्री पाशा पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीकांत जोशी आणि श्री. केशवराव मानकर यांचा समावेश आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांनी याबाबतची नोंद घ्यावी.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.30वा. भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.30 पर्यंत स्थगित झाली. )

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये एकूण तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. यापूर्वी मी एकदा असे बोललो होतो की, अशा पध्दतीने नियम 289 अन्वये सूचना आल्या असतील तर काही सूचना दालनात सुध्दा नाकारण्यात येतात. आजच्या कामकाजाच्या अनुषंगाने आजच्या सूचना विचारात घेतल्या तर तांत्रिकदृष्टया या तीनही सूचना नियम 289 अन्वये मान्य होऊ शकणार नाहीत. परंतु या सूचनांमध्ये नमूद केलेले विषय मला महत्वाचे वाटतात त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना थोडक्यात आपले म्हणणे मांडण्याची संधी देत आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या आठ दिवसापूर्वी कोकणामध्ये मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे कोकणामध्ये काळी बुरशी या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणात आंब्याचे उत्पादन घेतले जाते. या पावसामुळे आंबा पिकाचे उत्पादन 50 टक्क्यावर आले आहे. या 50 टक्क्यापैकी 75 टक्के उत्पादन वाया गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आंबा पीक वाया गेले असून कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या आठवडयात वाशी मार्केटमध्ये 2.5 लाख आंबा पेट्या आल्या होत्या त्यापैकी 1.5लाख आंबा पेट्या वाया गेल्या आहेत. आंब्यावर काळी बुरशी पडली आहे. कच्चा आंबा झाडावरुन काढला जातो त्यावेळी लक्षात येत नाही आणि पिकायला सुरुवात होते त्यावेळी ते फळ आतून सडलेले असते.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ........

म्हणून माझी विनंती आहे की, कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगडमधील शेतकरी या परिस्थितीमुळे हवालदिल झालेले आहेत. वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हा माल घेण्यास कोणीही तयार नाही, परिणामी आंब्याची परदेशात होणारी निर्यात थांबलेली आहे. लाखो आंब्याच्या बॅग्ज् सडत आहेत. म्हणून प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा असला तरी कोकणातील शेतकऱ्यावर जे अस्मानी संकट कोसळलेले आहे त्याबाबत त्वरित उपाययोजना केली नाही तर फार गंभीर प्रश्न निर्माण होईल. म्हणून नियम 289 खाली दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन कोकणातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा, ही नम्र विनंती.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : नियम 289 अन्वये जो प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आणला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, कोकणात मध्यंतरी अवेळी पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यात हापूस आंबा आणि काजू या फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. कारण आंब्याचे फळ तयार होऊन ज्यावेळी विकण्यासाठी आले त्यावेळी ते आतून खराब झाल्यामुळे अत्यल्प किंमतीत द्यावे लागत आहे म्हणून प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा असला तरी हा विषय सुध्दा तितकाच गंभीर असल्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घ्यावी. जर नियम 289 अन्वये प्रस्ताव मान्य करुन चर्चा घेणे शक्य नसेल तर अन्य कुठल्याही प्रकारे या विषयावर चर्चा घडवून आणावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे, त्यासंदर्भात माझी एवढीच विनंती आहे की, कोकणातील आंबा व काजू या पिकाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मुंबईच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जो आंबा आला आहे त्याचे जवळपास 200 कोटीचे नुकसान एकटया नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेले आहे, त्यामुळे शेतकरी एकदम हवालदिल झाला आहे. एक तर कोकणात बागायतीचे प्रमाण कमी आहे आणि आंब्याच्या उत्पादनातून शेतकऱ्याला आधार मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या बागा लावल्या परंतु त्याचेही अशा प्रकारे नुकसान झाले त्यामुळे गंभीर

.......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

परिस्थिती निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सुचविल्याप्रमाणे जरी या विषयावर 289 अन्वये चर्चा घेता येत नसली तरी अन्य एखादा पर्याय शोधून याबाबत चर्चा घडवून आणावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत पाटील : महोदय, नियम 289 अन्वये सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घडवून आणण्याबाबत जो प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आणला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या निमित्ताने माझी एकच सूचना आहे की, सभागृहात आपण अशा विषयावर चर्चा केल्यानंतर नुकसान भरपाईबाबतची घोषणा सभागृहात होते पण त्यासंबंधी आवश्यक असलेला सर्व्हे मात्र मागाहून होतो आणि गरीब शेतकऱ्यांना मात्र न्याय मिळत नाही, म्हणून यासंबंधी आपण निदेश द्यावेत व तातडीने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत सर्व्हे करावा व तातडीने मदत कशी मिळेल, अशी व्यवस्था करावी.

**सभापती** : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे जरी तांत्रिकदृष्ट्या हे प्रस्ताव 289 चे होत नसले तरी या विषयाचे महत्व लक्षात घेऊन कोकणातील शेतकरी असो अथवा महाराष्ट्रातील शेतकरी असोत, अचानक पडलेल्या पावसाचे जे परिणाम आहेत, त्याच्या अनुषंगाने आंब्याच्या पिकाचे सुध्दा मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. याबाबतीत मी अन्य कुठल्याही आयुधाच्या माध्यमातून चर्चा करता येते काय हे तपासून याच आठवड्यात ही चर्चा घेण्याचा प्रयत्न करीन.

श्री. दिवाकर रावते : नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्याची वेळ का आली तर यासंबंधीची चर्चा आपण याच सभागृहात यापूर्वी केली. आता प्रश्न उपस्थित होतो की, ती चर्चा झाल्यानंतर देखील कोकणातील ग्रामस्थाना, आंबा उत्पादकांना योग्य तो न्याय मिळाला नाही, म्हणून हा प्रस्ताव आणणे भाग पडले.

**सभापती** : विशेषत: अचानक पाऊस पडला तो गैरमोसमी पाऊस होता. शक्यतो एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात असा अवेळी पाऊस पडतो पण यावेळी मात्र मार्चच्या तिसऱ्या आणि चौथ्याच आठवड्यात असा पाऊस पडल्यामुळे परिस्थिती गंभीर आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी जो 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे, त्यावर त्यांनी एक मिनिटात आपले भाषण करावे.

यानंतर श्री. जुन्नरे.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, गृह विभाग आणि शिक्षण विभाग हे राज्यात अस्तित्वात आहे की, नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. कारण फुलंब्री तालुक्यातील इयत्ता 12 वीचे पेपर बारकोडींगने कोठे गेले हे माहिती नसतांना मानवद तालुक्यातील रत्नापुर नावाच्या खेडयामध्ये काही विद्यार्थी पोहचले. या गावांपर्यंत पोहचणे अत्यंत अवघड आहे. या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी जाऊन महाविद्यालयात प्रवेश घेतला, स्वत:च्या हस्तक्षरात पेपर लिहीत असतांना पोलिसांनी धाड टाकून काही विद्यार्थ्यांना पकडले आणि त्या विद्यार्थ्यांना 24 तासात जामीन मिळून ते विद्यार्थी तेथून निघून जातात. या प्रकरणी प्राध्यापकांवर, संस्थाचालकांवर कोणताही गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. या सर्व प्रकारामुळे बोर्डाच्या विश्वासार्हतेविषयी आणि शिक्षण खात्याच्या विश्वासार्हतेविषयी प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर प्रश्न गंभीर आहे. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने निवेदन करण्याची आवश्यकता आहे. आपण हा प्रस्ताव नाकारला तरी या प्रश्नाची दखल शासनाने घेण्याची आवश्यकता असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता आहे.

**सभापती** :नियम 289 अन्वयेची तिसरी जी सूचना आहे त्या सूचनेतील विषय हा तांत्रिक दृष्टया नियम 289 चा होत नाही परंतु तरी यांसदर्भातील बाब अत्यंत महत्वाची असून शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाची आहे म्हणून यासंदर्भात दालनात निर्णय घेण्यात येईल व या विषयी मार्ग काढण्यासाठी लक्षवेधी सूचना किंवा अन्य मार्गाने संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल.

तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सुध्दा नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. परंतु ही सूचना देखील मला तांत्रिक दृष्टया नाकारावी लागेल. या सूचनेतील विषय हा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा आहे. या सूचनेतील विषय असा आहे की, "अखिल भारतीय अभयांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या दिनांक 27 एप्रिल, 2008 रोजी होणा-या पेपरचे केंद्र महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अहमदाबाद,सुरत,बडोदा एवढेच नव्हेतर पोर्टब्लेयर येथे देण्यात आल्याने शेकडो विद्यार्थ्यांची झालेली गैरसोय." या विषयाच्या संदर्भात नियम 93 चे निवेदन घेतलेले आहे. नियम 93 च्या निवेदनावर चर्चा होऊन या विषयाला न्याय मिळेल असे मला वाटत नाही. सन्माननीय राज्यमंत्री उच्च शिक्षण या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यामुळे या विषयाला कशा पध्दतीने न्याय देता येईल याकडे लक्ष देण्यात येईल.

...2



SGJ/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खर्चे...... 13:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

एकंदरीत याचर्चेमध्ये 12 मिनिटांचा वेळ गेलेला आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराची वेळ 12 मिनिटे वाढवून न देण्याचा मी निर्णय घेतलेला आहे. कारण दर वेळेस प्रश्नोत्तरासाठी वेळ वाढवून देत गेलो तर ते योग्य होणार नाही. आता प्रश्नोत्तराला सुरुवात करण्यात येईल.

....3

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पाली-नाडसूर रस्त्यावर वाकणवाडी येथे नदीवर पूल बांधणेबाबत**

**(१) * ३७५८३ श्री. जयंत पाटील, प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामस्थांनी पावसाळ्यात होत असलेल्या दळणवळणाच्या गैरसोयीमुळे पाली-नाडसूर रस्त्यावर वाकणवाडी येथे नदीवर पूल बांधण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सदर कामास मंजूरी व निधी उपलब्ध करुन दिल्यास काम तात्काळ हाती घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील पाली-नाडसूर रस्त्यावर वाकणवाडी येथील नदीवर पूल बांधण्याची मागणी करण्यात आली होती परंतु जिल्हा नियोजन मंडळाकडून या ठिकाणच्या साकवाची तरतूद करुन घ्यावी असे छापील उत्तरात म्हटलेले आहे. 2008-2009 मध्ये रायगड मध्ये सार्वजनिक बांधकामासाठी 17 कोटी रुपयांची तरतूद आहे. या ठिकाणी 20 कोटी रुपयांची कामे पेंडींग आहेत. मागील कामे पूर्ण करण्यासाठी 20 कोटी रुपये लागणार आहेत. या कामाला जिल्हा नियोजन मंडळ तरतूद करु शकत नाही. म्हणून स्टेट पूलमधून शासन या ठिकाणच्या साकवाची तरतूद करेल काय?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील पाली-नाडसूर हा ग्रामीण मार्ग असून अडीच कि.मी. लांबीचा डांबरी रस्ता आहे. या रस्त्यावर सध्या 2.5 मिटर रुंदीचा साकव आहे. या साकवाचा उपयोग बारमाहीसाठी होत असतो तसेच या साकवाचा उपयोग दळणवळणासाठी सुध्दा होत असतो. या ठिकाणी साकव बांधावयाचा झाला तर त्यासाठी 40 लक्ष रुपयांची तरतूद करावी लागेल. या ठिकाणचा रस्ता अर्थसकल्पात मंजूर करण्यात आलेला नसल्यामुळे यासाठी निधीही मंजूर झालेला नाही. त्यामुळे या रस्त्याचा समावेश पुढील वेळेस अर्थसंकल्पात जरुर करण्यात येईल.

....4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37583** .......

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील पाली-नाडसूर या रस्त्यावर वाकणवाडी येथील नदीवर साकव बांधण्याचा हा प्रश्न आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणात ओढे आहेत. त्यामुळे या ठिकाणी साकव बांधल्याशिवाय वाहतुकीची व्यवस्था होणार नाही म्हणून या ठिकाणी साकव बांधण्याच्या कामाला प्राधान्य दिले जाईल काय?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, साकव बांघण्याचा कार्यक्रम निश्चितपणे हाती घेतला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.45

ता.प्र.क्र.37583...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांच्या मतदारसंघातील हा पूल आहे. माननीय मंत्री महोदय अनेक वेळा त्या ठिकाणी गेलेले आहेत. या पुलाच्या कामासाठी 40 लाख रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी आम्ही मागणी करीत आहोत. माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघातील हा पूल आहे. तेव्हा खास बाब म्हणून त्या ठिकाणच्या नाल्यावरील ब्रीज करण्यासाठी तरतूद करण्यात येणार आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की त्यांच्या आग्रहावरुन नाबार्ड अंतर्गत प्रस्ताव तयार करुन त्याला मंजुरी देण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सामाजिक अर्थसहाय्य योजनेतील गैरव्यवहार**

**(२) * ४०५७५ श्री. यशवंतराव गडाख :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी व राष्ट्रीय वृध्दापकाळ या सामाजिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थींची निवड करुन सुमारे १ कोटी रुपये लाटल्याचा प्रकार अहमदनगर जिल्ह्यात उघडकीस आला असून यास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अपात्र प्रकरणांची तालुकावार संख्या किती आहे,

(३) असल्यास, दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता:** (१) नाही. तथापि, सन २००२ मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र.१७२/२००२ मध्ये राज्यातील संजय गांधी निराधार / आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना, इंदिरा गांधी भूमिहीन शेत मजूर महिला अनुदान योजना व राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांची तपासणी करण्याचे आदेश दिलेले होते. यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख या तीन अधिकाऱ्यांच्या उप समितीने केलेल्या तपासणीमध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये या तिन्ही योजनांमध्ये सन २००२ मध्ये रुपये ७,२३,०००/- इतकी रक्कम अपात्र लाभार्थ्यांना वाटण्यात आल्याचे दिसुन आले.

(२) अपात्र लाभार्थ्यांची तिन्ही योजनांमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील तालुकावार संख्या खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| (१) | नगर शहर | १८ |
| (२) | नगर ग्रामीण | ४४ |
| (३) | पाथर्डी | १८३ |
| (४) | पारनेर | १० |
| (५) | शेवगांव | १६० |
| (६) | श्रीरामपूर | २१२ |
| (७) | राहुरी | १५३ |
| (८) | नेवासा | १८ |
| (९) | राहाता | ३० |
| (१०) | संगमनेर | ८३ |
| (११) | कोपरगांव | १९ |
| (१२) | अकोले | ३९ |
| (१३) | कर्जत | ३६ |
| (१४) | श्रीगोंदा | १०९ |
| (१५) | जामखेड | ६७ |

(३) सन २००२ मध्ये झालेल्या सूक्ष्म तपासणीत अपात्र लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर करण्यास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचेवर शिस्त व अपील नियमानुसार कारवाई करण्यांत येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, ज्यांना कोणाचाही आधार नाही अशा व्यक्तींना मदत करण्यासाठी शासनाची ही योजना आहे अहमदनगर जिल्हयामध्ये या योजनेत मोठया प्रमाणावर अपहार झाला आहे. जे लाभार्थी नाहीत त्यांना लाभार्थी दाखवून पैशाचे वाटप करण्यात आलेले आहे.उत्तरामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, "२००२ साली झालेल्या सूक्ष्म तपासणीमध्ये अपात्र लाभार्थ्याची प्रकरणे मंजूर करण्यास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचेवर शिस्त व अपील नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे " या चौकशीला सहा वर्षे होऊन गेलेली आहेत. अजूनही ही चौकशी सुरुच आहे. सरकार या प्रश्नाबाबत किती गंभीर आहे हे या उत्तरावरुन स्पष्ट होत आहे. माझे त्याही बाबतीत काही म्हणणे नाही. सरकारला चौकशी करावयाची आहे किंवा नाही, करावयाची असेल तर किती वर्षे करावयाची हा सरकारचा प्रश्न आहे.परंतु यामध्ये जे खरे लाभधारक आहेत त्यांना लाभ मिळालेला नाही. याबाबतीत सरकार काय करणार आहे ? अहमदनगर जिल्हयातील नेवासे तालुक्यामध्ये खाजगी सर्व्हे करण्यात आला असून त्यामध्ये असे आढळून आले आहे की दीड ते दोन हजार खरे लाभधारक या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. त्या भागातील कार्यकर्त्यानी या लोकांचा मोर्चा तहसीलदार कचेरीवर नेला होता. दीड ते दोन हजार आंधळे, पागळे, वृध्द, अपंग व्यक्ती उन्हा तान्हात मोर्चासाठी आलेले होते. जे लाभधारक लाभापासून वंचित राहिलेले आहेत त्यांना लाभ मिळावा यासाठी जिल्हाधिका-यांना सूचना देऊन त्यांचा पुनर्सर्व्हे करुन त्यांना लाभ मिळवून देण्यात येणार आहे काय आणि किती दिवसात हा लाभ मिळवून देण्यात येईल ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी नगर जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेत एक कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्यासबंधीचा प्रश्न विचारला आहे. २००२ मध्ये हा प्रकार झाला होता आणि त्यावेळी हायकोर्टाने जो निर्णय दिला होता त्यानुसार शासनाने प्रत्येक विभागीय आयुक्तांना मायक्रो इन्सपेक्शन करण्याचा आदेश दिला होता.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय मंत्री महोदय कशाच्या संदर्भात उत्तर देत आहेत.

**सभापती** : अहमदनगर जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेतील भ्रष्टाचारासंबंधी हा प्रश्न असला तरी उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विशेष सहाय्य विभागाशी संबंधित हा विषय आहे. सर्व विभागीय आयुक्तांना मायक्रो इन्सपेक्शन करण्याच्या सूचना दिल्या असून प्रत्येक तालुक्यात मायक्रो इन्सपेक्शन करण्यात आले होते. हे काम खूप मोठे असून संपूर्ण राज्यात हे काम करावयाचे होते. त्या संदर्भात एक समिती देखील नेमण्यात आली असून त्यात जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, डी.एस.पी.यांचा समावेश होता. संपूर्ण् राज्यात ३ लाख ५३ हजार ३०७ लाभधारक अपात्र ठरले होते. त्यानंतर या संदर्भात चौकशी करण्यात आली होती आणि त्यात १३ हजार ७३२ अधिका-यांची नावे करप्शन आणि मिसअप्रोप्रिएशनमध्ये असल्याचे दिसून आले होते. अर्थात हे सर्वच अधिकारी करप्ट नसतील किंवा मिसअप्रोप्रिएशनमध्ये नसतील. कारण काही वेळा लाभधारकाने यादीमध्ये गोंधळ केलेला असेल. त्याचबरोबर संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष असतात किंवा सदस्य असतात असे ७ हजार ५१९ अशासकीय सदस्य आहेत. त्यांच्या विरुध्द देखील चार्जेस लावण्यात आलेले आहेत. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये सांगितले होते की, या सर्वाची चौकशी करण्यास सांगण्यात येईल . तसा आदेश सर्व विभागीय आयुक्तांना देण्यात आला आहे व या अधिका-यांना शो कॉज नोटीस देण्यात आली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 13:50

श्री. सुरेश शेट्टी (पुढे चालू..) ता.प्र.क्र.40575 ...

सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्यांनी विचारले की, नगर जिल्ह्यात हजारो लाभार्थी आहेत की त्यांना या योजनेचा फायदा मिळालेला नाही. या संदर्भात आपण आता निर्णय घेतला आहे की, प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात यासाठी निर्माण केलेल्या समित्यांवर त्या त्या भागातील विधानसभेचे आमदार चेअरमन म्हणून असतील आणि त्या समित्यांकडून या योजनेतील लाभार्थ्यांची छाननी करून यादी तयार केली जाईल. अशा प्रकारे सर्व तालुक्यातील लाभार्थ्यांना या योजनेमध्ये समावेश आपण केलेला आहे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, 2002 पासून ही चौकशी सुरू आहे आणि यात गुंतलेल्या अनेक अधिकाऱ्यांची संख्यादेखील माननीय राज्यमंत्र्यांनी येथे सांगितली आहेत. पण 2002 पासून याच्याशी संबंधित असे जे अधिकारी-कर्मचारी निवृत्त झालेले आहेत वा होणार आहेत त्यांची पेन्शन वगैरे आपण थांबविले आहे का की, ते मुक्त केलेले आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कोठलाही अधिकाऱ्याला आपण यापासून मुक्त करणार नाही. जे निवृत्त झालेले आहेत त्यांच्यावर देखील कारवाई आपण करू.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, जे अधिकारी यात गुंतले आहेत आणि ते निवृत्त झाले असतील वा होणार असतील तर त्यांना पेन्शन वगैरे जे आर्थिक लाभ मिळतात ते थांबवून ठेवण्यात आले आहे की नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण सर्वांनाच शोकॉज नोटीसा दिलेल्या आहेत आणि संबंधितांची चौकशी सुरू आहे. यात जे गुन्हेगार आहेत त्या सर्वांवर आपण कारवाई निश्चितपणे करू.

( अडथळा )

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रकरण खूप जुने आहे आणि यावर येथे आज आलेले उत्तरही मजेशीर आहे. असतील, नसतील, कारवाई केली जाईल अशा प्रकारची उत्तरे दिली जात आहेत. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्यात डॉ.गावित जे आज सरकारमध्ये मंत्री आहेत व खालच्या सदनाचे सदस्य आहेत त्यांचेही नाव आहे. त्यांच्यावर कलम 409 आणि 420 अन्वये कारवाई करावी असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. कारण त्यांच्या जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून देणारी जी

..... एचएच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार (पुढे चालू...) ता.प्र.क्र.40575 ...

समिती होती तिचे ते त्या भागातील लोकप्रतिनिधी, आमदार असल्याने चेअरमन होते. या पार्श्वभूमीवर ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांना खरे तर सरकारने पकडायला पाहिजे होते, त्यांना पकडलेले नाही. येथे उत्तर देताना मात्र बाहेरून बाहेरून सांगितले जात आहे. पण भ्रष्टाचाराचा उगमच जेथून झालेला आहे त्याकडे सरकार पूर्ण दुर्लक्ष करीत आहे. तेव्हा या बाबतीत हायकोर्टाचा निर्णय या सभागृहात सांगून मी विचारले त्याचे उत्तर आपण द्यावे आणि सांगावे की, सरकारमधील एक मंत्री डॉक्टर गावित यांना आपण या प्रकरणी अटक केली आहे काय ? त्याबाबत नेमके काय झाले आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डॉ.गावित यांच्याबद्दल सांगितले आहे, त्याबाबत मी माहिती घेऊन, विभागाकडून माहिती घेऊन सांगू शकेन. कारण आता माझ्याकडे ती माहिती उपलब्ध नाही.

( अडथळा )

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी हे लक्षात घ्यावे की, आपण मघाशी उत्तर देताना उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय किंवा या संपूर्ण परिस्थितीची माहिती सांगितली. त्यामुळे या ठिकाणी त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी उपप्रश्न विचारला आहे, त्याबाबतची माहिती आपल्याकडे आहे का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याकडे वैयक्तिक केस संबंधीची माहिती नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हरकतीचा मुद्दा आहे. ....

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण हरकतीचा मुद्दा घेत नाही याची आपणा सर्वांना कल्पना आहे. तरीही मी माननीय विरोधी पक्षनेता यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याच सभागृहात दोन अधिवेशनापूर्वी हा प्रश्न आम्ही उपस्थित केला होता. नंदूरबार जिल्ह्याचा तो प्रश्न होता आणि त्या जिल्ह्यात अशा पद्धतीने भ्रष्टाचार झाला असून त्या संबंधात याच सभागृहात बसणारे एका मंत्र्यावर पोलीस ठाण्यात नॉनबेलेबल गुन्हा रजिस्टर झाला असून, अशा प्रकारे गुन्हा रजिस्टर झाल्यानंतरही ते मंत्री येथे, या सभागृहात बसत आहेत असा आरोप आम्ही केला होता आणि अजूनही त्या मंत्र्यावर कारवाई झालेली नाही वा त्या मंत्र्यांना पकडण्यात आलेले नाही असेही आम्ही सांगितले होते. सभापती

...... एचएच 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 13:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी राज्यवार प्रकरणांची संख्या सांगितली तर आपण भ्रष्टाचाराची ही जी प्रकरणे झालेली आहेत त्यात 13 हजार कर्मचारी-अधिकारी आरोपी केले गेले त्यांची जिल्हावार यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणार काय ? ...

( यानंतर सौ. रणदिवे ....आयआय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:55

ता.प्र.क्र.40575 . . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

दुसरा प्रश्न असा आहे की, नंदूरबार जिल्ह्यामध्ये वर्षानुवर्षापासून गुन्हे रजिस्टर झालेले आहेत. माननीय गृहमंत्री महोदय, आपले खाते अतिशय सक्षम आहे आणि आपणही सक्षमपणे काम करीत आहात. पण प्रत्यक्षात असे घडते की, काही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे रजिस्टर होत नाहीत, जर गुन्हा रजिस्टर झाला तर त्याबाबतीत कारवाई होत नाही. कलम 395 अन्वये रजिस्टर झालेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत देखील कारवाई केली जात नाही. माझा प्रश्न असा आहे की, नंदूरबार जिल्हयामध्ये ज्या-ज्या लोकांवर भ्रष्टाचार केल्यामुळे गुन्हे रजिस्टर झालेले आहेत, त्यांच्यावर त्या-त्या गुन्ह्याप्रमाणे ताबडतोब किती दिवसामध्ये कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी उपस्थित केलेला प्रश्न पाहिला तर त्यांच्या लक्षात येईल की, हा प्रश्न फक्त नगर जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी संपूर्ण राज्याच्या बाबतीत माहिती दिलेली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी मघाशी राज्याच्या बाबतीत याकरता माहिती दिली की, नगरच्या संबंधात जी चौकशी झाली, ती 2002 . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी खाली बसावे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी उत्तराला सुरुवात करताना राज्याची माहिती दिली. त्यानंतर या माहितीच्या अनुषंगाने एखादा उपप्रश्न उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, याठिकाणी अहमदनगर जिल्हयाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. पण आपण मूळातच ही बाब स्पष्ट केली असती तर बरे झाले असते.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी डिव्हीजनवाईज आकडेवारी देण्यास तयार आहे. पण जर एखाद्या स्पेसिफिक व्यक्तीबद्दल माहिती विचारली तर ती आता माझ्याकडे नाही. मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे सांगितलेले आहे.

. . . .2यु-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40575 . . . . .

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, याबाबतीत माहिती मिळालीच पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, डॉ.गावितांच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो आज याठिकाणी जो तारांकित प्रश्न विचारलेला आहे, त्याच्याशी निश्चितच संबंधित नाही हे सर्वांनाच पटेल. त्यांनी फक्त हाय कोर्टाच्या एका निर्णयाचा संदर्भ दिला. याठिकाणी अहमदनगर जिल्हयाच्या बाबतीत प्रश्न आहे. जर सन्माननीय सदस्यांना डॉ.गावित यांच्या संदर्भात प्रश्न विचारावयाचा असेल तर त्यासाठी अनेक आयुधे . . . .

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : पण तुम्ही प्रश्न स्वीकारत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी असे सांगितले की, सन्माननीय सदस्यांसाठी अनेक आयुधे उपलब्ध आहेत, त्यानुसार प्रश्न विचारु शकता. आपण या विषयाच्या संबंधात लक्षवेधी सूचना द्यावी. जरी हा विषय जुना असला तरी आम्ही शासनाच्यावतीने मान्यता देऊ.

**सभापती** : मी याबाबतीत नोंद घेतलेली आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पण दोन्ही बाजूने माहिती घेऊन उत्तरे देणे योग्य राहील. सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत लक्षवेधी सूचना उपस्थित करावी, आम्ही शासनाच्यावतीने त्याला उत्तर देऊ. प्रत्येक केसची आता माहिती असणे कसे शक्य आहे ? त्याचे स्टेटस काय आहे? वगैरे सर्व माहिती घेऊन येथे सांगू. याबाबतीत माहिती लपविण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी. नगर जिल्हयाच्या बाबतीत प्रश्न असताना जर सन्माननीय सदस्य नंदूरबारच्या बाबतीत प्रश्न विचारावयास लागले तर ते कितपत बरोबर आहे ? हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी, आपण ती स्वीकारावी आणि मग आम्ही त्याबाबतीत उत्तर देऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय गृहमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी नगर जिल्हयाच्या संबंधात प्रश्न .....

. . . .2 आय-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विचारलेला आहे. आता सुध्दा त्यासंबंधातील कोणतीही माहिती देण्याची शासनाची तयारी आहे. यापेक्षा सन्माननीय सदस्यांना या योजनेच्या संबंधात वेगळी माहिती हवी असेल तर ती देखील माहिती देऊ. परंतु त्यांनी योग्य आयुधे वापरुन, योग्य पध्दतीने हा प्रश्न उपस्थित करावा. नगर जिल्हयाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला असताना सन्माननीय सदस्य नंदूरबारच्या बाबतीत प्रश्न विचारीत असतील तर ते पध्दतीनुसार योग्य नाही. यासाठी सन्माननीय सदस्य पाहिजे तर लक्षवेधी सूचना देऊ शकतील.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माझा याठिकाणी प्रश्न विचारण्याचा जो मूळ उद्देश आहे, तो म्हणजे यामध्ये जे खरे लाभार्थी आहेत, जे या लाभापासून वंचित राहिलेले आहेत असे हजारो निराधार लोक आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत चौकशी करु. तर तशी ती करण्यात यावी. पण जे खरे लाभार्थी आहेत, त्यांच्या बाबतीत स्पेशल ड्राईव्ह घेण्याच्या दृष्टीने नगर जिल्हयाच्या कलेक्टर यांना सूचना द्याव्यात आणि एक महिन्यात, दोन महिन्यात, तीन महिन्यात, चार महिन्यात या लाभार्थींना सदरहू योजनेचा लाभ मिळणार आहे काय?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DVG/ MMP/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 14:00

ता.प्र.क्र. 40575..

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, समाजातील तळागाळातील व गरीब घटकांसाठी ही योजना राबविली पाहिजे यासाठी सर्व आमदारांची विभागीय बैठका घेण्यास सुरुवात केलेली आहे. काही विभागीय बैठका मी स्वत: घेतलेल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, काही जिल्हयामध्ये या बैठकांचे प्रमाण कमी आहे. अद्यापही तेथे कमिटया स्थापन झालेल्या नाहीत. ज्या ठिकाणी कमिटया स्थापन झालेल्या नाहीत, अशा ठिकाणी कमिटया स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जेथे कमिटी स्थापन झालेली आहे तेथे नियमाप्रमाणे तीन महिन्यातून एकदा बैठक घेतली गेली पाहिजे या दृष्टीने शासनाने बदल केलेला आहे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, ज्या मंत्र्यांवर आरोप आहे त्यांच्यावर...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली नाही त्यामुळे त्यांचे वक्तव्य मला नाईलाजाने कामकाजातून काढून टाकावे लागणार आहे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या ठिकाणी मी काय चुकीचे बोललो आहे ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मध्ये मध्ये कशाकरिता बोलत आहेत ? चुकीच्या वेळी चुकीच्या पद्धतीने सन्माननीय सदस्य बोलत आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता मी परवानगी दिलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने मघाशी असे सांगितले होते की, या संदर्भात लक्षवेधीची सूचना दिली तर...

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, एका केसचा संदर्भ दिला असेल तर राज्यातील ज्या सर्व केसेस आहेत त्यांची माहिती माननीय मंत्री महोदय सभागृहात देऊ शकत नाहीत. 13 हजार अधिकारी दोषी आढळून आलेले असतील तर त्यापैकी एका अधिकाऱ्याचे नाव घेतल्यास त्याची माहिती देणे शक्य आहे काय ? त्यामुळे सन्माननीय

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील... ता.प्र.क्र. 40575..

सदस्यांनी येथे स्पेसिफिक प्रश्न विचारला पाहिजे. हा प्रश्न नगर जिल्हयामधील आहे. त्यामुळे नगर जिल्यासंदर्भातील सर्व माहिती देण्यात येईल.

सभापती महोदय, काही ठिकाणी तीन महिन्यामध्ये बैठक घेतली जात नाही त्या संदर्भात नियमात दुरुस्ती करण्यात येत आहे. संबंधित कमिटीच्या अध्यक्षांनी तीन महिन्यामध्ये बैठक घेतली नाही तर त्या विभागाचे प्रांत मिटींग घेतील. तसेच आता समोर जे अर्ज आलेले आहेत त्या संदर्भात निर्णय घेतला जाईल. त्यामुळे आता पुढील काळामध्ये, माननीय आमदार बैठकीकरीता उपस्थित नाहीत किंवा त्यांनी वेळ दिला नाही म्हणून बैठक झाली नाही ही सबब प्रशासनाला सांगता येणार नाही. नगर जिल्हयामध्ये जे अर्ज प्रलंबित आहेत त्याचा सन्माननीय सदस्य श्री. गडाख यांनी उल्लेख केलेला आहे. (अडथळा ) अंध, अपंग व गरीब माणसांचे या योजनेत बसणारे अर्ज प्रलंबित आहेत. या संदर्भात एक स्पेशल ड्राईव्ह घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात. )

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कल्याण (पूर्व) येथील खडे गोलवली भागात राहणाऱ्या एका महिलेवर झालेला सामुहिक बलात्कार

**(३) * ३७५०७ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) येथील खडे गोलवली भागात राहणाऱ्या एका महिलेवर तिच्या घरात घुसून तिच्या पतीला जबर मारहाण करुन त्या महिलेवर गब्बर ठाकूर, मनोज नायर या दोघांनी सामुहिक बलात्कार केला असल्याची घटना दिनांक २ जानेवारी, २००८ वा त्या सुमारास घडली आहे तसेच जिम्मीबाग येथील साईकृपा चाळीत दोन अल्पवयीन सख्या बहिणींवर दिनांक ३ जानेवारी, २००८ रोजी वा त्यादरम्यान बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील घटनांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने पोलीसांनी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) दिनांक ३१.१२.२००७ रोजी कल्याण (पूर्व) येथील महिलेवर बलात्कार करण्यात आला असून दिनांक २.१.२००८ रोजी जिम्मीबाग येथील दोन अल्पवयीन बहीणींचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

(२),(३) व (४) होय, बालात्कारित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार कोळसेवाडी पो.ठा. येथे भा.द.वि. चे कलम ३७६, ४५२, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ प्रमाणे दिनांक १.१.२००८ रोजी गु.रं.क्र.०१/०८ नोंदविण्यात आला व दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. तसेच विनयभंग प्रकरणी मुलींच्या आईच्या फिर्यादीनुसार भा.द.वि.चे कलम ३५४ प्रमाणे गु.र.क्र.०५/०८ नोंदविण्यात आला आहे तथापि आरोपी फरारी असल्यामुळे त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

( दोन्ही पक्षातील सन्माननीय सदस्य एकमेकांशी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, कल्याण येथे एका मुलीच्या विनयभंग प्रकरणी गुन्हा किती तारखेला दाखल करण्यात आलेला आहे ? तसेच या मुलीच्या आईने केलेल्या फिर्यादीमध्ये आरोपीचा उल्लेख केलेला आहे काय, असल्यास त्यामध्ये किती आरोपींचा समावेश आहे ? एका बाजूला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अशा घटनेमध्ये कडक शिक्षा व्हावयाला पाहिजे असे सांगितले आहे. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री वचनास बांधील आहेत. असे असताना देखील गुन्हयाच्या तपासणीला विलंब होत आहे, आरोपी फरारी होत आहेत या संबंधित कोणती कारवाई शासनाकडून केली जाणार आहे ?

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, पहिल्या बलात्काराच्या घटनेतील दोन्ही आरोपींना शिताफीने पकडण्यात आले आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37507 .......

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकमेकांशी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, दुसरी जी विनयभंगाची घटना आहे त्याबाबत 3.1.2008 रोजी या गुन्ह्याची नोंद झाली आहे. त्यामध्ये दीपक आर. के. हे नाव निष्पन झाले परंतु आरोपी अजून सापडलेला नाही. त्याचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. आरोपी निश्चितपणे सापडावा यादृष्टीने पोलीस प्रयत्न करीत आहेत. बलात्काराच्या घटनेतील दोन्ही आरोपींना पोलिसांनी पकडले आहे. विनयभंगातील एका आरोपीला अद्याप पकडता आलेले नाही.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पोलिसांच्या समस्यांबाबतचा मेकॅन्झी अहवाल**

**(४) * ४०४९० श्री. दिवाकर रावते : दिनांक १ डिसेंबर, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित यादी क्रमांक २५ मधील प्रश्न क्रमांक ३२०६८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीसांच्या समस्यांचा अभ्यास करुन मेकॅन्झी या व्यावसाईक सल्लागार संस्थेने तयार केलेला अंतिम अहवाल राज्याचे पोलीस महासंचालकांनी दिनांक २० सप्टेंबर, २००६ रोजी गृहमंत्र्यांना सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही मेकॅन्झी संस्थेने एक अहवाल शासनाला सादर केला असून सदर अहवालात पोलीस दलाची संख्या, कामाचे तास, त्यांना घरे, आदि सुविधांबाबत शिफारशी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मेकॅन्झी अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने काही निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, तो कोणता,

(५) असल्यास, मेकॅन्झी अहवालाची शासनाने छाननी केली आहे काय ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) अंतिम अहवाल दिनांक २० सप्टेंबर,२००६ रोजी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांना सादर केला आहे.

(२) होय, दिनांक ३० ऑक्टोबर, २००५ रोजी अंतरीम अहवाल सादर केला होता.

(३),(४) व(५) मेकॅन्झी कंपनीच्या अंतीम अहवालातील शिफारशींची अभ्यासगटाद्वारे छाननी करून सविस्तर प्रस्ताव पाठविण्यास पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, यांना सांगण्यात आले आहे. त्यापैकी काही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले असून, ते शासनाच्या विचाराधीन आहे.

--------

( प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही )

----

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

**मुख्य कार्यकारी अधिकारी बीड (जि.बीड) यांचे शासकीय वाहन व खुर्ची जप्त केल्याबाबत**

**(५) * ३८०९८ श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी बीड (जि.बीड) यांचे शासकीय वाहन व खुर्ची दिनांक ३ जानेवारी, २००८ रोजी जप्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत.

(३) यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) होय.

(२) विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी वेळीच अपील दाखल न केल्यामुळे.

(३) विशेष भूसंपादन अधिकाऱ्यानी उशीराने का अपील दाखल केले याची चौकशी आयुक्त कार्यालयाने करण्यासंबंधी शासन विचाराधीन आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, प्रश्नामध्ये जास्त वेळ घेऊ नये हे माहीत असताना देखील एक बाब मला शासनाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. बीड जिल्ह्यात 30 प्रकरणांमध्ये शासनाने दोन वर्षापूर्वी पैसे दिलेले आहेत परंतु त्याचे वाटप झालेले नाही. ट्रेझरीचा अकाऊंट अटॅच झालेला आहे. या प्रकरणी मला असे विचारावयाचे आहे की, संपादित जमीन किती तारखेला संपादित करण्यात आली आणि न्यायालयाचा निवाडा किती तारखेला झाला. प्रत्यक्षात वाढीव मुआवजा शेतकऱ्यांना किती तारखेला दिला ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याआधीचा प्रश्न क्रमांक 40490 ज्या सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे ते सभागृहात उपस्थित असूनही त्यांनी प्रश्न विचारलेला नाही. यासाठी कोट्यवधी रुपये आपण खर्च करतो आणि सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत नाहीत.

**सभापती** : मी आपल्याला हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या प्रकरणी मला असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, 30 प्रकरणाचे पैसे शासनाने दिलेले आहेत परंतु त्याचे वाटप झालेले नाही. ट्रेझरीचे अकाऊंट अनेक वेळा न्यायालय अटॅच करते परंतु पैसे दिले जात नाहीत. या प्रकरणामध्ये ही जमीन किती तारखेला शासनाने ताब्यात घेतली ? न्यायालयाचा निवाडा किती तारखेला झाला ? प्रत्यक्षात शेतकऱ्यांना रक्कम किती तारखेला मिळाली आणि विलंबाचे कारण काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38098 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, निवाड्याची तारीख 20.11.1996 आहे. पहिल्यांदा ताबा घेतल्याची तारीख 6.8.1985 आहे. यामध्ये सुरुवातीला जो निवाडा निश्चित झाला तो 14,08,273 रुपयांचा होता. 1997 मध्ये ती रक्कम वर्ग केली. त्यानंतर तेथील जे भूधारक आहेत ते न्यायालयामध्ये गेले. न्यायालयामध्ये 5 प्रकारचे दावे दाखल झाले होते. न्यायालयाच्या निकालाप्रमाणे त्याची सुधारित रक्कम 85 लाख रुपयांपर्यंत गेलेली आहे. परवाच यासंदर्भात दुसरा निवाडा झालेला आहे. साधारणत: मे अखेरपर्यंत ही रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अपील करण्यास उशीर झाला. अपील करण्यास जो उशीर लागला त्याबद्दल त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार काय ? या शेतकऱ्यांना मुआवजा मिळाला की नाही ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी उत्तरामध्येच मान्य केलेले आहे की, विलंब झ ालेला आहे. अपील करण्यामध्ये विलंब का झाला याची चौकशी संबंधित अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल. यामध्ये दुसरा प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, बीड जिल्हा परिषदेने यासंदर्भामध्ये वेळोवेळी शासनाकडे जी माहिती द्यावयास पाहिजे होती ती माहिती वेळेत न दिल्यामुळे त्याची सुध्दा चौकशी करण्यात येईल. परवाच उच्च न्यायालयाचा आदेश आलेला आहे. त्याप्रमाणे मे अखेरपर्यंत ही रक्कम त्या शेतकऱ्यांना देण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले त्यावरुन आपल्या लक्षात आले असेल की, 1985 साली सुरु झालेले हे प्रकरण असून त्याची रक्कम आता जवळजवळ 1 कोटी रुपयांच्या घरात गेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, याची चौकशी करण्यात येईल. विशेष भूसंपादन अधिकारी हे कारकून किंवा शिपाई नाहीत. ते शासनाचे जबाबदार अधिकारी आहेत. त्यांना बडतर्फ करुन घरी पाठवणार काय ? त्याच्या चुकीमुळे शासनावर जेवढा अधिकचा भुर्दंड पडला तेवढी रक्कम त्यांच्याकडून वसूल करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38098.....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सुरुवातीला 14 लाख रुपयांची रक्कम निवाडयाप्रमाणे मान्य केली होती. ती शेतक-यांनी अंडर प्रोटेस्ट घेतली होती आणि तेच शेतकरी न्यायालयमध्ये गेले. शासनाने प्रती आर 180, 190, 200, 210, 220 रुपये या दराप्रमाणे निवाडा दिला होता. परंतु न्यायालयाने त्याबाबत फेरआदेश दिले. न्यायालयाने फेरआदेशामध्ये 180 रुपयांऐवजी 900 रुपये करावी आणि पोटखराब जमिनीची रक्कम 450 रुपये करावी असे म्हटले होते. त्यामुळे ही रक्कम वाढली आहे. न्यायालयाने रक्कम वाढविण्याचा आदेश दिला आहे. तेथील भूसंपादन अधिकारी यांच्यामध्ये हा दोष आढळून आला की, त्यांनी या निर्णयाच्या विरोधात कोर्टात अपील करावयास पाहिजे होते. अपील करण्यासंबंधी त्यांनी दिरंगाई केली आणि या प्रकरणी शासनाला वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांच्याविरुध्द निश्चितपणे चौकशी करुन कारवाई केली जाईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महादेय, या प्रश्नाशी थोडासा वेगळा प्रश्न आहे. परंतु ही परिस्थिती निर्माण होण्याचे एक कारण असे आहे की, बीड जिल्हयात भूसंपादन अधिका-यांची बरीच पदे रिक्त आहेत. एकेका अधिका-यांकडे 4-4 ठिकाणचा चार्ज आहे. त्यामुळे अधिका-यांवर कारवाई करीत असताना बीड जिल्हयाला भूसंपादन अधिकारी देण्याची सुध्दा कार्यवाही केली जाईल काय हा माझा प्रश्न आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी ( जि.ठाणे ) येथे नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात दोन गटात झालेल्या हाणामारीत १८ जण गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(६) * ३९७३५ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी वा त्या दरम्यान भिवंडी ( जि.ठाणे ) येथे नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात दोन गटात झालेल्या हाणामारीत तिघांनी केलेल्या गोळीबारात १८ जण गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेतील दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२), (३) व (४) काल्हेर माथाडी जनरल युनियन, काल्हेर, भिवंडी या युनियन वरील हक्काचे कारणावरुन सदर घटना घडल्याचे दिसून आले. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक १.१.२००८ रोजी नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे गु.नों.क्र.१/२००८ भा.दं.वि.सं. कलम ३०७, ३२६, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, ४२७ सह भा.ह.का. कलम ३/२५, २७ सह मुं.पो.का. कलम ३७(१)(३), १३५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील निष्पन्न १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींपैकी ७ आरोपी जामीनावर सुटले असून त्यांच्याविरुध्द फौ.प्र.सं. कलम १०७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा अधिक तपास चालू आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये नेमके काय आढळून आले ? 'या प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे,' असे उत्तरात नमूद केलले आहे. या घटनेला आता 3 महिन्यापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. हा तपास किती दिवसामध्ये पूर्ण होईल ?

श्री.आर.आर.पाटील : या प्रकरणी असे आढळून आले आहे की, श्री.राजेंद्र पाटील हे माथाडी कामगारांची जनरल युनियन चालवितात. त्यासंदर्भात श्री.सुजित पाटील व श्री.राजेंद्र पाटील यांच्यामध्ये वाद होता. या वादातून हे प्रकरण उद्भवले आहे. या प्रकरणी 12-13 आरोपींना अटक केलेली आहे. 2 आरोपी फरार आहेत, बाकीचा तपास पूर्ण होत आलेला आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतील ४ खटल्यांची**
**कागदपत्रे बेपत्ता असल्याचे उघडकीस आल्याबाबत**

**(७) * ३७६३२ श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सन १९९२ मध्ये उसळलेल्या जातीय दंगलीतील ७० आरोपी विरोधातल्या ४ खटल्यांची कागदपत्रे गेली १४ वर्षापासून बेपत्ता असल्याची खळबळजनक घटना माहे जानेवारी, २००८ मध्ये किंवा त्या सुमारास उघडकीस आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१),(२) व (३) हे खरे नाही, कुर्ला पोलीस ठाणे गु.र.क्र.९५१/९२, ९६४/९२, ९८३/९२ व १०२६/९२ या चार गुन्ह्याचे कागदपत्र गहाळ झाले नसून सदर गुन्ह्यांतील एकूण ६७ आरोपी विरुध्दची कागदपत्रे मा.अति.मुख्य महानगर दंडाधिकारी, ११ वे न्यायालय कुर्ला, मुंबई यांच्या न्यायालयात सादर करण्यात आली होती. नमूद खटले हे सत्र न्यायालयात चालणारे असल्याने सदरचे गुन्हे मा. ११ वे न्यायालयाने दिनांक २२.९.१९९४ रोजी मा. सत्र न्यायालयात वर्ग केले.

परंतू या गुन्ह्यांच्या कागदपत्रात काही त्रुटी राहिल्याने सदर चारही गुन्हे सत्र न्यायालयातून मा. ११ वे न्यायालयात परत करण्यात आले होते आणि त्रुटी दूर करणे बाकी असल्याने ते मा. ११ न्यायालयातच प्रलंबित राहिले होते.

११ वे न्यायालयाने पुन्हा या गुन्ह्याचे कागदपत्रे सत्र न्यायालयात वर्ग करण्याकरिता पाठविली होती. परंतू या कागदपत्रातील त्रुटीची पूर्तता राहिल्याने तेथील नोंदणी शाखेने ते पुन्हा ११ वे न्यायालयात त्रुटी दूर करण्याकरिता परत केले आहेत. याप्रकरणी ११ वे न्यायालयामार्फत पूर्तता चालू असून यातील त्रुटी पूर्ण होताच सदर ४ गुन्हे मा. सत्र न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात सुनावणी कामी वर्ग करण्यात येतील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या गुन्हयाच्या कागदपत्रात कोणत्या स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्या ? या गुन्हयाचा तपास कोणी केला आणि ज्यांनी कागदपत्रात त्रुटी ठेवल्या त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र.37632.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ब-याच वेळा वर्तमानपत्रातून आलेल्या बातम्यांच्या आधारे प्रश्न विचारले जातात आणि त्याचा हा परिणाम आहे. या प्रश्नाशी गृह खात्याचा, पोलीस खात्याचा काहीही संबंध नाही. पोलीस खात्याने अकराव्या न्यायालयामध्ये केस दिली होती. त्यांनी ही केस सेशन कोर्टात पाठविली. परंतु सेशन कोर्टाने खालच्या न्यायालयाकडून आरोपींच्या बेलसंबंधी वगैरे माहिती विचारली पाहिजे होती. हे प्रकरण कुर्ला येथील न्यायालयात होते. तेथे या प्रकरणाची कागदपत्रे पाण्यात भिजली, काही गहाळ झाली. त्यासंबंधी वर्तमानपत्रात बातमी आली होती. वास्तविक या केसमधील आरोपींना शिक्षा झाली पाहिजे अशी सरकारची इच्छा असल्यामुळे गहाळ झालेली कागदपत्रे शोधण्यासाठी पोलिसांनी मदत केली आहे. खरे तर ही जबाबदारी कोर्टाची होती. या केसशी पोलीस खात्याचा संबंध नाही. ही न्यायालयाची अंतर्गत बाब आहे. यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे. ही कागदपत्रे न्यायालयातून गहाळ झाली होती आणि आता ती शोधून देण्यात आलेली आहेत.

-----

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**सातेगाव ग्रामपंचायत (जि.अमरावती) येथील महिला सरपंचावर १० ते १५ जणांनी हल्ला केल्याबाबत**

**(८) * ४१४८२ प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रहिमापूर पोलीस स्टेशन अंतर्गत सातेगाव ग्रामपंचायत (जि.अमरावती) येथील सरपंच सौ.अलका प्रकाशराव काळे या महिलेचे अपहरण करून १० ते १५ जणांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेच्या संदर्भातील रहिमापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली आहे हे खरे आहे काय,
(३) सदर तक्रारीच्यानुसार शासनाने संबंधित व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) नाही.
(२), (३) व (४) याप्रकरणी केलेल्या तपासात असे निष्पन्न झाले की, श्रीमती अलकाताई दादाराव काळे, सरपंच, ग्रामपंचायत, सातेगाव, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती यांच्याविरुध्द दिनांक ४.२.२००८ रोजी अविश्वास ठराव होता. अविश्वास ठरावाचा अर्ज देणारे ग्रामपंचायत सदस्य श्रीमती उषाताई प्रकाशराव काळे व इतर ९ सदस्य हे अंजनगाव सुर्जी येथून सातेगाव येथे ट्रॅक्स गाडीने येत असताना जुनी स्मशानभुमी, सातेगाव जवळ सरपंच गटातील श्री.पुरुषोत्तम काळे यांनी ट्रॅक्टर आडवा करुन त्यांचेसह इतर १४ जणांनी गाडीवर दगडफेक करुन त्यांचेपैकी एका सदस्याला पळवून नेण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात श्रीमती उषाताई काळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ४.२.२००८ रोजी पोलीस स्टेशन रहिमापूर येथे अप.नं.३/०८, कलम १४७, १४८, ३३६, ३४१, ४२७, ५०४, ५०६, ३२३ भा.दं.वि.सं. प्रमाणे १५ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर असून त्यातील ११ आरोपींना दिनांक ८.२.२००८ रोजी अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द फौ.प्र.सं. कलम १०७, ११६(३) प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये 11 जणांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे, उर्वरित 4 जणांविरुध्द तशी कारवाई का करण्यात आली नाही आणि ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे त्यांच्यावर न्यायालयात कार्यवाही सुरु आहे काय ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता. प्र.क्र. 41482.....

श्री. आर.आर.पाटील : होय. त्यांना ॲरेस्ट करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तपासामध्ये उर्वरित लोकांची नावे आलेली आहेत. पुरावा बघून त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : महिला ग्रामपंचायत सदस्य किंवा महिला सरपंच यांना सार्वजनिक हिताच्या गोष्टी करताना मारहाण होत असेल तर त्याबाबतीत सरकारने स्वतःहून गुन्हा दाखल केला पाहिजे. परंतु ब-याच वेळा अधिकारी वैयक्तिक केस नोंदवायला सांगतात. तेव्हा महिला ग्रामपंचायत सदस्य आणि महिला सरपंच यांची सुरक्षा आणि प्रतिष्ठा राखण्याच्या दृष्टीने सरकार कोणती पावले उचलणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सरपंच म्हणून काम करीत असताना गावातील अतिक्रमण असेल तर ते अतिक्रमण काढणे हे सार्वजनिक हिताची बाब आहे. परंतु सरपंचाचा त्याच्या शेजा-याशी वाद असेल तर ती वैयक्तिक बाब समजता येईल. गावासाठी, ग्रामपंचायतीसाठी निर्णय घेत असताना सरपंचाना मारहाण झाली तर शासकीय कर्मचा-यांना जे प्रोटेक्शन दिले जाते तशा प्रकारचे प्रोटेक्शन या महिला आणि अन्य प्रतिनिधींना देण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी**
**बाल विकास केंद्र व बालवाड्या सुरु करण्याबाबत**

**(९) * ३७३०१ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. शरद रणपिसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या किती आहे याबाबतचे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय, असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(२) तसेच आदिवासी भागातील अनुक्रमे नांदगांव, सातूर, साखरशेत, मलवाडा, मोरांडा, खोडाळा, वाशाला, उपलाब, यायवन, गंजाड, वानगांव, घोलवट, मासवण, केळवा, माहिम, पारी, चंदनसार या विभागातील आदिवासी बालकांचे, कुपोषित बालकांसाठी बाल विकास योजनेमार्फत ३४ ठिकाणी केंद्र सुरु करण्याचा निर्णय दिनांक ७ जानेवारी, २००८ पासून घेतला आहे हे खरे आहे काय, असल्यास, योजनेच्या अंमलबजावणीचा प्रश्न काय आहे, सदर बालविकास केंद्र संदर्भातील कर्मचाऱ्यांचे वेतन व आहार व्यवस्था व देखभाल यासाठी शासनाने या वर्षासाठी किती निधीची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे,

(३) जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी वस्ती असलेल्या दुर्गम परिसरातील बालकांचे कुपोषण व बालमृत्यूचे वाढते प्रमाण लक्षात घेता, त्या परिसरात सर्व शिक्षा अभियानांतर्गत सुरु असलेल्या सुमारे १०० बालवाड्या शासनाने अचानक बंद केल्याने तेथील शेकडो मुले शिक्षण व आरोग्य सेवेपासून वंचित राहिल्याने कुपोषणात भर पडून बालमृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय, असल्यास, आदिवासी क्षेत्रातील बालमृत्यू रोखण्यासाठी शासन अशा बंद केलेल्या बालवाड्या सुरु करणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

(४) तसेच जिल्हा कुपोषणमुक्त करण्याच्या दृष्टीने जननी सुरक्षा केंद्र, रुग्ण कल्याण समिती, ग्राम आरोग्य पोषण आणि पाणीपुरवठा योजना अशा आरोग्य आणि पोषण आहाराच्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जाव्यात याबाबतची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय ?

**श्री.हर्षवर्धन पाटील :** (१) ठाणे जिल्ह्यात श्रेणी-३ मध्ये ३१८ व श्रेणी-४ मध्ये ७२ अशी एकूण ३९० अति कुपोषित बालके आहेत. त्यांचे दरमहा सर्वेक्षण करण्यात येते.

(२) ६ वर्षाखालील श्रेणी-३ व श्रेणी-४ मधील अति कुपोषित बालकांना एकत्रित आरोग्य व आहार सेवा देऊन त्यांचे श्रेणीवर्धन करण्याच्या उद्देशाने कुपोषित बालकांसाठी बाल विकास केंद्र चालविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार दिनांक २४.१२.२००७ ते दिनांक १४.१.२००८ या कालावधीत ३३ ठिकाणी बाल विकास केंद्र उघडण्यात आली आहेत. सदर केंद्रासाठी राष्ट्रीय ग्रामीण व आरोग्य अभियानाकडून खर्च करण्यात आला आहे. तसेच तेथील कर्मचारी शासकीय / जिल्हा परिषदेचे असल्यामुळे त्यांच्या वेतनासाठी स्वतंत्र तरतूद करावी लागत नाही. परंतु बाल विकास केंद्रातील आहार व्यवस्था व देखभाल यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी ठाणे जिल्ह्याच्या आरोग्य कृती आराखड्यामध्ये रु.१९.७५ लक्ष इतकी तरतूद करण्यात येत आहे.

==३==



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(३) हे खरे नाही, ठाणे जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, शिक्षण, आरोग्य व पोषण या सेवांपासून वंचित नाहीत. ठाणे जिल्ह्यात एकूण ३३९५ अंगणवाड्या असून एकूण ४,१६,७३० इतक्या बालकांना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे कुपोषित बालकांच्या संख्येत घट झाल्याचे खालील तपशिलावरुन दिसून येईल:-

| अ.क्र. | वर्षे | एकूण वजन घेतलेली बालके | श्रेणी ३ व ४ ची बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | फेब्रु-०६ | ३५०६०० | १४७७ | ०.४२ |
| २ | फेब्रु-०७ | ३७८३२१ | ६७८ | ०.१८ |
| ३ | फेब्रु-०८ | ३७७९९८ | ३९० | ०.१० |

नवोपक्रम अंतर्गत बाल शिक्षण या उपक्रमातून २७० बालवाड्यांना ३१ जानेवारी, २००७ पर्यंत अनुदान उपलब्ध करुन दिले जात होते. सदरचे अनुदान बंद केल्याने सदर २७० बालवाड्या बंद करण्यात आल्या. बंद करण्यात आलेल्या बालवाड्यांचे निकषाप्रमाणे अंगणवाडी / मिनी अंगणवाडी मध्ये रुपांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर बालवाड्या पुन्हा सूरु करण्याची आवश्यकता नाही.

(४) होय.

श्री. संजय दत्त : दिनांक 24-12-2007 ते 14.1.2008 या कालावधीत 33 ठिकाणी बाल विकास केंद्रे उघडण्यात आली. त्यासाठी किती खर्च करण्यात आला ? फेब्रुवारी 2008मध्ये 390 बालके श्रेणी- 3 व 4 मध्ये आढळून आलेली आहे. या बालकांची काळजी घेण्यासाठी कोणती खास योजना राबविण्यात आलेली आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : आपण बाल विकास केन्द्रे सुरु केलेली आहेत. 33 बाल विकास केन्द्रांचा तपशील आता माझ्याकडे उपलब्ध नाही. या बाल विकास केन्द्रामध्ये बालकांची वैद्यकीय तपासणी करणे, पूरक पोषण आहार देणे, आवश्यकता असेल तर वैद्यकीय उपचार देण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देणे अशा सर्व बाबी या बाल विकास केन्द्रामध्ये असतात. पहिल्यांदा 33 बाल विकास केन्द्रे सुरु केली. त्यानंतर 32 केन्द्रे सुरु केली. एकूण 65 बाल विकास केंद्रे सुरु केलेली आहेत. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्यामधील माहिती मी घेतलेली आहे.

..4..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काल हाती आलेल्या माहिती नुसार श्रेणी-3 मधील मुलांची संख्या कमी होऊन ती 271वर आलेली आहे आणि श्रेणी-4 मधील  मुलांची संख्या 74 वर आलेली आहे. श्रेणी-3 आणि श्रेणी-4 मधील मुलांची एकूण संख्या 345 इतकी आहे.

श्री. संजय केळकर : कुपोषण कमी करणे हा या केन्द्राचा उद्देश आहे. 270 बालवाडयांना अनुदान उपलब्ध करुन दिले जात होते. हे अनुदान बंद करुन त्या बालवाड्या बंद करण्यात आलेल्या आहे. सुरु असलेल्या ज्या 270 बालवाडया बंद केल्या त्या पुन्हा सुरु करण्यात येणार आहेत काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : त्या बालवाड्या होत्या. त्या अंगणवाडयांशी संबंधित नव्हत्या. तेथील स्थानिक पंचायत समिती किंवा नगरपालिकास्तरावर बालवाडयांच्या संबंधातील निर्णय घेतला जातो. धोरणात्मक निर्णय राज्यस्तरावर घेतला जातो. बालवाडयांचे अंगणवाडयांमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय घेतलेला असून त्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. अंगणवाडी झाली तर मुलांना पूरक पोषण आहार मिळतो, अंगणवाडी सेविका, मदतनीस असा कर्मचारी वर्ग मिळतो. बालवाड्यांचे अंगणवाडयांमध्ये रुपांतर करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. आतापर्यन्त 90 बालवाडयांचे रुपांतर अंगणवाड्यांमध्ये केलेले आहे. राहिलेल्या बालवाड्यांचे अंगणवाडयांमध्ये लवकर रुपांतर करण्यात येईल.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37301...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्रेणी-3 आणि श्रेणी-4 मधील कुपोषित बालकांची टक्केवारी माननीय मंत्री महोदयांनी दिली आहे. फेब्रुवारी, 2006 ते फेब्रुवारी, 2007 आणि फेब्रुवारी, 2007 ते फेब्रुवारी, 2008 या दोन वर्षात ठाणे जिल्हयात किती कुपोषित बालकांचा मृत्यू झाला ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी माहिती विचारली आहे त्याबाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. महाराष्ट्रात कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यासाठी जिजामाता बाल आरोग्य मिशन हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरु केला आहे. महाराष्ट्रात आदिवासी पट्टे आहेत, स्लम एरिया त्या परिसरामध्ये कार्यक्रमाची मोठया प्रमाणात अंमजबजावणी सुरु केली आहे. कुपोषित बालकांची पूर्वीची आकडेवारी आणि गेल्या वर्षभरातील आकडेवारी याची तुलना केली तर त्यात कुपोषणाचे प्रमाण निश्चितच कमी झालेले आहे असे दिसून येईल.

-------------

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक - 40349</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**लोहारा (जि.गोंदिया) येथील आदर्श शाळेतील विद्यार्थ्यांच्या**

**पोषण आहाराचे धान्य व इतर वस्तू चोरी गेल्याबाबत**

**(११) * ३७७८३ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील**

: सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (जि.गोंदिया) येथील आदर्श शाळेतील विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराचे धान्य व इतर वस्तू दिनांक २१ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान काही चोरांनी चोरुन नेल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक २२ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान देवरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) लोहारा येथील जिल्हा परिषदेच्या आदर्श केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेमधून दि.२०.१२.२००७ ते दि. २२.१२.२००७ च्या दरम्यान विद्यार्थ्यांचे पोषण आहार धान्य व इतर वस्तू मिळून रु. ७,४७७/- चा माल चोरीला गेल्याबाबतचा गुन्हा देवरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १०६/०७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० अन्वये नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून २,५६६/- रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, याप्रकरणी गुन्हा कधी नोंदविण्यात आला ? या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे तर त्यांची नावे काय आहेत ? या आरोपींकडून उर्वरित माल हस्तगत करावयाचा आहे, त्यासाठी शासनाने कोणती पाऊले उचलली आहेत ?

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सदरहू चोरी प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २२.१२.०७ रोजी तक्रार नोंदविण्यात आली आहे. श्री. विजय यशवंत भोयर, श्री. संदिप टेंभुळकर आणि श्री. महेंद्र शामलाल टेंभुळकर अशी आरोपींची नावे आहेत. हे तिन्ही आरोपी अल्पवयीन आहे. त्याचे वय 17 वर्ष एवढे आहे. या आरोपींनी विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या पोषण आहाराचे धान्य आणि आहार बनविण्यासाठी लागणा-या भांडयांची चोरी केली आहे. या चोरी प्रकरणी 7777 रुपयांचा माल चोरी गेला होता. त्यापैकी आरोपींकडून 2566 रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. कदाचित उर्वरित धान्य त्या आरोपींनी खाऊन टाकला असावा. तरी देखील उर्वरित रक्कमेचा माल रिकव्हरी करण्याचा प्रयत्न चालला आहे.

----------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खरबढोरे (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील राणी लक्ष्मीबाई महिला बचत गटातर्फे देण्यात येणारा निकृष्ट आहार**

**(१२) * ३९६२० श्री. जगदीश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरबढोरे (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील राणी लक्ष्मीबाई महिला बचत गटातर्फे मुलांना दुर्गंधी, खडे व अळ्या युक्त निकृष्ट आहाराचे वाटप होत असल्याची तक्रार तेथील ग्रामस्थांनी जून, २००६ वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अंगणवाडीतील मुलांना चांगल्या प्रकाराचे आहार वाटप करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) खरबढोरे (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील ग्रामस्थांची तक्रार माहे जून-२००६ वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : या प्रकरणाच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली नाही अशा प्रकारचे विभागाकडून लेखी उत्तर देण्यात आले आहे. यासंदर्भात जरी तक्रार प्राप्त झाली नसेल, तरीही या प्रकरणाबाबतची चौकशी झाली आहे काय ? विद्यार्थ्यांना आहार वाटप करण्याचे काम महिला बचत गटांना देण्यासंबंधी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. महिला बचत गटाकडे आहार वाटप योजनेचे काम दिल्यामुळे कुपोषण बालकांचे प्रमाण कमी झाले आहे, काय याबाबतचा सर्व्हे शासनामार्फत करण्यात आला आहे काय ? नसल्यास, तसा सर्व्हे करण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : महाराष्ट्रातील 85 हजार अंगणवाडयांमध्ये पूरक पोषण आहार देण्याचे काम पूर्वीच्या काळात ठेकेदारामार्फत करण्यात येत होते. परंतु सदर पूरक पोषण आहार देण्याचे काम महिला बचत गटांकडे देण्यात यावे अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासंबंधीची आकडेवारी पाहिली तर 95 टक्के पूरक पोषण आहार देण्याचे काम महिला बचत गटांमार्फत सुरु झाले आहे. पूरक पोषण आहाराचे काम महिला बचत गटांकडे सोपवावे अशा प्रकारचा शासनाने जी.आर.काढलेला आहे. या राज्यात महिला बचत गटाकडून पूरक पोषण आहार देण्याचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने होत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील खरबढोरे येथे राणी लक्ष्मीबाई बचत गटातर्फे मुलांना निकृष्ट आहार दिला जातो असा स्पेसिफीक प्रश्न विचारलेला होता. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे तक्रार प्राप्त झाली नाही अशा प्रकारचे लेखी उत्तर देण्यात आले आहे. खरबढोरे येथील राणी लक्ष्मीबाई महिला बचत गटातर्फे मुलांना दुर्गंधी, खडे व अळया युक्त निकृष्ट आहाराचे वाटप होते अशा प्रकारची बाब निदर्शनास आली आहे आणि त्या अनुषंगाने सदर गावातील ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे तक्रार केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे या तक्रारीची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. हा प्रश्न अकोला जिल्हयातील आहे. या जिल्हयातील अनेक अंगणवाडयांमध्ये हा प्रकार चालला आहे. म्हणून या जिल्हयातील ज्या ज्या महिला बचत गटांकडे पूरक पोषण आहाराचे काम दिले आहे, त्यांच्याकडून मुलांना आहार व्यवस्थित दिला जातो आहे किंवा नाही याबाबतची चौकशी केली जाईल काय ? माझ्याकडे अनेक अंगणवाडयांच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या खरबढोरे या गावाची देखील तक्रार माझ्याकडे प्राप्त झाली आहे. ती तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्राप्त झाली नसेल तर ती तक्रार आपल्याकडे आणून द्यावयास मी तयार आहे...

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 39620 पुढे सुरु...

श्री. पांडुरंग फुंडकर ....

परंतु अकोला जिल्हयामध्ये अंगणवाडयांमध्ये जे पोषण आहाराचे वाटप चालू आहे त्याच्यामध्ये भ्रष्टाचाराची बरीचशी प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. निकृष्ट दर्जाचा माल दिला जातो याची चौकशी वरिष्ठ पातळीवरुन केली जाणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, खरबढोरे या गावामध्ये राणी लक्ष्मीबाई महिला बचत गटातर्फे आहार देण्यात येतो याबाबत तक्रार आहे काय असा मूळ प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर मी चर्चा केली. त्यांनी अशी तक्रार आलेली नाही असे मला सांगितले. सन्माननीच विरोधी पक्षनेत्यांकडे जी तक्रार आलेली आहे त्याची प्रत मला द्यावी. त्याबाबत निश्चितपणाने चौकशी करण्यात येईल. पोषण आहार देण्याबाबत गाव पातळीवर, तालुका पातळीवर आणि जिल्हा पातळीवर एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यांना अधिकार दिलेले आहेत. बचत गटामार्फत पोषण आहाराचा पुरवठा केला जातो त्यावर नियंत्रण करणे, पर्यवेक्षक, आरोग्यसेविका, सीडीपीओ यांच्यावर नियंत्रण ठेवणे ही कामे समितीकडे दिलेली आहेत. पोषण आहाराचा पुरवठा होत नसल्याबद्दल काही स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याची फेरचौकशी करण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने महिला बचत गटामार्फत पोषण आहाराचे वाटप करण्याचे जे धोरण स्वीकारलेले आहे त्याचे मी स्वागत करतो. परंतु बचत गटाच्या माध्यमातून ठेकेदार हे काम करणार नाहीत याची दक्षता शासन घेईल काय ? सुरुवातीपासून याचे नियोजन होणे आवश्यक आहे. अन्यथा सहकारी संस्थांच्या नावावर व्यापारी काम करतात त्याचप्रमाणे बचत गटाच्या माध्यमातून अन्य कोणी काम करणार नाही याबाबत शासन कोणते धोरण ठरविणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महिला बचत गटांना शालेय पोषण आहार देण्याबाबत 27 पानांचा जीआर शासनाने काढलेला आहे. महिला बचत गटांनाच हे काम मिळावे. ठेकेदार काम करु शकणार नाही कारण एका महिला बचत गटाला एकाच अंगणवाडीचा पुरवठा करण्याचे काम दिलेले आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर समिती गठीत केलेली आहे. पोषण आहार देताना रेसिपि काय असावी किती कॅलरीज् वापराव्यात हे निश्चित करण्यात

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 39620 पुढे सुरु....

श्री. हर्षवर्धन पाटील...

आल्यामुळे महिला बचत गटाच्या पाठीमागून ठेकेदार काम करील अशी शक्यता नाही. तरीसुध्दा याबाबतच्या काही सूचना असतील तर शासन जरुर त्यामध्ये सुधारण करील. परंतु निश्चितपणाने पोषण आहाराचे काम महिला बचत गटामार्फतच करण्यात येत आहे.

------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे शहरातील पोलिसांनी लातूर येथील सुवर्णड्राप्स कंपनीच्या प्रतिनिधींना अटक केल्याबाबत

**(१३) * ३७४२६ श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास श्री. धिरज घाटे या सामाजिक कार्यकर्त्याच्या तक्रारी वरुन पुणे शहरातील दांडेकर पूल परिसरात (पर्वती पायथा) स्वारगेट पोलिसस्टेशनच्या पोलीसांनी स्मरणशक्ती वाढवण्याच्या नावाखाली सुवर्णड्राप्स २५ रुपयांमध्ये देणाऱ्या लातूर येथील कंपनीच्या १२ प्रतिनिधींना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियमानुसार अशापध्दतीने उपचार करण्यासाठी वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी केली होती का व या औषधोपचाराच्या वेळेस वैद्यकीय प्रतिनिधी उपलब्ध असणे आवश्यक असल्याने, तो होता का,

(३) या बारा प्रतिनिधींच्या विरोधात कारवाई करण्याआधी ज्याकंपनीचे हे प्रतिनिधी आहेत त्या कंपनीचे संचालक, व्यवस्थापक इ. विरोधात या प्रकरणी काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) हे खरे नाही.

परंतु श्री.धिरज घाटे, सरचिटणिस, भारतीय जनता युवा मोर्चा, पुणे शहर यांनी दिलेल्या अर्जावरून रिलायन्स ग्रुप प्रिव्हेंटीव्ह ॲण्ड सोशल हेल्थ केअर सर्व्हिसेस संस्था, लातूर यांनी साई क्लिनीक, दांडेकर पुल, दत्तवाडी , पुणे या ठिकाणी घेतलेल्या शिबीराबाबत स्वारगेट पोलीस ठाणे येथे दिनांक २८.१२.२००७ रोजी स्टेशन डायरी नं ५३/०७ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) लातूर येथील उपरोक्त संस्थेने महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय परिषदेकडे नोंदणी केलेली नाही. तसेच सदर शिबिराचे वेळी वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते. या शिबीराचे वेळी पोलीसांनी ताब्यात घेतलेले औषध / अन्न व औषध प्रशासन, पुणे यांचेकडे तपासणीसाठी दिनांक २.१.२००८ रोजी पाठविलेले आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे. या प्रकरणी चौकशी सुरू आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तर दिलेले बरोबर आहे. परंतु अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे याचा अर्थ काय ? तीन महिले झाले तरी अहवाल प्राप्त झालेला नाही. म्हणून एक महिन्याच्या आता चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ?

.......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आज सकाळी ब्रिफींग घेताना अहवाल प्राप्त झाला आहे असे समजले आहे. अहवाल माझ्याकडे उशिरा आल्यामुळे मी पाहिला नाही. परंतु वरवर माहिती घेतली असता असे लक्षात आले की आयुर्वेदिक औषध शिबिराचे वेळी आढळून आले. औषध नसेल तर कारवाई करण्यात येईल आणि औषध असेल तर कारवाई करण्याची आवश्यकता नाही. म्हणून तजवीज हा शब्द वापरला आहे.

--------

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मोहम्मद सय्यद देसाई याला पाकिस्तानातील आयएसआयचा एजंट म्हणून अटक केल्याबाबत**

**(१४) * ३९८८६ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :**
सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहम्मद सय्यद देसाई याला पुणे पोलीसांनी पाकिस्तानातील आयएसआयचा एजंट म्हणून अटक केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या एजंटला पुण्यातील सहकार नगर पोलीस ठाण्यामध्ये आणले असता त्याने शौचालयाला जायचे निमित्त करुन पलायन केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा धोकादायक आरोपीच्या पलायनास जबाबदार असणाऱ्या सहकार नगर पोलीस ठाण्यातील किती पोलीसांवर कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, कारवाई न करण्यामागील कारणे कोणती ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) व (२) हे खरे आहे.
आरोपी सईद अहमद महमद देसाई, पाकिस्तानी नागरिक यांच्याविरुध्द १९९९ मध्ये गुन्हा दाखल करुन त्यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. मा.न्यायालयाने त्याला नंतर सक्तमजुरीची शिक्षा दिली. परंतु सदर आरोपीला दिलेली शिक्षा ही न्यायालयीन कालावधीमध्ये संपली असल्या कारणाने त्याला त्याच्या देशात परत पाठविण्याची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सहकारनगर पोलीस ठाण्यामध्ये योग्य निगराणीखाली ठेवण्याचे मा.न्यायालयाने आदेश दिले. त्याप्रमाणे तो पोलीस ठाण्यामध्ये योग्य त्या निगराणीखाली होता. परंतू दि. २३/१/२००८ रोजी तो ज्या पोलीसाच्या निगराणीखाली होता, तो पोलीस बाथरुमला गेल्यावर तो पोलीस ठाण्यामधून निघून गेला.
(३) सदर घटनेस जबाबदार असलेल्या पोलीसावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पोलीस ठाण्यामध्ये आरोपीवर निगराणी असताना सुध्दा तो निघून गेला. आरोपी हा पाकिस्तानी नागरिक होता. त्याला सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. पाकिस्तानी नागरिकाला सक्त मजुरीची शिक्षा झालेली होती. आणि त्याला पुन्हा पाकिस्तानात पाठविण्यासाठी इतका हलगर्जीपणा दाखविण्यात आला आहे. पोलिसांवर दंडात्मक कारवाई केलेली आहे. हा आरोपी पुन्हा सापडला काय ? त्याचा शोध घेण्यात आला आहे काय ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : काही वेळेला पोलिसांची देखील अडचण होते. शिक्षा संपल्यामुळे आरोपीला कोर्टातून सोडले जाते. परंतु तो आरोपी जर परदेशातील असेल तर त्याला परत पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यास काही कालावधी लागतो. मधल्या काळात त्याची शिक्षा संपल्यामुळे त्याला ठेवायचे कुठे? अटक करुन ठेवले तर बेकायदेशीर डांबून ठेवले असा अर्थ होतो. म्हणून अटकेतही ठेवता येत नाही. मोकळे सोडले तर परदेशात जाऊन पुन्हा त्याला शोधण्याची पाळी पोलिसांवर येते. आरोपी कायदेशीररित्या सुटला होता, तो पळून गेला हे खरे आहे. परंतु पोलिसांनी शिथाफीने कलकत्ता येथे जाऊन त्याला पकडले म्हणून पोलिसांवर इतर कारवाई केली नाही. तो कायदेशीर कस्टडीमध्ये नव्हता. फक्त नजर ठेवणे एवढेच काम होते. तरी सुध्दा तो तेथून गेल्यानंतर पोलिसांनी पुन्हा पकडले म्हणून दंडात्मक कारवाई केली नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 चा 41 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम, 2002 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक-मुवक.1507/प्र.क्र.6/कराधान-1, दिनांकित 21 जानेवारी, 2008 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, श्रीकांत जोशी, गुरुमुख जागवानी, जगदीश गुप्ता यांनी "राज्य शासनाने रोहयो योजनेमध्ये कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत समाविष्ट करुन घेण्याचा निर्णय दि.30.1.2004 रोजी जाहीर करुनही त्यांना अद्याप सेवेत घेण्यात न येणे, त्यामुळे सदर सहाय्यकांनी दिनांक 1 एप्रिल, 2008 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे सुरु केलेले आमरण उपोषण" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाच्या विविध मागण्या पूर्ण होत नसल्याने सदर महासंघाने दिनांक 10 एप्रिल, 2008 पासून बेमुदत धरणे कार्यक्रम आयोजित करणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "अखिल भारतीय अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या केंद्र वाटपाच्या प्रक्रियेमध्ये गोंधळ झाल्यामुळे राज्यातील शेकडो परिक्षार्थ्यांना पुणे, नागपूर ऐवजी पोर्टब्लेअर, अहमदाबाद, सुरत, बडोदा इ.ठिकाणी परीक्षा केंद्र दिल्याने विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याच विषयावर नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना देखील देण्यात आली होती. या विषयावर चर्चा घेण्याचे मी मान्य केले आहे. चर्चा कोणती द्यायची या संदर्भातील निर्णय मी दालनात जरुर घेईन. या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "रत्नागिरी येथील गद्रे मरीन एक्स्पोर्ट कंपनी आपल्या उद्योगातील प्रदूषित पाणी अनधिकृतपणे टँकरद्वारे परिसरातील खाडीत सोडत असल्यामुळे परिसरातील लोकांचे आरोग्य तसेच मच्छिमारांचा व्यवसाय धोक्यात येणे" या विषयावर

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "शासनाने दिनांक 23 जुलै, 2007 रोजीच्या आदेशान्वये गुटखा उत्पादन, खरेदी व विक्री यावर बंदी घातलेली असताना गुटख्याचे उत्पादन सुरु असून या प्रकरणी जवळपास 332 खटले दाखल होऊन गुटखा निर्मिती उत्पादक सापडत नाहीत या कारणावरुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यास होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी "शासनाने मध्यवर्ती कर प्रणालीच्या कराच्या दरामध्ये फेरफार केल्याने छोट्या हॉटेल व्यावसायिकांना पूर्वी 2 टक्के कर लागत असताना आता तोच कर 8 टक्के दराने भरावा लागत असल्याने छोट्या व्यावसायिकात पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "दिनांक 5 एप्रिल, 2008 रोजी मुंबईतील जेजे मार्ग उड्डाणपुलावर होर्डिंग जाहिरात लावण्याच्या कारणावरुन दोन गटात झालेल्या हाणामारीवरुन पोलिसांनी त्यांना केलेली अटक" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "निम्नपेढी, पंढरी व पाक नदी जि.अमरावती या प्रकल्पाकरिता परिसरातील बिगर आदिवासी शेतकऱ्यांना जमीन विक्रीची परवानगी देऊन आदिवासी शेतकऱ्यांना या प्रक्रियेपासून वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या तीन प्रकल्पांमध्ये लोक स्वेच्छेने आपल्या जमिनी सरळ खरेदी करुन देत आहेत. त्यात गैर आदिवासींच्या जमिनीची खरेदी मोठया प्रमाणात होत आहे. अशा प्रकारे गेल्या सहा महिन्यात जवळपास 1400 लोकांच्या जमिनी खरेदी करण्यात आल्या आहेत. परंतु आदिवासी कास्तकारांना बाजूला बसवून ठेवलेले आहे, त्यांच्या जमिनीची खरेदी होत नाही. कारण काय सांगितले जाते तर नॉर्मल कोर्समध्ये आदिवासींच्या जमिनी खरेदी करण्यासाठी जमीन महसूल अधिनियम, 1966 च्या कलम 36 (अ) प्रमाणे शासनाची परवानगी पाहिजे. नॉर्मल कोर्समध्ये विचार केला तर हे ठीक आहे पण जिल्हाधिकारी म्हणतात की, या प्रकल्पाला शासनाने मान्यता दिलेली असल्यामुळे या ठिकाणी सुध्दा अशा मान्यतेची आवश्यकता आहे. पण कमिशनरांकडून मंत्रालयाकडे 24 तारखेला दोन रेफरन्सेस आलेले आहेत. म्हणून विभागीय आयुक्तांनी मंत्रालयात जी प्रकरणे पाठविलेली आहेत त्यावर गरीब आदिवासींच्या दृष्टीने लवकरात लवकर निर्णय होण्याच्या दृष्टीने सभागृहात परवाच निवेदन केले तर बरे होईल.

**सभापती** : येत्या दोन तीन दिवसात यासंबंधीचे निवेदन होईल, अशी मी सूचना करतो.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "राज्यातील विणकरांना हातमागावर उत्पादित केलेल्या कापडांची मागणी कमी असल्यामुळे सदर कापडाचे उत्पादन कमी झाल्याने हातमाग महामंडळाला मोठ्या प्रमाणावर तोटा होऊन विणकरांना रोजगार उपलब्ध नसल्याने सानुग्रह अनुदान देण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य ज्या सूचना आल्या होत्या, त्यांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

परवा मी सभागृहात सांगितले होते, त्यानुसार आजच्या कामकाज पत्रिकेवर 260 अन्वये दोन प्रस्ताव चर्चेसाठी आहेत. त्यातील एका प्रस्तावावरील उत्तर बाकी आहे. दुसरा प्रस्ताव सुध्दा आजच पूर्ण करावयाचा आहे, म्हणून आज आपण लक्षवेधी सूचना घेतलेल्या नाहीत. म्हणून आजच्या लक्षवेधी सूचना आणि उद्याच्या लक्षवेधी सूचना मिळून जवळपास 10 ते 12 लक्षवेधी सूचना उद्या सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत घेण्याचे मी ठरविले आहे. दुपारी 12.15 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज घेण्यात येईल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 ची निवेदने सुध्दा बाकी आहेत.

**सभापती** : नियम 93 अन्वये 20 निवेदने सुध्दा बाकी आहेत व ती येत्या दोन दिवसात घेण्यात येतील. तसेच 18 ते 20 अर्धा-तास चर्चा सुध्दा राहिलेल्या आहेत, या सर्व चर्चा घेण्यासाठी सुध्दा एक दोन दिवस देऊन अशाच प्रकारे पूर्ण करण्यात येतील.

आता सभागृहात प्रथम माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे, ॲड. अनिल परब, डॉ. दीपक सावंत, श्री. संजय केळकर, श्री. प्रकाश शेंडगे आणि श्री. सय्यद पाशा पटेल या सहा सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, त्यानंतर माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी जवळपास एक तास वेळ लागणार आहे. अशा प्रकारे पहिल्या प्रस्तावाला दीड तास वेळ देण्यात येईल. त्यात सन्माननीय सदस्यांना पाच-पाच, सहा-सहा मिनिटे बोलण्यासाठी वेळ दिलेला आहे व त्या वेळेतच सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे. त्यानंतर ज्यांचा प्रस्ताव आहे, त्यांनाही उत्तरादाखल बोलण्यासाठी थोडा वेळ द्यावा लागणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आता मी मध्यांतरासाठी अर्ध्या तासाकरिता सदनाचे कामकाज तहकूब करीत आहे. दुपारी 3.15 वाजता सदनाची बैठक पुनः भरेल. दुपारी 3.15 नंतर आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुर्ण केल्याशिवाय दुस-या चर्चेला मी परवानगी देणार नाही.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुनः भरेल.

( 2.40 ते 3.15 मध्यंतर )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरा नंतर

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: राज्यात विजेच्या भारनियमनामुळे निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी : राज्यात विजेच्या भारनियमनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत सर्वश्री पांडुरग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी.,दिवाकर रावते, विनाद तावडे, डॉ.दीपक सावंत,सर्वश्री मधुकर चव्हाण,डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री अरविंद सावंत, श्रीकांत जोशी,अनिल परब,परशुराम उपरकर,संजय केळकर,केशवराव मानकर, पाशा पटेल,वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला )

**उपसभापती** : आता विजेच्या प्रश्नासबंधी नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल. त्यानंतर मुंबईतील कापड गिरण्याच्या जमिनीसबंधी आणखी एक नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा होणार आहे. तेव्हा या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करण्याकरता विजेच्या प्रश्नासबंधीच्या प्रस्तावावरील चर्चा लवकर संपविणे आवश्यक आहे म्हणून सन्माननीय सदस्यांनी विस्तृत न बोलता आपले विचार थोडक्यात मांडावेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी मुद्याशिवाय बोलत नाही.

**उपसभापती** : आपला आदर्श इतरही सन्माननीय सदस्यांनी घ्यावा एवढेच मला सांगावयाचे आहे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्रीमती उषा दराडे ( विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभी आहे.

सभापती महोदय, ऊर्जा खात्यासबंधी सभागृहात ज्या ज्या वेळेला चर्चा होत असते त्या त्या वेळी शासनाला आणि ऊर्जा खात्याला आरोपीच्या पिंज-यात टाकल्यासारखी चर्चा केली जाते. एन्रॉन सबंधी जेव्हा चर्चा् झाली होती तेव्हा त्यावेळचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांच्यावर आरोप झाले होते. त्या इतिहासामध्ये मी जाऊ इच्छित नाही. परंतु त्यावेळी ज्या पध्दतीने आपण वीज निर्मिती थांबवली होती त्या पध्दतीचा परिणाम म्हणून मागच्या दहा वर्षात आपल्याला अंधारात रहावे लागले आहे. केवळ शासन किंवा ऊर्जा खाते यांना आरोपीच्या पिंज-यात बसवून

श्रीमती उषा दराडे ....

केवळ टीकेची झोड उठवून हा प्रश्न सुटणार नाही असे मला सांगावयाचे आहे.सभापती महोदय, आज जी विजेची टंचाई निर्माण झालेली आहे किंवा आज ज्या अडचणीतून राज्य चालले आहे त्याला फक्त शासनच जबाबदार आहे असे समजून चालणार नाहीर तर ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे ती मंडळीसुध्दा कदाचित शासना पेक्षा जास्त जबाबदार आहे. त्यामुळे या प्रश्नातून मार्ग काढत असतांना अत्यंत संयमाने, समजूतदारपणाने मार्ग काढणे गरजेचे आहे. सभापती महोदय, या संदर्भातील आणखी एक गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे , ज्यावेळी एन्रॉन प्रकल्प समुद्रात बुडविण्याची भाषा केली गेली होती त्यावेळी विविध प्रकल्पाव्दारे महाराष्ट्रात होणारी गुंतवणूक बंद झाली होती. परंतु मागच्या आठ वर्षात महाराष्ट्रात वेगवेगळया प्रकल्पामध्ये गुंतवणूक व्हावयास लागली आहे. नवीन कारखानदारी यावयास सुरुवात झाली आहे त्यामुळे विजेची मागणी देखील मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. सिंचनाच्या बाबतीत सुध्दा मोठया प्रमाणात राज्यामध्ये गुंतवणूक करण्यात आली असून मोठया प्रमाणात सिंचन प्रकल्प तयार झाले होते त्यामुळे शेतक-याकडून विजेची मागणी मोठया प्रमाणावर केली जात आहे. विजेची गरज , विजेची निर्मिती याचा मेळ घालत असतांना कोठे तरी गल्लत होत आहे किंवा अडचण निर्माण होत आहे. जेवढी विजेची मागणी आहे तेवढी वीज निर्माण होत नाही हे कबूल करीत असतांना ती वीज निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत किंवा नाही ही गोष्ट समजावून घेतली पाहिजे.एका गोष्टीचा मी येथे उल्लेख करणार आहे. ज्यावेळी श्री.गोपीनाथ मुंडे ऊर्जा मंत्री होते त्या वेळी दिनांक 13एप्रिल 1999 रोजी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव पिचड,डॉ.पदम्‌सिंह पाटील, सवर्श्री विजयसिंह मोहिते पाटील, रोहिदास पाटील व इतर सन्माननीय सदस्यांनी विजेच्या संदर्भात प्रस्ताव आणला होता. त्या प्रस्तावाला उत्तर देत असतांना श्री.गोपीनाथ मुंडे यांनी असे सांगितले होते की, महाराष्ट्रात विजेची गरज आणि निर्मिती याचा मेळ घालत असतांना फार त्रास होत आहे अचानक 4 हजार मेगॅवॅट विजेची मागणी वाढलेली आहे. एका वर्षात जर चार हजार मेगॅवॅटची मागणी वाढली तर लोडशेडीग निश्चितपणे करावी लागेल आणि 800 ते 1000 मेगॅवॅटचे लोडशेडींग करणे गरजेचे आहे..

नंतर श्री.सुंबरे



KBS/ KTG/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 14:50

श्रीमती दराडे ....

म्हणून हा प्रश्न केवळ सत्ताधाऱ्यांचा नाही तर विरोधी पक्षाच्या आमदारांनीदेखील यामध्ये समजूतदारीची भूमिका घेऊन सर्वांनी मिळून यातून मार्ग काढला पाहिजे अशा प्रकारचे आवाहन या 13 एप्रिल 1999 च्या भाषणामध्ये उत्तर देत असताना तत्कालीन ऊर्जा मंत्र्यांनी केले होते., त्याची आठवण मला या सभागृहाला करून द्यायची आहे. तेव्हा केवळ सत्तेमध्ये आहेत त्यांना या प्रश्नी आरोपी करून प्रश्न सुटणार नाही असे जे मी बोलले त्यावेळेस मला येथे आठवण करून द्याविशी वाटते की, आपण यातून बाहेर येण्यासाठी काही प्रयत्नच करीत नाही का ? आपण यासाठी निश्चित काही प्रयत्न करीत आहोत आणि त्या दृष्टीने मला काही बाबी आपल्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. आजूबाजुच्या राज्यांमध्ये वीज निर्मिती आणि पुरवठा यामध्ये काय परिस्थिती आहे हेही आपण या निमित्ताने अभ्यासले पाहिजे. म्हणजे दुसऱ्या राज्यातही वीज मिळत नाही असे सांगून आपल्याकडे जे मिळत नाही त्याचे मी समर्थन करते आहे असे कोणी समजू नये., परंतु या संदर्भात नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. जी काही वस्तुस्थिती आहे ती आपण स्वीकारली पाहिजे. साऱ्या देशातच अशा प्रकारची परिस्थिती आहे. आपल्यापुढे 100 टक्के वीज निर्मितीचे लक्ष्य निश्चितपणे आहे. पण आपण ते 1992 पासून 2007 पर्यंत सरासरी 50 टक्के पर्यंत मिळवू शकलो आहोत, 50 टक्के वीज निर्मिती आपण करू शकलो आहोत. सभापती महोदय, आपण पाहिले तर हरयाणा मध्ये साधारणतः दिवसाकाठी साडेसहा तासांचा वीज पुरवठा केला जातो., पंजाबमध्ये 6.88 तासांचा वीज पुरवठा केला जातो, गुजराथमध्ये 8 तासांचा, उत्तर प्रदेशमध्ये 9.44 तासांचा, आंध्र प्रदेशमध्ये 7 तासांचा आणि कर्नाटकामध्ये 8.5 तासांचा वीज पुरवठा केला जातो. त्या मानाने आपण फार बऱ्या परिस्थितीत आहोत असेच म्हणावे लागेल. सभापती महोदय, ही तुलना करीत असताना दुसरा कोणी तरी कमी आहे म्हणून आपण कमी आहोत यात मी निश्चितच समाधान मानत नाही परंतु ही परिस्थिती सबंध देशामध्येच कमी अधिक प्रमाणात आहे. म्हणून आपण जो प्रयत्न करीत आहोत त्यात महाराष्ट्र निश्चितच अग्रेसर आहे. सभापती महोदय, मागणीच्या बाबतीतही आपण पाहिले तर 2006-07 मध्ये 14,700 मे.वॅ.ची मागणी, 2007-08 मध्ये 16 हजार मे.वॅ.ची मागणी आहे. म्हणजे ही मागणी किती प्रमाणात वाढते आहे आणि त्या प्रमाणात आपण ती पुरी करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत की नाही हे तपासून घेणे गरजेचे आहे. सभापती महोदय, आपण पाहिले तर जनरेशनमध्ये पुढील पाच वर्षांमध्ये आपण

..... टीटी 2 ...



श्रीमती दराडे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

39 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करीत आहोत. त्यात 20 टक्के भाग-भांडवल हे शासनाचे असणार आहे. ट्रान्समिशनमध्ये 21,748 कोटी रूपयांची आपण गुंतवणूक करीत आहोत. डिस्ट्रिब्यूशनमध्ये देखील आपण 9 हजार कोटीचे भाग-भांडवल टाकतो आहोत. ज्याचा ग्राहकांना वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने आपल्याला फायदा होणार आहे. मी येथे या बाबतीत शासनाचे पूर्णपणे समर्थन करीत नाही, करणार नाही. परंतु समोरच्या बाजूने जे चित्र सरकारला आणि ऊर्जा मंत्र्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात टाकण्याचे उभे केले जात आहे ते चित्र कसे आहे याकडे आपण पाहिले तर ते चित्र प्रयत्न करणाऱ्यांना डिमॉरलाईज करणारे आहे असेच म्हणावे लागेल. जे प्रयत्न करताहेत त्यांना तुम्ही प्रयत्न करीत आहात असे सांगणे, ते मान्य करणे आणि त्यांना प्रोत्साहन देऊन या कठीण परिस्थितीतून मार्ग काढणे गरजेचे आहे. यासाठीच काही बाबी येथे सांगणे मला गरजेचे वाटल्याने मी या बाबी आपल्यापुढे मांडल्या आहेत.

सभापती महोदय, वीज टंचाई दूर करण्यासाठी महानिर्मितीच्या काही उपाय योजना आहेत, ज्याचा स्पष्ट उल्लेख येथे करणे मला गरजेचे वाटते. सभापती महोदय, वायू विद्युत केंद्र,उरण येथे वाढीव गॅस पुरवठ्यासाठीची जी निविदा काढण्यात आलेली आहे, ती निविदा उघडलेली आहे आणि हा गॅस उपलब्ध झाला तर 180 ते 200 मे.वॅ.वीज आपल्याला जांस्तीची मिळू शकेल आणि साधारणत: एक वर्षानंतर म्हणजे एप्रिल,2008 मध्ये ही वीज अपेक्षित आहे. सभापती महोदय, परळी आणि पारस येथील वीज निर्मिती चालू आहे आणि परळी येथील संच क्र.2 तसेच पारस येथील संच क्र.2 हा एप्रिल 2009 मध्ये सुरू होण्याचे आपण गृहित धरलेले आहे आणि त्या पद्धतीने तेथे काम सुरू आहे. खापरखेडा आणि भुसावळ येथील काम देखील चालू आहे. सभापती महोदय, मी सगळी नावे येथे वाचून दाखवू इच्छित नाही, माननीय ऊर्जा मंत्री त्याबाबत सखोल माहिती देतीलच. पण काही उदाहरणे मी यासाठी दिलेली आहेत की, आपण वीज निर्मिती सुरू केलेली आहे. युती सरकारच्या काळात जी वीज निर्मिती ठप्प झालेली होती. त्यानंतर राज्याची आर्थिक परिस्थिती माननीय अर्थमंत्र्यांनी ज्या पद्धतीने सावरली त्यामुळे मोठी गुंतवणूक आपण यात करू शकतो आहोत. एक वेळ अशी आली होती की, राज्यातील नव्याने वीज निर्मिती पूर्णपणे थांबलेली होती, महाराष्ट्र पूर्णपणे काळोखात बुडालेला होता पण आता 2011-12 मध्ये हा महाराष्ट्र सक्षमपणे अधिकची वीज निर्मिती करू शकेल अशी परिस्थिती निर्माण करण्यात आणि

..... टीटी 3 ...



श्रीमती दराडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाऊल त्या दिशेने टाकण्यात ऊर्जा खाते आणि राज्य सरकार यशस्वी ठरते आहे. सभापती महोदय, यामध्ये आपण जी धडपड करीत आहोत, त्यात एक आकडा फार बोलका आहे. 2006-07 आणि 2007-08 मध्ये मागणी व उपलब्धता यातील एक दोन आकडे फार बोलके आहेत. 2006-07 मध्ये एप्रिलमध्ये मागणी ही 13,484 ची होती आणि तुटवडा हा 3673 मे.वॅ.चा होता. 2007-08 मध्ये मध्ये हीच मागणी 15,347 मे.वॅ.ची होती आणि उपलब्धता ही केवळ 9805 मे.वॅ.ची होती व तुटवडा हा 5513 मे.वॅ.चा होता. यात मला शेवटचा आकडा नमूद करावयाचा आहे तो अशासाठी की, मार्च 2008 मध्ये जी परिस्थिती आपण पाहिली तर मागणी 14819 मे.वॅ.ची आहे, उपलब्धी फक्त 10154 मे.वॅ.ची आहे आणि तूट 4563ची आहे म्हणजे मागणी जास्त असतानाही तुटवडा कमी करण्याकडे आपण यशस्वी झालो आहोत. आपण या सगळ्या गोष्टींचा खरे म्हणजे बाकी सगळ्या गोष्टींवर बोलणार नाही, कारण वेळ संपल्याची बेल वाजली आहे. मात्र मी एक बाब स्पष्टपणे सांगेन की, यामध्ये लोकराज्यचा अंक जाणीवपूर्वक येथे वाचून दाखविला गेला. ...

( यानंतर सौ.रणदिवे ....यूयू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे . . . .

याठिकाणी आपण कोणताही एखादा अंक वाचताना अर्धवट वाचता कामा नये. माननीय मंत्री महोदयांनी विजेच्या बाबतीत असलेली तूट मान्य केलेली आहे तेवढाच भाग वाचून दाखविला. पण आपण याबाबतीत पुढे काय करीत आहोत, ते देखील सांगितले पाहिजे. आमच्या इव्हीडन्स ॲक्टनुसार समोरच्या बाजूकडून एखाद्या डॉक्युमेंटमधील एक ओळ जरी वाचून दाखविली तर तो सगळा डॉक्युमेंट ॲडमिसिबल होतो. सन्माननीय सदस्यांनी तेवढाच भाग वाचून दाखविला आहे. परंतु मी सदनासमोर एक चार्ट वाचून दाखविते. या अंकामध्ये विजेची तूट आहे हे सांगितलेले आहे पण आपण 2011-2012 मध्ये राज्याच्या गरजेपेक्षा जास्त म्हणजे 650 मे.वॅ.ॲडिशनल वीज निर्माण करणार आहोत. त्यावेळेला विजेची 23,100 मे.वॅ.इतकी मागणी असणार आहे आणि आपण 23,750 मे.वॅ.विजेची परिपूर्ती करणार आहोत. हे चित्र निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून कालच केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी सुध्दा संपूर्ण देशाला उद्देशून सांगितले की, याच पध्दतीने वीज निर्मिती करुन 2011-2012 मध्ये संपूर्ण देश लोड शेडींगमधून मुक्त करण्याचे स्वप्न देशाने, या राज्याने पाहिलेले आहे. सध्या विजेची तूट आहे हे मान्य करुन यामध्ये दुरुस्ती करण्याचा शासन यशस्वीपणे प्रयत्न करीत आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाला आणि ऊर्जा विभागाला त्यांच्या प्रयत्नांमध्ये पाठिंबा देते. तसेच त्यांनी केलेले काम हे चांगल्या पध्दतीचे आहे असे सांगून मी माझे भाषण संपविते.

----

. . . .2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी आपले भाषण सुरु करावे. तत्पूर्वी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करु इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी पाच मिनिटांपेक्षा जास्त भाषण करु नये.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आम्ही परवाच्या दिवशी सुध्दा याठिकाणी उपस्थित राहून सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली आहेत. त्यामुळे आज तरी आम्हाला भाषण करण्यासाठी थोडा वेळा द्यावा.

**उपसभापती** : असे असेल तर मग आज सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांची जी दुसरी चर्चा आहे, ती होणार नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आम्ही नवीन सदस्य आहोत . . . .

**उपसभापती** : मग मी देखील हतबल होतो. प्रत्येक जण जर असे बोलावयास लागले तर मी तरी काय करणार ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, नवीन-नवीन करीत आम्ही जुने झालो. आता रिटायर होण्याची वेळ आली. नवीन-नवीन म्हणून शेवटी बोलण्यासाठी उभे रहावयाचे आणि शेवटी पाच मिनिटातच बोलावयाचे असे होते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी मला माझ्या दालनामध्ये येऊन भेटावे. मग काय करावयाचे याची मी माहिती देतो. आता सन्माननीय सदस्यांनी पाचच मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे. पुढे काय करावयाचे ते नंतर सांगतो.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मला आपल्या दालनामध्ये एक तास भाषण करण्यासाठी परवानगी द्यावी.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला देखील भाषण करण्यासाठी संधी द्यावी.

**उपसभापती** : याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत, त्यांना संधी दिली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांचे नाव या यादीमध्ये नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचा कोटा संपलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी आपले भाषण सुरु करावे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी कोणत्याही परिस्थितीत भाषण वाचणार नाही, तसेच मला ते कोणीही लिहून दिलेले नाही. मी बोलणार आहे.

. . . .2यु-3



APR/MMP/KGS/ 15:25

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना सांगू इच्छितो की, माझा त्यांच्यावर विश्वास आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आज याठिकाणी विजेच्या प्रश्नासंबंधात चर्चा सुरु आहे. जेव्हा मी या सदनामध्ये 2004 साली आलो, तेव्हा विजेच्या प्रश्नासंबंधात येथे चर्चा सुरु होती. त्यावेळी मी अतिशय गांभीर्याने चर्चा ऐकली होती. मी 2004 पासून 2008 पर्यंत सतत या विषयावरील चर्चा आणि त्यावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर अतिशय बारकाईने ऐकत आहे. या विषयाच्या संबंधात यापूर्वी माननीय मंत्री महोदयांनी जी उत्तरे दिलेली आहेत, ती गेली दोन दिवस वाचलेली आहेत. म्हणून या प्रस्तावावरील चर्चेला ते काय उत्तर देणार आहेत ते मला पूर्णपणे माहिती आहे. तरी देखील माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये काहीतरी बदल होईल या अपेक्षेने मी माझे विचार त्यांच्यासमोर मांडणार आहे.

**उपसभापती** : याचा अर्थ सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, बटण दाबल्यानंतर लाईट लागणार नाही हे माहिती आहे. तरी देखील बटण दाबून ते नशीब अजमावत आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, तसा मी प्रयत्न करीत आहे. "प्रयत्ने वाळूचे कण रगडिता, तेलही गळे" त्याप्रमाणे बटन दाबून-दाबून कधीतरी लाईट येईल. या अपेक्षेने मी बटण दाबण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्राला विजेचा तुटवडा आहे, त्याबाबतीत वेळोवेळी सांगितले जाते की, शासनाकडून यासाठी कशा प्रकारचे प्रयत्न सुरु आहेत ? माननीय ऊर्जा मंत्री कशा प्रकारचे प्रयत्न करीत आहेत ? याबाबतची सविस्तर माहिती वेगवेगळया वृत्तपत्रातून, त्यांच्या वेगवेगळया मुलाखतीच्या माध्यमातून येत आहे.

यानंतर कु.गायकवाड . .. .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ D/ 15:30

**( सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता )**

ॲड. अनिल परब...

जवळपास 17 ते 18 हजार मेगावॅट विजेची आज महाराष्ट्राला आवश्यकता आहे. आपल्या राज्यात विजेची किती उपलब्धता आहे याची आपल्याला माहिती आहे. सध्या भारनियमन 7 तासावरून 10 तास, त्यानंतर 14 तास व आता 20 तासांवर गेलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर 2004-05 साली दिलेले होते त्याच पद्धतीचे उत्तर आजही दिले जात आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी या संदर्भात आत सर्व सांगितलेले आहे. त्यावेळी आपण जी उत्तरे दिलेली आहेत ,त्यावेळची सर्व माहिती आता माझ्याकडे आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले होते की, 2009 साली महाराष्ट्र राज्यात अतिरिक्त विजेचे उत्पादन होईल व राज्याची गरज संपवून इतर राज्यांना देखील वीज देता येईल. आता सन 2008 साली साधारणपणे पाच ते सहा हजार मेगावॅट वीजेची तूट जाणवत आहे. मग सन 2009 सालामधील अतिरिक्त निर्मितीची तर गोष्टच निराळी आहे. सन 2012 सालापर्यंत काय संपूर्ण प्लानिंग केलेले आहे. सन 2012 मध्ये महाराष्ट्र राज्यात किती वीजेचे उत्पादन घेतले जाईल, सन 2004 मध्ये असे उत्तर दिले होते की, सन 2006, 2007, 3008 मध्ये वीजेचे उत्पादन वाढविण्याकरिता प्रयत्न केले जातील. परंतु शासनाने केलेल्या प्रयत्नांना किती यश आलेले आहे याची माहिती आजपर्यंत देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय त्यांच्या भाषणात सांगत असतात की, परळी येथे एक प्रकल्प सुरु करण्यात येत आहे. ऊरण, रत्नागिरी येथे एनरॉन हा पॉवर प्रोजेक्ट सुरु झालेला आहे. या प्रकल्पामुळे अमूक इतकी वीज राज्याला मिळणार आहे वगैरे वगैरे. परंतु आज राज्यामध्ये काय परिस्थिती आहे ? इंधनाचे दर काय आहेत, ते दर परवडण्यासारखे आहेत काय, या दरांचा भार कोणावर टाकला जात आहे ? हे सर्व प्रश्न पूर्वी देखील अनुत्तरीत होते व आजही अनुत्तरीतच आहेत आणि या पुढे देखील हे सर्व प्रश्न अनुत्तरीतच राहतील अशा प्रकारचे वातावरण राज्यामध्ये तयार झालेले आहे. सन 2006- 2007 मध्ये 1200 ते 1400 मेगावॅट विजेचे उत्पादन करु असे सांगण्यात आले होते. या पैकी किती विजेची निर्मिती करण्यात आली आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

सभापती महोदय, वीज कंपनीचे त्रिभाजन करण्यात आले आहे. जागतिक बँकेचे कर्ज मिळावे याकरिता वीज कंपनीचे त्रिभाजन करण्यात आले होते. तसेच फेडरल सिस्टिम तयार करण्यात आली. वीज कंपनीचे त्रिभाजन केल्यामुळे, विजेचे डिस्ट्रीब्यूशन चांगले केले जाईल, वीज चोरीचे प्रमाण कमी होईल अशी उत्तरे त्यावेळी देण्यात आली होती. मी विचारु इच्छितो की, वीज कंपनीचे त्रिभाजन करुन शासनाने काय मिळविले आहे ? आजपर्यंत या मुळे किती फायदा झालेला आहे याचे उत्तर अजूनही मिळालेले नाही. या सर्व उपाययोजना करुनही राज्याने किती अतिरिक्त विजेचे उत्पादन केले आहे व जनतेला किती विजेचा पुरवठा केलेला आहे ? राज्यातील वीज गळतीचे प्रमाण 40 टकके आहे. गळतीच्या बाबतीत हे प्रमाण केवळ वीज गळतीचे नसून वीज चोरीचे देखील आहे. चोरीचे प्रमाण वेगळे देता येत नाही. त्यामुळे, वीज गळतीमध्येच वीज चोरी देखील ॲड केली जाते त्यामुळे ही टक्केवारी वाढत आहे. वीज गळतीचे आयडीयल प्रमाण हे 15 टक्के इतके आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, त्यावेळी एक टक्का वीज गळती झाल्यास 200 करोड रुपयांचे नुकसान होते. मग 40 टक्के विजेची गळती होत असल्यास किती मोठया रकमेचे नुकसान होत असेल ?

सभापती महोदय, आता आपण टोरँटो कंपनीला फ्रँचाईजी दिलेली आहे. त्यांच्या कडून अद्याप काही रक्कम येणे बाकी आहे. वीज मंडळाने, राज्य शासनाकडे वीजेची मागणी केली होती. त्यावेळी अर्थ सचिवांनी सांगितले की, मी राजीनामा देईन पण मला पैसे देता येणार नाही. अर्थ सचिव राजीनामा देण्याची भाषा करु लागले म्हणजेच यामधून आपल्याला शासनाची मानसिकता दिसून येत आहे की, शासन , वीज मंडळाला किती मदत करीत आहे ? लोकांना अंधाराच्या खाईतून काढावयाचे आहे की नाही ? वीज मंडळाला देय असलेले दोन हजार कोटी रुपये देण्यास शासनाने स्पष्टपणे नकार दिलेला आहे. त्यांनी अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, पैसे देण्यापेक्षा मी राजीनामा देऊन निघून जाईन. याच्या बाबतीत आपण काय करणार आहात ? तसेच सभागृहामध्ये अनेक गोष्टी करण्यात येतील असे सांगण्यात आले होते त्या संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

..3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

सभापती महोदय, सन 2012 मध्ये विजेचे उत्पादन होईल याचा तक्ता  सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी वाचून दाखविला आहे. शासनाने वीज उत्पादन वाढविण्याकरिता, सन 2004 पासून प्रयत्न केलेले आहेत.  सन 2002 मध्ये श्वेतपत्रिका  काढली होती. मी विचारु इच्छितो की, सन 2002 पासून सन 2008 पर्यंत किती मेगावॅटचे उत्पादन  करण्यात आलेले  आहे या संदर्भातील कात्रणे माझ्याकडे आहेत. कोठल्या वर्षी आपण किती प्रोजेक्टस सुरु करणार आहोत व त्यापासून किती वीजेचे उत्पादन होणार आहे याची आकडेवारी माझ्यासमोर आहे. सन 2004, 2006- 2007-2008 व सन 2010- 2012 ला किती विजेचे उत्पादन होणार आहे याची माहिती माझ्याकडे आहे. परंतु वीज निर्मिती करण्यासाठी कोणते  प्रयत्न करण्यात येणार आहेत याचे एकाच प्रकारचे उत्तर साधारणपणे पाच वर्षापासून आम्हाला देण्यात येत आहे. तशाच प्रकारचे उत्तर आजही देण्यात येईल असे मला वाटत आहे. माझी आज एवढीच अपेक्षा आहे की, आजच्या उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदयांनी काही तरी बदल करुन लोकांना अंधाराच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी,  जे प्रयत्न शासन करीत आहे त्या संदर्भात माहिती दिली पाहिजे.

यानंतर श्री. बरवड........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .......

सभापती महोदय, मला आणखी बोलता येईल काय ?

**तालिका सभापती** (श्री. जगदीश गुप्ता) : आपण एक मिनिटात आपले भाषण संपवावे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या महाराष्ट्राची विजेच्या बाबतीत अतिशय परवड झालेली आहे. जी वीज उपलब्ध आहे ती अतिशय कमी आहे. वीज निर्मिती करण्याचा शासनाचा कोणताही प्रयत्न दिसत नाही. जे सामंजस्य करार झालेले आहेत त्यासंदर्भामध्ये किती जागा संपादित केली, किती जागेचे करार झाले ? विधान परिषदेमध्ये मागे एक प्रश्न आला होता. टाटा आणि रिलायन्स या दोन्ही कंपन्याना एकच जागा दिली होती. त्या ठिकाणी जागेवरुन भांडण आहे. ते भांडण केव्हा सुटणार आणि वीज प्रकल्प केव्हा येणार ? वेगवेगळ्या प्रकल्पांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने जे सामंजस्य करार केलेले आहेत त्यांची परिस्थिती काय आहे ? सामंजस्य करार केल्यानंतर ज्या जागा ताब्यात घेतल्या त्या ठिकाणी प्रकल्प होण्यासाठी किती महिने लागतात आणि त्यासाठी आतापर्यंत काय प्रयत्न करण्यात आले ? वीज मंडळामध्ये जे करारनामे झालेले आहेत, जे घोटाळे झालेले आहेत त्याबाबतीत खूप प्रकरणे आहेत. ट्रान्सफार्मर्सची प्रकरणे आहेत. मी त्यामध्ये जाणार नाही. परंतु वीज निर्मिती करण्यासाठी शासनाची जी मानसिकता लागते ती दिसत नाही. एखादा प्रकल्प 28 ते 30 महिन्यांमध्ये उभा करण्याची तयारी शासनाने ठेवली तर ते होऊ शकते. परंतु खरोखर हे शासन करणार आहे काय असा माझ्यासमोर प्रश्न आहे. मुंबईच्या उपनगरातील लोकांना रिलायन्सकडून 40-40 टक्के वाढीव बिले दिल्यामुळे चटके लागत आहेत. त्या ठिकाणी 40-40 टक्के वाढवून बिले दिली जात आहेत. कशा पध्दतीने बिले वाढवून दिली जात आहेत हे मी अनेक प्रकारे हे सिध्द करुन दाखवू शकतो. तक्रार केली तर आधी बिल भरा असे सांगण्यात येते. आधी बिल भरा त्यानंतर काय करावयाचे ते बघू असे सांगितले जाते. फक्त 5 टक्के लोक तक्रार करतात. बाकीचे लोक मुकाट्याने पैसे भरतात. आम्ही रिलायन्सला बिल भरतो. त्याबाबतीत आपण कोणता दिलासा देणार आहात ? बेस्टचा दर वेगळा आहे. उपनगरातील दर वेगळा आहे. एमईआरसीकडे गेलो तर ते काही निर्णय घेत नाहीत. एमईआरसीकडे वेगवेगळे प्रस्ताव पाठविलेले आहेत परंतु एमईआरसी त्याबाबतीत दखल घेत नाही. आम्ही प्रत्येक कंपनीवर

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

ॲड. अनिल परब .....

मोर्चा घेऊन जातो, एमईआरसीकडे तक्रारी दिल्या परंतु वीज मंडळ, महाराष्ट्र सरकार यांच्या एकमेकांच्या संगनमतातून लोकांच्या तोंडाला पाने पुसली जातात. या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने त्या ठिकाणी जे बिल वाढवलेले आहे ते आपण थांबवाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. महाराष्ट्रातील जनतेला कोणत्याही परिस्थितीत आशेचा किरण दिसू द्यावा. येणाऱ्या दिवसात भारनियमनाला सामोरे जावे लागणार नाही आणि कमीतकमी भारनियमन करुन जनतेला दिलासा द्यावा अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विजेच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

या विजेसंबंधी जेवढे बोलू तेवढे कमीच आहे अशा प्रकारची परिस्थिती आहे. सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशी महाराष्ट्रातील सर्व जनतेची स्थिती आहे. दिवा आहे पण दिव्याखाली अंधार आहे. मी या ठिकाणी चारच मुद्दे मांडणार आहे. प्रत्येक मुद्याला एक ते दीड मिनिट निश्चितपणे लागेल. सन 2012 पर्यंत या राज्यातील भाननियम बंद होईल आणि तेवढी वीज निर्मिती आपल्याकडे होईल यासंदर्भात सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी सांगितले. परंतु मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, गेल्या 8 वर्षामध्ये एकही मेगावॅट वीज निर्मिती झाली नाही, मग 2012 पर्यंत भारनियमनमुक्त राज्य कसे करणार ? उरणला 950 मेगावॅटची क्षमता असताना प्रत्यक्षात 500 मेगावॅट क्षमतेचा वापर करीत आहोत. त्या ठिकाणी गॅसचा पुरवठा झाला तर उरलेल्या 400 मेगावॅट विजेची निर्मिती त्या ठिकाणी होऊ शकते. परंतु ते केले गेले नाही. दाभोळ येथे 1100 मेगावॅटची क्षमता असताना फक्त 600 मेगावॅट वीज निर्मिती केली जाते. त्या ठिकाणी नाफ्था पुरविला तर उरलेल्या 500 मेगावॅट विजेची निर्मिती होऊ शकते. माझ्याकडे "सकाळ" दैनिकाचे कात्रण आहे. त्या बातमीमध्ये राजकीय इच्छाशक्ती नसल्याने केंद्राचा निधी महाराष्ट्रापासून दूर आहे असे श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी विधान केले आहे. ती बातमी वाचण्यामध्ये मी वेळ घालवणार नाही. कारण मला महत्त्वाचे दोन तीन मुद्दे मांडावयाचे आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

म्हणजे ही राजकीय इच्छा शक्ती नसल्यामुळे तेथे क्षमता असून सुध्दा वीज निर्मिती होऊ शकत नाही. माझी मागणी आहे की, ज्या ठिकाणी आता आपली क्षमता आहे तेथे तातडीने वीज निर्मिती झाली पाहिजे. रत्नागिरीला 104 कि.मी.च्या अंतरावर धोपावे, जयगड, गोळप, गुहागर, दाभोळ व राजापूर अशा 6 ठिकाणी ऊर्जा प्रकल्प करण्याचे ठरविलेले आहे. कालच तेथील लोकांनी आपले उपोषण मागे घेतले आहे. फिनोलेक्स कंपनीच्या संदर्भात तेथील लोकांमध्ये अस्वस्थता आहे. आंबा उत्पादक, फळबाग उत्पादकांमध्ये अस्वस्थता आहे. तेथे 14 दिवस उपोषण सुरु होते, लोकांचे हॉस्पिटलमध्ये उपोषण चालू होते. परंतु उपोषणकर्त्यांवर व आंदोलनकर्त्यांवर जबरदस्ती केली गेली, हा विषय अलाहिदा. माननीय मंत्रिमहोदयांचे आभार मानीन, आपण दिलेले आश्वासन उशीरा का होईना पाळले आहे. त्याठिकाणी आपण 10 हजार लोकांसमोर आश्वासन दिले होते की, "त्या प्रकल्पाच्या उच्चाधिकार समितीची एक बैठक घेण्यात येईल. तोपर्यंत आम्ही हे काम थांबवू." या उच्चाधिकार समितीची बैठक झाली नाही, पण प्रत्यक्षात काम आधीच सुरु झाले आहे. आता शासनाने त्यांना लेखी स्वरुपात आश्वासन दिल्यामुळे उपोषण स्थगित झालेले आहे. त्या लोकांचा आज मोर्चा होता तो देखील स्थगित झालेला आहे. त्या उच्चाधिकार समितीची बैठक लवकर होणार आहे असे समजते. माझी मागणी आहे की, हया ज्या कंपन्या आहेत त्या एखादा प्रकल्प आणताना त्यांच्या पध्दतीने प्रकल्प अहवाल सादर करतात. त्याऐवजी शासनाने कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून समिती निर्माण करुन त्या समितीला शासनामार्फत पैसे द्यावयाचे, त्या कंपनीने त्यांना पैसे द्यायचे नाहीत. त्यांनी अहवाल दिला तर या खरच ऊर्जा प्रकल्पामुळे आंबा उत्पादक, तेथील शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे का हे निश्चितपणे निदर्शनास येईल. म्हणून माझी मागणी आहे की, कृषि विद्यापीठाच्या तज्ज्ञांमार्फत अहवाल केला जावा. त्याच्यातून खरी माहिती कळू शकते.

सभापती महोदय, राज्य सरकारकडे केंद्र सरकारकडून निधी येतो. सन्माननीय श्री.गिते यांनी रत्नागिरीच्या ग्रामीण ऊर्जा प्रकल्पाच्या अंतर्गत 25 कोटी रुपये मंजूर केले होते. त्या पैशात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे असा मी आरोप करतो. त्या भ्रष्टारातील संबंधित

2...

श्री.संजय केळकर.....

अधिका-यांना अजून पर्यंत शोधलेले नाही. तेथील भागात अखंडित वीज पुरवठा व्हावा म्हणून 7 उपकेंद्राकरिता 25 कोटी रुपये दिले आहेत. केळशीफाटा, तुरंबो, रजवेल, साखरपा, कोंडे, निवळी, वेळणेश्वर या उपकेंद्राच्या बांधकामाचे कंत्राट दीप इंजिनिअर कंपनीला दिले होते. त्या कंपनीने सब कॉन्ट्रॅक्टरला हे काम दिले. जो सब कॉन्ट्रॅक्टर बीएसएनएलचे वायरिंगचे काम करतो. त्याला हे काम दिले गेले. ही बातमी अनेक वेळेला अनेक वर्तमानपत्रातून आलेली आहे. परंतु आजही याकडे महावितरणच्या अधिका-यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. या उपकेंद्राची उभारणी करीत असताना रिंग फिडिंग केले तर त्यातून सेवा चांगल्या पध्दतीने राबविता येते. एक फिडिंग बंद पडले तर सर्वत्र अंधार पसरतो अशी स्थिती निर्माण होते. त्यावर उपाय म्हणून रिंग फिडिंगची व्यवस्था केली होती, पण त्याची सुध्दा अंमलबजावणी झाली नाही. रजवेल उपकेंद्रासाठी 33 के.व्ही.लाईन लोटे एमआयडीसीच्या लाईनमधून घेणे आवश्यक असताना ती दापोली फिडरवरुन टॅब टाकून ब्रेकरविना घेण्यात आली. परंतु त्याचे बिल मात्र पूर्ण दिले गेले. त्याच्या स्टॅण्डर्डचा विचार केला गेला नाही. केळशीच्या उपकेंद्राला ट्रान्सफॉर्मर सुध्दा नाही. वेळणेश्वर येथील 33 के.व्ही.उपकेंद्राच्या कित्येक चाचण्या केल्यानंतरही लाईन स्टॅण्ड होत नाही. त्याठिकाणी सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसविले गेले आहेत. साखरप्याला उपकेंद्राची तर उभारणी झालेली नाही. पण पेमेंट मात्र झालेले आहे. साहित्य खरेदीत सुध्दा भ्रष्टाचार झालेला आहे. तुरंब्याच्या उपकेंद्राला कंत्राटदाराने ट्रान्सफॉर्मर बसविला नाही. महावितरणने स्वत:कडील ट्रान्सफॉर्मर त्याला दान केला. हे कशासाठी संगनमताने चालले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...)

एका बाजूला हे अधिकारी आहेत आणि दुस-या बाजूला लोकांचे हाल होत आहेत. तेव्हा ही जी प्रकरणे झालेली आहेत त्याला पायबंद घालता पाहिजे. या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी व्हिजिलन्सचे उपायुक्त श्री. इंदूरकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली होती त्या कमिटीचा रिपोर्ट आला असेल तर त्या रिपोर्टनुसार संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. देवरे मंडणगड या उपकेन्द्राच्या तुटलेच्या वीज वाहिनीचे काम करीत असताना श्री.लक्ष्मण हंबीर या कर्मचा-याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला असताना अधिका-यांनी मात्र या कर्मचा-याच्या मृत्यूचा चुकीचा रिपोर्ट दिला. पोस्टमार्टेमचा देखील चुकीचा रिपोर्ट देण्यात आला. त्यासाठी डॉक्टरांना देखील हजारो रुपये देण्यात आले. तेव्हा या सर्व प्रकारांची चौकशी करुन जे अधिकारी संगनमताने अशा त-हेने अनुचित प्रकार करणारे असतील त्यांच्यावर कारवाई करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील निरनिराळया उपकेंद्रावर 25 कोटी रुपये खर्च झाल्यानंतर अजूनही योग्य पध्दतीने सेवा मिळत नाही हे मला येथे मुद्दाम नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, आणखी दोन मुद्दे मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकाला एका बाजूला भारनियमनाला आणि दुस-या बाजूला वाढत जाणा-या वीज बिलाला तोंड द्यावे लागत आहे. सर्वसामान्य वीज ग्राहक जेव्हा विद्युत कार्यालयामध्ये जातो त्यावेळी त्याला अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्या ठिकाणी त्याला सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे. जर वीज ग्राहकाला अपमानास्पद वागणूक मिळत असेल तर संबंधितावर कारवाई करावी. तेव्हा ज्या ज्या ऑफीसच्या संदर्भात अशा प्रकारच्या तक्रारी येतील तेथील अधिकारी/कर्मचा-यांवर सक्त कारवाई करावी अशी माझी मागणी आहे. खरे तर सर्वसामान्य वीज ग्राहक हाच खरा विद्युत ग्राहक आहे. तो प्रामाणिकपणे वीज बिल भरत असतो. लोडशेडिंगने आणि वाढीव वीज बिलामुळे त्रस्त झालेला हा वीज ग्राहक जेव्हा विद्युत कार्यालयामध्ये जातो त्यावेळी त्याला योग्य पध्दतीने मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, वीज चोरीच्या बाबतीत कोणतीही हयगय किंवा दुर्लक्ष करता कामा नये. ठाणे, भिवंडी आणि अन्य शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वीज चोरी होते आणि त्या वीज चोरीचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...)

अधिभार मात्र नियमितपणे वीज बिल भरणा-यांवर पडतो. हे योग्य नाही. भिवंडीसारख्या शहरातून करोडो रुपये येणे बाकी आहे. वीज चोरी रोखण्याच्या बाबतीत कोणतीही हयगय न करता वीज चोरी करणा-यांवर शासनाने कठोर कारवाई करावी अशी माझी सूचना आहे. बोलण्यासारखे अनेक मुद्दे आहेत. परंतु वेळेचे बंधन असल्यामुळे मी माझे भाषण येथेच संपवितो.

----

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे संवेदनशील आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी भ्रष्टाचाराच्या संदर्भात फार गंभीर आरोप केलेले आहेत. अनेक वेळा अशा चर्चेच्या वेळी भ्रष्टाचाराच्या मुद्यांच्या संदर्भात उत्तरे मिळत नाहीत. तेव्हा त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना मंत्री महोदय उत्तरे देतील अशी माझी अपेक्षा आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मुंबईमध्ये उन्हाळयाच्या ऐन मोसमावर हा विजेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. पुण्याचा विजेचा प्रश्न थोड्या फार प्रमाणात सुटला असे कळते. परंतु पुण्याचा मॉडेल पॅटर्न आज पूर्णत: अयशस्वी झालेला आहे अस माझे मत आहे. एप्रिल पासून 15 ते 16 तासाचे भार नियमन होणार आहे. विजेच्या तुटवडयामुळे आता महागडी वीज आपण घेणार आहोत. ती घेणार की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर कंपनीची वीज जास्त दराने घ्यावी लागणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता जी विजेचे चटके सहन करीत आहे, महागाईचे चटके सहन करीत आहेत तिला आता वीज दर वाढीचे चटकेही सहन करावे लागणार आहेत. साधारणत: विजेच्या दरामध्ये 40 टक्के वाढ होणार आहे अशी माझी माहिती आहे. विजेचे दर 40 टक्क्यांनी वाढले तर भारनियम आणि वीज दर वाढ यामुळे वीज ग्राहक विजेचा वापर करु शकणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 15:50

डॉ.दीपक सावंत...

त्याचबरोबर विजेसाठी शासनाला जास्त पैसे मोजावे लागता आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी मघाशी सांगितले की, 12500 मे.वॅ. क्षमतेचे 8 इरादापत्रे आहेत, ते बासनात गुंडाळून ठेवले आहेत. राज्य शासनाने या प्रकल्पासंबंधी इरादापत्रे दिली, परंतु तेथे कोणत्याही प्रकारचे काम होऊ शकले नाही यासंबंधीची माहिती माननीय ऊर्जा मंत्र्यांकडून मिळावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. 2005 मध्ये या कंपन्यांशी करार केले. जमीन संपादन, इंधन, पायाभूत सुविधा, पोल टाकण्यासाठी मार्ग, पाण्याची क्षमता, वित्त कार्यासाठी प्रशासकीय मदत, 100 टक्के स्टॅम्पडयूटी आणि नोंदणी आकारात सूट, जकातीतून 100 टक्के सूट, वितरण कंपनीच्या समकक्ष सेवा करात सवलत, इत्यादी सवलती देण्याचे शासनाने मान्य केले होते. त्यात टाटा पॉवरकडून 1500, रिलायन्स एनर्जीकडून 4 हजार, सेंट्रल इंडिया पॉवर कंपनीकडून 2 हजार, इस्पात एनर्जी यांचेकडून 1 हजार, जिन्दाल औष्णिक वीज कंपनी 1 हजार, एस.आर.पॉवर कंपनी यांचेकडून 1500, स्प्रेक्टा टेक्नॉलॉजी 500, जी.एम.आर.एनर्जी 1 हजार, एवढे मॅ.वॅ.च्या संदर्भात आपण करार केले आहेत. पण या कंपन्यांमध्ये रिलायन्सलाच झुकते माप मिळते आहे. काही प्रमाणात इस्पात आणि टाटा कंपनीला वगळता काही कंपनीचे इरादापत्रे घेतली होती, त्या इरादापत्राच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची ॲक्शन आतापर्यंत घेतली गेली नाही. आतापर्यंत ॲक्शन न घेण्यात अडचणी काय आहेत या गोष्टीचा खुलासा या ठिकाणी करणे गरजेचे आहे. अजून पाच वर्षे भारनियमन अटळ आहे असे माननीय मंत्री महोदय आपल्या भाषणात सांगणार आहेत. तरी देखील वीज निर्मितीच्या बाबतीत हे जे काही उपाय करावयाचे होते, ते उपाय का केले गेले नाहीत ? यापुढे तरी ते उपाय अंमलात आणले जाणार आहेत किंवा नाही यासंबंधीचा देखील खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी विनंती आहे. माननीय महसूल मंत्र्याकडून सांगितले जाते की, जोपर्यंत कंपन्यांना शासन जमीन उपलब्ध करुन देणार नाही तोपर्यंत हे प्रोजेक्ट होणार नाहीत. वीज निर्मितीच्या बाबतीत छत्तीसगड राज्य पुढे गेले, गुजरात राज्य वीज निर्मितीच्या बाबतीत पुढे गेले. त्यांनी वीज निर्मिती प्रकल्पांची कामे झपाटयाने सुरु केली आहेत. आपण मागे का राहिले याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात माहिती द्यावी अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो. मी माननीय ऊर्जा मंत्र्यांना सांगू इच्छितो की, रिलायन्सचे लाड शासनाने बंद केले पाहिजेत.बेस्ट आणि टाटा कंपनी मुंबईला वीज देण्यास तयार आहे. पश्चिम उपनगरात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

रिलायन्स कंपनीतर्फे वीज पुरवठा होतो आहे. मुलुंड आणि भांडूप येथे भारनियमन अटळ आहे. मुलुंड आणि भांडूप येथील भारनियमात कोणत्याही प्रकारचा फरक पडलेला नाही. पश्चिम उपनगरात राहणा-या ग्राहकांना रिलायन्स कंपनी प्रति युनिट 80 पैसे दर वाढविणार आहे अशी माझ ी माहिती आहे. महावितरणाच्या नियमाप्रमाणे हा दर वाढविण्यात येणार असेल तर त्या दरवाढीच्या बाबतीत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. हिवाळी अधिवेशनात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी विजेच्या प्रश्नासंबंधी बैठक घेतली होती. त्या बैठकीत काही साध्य झाले नाही. माननीय मंत्री महोदय बैठका घेतात, परंतु त्या बैठकीतून काही निष्पन्न निघत नाही. या शासनाचा रिलायन्स कंपनीवर कंट्रोल राहिलेला नाही असा मी आरोप करु इच्छितो. रिलायन्स कंपनी शासनाच्या कंट्रोलमध्ये असावयास पाहिजे होती. रिलायन्सचा मनमानी कारभार मुंबईतील पश्चिम उपनगरात, तसेच इतर उपनरात राहणा-या ग्राहकांना डोकेदुखी झालेला आहे. खरोखरच विजेचा दर प्रति युनीट 80 पैसे वाढणार आहे की त्यापेक्षा जास्त वाढणार आहे यासंबंधीची माहिती या सदनात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी दिली पाहिजे. जर 80 पैसे प्रति युनीट वीजेचा दर वाढणार असेल तर 300 युनीट वापरणा-या ग्राहकांची काय परिस्थिती होईल हे सांगणे कठीण आहे. रिलायन्स कंपनी विजचा दर प्रति युनिट किती वाढविणार आहे यासंबंधीची स्पेसिफिक अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावी.

सभापती महोदय, राज्यात विज निर्मिती केंद्रातील किती संच बंद आहेत यासंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. चंद्रपुरचा महाजनकोचा औष्णिक प्रकल्प आहे, त्या ठिकाणचा पाचवा संच गेल्या अनेक दिवसापासून बंद आहे. तो संच बंद असल्यामुळे 500 मे.वॅ.वीज निर्मिती ठप्प झाली आहे अशी माझी माहिती आहे. उन्हाळयात एखादा निर्मिती संच बंद पडला तर व त्यामुळे महाराष्ट्रात विजेचा तुटवडा भासला तर अशावेळी आपतकालीन काय व्यवस्था करण्यात येणार आहे ? जनतेला कशा पध्दतीने वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ? तसेच ती वीज कोणत्या दरात ग्राहकांना उपलब्ध करुन देण्याता येणार आहे? यासंबंधीची देखील माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिली पाहिजे.

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 15:50

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, मी एका गोष्टीचा पुनरुच्चार करु इच्छितो. मुंबईत टाटा, बेस्ट या कंपन्या विद्युत पुरवठा करतात. मुंबई शहरात मोठमोठे मॉल्स् आहेत, शो-रुम्स् आहेत, मुंबईतील लिकींग रोडने गेलात, ब्रीचकॅन्डी रुग्णालयाच्या रस्त्याने गेलात, कोणत्याही रस्त्याने गेलात तर आपल्याला दिसून येईल की, ....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 15:55

डॉ. दीपक सावंत ....

रात्री 12.00 ते सकाळी 6.00 वाजेपर्यंत मोठमोठया कंपन्यांचे होर्डिंगवरील दिवे ठणठणा पेटत असतात. हा विजेचा अपव्यय नाही काय ? होर्डिंगवरील दिवे रात्री 12.00 नंतर कोण बघतो ? ही वीज वाचविली तर हजारो मे.वॅ. वीज उपलब्ध होऊ शकते. सामान्य ग्राहकांच्या खिशातील ही बचत आहे. मंत्रीमहोदयांनी रात्रीच्या वेळी फेरफटका मारावा, मी स्वत: बरोबर येतो आणि किती मॉल्सचे दिवे तसेच रेमंड, रिबॉक या कंपन्यांच्या होर्डिंगवरील दिवे चालू असतात ते पहावे. रात्रीच्या वेळी हे दिवे कशाला पाहिजेत ? रात्रीच्या वेळी जळणारे हे दिवे ताबडतोब बंद करावेत अशी माझी सरकारला विनंती आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

07-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3A-2

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अतिशय महत्वाच्या अशा प्रश्नावर सदनामध्ये चर्चा सुरु आहे. मागील विधानसभा निवडणुकांपूर्वी या सरकारला अचानक साक्षात्कार झाला आणि आपण विकत वीज देणे देखील शक्य नसताना फुकट वीज कशी देऊ शकतो असे असले तरी फुकट वीज देण्याची घोषणा करण्याची अक्कल या सरकारला सुचली. परिणाम असा झाला की महाराष्ट्रातील जनता या घोषणेला भुलली. महाराष्ट्रात या सरकारने भुलभुलैय्या निर्माण केला. शून्य रकमेची बिले पाठविली. मते मिळाल्यानंतर ऐन निवडणुकीनंतर एका नेत्याला साक्षात्कार झाला. श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले की, हे व्यवहार्य नाही. पवार साहेबांनी पक्षाचा जाहीरनामा वाचला नव्हता काय ? जाहीरनाम्यामध्ये दुरुस्ती करावी असे वाटले नाही काय ? यामुळे जनतेची फसवणूक होणार नाही असे वाटले नाही काय ? निवडणुका झाल्यानंतर एक-दोन महिन्यातच जेव्हा जाब विचारला तेव्हा सरकारने या सदनात सांगितले की, 'मरता क्या नही करता'. जो माणूस मरत असेल तो वाट्टेल ते करु शकतो. जगण्यासाठी धडपड करु शकतो ती धडपड या सरकारने केली. अशा प्रकारचे उत्तर उपमुख्यमंत्र्यांनी या सभागृहात दिले. अशा प्रकारचे सरकारने जगण्यासाठी धडपड करुन लोकांची दिशाभूल केली. सत्य बाहेर आले. सरकारकडून नेहमी सांगितले जाते की, अमुक एका कंपनीबरोबर करार केला, 1000 कोटींचा करार केला, 2008-09 सालामध्ये वीज उत्पादन सुरु होणार आहे. केंद्रीय ऊर्जामंत्र्यांनी सांगितले की, 2012 सालापासून विजेच्या टंचाईमधून महाराष्ट्र मुक्त होणार आहे. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, एकदा खरे काय ते बोला. अजून निवडणुका लांब आहेत. जनतेला खरे काय आहे ते एकदा सांगा. किती वीज मिळणार आहे ते सांगा. अन्यथा कंदील वापरण्यासाठी योजना तयार करा, त्यासाठी सबसिडी द्या. पेट्रोमॅक्स, मेणबत्त्या, माचीस द्या. ग्रामीण भागातील वाडया-वस्तीवरील विद्युतीकरणाचा प्रश्न अनेक वेळा आलेला आहे. वर्षाला फक्त 121 वाडयांचे विद्युतीकरण झाले. गेली चार वर्षे मी धनगर वस्तीवरील विद्युतीकरणाचा विषय मांडतो आहे. महाराष्ट्रात 16/16 तास लोडशेडींग आहे. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी आम्ही मात्र पूर्ण अंधारात आहोत. आमची विनंती कोणी ऐकायला तयार नाही. मंत्रीमहोदयांनी सांगितले की गांधींच्या नांवे योजना सुरु आहे. त्या योजनेतून वीज मिळणार आहे असे सांगत आहात.

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ..........

या वाड्या-वस्त्यांचे विद्युतीकरण कधी करणार आहात ? त्यांच्या आयुष्यात उजेड कधी येणार आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी जाहीर करावे. राज्यात जवळपास 3.50 लाख कृषी पंपांना वीज पुरवठा करण्यासंबंधीचे अर्ज प्रलंबित आहेत. तसेच या राज्यात व देशातही मोठया प्रमाणात भाववाढ होत आहे पण कृषी उत्पन्न मात्र कमी व्हायला लागले आहे. आणि अशा परिस्थितीत जर 3.50 लाख कृषी पंपांना वीज पुरवठा केला नाही तर काय परिस्थिती निर्माण होणार आहे, याचा शासनाने विचार केला आहे काय ? राज्यातील साखर कारखान्यांची वीज निर्मितीची क्षमता 1250 मेगावॅट इतकी असतांना फक्त 22 साखर कारखानेच को-जनरेशन आणि बगॅसच्या माध्यमातून वीज निर्मितीचे काम करीत आहेत. म्हणून सर्वच साखर कारखान्यांना वीज निर्मिती करण्याबाबतची सक्ती शासन करणार काय ? याचाही खुलासा झाला पाहिजे. हवे तर त्यासाठी लागणारे आर्थिक नियोजन शासनाने करावे परंतु उर्वरित सर्व साखर कारखान्यांवर वीज निर्मितीचे बंधन घालावे, अशी माझी सूचना आहे. राज्यात आजच्या परिस्थितीत 4854 मेगावॅट इतकी उर्जा निर्मिती होऊ शकते एवढे पवन ऊर्जेचे क्षेत्र उपलब्ध आहे पण त्यालाही शासनाची उदासीनताच कारणीभूत असल्यामुळे हे होऊ शकत नाही. गेल्या तीन अधिवेशनांपासून मी मागणी करीत आहे की, पवन चक्क्यांसाठी ज्या गरिबांच्या जमिनी लाटल्या जात आहेत त्यांच्या आयुष्यात अंधार निर्माण करुन राज्याला आपण कसे उजेडात आणणार आहात ? म्हणून त्यांच्या आयुष्यात उजेड निर्माण करावयाचा असेल तर ज्यांच्या जमिनी पवन चक्क्यांसाठी संपादित केल्या त्यांना दर महिन्याला ठराविक भाडे देऊन या कामात त्यांचाही सहभाग घ्यावा, ते आपल्याला सहकार्य करतील.

महोदय, राज्यात लागणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी 40 टक्के गळती आणि वीज चोरीचे प्रमाण आहे व त्यासाठी शासनाने वेगवेगळया कंपन्या तयार केल्या. अशा प्रकारे कंपन्या तयार करुन सुध्दा गळती आणि चोरी थांबविणे शक्य नसेल तर अशा कंपन्या तयार करण्याचे शासनाचे प्रयोजन काय होते, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. शेवटी एवढेच विचारु इच्छितो की, राज्याला लागणारी वीज शासन कधी व कोणत्या दरात उपलब्ध करुन देणार आहे ? याचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी द्यावे, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो विजेचा प्रस्ताव सभागृहात चर्चेला आला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात विजेच्या बाबतीत काय चालले आहे हेच मला समजत नाही. परवाच माझ्या मित्राला मी सांगितले की, सभागृहात मला विजेच्या बाबतीत भाषण करावयाचे आहे. शेवटी विजेच्या बाबतीत काय बोलणार आहे ? माझा मित्र मला म्हणाला देशातील सर्व राज्यांना केंद्राकडून पारितोषिक देण्यात आले. त्यामध्ये गुजरात, आंध्र या राज्यांचा नंबर लागला. परंतु आपल्या महाराष्ट्राला कसलेही प्रमाणपत्र मिळाले नाही. हे प्रमाणपत्र कशावर मिळते असे मी विचारले तर त्याने मला सांगितले की, विजेची निर्मिती, इफिशिएन्सी, ब्रेक-डाऊन, प्रति युनिटवर येणारा खर्च आणि मॅनेजमेंट अशा सर्व गोष्टींवर हे प्रमाणपत्र मिळते. परंतु हे प्रमाणपत्र आपल्या राज्याला मिळाले नाही, याचा अर्थ आपल्या राज्यात यापैकी कुठलीही गोष्ट होत नाही. दुसरे म्हणजे "रात्री खाल्ले तूप आणि सकाळी बघा रुप" या उक्तीनुसार आम्ही विजेची निर्मिती कशी करणार ? असे शासनाचे म्हणणे असेल तर माझी त्याबाबत अशी सूचना आहे की, जर अशा प्रकारे करता येत नसेल तर जुन्या गोष्टींमध्ये काही तरी बदल करता येतो काय हेही पाहण्याची गरज आहे. परंतु तसे काहीच न करता या शासनाने वीज मंडळाचे नाव बदलले. परंतु नाव बदलले म्हणजे गुण बदलतात काय ? अशा प्रकारे गुणांमध्ये बदल होत नाही. कारण पूर्वी वीज मंडळात जे अधिकारी कार्यरत होते, तेच अधिकारी आज कंपनी झाल्यानंतरही कार्यरत आहेत. याबाबत मी जास्त काय सांगणार, मी काही इंजिनियर नाही, मी काही एमएसईबीमध्ये कामाला नव्हतो. पण सगळया इंजिनिअर्सच्या खोलीमध्ये कॅमेरे बसविले तर ते आपल्या कॉम्प्युटरवर फक्त पत्ते खेळतांना दिसतील, असे आजचे चित्र आहे. त्यांना दुसरे कामच नाही. त्यांची मानसिकता अशी झाली आहे की, आपल्याकडे एवढे मेरिट आहे, एवढी यंत्रणा आहे की, कुठेही झालेला बिघाड आपल्या ताकदीवर आपल्याला दुरुस्त करता येतो....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

परंतु अधिकारी म्हणतात की, बिघाड झाल्यानंतर त्या भागाची दुरुस्ती झाली तर आपल्याला त्याचा काही फायदा होणार नाही. सभापती महोदय, कमिशन पोटी वीज मंडळाची वाट लावली जात आहे. सगळेच नीट करायला बसलो तर खायचे काय असा प्रश्न अधिका-यांना पडला आहे. अगोदर एक विद्युत महामंडळ होते परंतु यांनी एका विद्युत मंहामंडळाचे तीन विद्युत महामंडळ तयार केले. विजेचे तीन महामंडळ करुन सुध्दा काही उपयोग होत नाही. तीन महामंडळामुळे कोणाचा पायपोस कोणामध्ये राहिलेला नाही. त्यामुळे तीन महामंडळाचे परत एक महामंडळ करावे काय असा यांना प्रश्न पडला असावा.

सभापती महोदय, मी एक महत्वाची गोष्ट सांगणार आहे. कारण "करणा-याने लाजावे नाही तर पाहणा-याने लाजावे" अशी एक म्हण आहे त्यामुळे या सरकारला आपण कितीही सांगितले तरी त्याचा काही उपयोग होणार नाही त्यामुळे मी थोडक्यात माझे विचार व्यक्त करतो. परवा मी औसा शहरातील ट्रान्सफॉर्मरच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना या सभागृहात उपस्थित केली होती त्यावेळेस या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात "नाही हें खोटे आह", "चूक आहे" अशी उत्तरे देण्यात आली होती.

सभापती महोदय, आम्हाला विजेचे कनेक्शन घ्यावयाचे असेल तर विद्युत महामंडळ सांगते तुम्ही डी.पी.साठी पैसे द्या, केबल साठी पैसे, फयूजसाठी पैसे द्या, चॅनलसाठी पैसे, पोलसाठी पैसे द्या, नट-बोल्टसाठी पैसे द्या. सभापती महोदय, जर आम्ही सगळयांचेच पैसे द्यावयाचे तर यांनी मग आम्हाला द्यायचे तरी काय हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागात 15-15 तासाचे लोडशेडींग होत असल्यामुळे लोक इन्व्हेटर वापरावयास लागले आहे. वीज नसतांनाही पंखा चालतो तेव्हा लोकांना गोड वाटते, परंतु आता या इन्व्हेटरचा रेट 8 रुपये प्रती युनीट पडण्ार आहे अशी चर्चा सुरु आहे. जेव्हा 8 रुपये प्रती युनीट खर्च येईल तेव्हा या लोकांना कसे वाटेल ?

सभापती महोदय, परवा मला रात्री 11.30 वाजता माननीय मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील हरंगुळ गावातील श्री. मधुकर खटोळे नावाच्या इसमाचा फोन आला. मला वाटले काही विशेष झाले असेल म्हणून फोन केला असावा. मी त्याला विचारले एवढया रात्री तू कसा काय फोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

केला? त्यावेळेस त्याने सांगितले की, तुम्ही विजेच्या संदर्भात सभागृहात बोलणार आहात त्यामुळे मी फोन केला आहे. त्याने पुढे सांगितले की, माझ्याकडे 15 एकर जमीन आहे. मला 63 हजार रुपये वीज बील भरण्याची नोटीस पाठविलेली आहे. मी जेव्हा 3 हजार रुपये वीज बील भरु शकलो नाही तर आता 63 हजार रुपये वीज बील कसे काय भरु शकणार आहे? या 63 हजार रुपयात 3 हजार रुपये मूळ विजेचे बील आहे, 3 हजार रुपये बील न भरल्यामुळे 33 हजार रुपये थकबाकी आहे, 26 हजार रुपये व्याज आहे, सरचार्ज 5 हजार रुपये असे मिळून या शेतक-याला 63 हजार रुपयांची भरण्याची नोटीस दिलेली आहे. कृषी संजीवनी योजना होती तेव्हा विहीर होती परंतु विहिरीत पाणी नव्हते आणि आता विहिरीत पाणी आहे परंतु वीज नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे या शेतक-याचे वीज बील माफ करावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, जसे पंजाबमध्ये कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी श्री. रिबेरो यांची नेमणूक करण्यात आली होती तशाच प्रकारे एका एका केंद्रावर जर आपण रिबेरोसारख्या माणसाची नेमणूक केली तर विद्युत महामंडळाची स्थिती सुधारु शकेल. वरचे अधिकारी किती चांगले असले तरी त्याचा उपयोग होत नाही. जोपर्यंत खालचे अधिकारी चांगल्या प्रकारचे काम करीत नाही तोपर्यंत आपल्या विद्युत महामंडळाचे काम सुधारु शकणार नाही. शेवटी आपण सगळीकडे खाजगीकरण करीत आहात त्यामुळे शासनाने सगळया गोष्टींचे खाजगीकरण करुन टाकण्याची घोषणा करावी.

**तालिका सभापती** ( श्री. जगदीश गुप्ता ) : सन्माननीय सदस्यांची वेळ संपत आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ श्री.जुन्नरे 16.10

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, आज पाण्याचे खाजगीकरण करण्यात येत आहे. त्याचबरोबर इतरही अनेक क्षेत्राचे खाजगीकरण करण्यात येत आहे त्यामुळे विजेचे खाजगीकरण करण्यात येत असेल तर त्याही बाबतीत मला काही म्हणावयाचे नाही. विजेच्या समस्येसारख्या गंभीर विषयावर बोलण्यासाठी नवीन सन्माननीय सदस्यांना थोडा अधिक वेळ दिला गेला पाहिजे. आम्हाला शेवटी बोलण्याची संधी दिली जाते आणि शेवटी बोलावयास सुरुवात केली असताना केवळ एक दोन मिनिटांमध्ये भाषण पूर्ण करा असे सांगितले जाते ही गोष्ट बरोबर नाही. आम्हाला बोलण्यासाठी अधिक वेळ दिला जावा . आमचा गळा घोटू नका, आमचा गळा घोटणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटण्यासाखे आहे.

सभापती महोदय, शेवटी मला एक दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. माननीय उर्जा मंत्र्यांना मला आपल्या मार्फत एवढेच सांगावयाचे आहे की विजेच्या समस्येतून त्वरित मार्ग काढण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात आली पाहिजे तसेच कृषि संजीवनी योजनेव्दारे शेतकऱ्यांना आणखी काही सवलती देता आल्या तर त्या देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सौर ऊर्जेच्या संदर्भात आज जी सबसिडी दिली जाते त्यात आणखी वाढ करण्यात यावी. गावामध्ये वीज कशी राहील या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. रात्रीच्या वेळी प्रवास करीत असताना गाव कधी लागते हे कधी लक्षात येत नाही. रात्रीच्या वेळी कुत्रे भुंकावयाला लागले किंवा नाकाला रुमाला लावावा लागला की गाव आले आहे असे आम्ही समजतो. तेव्हा सौर उर्जेच्या संदर्भात आणखी सबसिडी देण्यात यावी अशी मी माननीय उर्जा मंत्र्याना विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : यानंतर माननीय मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि त्यांच्या अन्य सहका-यांनी विजेच्या टंचाईच्या संदर्भात नियम 260 अन्वये या ठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे. अतिशय संयमाने आणि कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता शक्य होईल त्या ठिकाणी टीका करीत आणि शक्य होईल त्या ठिकाणी सूचना करीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार, अरुण गुजराथी, केशवराव मानकर, दिवाकर रावते, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रकाश शेंडगे, पाशा पटेल यांनी या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेतला आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्याचबरोबर इच्छा असूनही ज्या सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घेता येऊ शकला नाही त्यांनासुध्दा मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. या चर्चेत भाग घेत असताना ज्या सन्माननीय सदस्यांनी आस्था दाखवली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, विजेच्या प्रश्नासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणाले की, "ऊर्जा मंत्री हताश झालेले आहेत." त्यांना मी सांगू इच्छितो की, मी हताश झालेलो नाही. माझ्या मनात कोणत्याही प्रकारचा हताशपणा नाही. दिशा देऊन विजेचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्याची भूमिका मी घेतलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चर्चेची सुरुवात वरच्या दर्जाची केली होती. मोफत विजेच्या संदर्भात, विद्युत निर्मितीच्या संदर्भात त्यांनी मुद्दे उपस्थित केले होते. ही चर्चा करीत असतांना एक गोष्ट मान्य केलेली आहे की विजेच्या संदर्भात जी टंचाई आहे ती फक्त महाराष्ट्र राज्यातच नाही तर सपूर्ण देशात आहे. त्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी त्यांच्या भाषणात केला होता. श्री.गोपीनाथ मुंडे हे ज्यावेळी ऊर्जा मंत्री होते त्यावेळी दिनांक 13 एप्रिल 1999 रोजी विधानसभेमध्ये त्यांनी केलेल्या भाषणाच्या चार ओळी मी वाचून दाखवतो. त्यांनी असे सांगितले होते की, "आज सुध्दा एनरॉन कंपनीच्या 200,500 व 900 मेगॅवॅट वीज टेस्टींगच्या माध्यमातून उपलब्ध होत आहे.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

परंतु 17 तारखेपासून 740 मे.वॅ. इतकी वीज उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे आपल्याला थोडा रिलिफ मिळेल पण तरीदेखील 800 ते 1000 मे.वॅ.चे लोड शेडींग राहील. आपल्या शेजारच्या राज्यांमध्येही विजेचे शॉर्टेज आहे त्यामुळे त्यांच्याकडून वीज मिळेल अशीही परिस्थिती नाही. सभापती महोदय, 13 एप्रिल 1999 रोजी तत्कालीन ऊर्जा मंत्री श्री.गोपीनाथ मुंडे यांनी सभागृहात जे भाषण केले होते ती गोष्ट मी या लोड शेडींगच्या संदर्भातच पुन्हा एकदा रेकॉर्डवर आणतो. याचा अर्थ या राज्यात किमान एक हजार मे.वॅ. विजेची तूट ही 1999 सालामध्ये झाली होती. एवढेच नव्हे तर दाभोळची वीज आल्यानंतरही त्या परिस्थितीत फार फरक पडेल असे वाटत नाही अशी भूमिका देखील त्यावेळेस घेतली गेली होती आणि आजूबाजुच्या राज्यांमध्येदेखील तीच परिस्थिती आहे असे त्यांनी त्यावेळेस सांगितले होते. सभापती महोदय, सी.इ.ए. नावाची एक संस्था आहे. त्यांची एक वेबसाईट आहे त्या वेबसाईटवर कोठल्या राज्याची विजेची किती मागणी होती आणि त्या राज्यांनी वीज किती पुरविली या संबंधीची आकडेवारी प्रसिद्ध होत असते. माझ्या हातामध्ये एप्रिल 2007 ते जानेवारी 2008 या कालावधीतील देशातील वेगवेगळ्या राज्यामधील विजेची मागणी आणि त्या राज्यांनी पुरविलेली वीज यांचे स्टेटमेंट आहे. याच्या फार डिटेलमध्ये मी जात नाही. पण आपल्याला पॉझिटिवली उत्तर पाहिजे आहे, माहिती पाहिजे आहे म्हणून आणि मी येथे सभागृहाला काय सांगणार आहे याचीही आपल्याला चांगली माहिती असल्याचे सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी म्हटले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी तर श्वेतपत्रिकेचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी जे भाषण केले ते त्यांना मीच लिहून दिले असल्याचाही संशय व्यक्त केला गेला. परंतु यातील 'लोकराज्य' आणि 'राष्ट्रवादी'चा ऊर्जा विशेषांक काढला होता आणि त्यात राज्यातील जनतेला विजेच्या बाबतीत आम्ही काय करीत आहोत याची माहिती कोठे तरी तोंडी असण्याऐवजी लेखी स्वरूपात दिली जावी म्हणून प्रसिद्ध केली आहे. शेवटी आम्ही या सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेरही जे बोलू त्यात आणि आमच्या कृतीमध्ये काही फरक असू नये ही यामागे आमची भूमिका होती. त्यामुळे ते अंक वाचून त्यांनी त्यांची भूमिका येथे मांडली आहे इतकेच.

..... 3इ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

सभापती महोदय, मी या ठिकाणी दोन राज्यांची तुलना करताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, एप्रिल 2007 ते जानेवारी 2008 या कालावधीत महाराष्ट्रात 17.2 टक्के विजेचे शॉर्टेज होते आणि त्याच काळात गुजराथमध्ये 15.1 टक्के विजेचे शॉर्टेज होते. फरक एवढाच आहे की, गुजराथमध्ये या सर्व कालावधीत जी विजेची मागणी होती ती 56,270 दशलक्ष युनिटस्‌ची तर पुरवठा होता 47,664 दशलक्ष युनिटस्‌चा आणि 8793 दशलक्ष युनिटस्‌चे शॉर्टेज होते. याच कालावधीत महाराष्ट्रात 17 टक्के टंचाई होती त्यावेळी महाराष्ट्रात विजेची मागणी 94566 दशलक्ष युनिटस्‌ची होती आणि त्यावेळी 78277 दशलक्ष युनिटस् इतक्या विजेचा पुरवठा केला गेला. गुजराथ राज्यात 47664 दशलक्ष युनिटस् वीज पुरविली तरी त्यांची तूट 15 टक्के होती आणि आपण 78277 दशलक्ष युनिटस् वीज पुरविली असताना आपली तूट 15.2 टक्के इतकी आहे. एकंदरीत महाराष्ट्रा सारख्या राज्यात आज विजेच्या संदर्भात जी काही मागणी वाढते आहे, गुंतवणूक वाढते आहे, औद्योगिकीकरण, नागरीकरण, शेतीकरण वाढते आहे त्यामुळे दिवसेंदिवस विजेची मागणी वाढणारच आहे. त्या प्रमाणात विजेची निर्मिती आणि बाकीच्या सुविधादेखील वाढणे महत्त्वाचे आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी लोकसभेमध्ये देखील काम केले आहे त्यांच्या आणि आपणा सर्वांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आठव्या, नवव्या आणि दहाव्या पंचवार्षिक योजना आहेत ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 3एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 16:20

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

ज्याच्यामध्ये 1992 ते 1997, 1997 ते 2002 आणि 2002 ते 2007 या तीन पंचवार्षिक योजनेमध्ये 15 वर्षाच्या कालावधीत देशाच्या पातळीवर विजेच्या निर्मितीच्या बाबतीत जे लक्ष्य ठेवले गेले, त्याच्या फक्त 50 टक्के वीजच आपण या देशामध्ये निर्माण करु शकलो हे केंद्र शासनाच्या किंवा नियोजन आयोगाच्या आकडेवारी वरुन निश्चित प्रकारे समजू शकते. या राज्यामध्ये विजेच्या बाबतीत सुधारणा करताना मध्यंतरी माननीय पंतप्रधान यांनी श्री.मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखाली देशाच्या पातळीवर वेगवेगळया राज्यातील ऊर्जा मंत्र्यांचा एक ग्रुप नेमला. या ग्रुपला असे काम देण्यात आले की, उद्याच्या 2007 ते 2012 या पंचवार्षिक योजनेमध्ये या देशामध्ये वीज निर्मिती करण्यासाठी किती भांडवल घालावे लागणार आहे ? यासाठी कशा प्रकारे निधी उभारावा लागेल आणि यासंबंधात काय टारगेट असले पाहिजे ? याचा अभ्यास करण्याच्या बाबतीत या ग्रुपवर जबाबदारी टाकण्यात आली आणि त्या ग्रुपमध्ये मला एक मेंबर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आपण 11,11,777 मे.वॅ.वीज निर्मितीचे लक्ष ठेवलेले आहे. मागच्या तीन पंचवार्षिक योजनेमध्ये 50 हजाराच्या आसपास लक्ष्य असताना सुध्दा, आपण 50 टक्के सुध्दा वीज निर्मिती करु शकलो नाही. पण आज संपूर्ण देशामध्येच विजेची टंचाई आहे आणि यासंबंधीची आकडेवारी मी सदनाच्या पटलावर ठेवतो. आज देशामध्ये असे एकही राज्य नाही की, ज्या राज्यामध्ये विजेच्या बाबतीत मायनस स्थिती नाही. आज सर्व भारत देशामधील सर्व राज्यांसमोरच विजेच्या बाबतीत निश्चितपणे हीच परिस्थिती राहिलेली आहे. म्हणून आपल्याला काही गोष्टी करणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदारदादांनी सांगितले, त्याप्रमाणे माननीय डॉ.पतंगराव कदम ऊर्जा मंत्री असताना शासनाने श्वेतपत्रिका काढली. त्यामध्ये इंटरनल रिफॉर्मच्या बाबतीत काही कमिटमेंट देण्यात आल्या. ग्राहकांच्या, देशातील नागरिकांच्या हक्काच्या, सनदीच्या बाबतीत कमिटमेंट दिल्या. त्यानंतर 2003 चा कायदा आला. त्यानंतर आपलेच सरकार केंद्रामध्ये असताना त्या सरकारने 2003 च्या कायद्यामध्ये वीज मंडळाचे विभाजन करुन त्याची चांगल्या प्रकारे रचना केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्या कायद्याच्या अंतर्गत जून 2005 मध्ये आपण आपल्या राज्यामध्ये वीज मंडळाचे विभाजन करुन विजेच्या बाबतीत निर्मिती कंपनी, ट्रान्समिशन कंपनी, वितरण कंपनी आणि या तीन कंपन्यांवर कंट्रोल करणारी होल्डींग कंपनी अशा चार कंपन्या निर्माण केल्या. अनेक सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये अशी अपेक्षा व्यक्त केली की, तुम्ही .....

. . . .3 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

वीज मंडळाचे विभाजन केल्यानंतर, अन्‌बंल्डींग केल्यानंतर नक्की कारभारामध्ये काय सुधारणा झाली यासंदर्भात माहिती सांगितली पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, बाकीच्या राज्यांमध्ये वीज मंडळाचे विभाजन करताना त्यांनी या कंपन्यांना क्लीन स्लेट दिलेली होती, परंतु आपण आपल्या या राज्यामध्ये वीज मंडळाचे विभाजन केल्यानंतर ती देऊ शकलो नाही. पण तरी सुध्दा या राज्यामध्ये या तीनही कंपन्यांनी काम करुन दाखविलेले आहे. मी आज आपल्याला येथे सांगू इच्छितो की, निर्मितीच्या क्षेत्रामध्ये गेल्या दोन वर्षात आपल्या पी.एल.एफ.मध्ये 4 टक्क्यांनी वाढविण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. आपल्या वितरण कंपनीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांचा टी ॲण्ड डी.च्या लॉसेसबाबत कन्सर्नचा एक मुद्दा असतो. 2005-2006 च्या सुमारास आपले टी ॲण्ड डी लॉसेस साधारणपणे 31 टक्क्याच्या आसपास होते. आपण 2005-2006 मध्ये टी ॲण्ड डी लॉसेस 3.16 टक्क्यांनी कमी केले. 2006-2007 मध्ये आपण 2.9 टक्क्यांनी कमी केले. आता 2007-2008 मध्ये टी ॲण्ड डी लॉसेस 7.65 टक्क्यांनी कमी केले आहेत. आज राज्यातील आपले टी ॲण्ड डी लॉसेस 31 टक्क्यावरुन 22.4 टक्क्यापर्यंत आणले आणि या सगळयाचा एकत्रित परिणाम पाहिला तर वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून टी ॲण्ड डी लॉसेस कमी केल्यामुळे 1376 कोटी रुपयांचे उत्पन्न या कंपनीला जास्त मिळू शकले ही बाब मला मुद्दाम या सदनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. तसेच आपल्याला ट्रान्समिशनमध्ये सुध्दा 5.94 टक्के लॉस होता. आता आपण 2007-2008 मध्ये 4.60 टक्क्यापर्यंत खाली आलो आहोत. वितरण कंपनीच्या बाबतीत सांगावयाचे तर आपण या वीज मंडळाचे अनबल्डींग करण्यापूर्वी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याचे कलेक्शन 800 कोटी रुपयांच्या आसपास होते. आता आपण दुसऱ्या वर्षी 1100 कोटी रुपयापर्यंत गेलो आहोत.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ MMP/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:25

श्री. दिलीप वळसे पाटील...

आतापासून दर महिन्याला जवळपास 1600 कोटी रुपये कलेक्शन झालेले आहे. तसेच इंटर्नल रिसोर्सेस मधून जेथे जेथे इन्वेस्टमेंट करणे आवश्यक आहे, नवीन सुधारणा करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी सुधारणा करण्याच्या संदर्भात निश्चित प्रकारे शासनाकडून प्रयत्न केले जाणार आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, आवश्यक असेल तेथे शासन वीज खरेदी करण्यास तयार आहे. आज राज्यामध्ये 12 ते 14 तास भार नियमन करावे लागत असले तरी देखील मधल्या कालावधीमध्ये या संदर्भात जे प्रश्न निर्माण झाले होते त्याच्या बाबत शासनाने उपाययोजना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पूर्वी संपूर्ण राज्यामध्ये एकच ग्रीड होते. आज विभागीय ग्रीड व राष्ट्रीय ग्रीड तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे आता केवळ एका राज्याने विजेच्या उत्पादनासंदर्भात काम करुन चालणार नाही. उद्या नॉर्थ ईस्ट मधील काही राज्यांनी जास्त वीज ओढल्यास त्याचा फटका इतर राज्यांना देखील बसणार आहे. त्यामुळे अशा प्रकारे एखाद्या राज्याने वीज ओढल्यास, राज्याच्या गरजेपेक्षा अधिक वीज राज्यामध्ये असूनही त्या राज्याला अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. या मधून मार्ग काढण्याचा प्रयत्न आता शासनाकडून करण्यात येत आहे. तसेच वीज निर्मितीच्या संदर्भात मी वेगळा मुद्दा मांडणार आहे.

सभापती महोदय, आज सभागृहामध्ये सांगितले पाहिजे की, राज्यामध्ये वीज पुरवठा करीत असताना विजेचे उत्पादन होण्याकरिता काही कालावधींची आवश्यकता आहे. वीज प्रकल्प पूर्ण करण्याकरिता जागा मिळविण्यापासून एन्व्हायर्मेंटल क्लिअरन्स, पाण्याची परवानगी तसेच केंद्र शासनाची परवानगी मिळण्यास एक ते दीड वर्षाचा कालावधी जातो. त्यानंतर वर्क ऑर्डर इश्यू केल्यानंतर साधारणपणे चार वर्षाचा कालावधी हा प्रकल्प उभा राहण्यासाठी लागतो.

सभापती महोदय, या राज्याचा उर्जा मंत्री म्हणून सूत्र हाती घेतल्यानंतर चार ते पाच वर्षामध्ये वीज निर्मितीमध्ये काय करणार आहे हे मी या सभागृहामध्ये अनेक वेळा सांगितलेले आहे. या संदर्भातन मी सन्माननीय सदस्यांना प्रेझेंटेशन केले आहे, तसेच मिडीयासमोरही प्रेझेंटेशन केलेले आहे. एखादी गोष्ट होण्यास चार वर्षे लागणार आहेत असे कमिट करुनही दर 3 महिन्यांनी अधिवेशनामध्ये, या विषयासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा होत आहे. मागच्या अधिवेशनामध्ये आपण

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

असे सांगितले होते अशा प्रकारचे तेच तेच प्रश्न दोन ते तीन महिन्यांनी येणाऱ्या अधिवेशनात विचारले गेले तर त्याबाबत नवीन काही उत्तर देण्यासारखे आहे असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, या निमित्ताने मी आपणाला एवढेच सांगू इच्छितो की, राज्यामध्ये नवीन वीज निर्मिती करण्याकरिता दोन कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशनचा कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे प्रामाणिकपणे कबूल केलेले आहे की, गुजरात राज्यामध्येही विजेचा प्रश्न आहे. तरी देखील तेथील शेतकऱ्यांना खात्रीशीर वीज मिळते. कारण त्या ठिकाणी वेगवेगळया फिडरमधून वीज पुरवठा केला जातो. त्यामुळे वीजेची अडचण असताना शेतकऱ्यांना वीज टंचाई भासत नाही. गुजरात राज्यामध्ये वीज टंचाईचा प्रश्न फार पूर्वीपासून होता त्यामुळे त्यांनी ही उपाययोजना अगोदरच केलेली होती. आपल्या राज्यामध्ये विजेची टंचाई सुरु झाल्यापासून सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साधारण 41 हजार 895 गावांपैकी 28 हजार 237 गावांमध्ये सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशनचे काम करावयाचे आहे. सिंगल फेजिंगच्या टप्पा क्रमांक 1 मध्ये 8085 गावे पूर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. मला आपणास सांगण्यास आनंद होत आहे की, ठरविलेल्या उद्दीष्टापैकी सर्व गावांमध्ये सिंगल फेजिंगचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. आपल्याला ज्या वेळी सिंगल फेजिंगद्वारे वीज द्यावयाची नसेल त्यावेळी थ्री फेजिंगद्वारे वीज दिली जाते. पूर्वी सिंगल फेजिंग नसल्यामुळे तेथे 12 ते 14 तास भार नियमन करावे लागत असे. आता हे भार नियमन 2 ते 3 तासांपर्यंत कमी झालेले आहे. आता जितका वेळ शेतकऱ्यांना वीज पुरवठा केला जाईल असे कमिट केले होते तितका वेळ ग्राहकांना वीज पुरवठा केला जात आहे. या बद्दल सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य सहमत होतील असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ KGS/ D/ श्री.बरवडनंतर 16:30

श्री.दिलीप वळसे-पाटील......

सिंगल फेज (2) चा कार्यक्रम घेतला त्यामध्ये 3926 गावे पूर्ण करावयाची होती. आजपर्यंत 3781 गावामध्ये हे काम पूर्ण केले आहे. राहिलेली जी गावे आहेत त्यामध्ये हे काम करता येईल. ज्या भागामध्ये सिंगल फेज करणे शक्य नाही तेथे फिडर सेपरेशनचा कार्यक्रम हाती घेतला आहे. ज्या भागामध्ये कृषि पंपाचा वापर अधिक आहे, मग नाशिक जिल्हा असेल, अहमदनगर, जळगांव किंवा पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे असतील या सर्व जिल्हयात मोठया प्रमाणात कृषि पंपाची मागणी असते. तेथे भारनियमन करावयाचे म्हटले तर मोठमोठी शहरे, मोठमोठी गावे अंधारात जातील. ते व्हावयाचे नसेल तर आपल्याला शेतीचे फिडर आणि गावाचे फिडर, ग्राहकांचे फिडर वेगळे करण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याशिवाय गावठाण फिडर सेपरेशन (1) योजना घेण्यात आली होती. त्यामध्ये 7,512 गावांचे लक्ष्य ठरविले होते. त्यापैकी 2645 गावे पूर्ण झालेली आहेत. फिडर सेपरेशन (1) योजना अंतर्गत उर्वरित सर्व गावे वाटेल त्या परिस्थितीत डिसेंबरअखेर किंवा उशिरात उशिरा जानेवारी पर्यंत पूर्ण करण्याचे काम हाती घेत आहोत. गावठाण फिडर (2) या योजनेंतर्गत 8714 गावे व 2020 वाडया अशी टर्म की पध्दतीने करण्यासाठी 1446 कोटी रुपयांचे कंत्राट दिलेले आहे. या सर्व कामांच्या माध्यमातून आपल्या राज्यामध्ये जे उद्दिष्टय ठेवले होते त्याच्यामध्ये ही गावे पूर्ण करण्याच्या दृष्टीने निश्चित प्रकारे मदत झाल्याशिवाय राहणार नाही. शेवटी आपल्याकडे वीज नाही. वीज निर्माण होण्यासाठी 2-3 वर्षांचा कालावधी लागणार आहे. परंतु यासंबंधी आज बाकीच्या गोष्टी करीत असताना लोडचे व्यवस्थापन करुन आज ग्रामीण भागामध्ये 14-14 तास लोड शेडिंग सहन करावे लागते अशी ओरड आहे. त्यावर उपाय म्हणून हे महत्वाचे कार्यक्रम राज्यात घेतले आहेत. यामध्ये काही वाडया वस्त्या राहिल्या असतील हे नाकारता येत नाही. परंतु ते दुरुस्त करण्यासाठी निश्चित कार्यक्रम हातात घेतले आहे. सन 1999 सालापासून 2008 पर्यंत विजेची मागणी वाढली आहे की नाही हे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला सांगावे. राज्यात दरवर्षी 1000 मे.वॉट इतकी मागणी वाढत आहे, नवीन वीज निर्माण होत नाही. 1999 साली 1500 मे.वॉटच्या आसपास असलेला तुटवडा मागील वर्षाचा विचार करता यावर्षाची परिस्थिती बरी आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते, आपण आपल्या मतदार संघात जाऊन आला

.2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ KGS/ D/

श्री.दिलीप वळसे-पाटील....

असाल. मागील 4-5 दिवसामध्ये भारनियमन कमी झालेले आहे. त्याचे कारण काही भागात पाऊस पडल्यामुळे असेल किंवा उत्तरेकडून येणा-या थंड वा-यामुळे हे झाले असावे. त्याचबरोबर वीज निर्मितीचे काम चांगल्या प्रकारे करुन घेतले आहे. त्यामुळे कृषि पंपासाठी लागणारे कनेक्शन्स देण्याच्या बाबतीत आपण मागे राहणार नाही. ती देण्यासंबंधी प्रयत्न करीत आहोत. ग्रामीण भागात विजेचे ट्रान्सफॉर्मर जळण्याचे प्रकार पहावयास मिळतात. सध्या 2,56,793 ट्रान्सफॉर्मर्स लावण्यात आले आहेत. त्यापैकी यावर्षी 35,909 बदलण्यात आले आहेत, 484 ट्रान्सफॉर्मर्स अजून बदलण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे त्यात काही चुका असू शकतात. एखादा अधिकारी वा कर्मचारी चुकीचा वागू शकतो. पण राज्यात अटीतटीची परिस्थिती असताना लोकांच्या संघर्षाला, मोर्चाला सामोरे जात असताना, जाळपोळीला सामोरे जात असताना, लोकांच्या क्षोभाला सामोरे जात असताना केवळ आपल्या भूमितील ही माणसे आहेत म्हणून सर्व परिस्थितीचा सामना करण्याचे, संघर्ष करण्याचे काम या तिन्ही कंपन्यांचे अधिकारी वा कर्मचारी काम करीत आहेत. त्यांना सुध्दा मर्यादा आहेत. आपल्याला अडचण आहे, आपल्याला दुसरा कोणताही पर्याय नाही. त्यामुळे आपला राग व्यक्त करण्यासाठी राजकीय भूमिकेतून आपल्याला सर्व सहन करावे लागते. त्यावेळी काही ठिकाणचे अधिकारी वा कर्मचारी चुकीचे वागत असतील तर त्यासाठी एकत्र बसून त्यांना दुरुस्त करण्याची कामगिरी करु शकतो.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

अनेक सन्माननीय सदस्यांनी वीज चोरीच्या संदर्भात आपले विचार मांडले. वीज चोरीच्या संदर्भात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. आपल्या राज्याने पहिल्यांदा या सभागृहामध्ये वीज चोरीच्या संदर्भातील कायदा मंजूर केला. हा कायदा मंजूर केल्यानंतर आपल्या कायद्यातील अनेक तरतुदी केन्द्र सरकारने केन्द्राच्या कायद्यामध्ये जशाच्या तशा स्वीकारलेल्या आहेत. हा कायदा करीत असताना आपण युनियन बरोबर देखील चर्चा केली होती. आपल्या कायद्यामध्ये आपण जशी ग्राहकावर कारवाई करण्याची तरतूद केलेली आहे त्याच प्रमाणे कर्मचा-यांवर देखील कारवाई करण्याची तरतूद केलेली आहे. मी सांगू इच्छितो की, महावितरण कंपनीच्या माध्यमातून 484 कर्मचा-यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. हे सर्व करीत असताना डेडिकेटेड पोलीस स्टेशन्स स्थापन केलेली आहेत. तसेच रेडस् टाकून अनधिकृतपणे वीज वापर करणा-या लोकांवर मर्यादा घालून त्यामधूनही मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याचा आपण निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदय, अनेक गोष्टींच्या संदर्भात मला या ठिकाणी बोलले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये फिरती पथके, विशेष पथके तयार केलेली आहेत. ट्रान्सफार्मर पर्यन्त जाऊन, सब स्टेशनपर्यन्त जाऊन एनर्जी ऑडिट करण्याची पध्दत सुरु केलेली आहे. एखाद्या सबस्टेशनमधे किती वीज आहे आणि वीज बिल किती आहे आणि उत्पन्न किती मिळाले याचे ऑडिट घेतले जाते. त्यामुळे 800 कोटीचे उत्पन्न आपण 1600कोटी पर्यन्त घेऊन जाऊ शकलो आहोत. टॅरिफ फिक्सेशन कमिटी तसेच एमईआरसी यांच्याकडे या सर्व गोष्टींचा ऑडिट रिपोर्ट सादर केला जातो. सन 2006-07मध्ये आपण 33 के.व्ही.ची 130 नवीन सब-स्टेशन सुरु केली. 2007-08मध्ये 64 सबस्टेशन्स उभी करण्याचे काम करीत आहोत. जसा महावितरण कंपनीचा कार्यक्रम आहे त्याचप्रमाणे ट्रान्समिशन कंपनीचा देखील कार्यक्रम आहे. या राज्यामध्ये वीज मंडळाचे अन्बंडलिंग केल्यानंतर या तीनही कंपन्या आपापल्या पध्दतीने पुढे जाऊन काम करायला लागलेल्या आहेत. त्यामुळे वीज क्षेत्रामध्ये चांगले रिझल्टस् दिसायला लागलेले आहेत. मी अधिक बोलून सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. सिंगल फेज, त्रिफेज, ट्रान्सफॉर्मर या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते या ठिकाणी व्यक्त केली. सन 2006-07मध्ये

..2..

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

63 आणि 33 के.व्हीचे 7475 , 2007-2008मध्ये 63 के.व्ही.चे 6209 आणि 33 के.व्ही.चे 3504 ट्रान्सफॉर्मर इन्स्टॉल्ड करण्याचे काम केलेले आहे. ट्रान्सफॉर्मर फेल्युअर रेट यापूर्वीच्या काळामध्ये जो होता तो आपण कमी केलेला आहे. 2006-07मध्ये हा ट्रान्स्फॉर्मर फेल्युअर रेट 22 टक्क्यापर्यन्त गेलेला होता. तो रेट 17.12 टक्क्यापर्यन्त कमी केलेला आहे. तसेच 2007-08मध्ये हा रेट 16.14 टक्के इतका कमी केलेला आहे. तेव्हा या ट्रान्सफॉर्मर फेल्युअरच्या बाबतीत आपण निश्चितपणे दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, वाड्या वस्त्यांचे विद्युतीकरण हा सगळयांच्याच दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. डीपीडीसी मधून मिळणाऱ्या पैशातून वाड्या वस्त्यांचे विद्युतीकरण करण्याचे काम आपण हाती घेतलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. शिगम 16:40

श्री. दिलीप वळसे पाटील....

यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी श्री. केळकर यांनी काही भूमिका मांडली. ई.पी.डी.आर.पी. च्या कार्यक्रमासंबंधी या ठिकाणी सांगितले गेले. गेली अनेक वर्षे वाडया, वस्त्यांच्या विद्युतीकरणासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून किंवा डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून फार पैसा उपलब्ध होत नव्हता. केंद्र सरकारने यामध्ये भूमिका घेतली आहे. ती भूमिका घेतल्यानंतर 716.71 कोटी रुपयांची केंद्र सरकारला पाठविली होती. केंद्र सरकारच्या योजनेच्या अंतर्गत आपले सगळयाचे सगळे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. येत्या वर्ष दीड वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील वाडया, वस्त्यांचे विद्युतीकरणाचे काम हातात घेण्यात येणार आहे. राज्यातील सर्व वाडया, वस्त्यांमध्ये विद्युतीकरणाचे काम पूर्णपणे आम्ही करुन दाखविणार आहोत त्यामुळे याबाबतीत कोणी शंका घेण्याचे कारण नाही. (अडथळा ) माझे भाषण पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले तर त्या प्रश्नांची उत्तरे देण्यास मी तयार आहे.

सभापती महोदय, वितरण क्षेत्रामध्ये एक गोष्ट मला ॲडमीट केली पाहिजे की, मी या सभागृहामध्ये इन्फ्रास्टक्चरच्या बाबतीत सभागृहात बोललो आहे. या राज्यामध्ये येत्या दोन वर्षात 555 नवीन सब स्टेशन्स उभारणीचा 14500 कोटी रुपयांचा कार्यक्रम जाहीर केला होता. वीज नियामक आयोगाकडे आम्हाला थोडासा विलंब झाला. परंतु आज वीज नियामक आयोगाने सुध्दा महावितरण कंपनीने जेवढे प्रस्ताव पाठविले होते, त्या सगळयाच्या सगळया प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. उद्याच्या काही कालावधीमध्ये पहिल्या टप्प्यात साधारणत: 8 हजार कोटी रुपये खर्च करुन या राज्यात नवीन सब स्टेशन्स उभारणीचे काम हाती घेतले आहे. मी या सदनाला नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, वीज क्षेत्राचा एकंदर 60 हजार कोटी रुपयांचा कार्यक्रम हातामध्ये घेतला आहे. वीज निर्मितीमध्ये 30 हजार कोटी रुपये, वितरणाच्या क्षेत्रामध्ये 14 हजार कोटी रुपये, ट्रान्समिशन क्षेत्रासाठी 20 हजार कोटी रुपये असा कार्यक्रम हाती घेतला आहे. एवढे मोठे काम स्वातंत्र्यप्राप्ती नंतर वीज क्षेत्रात यापूर्व काळामध्ये कधीही करु शकलो नव्हतो. कदाचित मर्यादा असतील. आता अनबंडलींग झाले. आता कंपन्या केल्या आणि त्या माध्यमातून राज्य सरकारकडून 10-20 टक्के इक्विटी घेऊन, बाकीचे पैसे वित्तीय संस्थांकडून उभे करुन या राज्यात वीज निर्मितीच्या क्षेत्रात काम करीत आहोत.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले की, वीज निर्मितीच्या बाबतीत महाराष्ट्रातील एकाही कंपनीस पुरस्कार मिळाला नाही. आपल्या राज्यास पुरस्कार मिळाला नाही याची खंत माझ्या मनात आहे. यासंदर्भात आम्हाला काय करेक्टिव्ह मेजर घ्यावयास पाहिजे त्यासंदर्भात आम्ही भूमिका घेऊ. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, 2005-06 मध्ये या राज्यातील स्वत:च्या वीज निर्मिती केंद्रातून 40927 हजार दशलक्ष युनिट आपण वीज निर्मिती केली होती. 2006-2007 मध्ये 41271 हजार दशलक्ष युनिट वीज निर्मिती आपण केली. 2007-08 मध्ये जवळपास 44 हजार दशलक्ष युनीट वीज निर्मिती एप्रिल अखेर होईल असे अपेक्षित आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सभापती महोदय, या सभागृहात मी यापूर्वी एकदा सांगितले होते की, राज्य सरकारचे वीज निर्मितीचे जे दीर्घकालीन प्रस्ताव कोणते आहेत आणि ते कसे पूर्ण केले जाणार आहेत. उरणच्या प्रकल्पाची कॅपॅसिटी वाढविण्यासाठी राज्य शासनाला केंद्र शासनाकडून मिळणारा गॅस कमी मिळत असल्यामुळे 755 मे.वॅ.वीज निर्मितीची क्षमता असताना या संचातून 450-500 मे.वॅ.वीज निर्माण करु शकलो. केंद्र शासनाकडून गॅस मिळविण्याचा या शासनाने प्रयत्न केला परंतु गॅस उपलब्ध झाला नाही. त्यानंतर महाजनको कंपनीने टेंडर कोट केले त्यानंतर निश्चितप्रकारे पाहिजे तेवढा गॅस मिळाला नाही तरी त्याच्या 50 टक्के येत्या 8/15 दिवसात मिळाला तरी निश्चितप्रकारे उरण येथील प्रकल्पाच्या क्षमतेमध्ये 100 मे.वॅ.ने वाढ होईल. ही वाढ करीत असताना 6 रुपये 48 पै.इतका महाग गॅस उपलब्ध होईल. काही दिवसापूर्वी सभागृहामध्ये मागणी होत होती की, देशातून जेथून मिळेल तेथून वीज खरेदी करा. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, संपूर्ण देशामध्ये ट्रेडेबल पॉवर कुठल्याही राज्याने द्यावयाची असली तरी ती 1000 मे.वॅ.इतकी देण्याची क्षमता देशात कुठेच नाही. काय दर घ्यायचा असेल तो घेतला तरी पॉवर उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून स्वत:च राज्याने स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. तो प्रयत्न शासन करीत आहे. दाभोळ पॉवर कंपनीकडून वीज मिळू शकेल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेमध्ये भाग घेताना सांगितले की, शासन वारंवार परळी आणि पारस येथील पॉवरस्टेशनचा उल्लेख करते आहे प्रत्यक्षात यातून वीज केव्हा निर्माण होणार आहे ? मला वाटते माननीय विरोधी पक्षनेत्यांची याबाबतीत काही तरी गल्लत झालेली दिसते. शासनाने परळी-1 आणि पारस-1 या दोन युनिटचे काम सुरु केलेले आहे. परळी-1 आणि पारस-1 मधून 250 मे.वॅ.वीज उत्पादन सुरु झालेले आहे. परळी येथील प्रकल्पातून 1.11.2007 पासून आणि पारस येथील प्रकल्पामधून 10 मार्च 2008 पासून वीज निर्मिती सुरु झालेली आहे. आणखी एक 250 मे.वॅ. युनिटचे काम सुरु आहे. खापरखेडा येथे 500 मे.वॅ. आणि भुसावळ येथे 500 मे.वॅ.ची दोन युनिट या प्रकल्पाची कामे सुरु आहेत. महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असेल की ज्यांनी 500 मे.वॅ.वीज निर्मितीचे प्रकल्प सुरु केले. त्यानंतर 2000 मे.वॅ.वीज निर्मिती करण्याचे काम या राज्यामध्ये सुरु आहे. आजच्या चर्चेचा फायदा घेऊन मी सदनाला सांगू इच्छितो की, येत्या 5-6 वर्षात या राज्यामध्ये नवीन वीज निर्मिती किती होणार आहे आणि कधी होणार आहे याचे एक स्टेटमेंट तयार केले असून ते सदनाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

पटलावर मी ठेवू इच्छितो. परवा या चर्चेमध्ये भाग घेताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की, आमच्या हातात 2 वर्षे सत्ता द्या आम्ही विजेचा प्रश्न सोडवून टाकू.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असे म्हणालो की, आमच्या हातात सत्ता द्या 2 वर्षात आम्ही लोडशेडींग बंद करु.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, दोन वर्षे सत्ता हातात द्या. लोडशेडींग बंद करु असे सन्माननीय सदस्य म्हणाले. तर सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांनी स्टेटमेंट केले की, विधानसभेच्या निवडणुकानंतर दोन वर्षात आम्ही या राज्यातील विजेचा प्रश्न सोडवून टाकू. सभापती महोदय, मला कळत नाही की ही मंडळी आता असे का बोलायला लागली आहेत. सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, विजेची अतिरिक्त कॅपॅसिटी किती आहे यासंबंधी सरकारने रेकॉर्ड तयार केले असून ते मी सदनासमोर ठेवतो. मी आपल्याला कबूल केले आहे की, । राज्यामध्ये 7-8 वर्षात 1467 मे.वॅ. वीज ॲडीशनल कॅपॅसिटीमधून निर्माण करणार आहोत. गेल्या 5 वर्षात एक मे.वॅ. वीज निर्मिती सुध्दा झाली नाही असे आता कोणी म्हणू नये आणि मिडीयाने सुध्दा छापू नये. या राज्यामध्ये परळी आणि पारस या दोन प्रकल्पांमधून प्रत्येकी 250 मे.वॅ. वीज निर्माण केली. केंद्र सरकारचे प्रकल्प म्हणजे विंध्याचल येथून 169 मे.वॅ. खेरगांवमधून 146 मे.वॅ. आणि रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्टमधून 650 मे.वॅ. म्हणजे 967 अधिक 500 अशी एकूण 1467 मे.वॅ. वीज 2007-08 मध्ये या राज्याला मिळणार आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.......

आपल्याला या राज्यात 1891 मेगावॅट इतकी ॲडिशनल कपॅसिटी निर्माण होणार आहे. त्यात घाटघर प्रकल्पातून 250 मेगावॅट क्षमतेचा जो प्रकल्प आहे तो आता पूर्ण होणार आहे, उरण येथून 200 मेगावॅट ऊर्जानिर्मिती होणार असून त्यापैकी 100 मेगावॅट राज्याला मिळू शकेल. परवा सभागृहात केंद्रशासनाच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला होता. त्या अनुषंगाने मी असे स्पष्ट करु इच्छितो की, माननीय श्री. अनंत गिते हे केंद्रीय उर्जा मंत्री असतांना त्यांनी सन 2001 मध्ये आपल्या राज्याला सिपतमधून वीज देऊ केली होती, त्याबाबत नंतर काय झाले वगैरे हा भाग वेगळा. परंतु आम्ही त्यातून करेक्टीव्ह मेझर्स घेतल्या आणि सिपतमधून मिळणारी वीज या राज्याला आता आवश्यक आहे, असे ठरविले. त्या अनुषंगाने पुन्हा सन 2005 मध्ये आम्ही एनटीपीसीला लिहीले की, त्या काळात जरी राज्यशासनाने दाभोळची वीज असल्यामुळे या विजेची आमच्या राज्याला गरज नाही असे सांगितलेले असले तरी आम्हाला ती वीज आता पाहिजे आणि अशा प्रकारे आपल्या राज्याला तो वाटा मिळायला सुरुवात झालेली आहे. अशा प्रकारे सन 2008-09 मध्ये सिपतमधून 258 मेगावॅट, बहरमधून 33 मेगावॅट आणि आरजीपीपीएल मधून 900 मेगावॅट एवढी ॲडिशनल वीज आपल्याला मिळणार आहे. रत्नागिरीच्या दाभोळ प्रकल्पाच्या संदर्भात सभागृहात बरेच राजकारण झाले, निवडणुका सुध्दा त्याच मुद्यावर लढल्या गेल्या, शेवटी तो प्रकल्प अडचणीत आला, बंद पडला. परंतु या देशात माननीय मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्ता आली त्यावेळी आपल्या राज्यातील एवढा महत्वाचा जो एन्रॉन प्रकल्प बंद पडला आहे तो पुन्हा सुरु झाला पाहिजे यासाठी देश पातळीवर पहिला मंत्री गट माननीय प्रणव मुख्यर्जी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. त्यात माननीय श्री. शरदराव पवार, मा. श्री. सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. मुरली देवरा आणि माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण इ. मान्यवरांचा समावेश होता. यांच्या अनेक बैठका या दोन वर्षाच्या काळात झाल्या होत्या. त्यापूर्वी हा दाभोळचा प्रकल्प रिव्हायवल झाला, त्या प्रकल्पाच्या संदर्भात इंटरनॅशनल कोर्टात जो तंटा होता तो मिटविला आणि अशा प्रकारे हा रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लिमिटेड या नावाने भारतीय जनतेच्या मालकीचा आणि केंद्र व राज्यशासनाची इक्विटी असलेला प्रकल्प सुरु केला आणि त्यातून विजेची निर्मिती व्हायला लागली. आपल्याला माहीत आहे की, केंद्रसरकार आपल्या राज्याला मदत करते म्हणून

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

गुजरात आणि आपले यासंदर्भात भांडण झाले, कारण केंद्रशासनाने महाराष्ट्राला स्वस्त दरात गॅस उपलब्ध करुन देण्याबाबत मदत करण्याची भूमिका घेतली. कारण एवढा मोठा प्रकल्प चालवावयाचा असेल तर केंद्राने काही ना काही तरी मदत दिली पाहिजे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या घेतलेल्या भूमिकेतून दाभोळचा प्रकल्प सुरु झाला. अजून या प्रकल्पाचा तिसरा टप्पा सुरु झालेला नसला तरी मे महिन्याच्या आसपास हा टप्पा देखील सुरु होईल, आणि त्यातून काही वीज आपल्याला मिळेल. त्यानंतर परळी आणि पारस येथील टप्पा क्र. 2 ची कामे सुरु झाली आहेत, खापरखेडा येथे 500 मेगावॅट आणि भुसावळ येथे 500 मेगावॅटची दोन प्रकल्पांची कामे सुरु झालेली आहेत. ही कामे प्रत्यक्षात सुरु झाली आहेत, कारण यासाठी लागणारा निधी, मंत्रिमंडळाची मान्यता, पर्यावरणाकडून क्लिअरन्स वगैरे संपूर्ण प्रोसिजर पूर्ण झाल्या आहेत, म्हणूनच मी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याचे सांगितले. अशा प्रकारे याराज्यात वीज निर्मितीच्या संदर्भात शासनाने कॉंक्रीट स्टेप्स घेतलेल्या आहेत. हे स्टेटमेंट मी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे तसे प्रेसला सुध्दा देणार आहे. पुढील काही वर्षात या राज्यात पंचवार्षिक योजनांप्रमाणे बोलावयाचे म्हटले तर सन 2011-2012 पर्यंत बोलावे लागणार आहे. पंचवार्षिक योजनेनंतर सुध्दा ॲडिशनल कॅपॅसिटी निर्माण झालेली आहे. त्यानुसार सन 2007-08 मध्ये 1467 मेगावॅट, सन 2008-09 मध्ये 1891 मेगावॅट, सन 2009-2010 मध्ये 3365 मेगावॅट, सन 2011-2012 मध्ये 3131 मेगावॅट, सन 2012-2013 मध्ये 2767 मेगावॅट, सन 2013-201 मध्ये 6400 मेगावॅट अशी एकूण खाजगी क्षेत्र, केंद्रसरकार आणि राज्य यांची मिळून सर्व क्षेत्रातून जवळपास 21924 एवढी अतिरिक्त वीज निर्माण होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ 16:55

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

या राज्याच्या विजेच्या संदर्भात फोरकास्ट पाहिले तर सन 2012-13 मध्ये 25 हजार मे.वॅ. पीक लोड मुंबई आणि महाराष्ट्रात असण्याची शक्यता आहे. यातून मार्ग काढण्याच्या संदर्भातील उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी केला आहे. सन 2012-13 मध्ये विजेच्या बाबतीत महाराष्ट्र चांगल्या परिस्थितीत असू शकेल कदाचित महाराष्ट्र राज्य विजेच्या बाबतीत सरप्लस देखील असू शकेल. कारण या राज्यात वाढणारी विजेची मागणी, येणारे उद्योगधंदे, राज्यात होत असलेली गुंतवणूक यासंदर्भात विचार करुन आपल्याला पुढे जावे लागणार आहे. विजेच्या संदर्भात आपण अनेक उपाययोजना करीत आहोत. परंतु या सगळया उपाययोजना करीत असतांना आम्हाला कल्पना आहे की, आमच्या वर्कींगमध्ये, आमच्या मानसिकतेमध्ये थोडसे बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणच्या लोकांच्या मनामध्ये विजेच्या संदर्भात नाराजी आहे ती नाराजी आम्हाला दूर करावी लागणार आहे. आपल्याला एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, 2003 चा कायदा आल्या नंतर महावितरण कंपनीचे विजेचे दर ठरविण्याचा अधिकार मला मंत्री म्हणून सुध्दा राहिलेला नाही. आपण रेग्युलेटरी कमिशनची निर्मिती केली परंतु या पुढील काळामध्ये वर्षाचे उत्पन्न आणि खर्च एमईआरसी पुढे सादर करावा लागतो. मग त्या ठिकाणी हिअरींग घेतले जाते. आपणच नाही तर सामान्यातल्या सामान्य माणसाला त्या ठिकाणी जाऊन आपली बाजू मांडता येते मग त्यानंतर विजेचे दर ठरविले जातात. लोकांना सवलत द्यावयाची असेल तर त्यासंदर्भात राज्यसरकारला निर्णय घ्यावा लागतो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी मोफत विजेच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मोफत विजेच्या संदर्भात त्यावेळेस शासनाने कदाचित निर्णय घेतला असेल पण या राज्यामध्ये लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर शेतक-यासाठी 2100 रुपये प्रती हॉर्स पॉवर या प्रमाणे वीज बील भरावयाचे असतांना सुध्दा शेतक-याकडून 700 रुपये प्रती हॉर्स-पॉवर प्रमाणे पैसे घेतले जात आहे. यामुळे राज्याच्या तिजोरीमधून गेल्या 5-6 वर्षापासून शेतक-यासाठी प्रती हॉर्स-पॉवर 1400 रुपये शासन भरत आहे. गेल्या 5-6 वर्षामध्ये राज्य शासनाच्या तिजोरीतून 6.5 हजार कोटी रुपये शेतक-यांसाठी शासनाने भरलेले आहेत. शेतक-यांना आपण 100 टक्के वीज माफी देऊ शकलो नसलो तरी 2/3 वाटा राज्यसरकारने उचलला आहे. मग

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

यामध्ये अतिवृष्टी असू दे किंवा दुष्काळ असू दे किंवा कोणतीही परिस्थिती असू दे. या सर्व परिस्थितीतून शेतक-यांसाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे आणि यापुढील कालावधीत सुध्दा आपल्याला अशाच प्रकारचे प्रयत्न करावे लागणार आहेत.

सभापती महोदय, एका बाजूला राज्यामध्ये वीज पाहिजे असे म्हणतो परंतु दुस-या बाजूला आपणच मला प्रश्न विचारणार की, आपण इतके एमओयु केले होते त्या प्रकल्पांचे काय झाले? रत्नागिरीमध्ये एमओयु मध्ये जिंदालचा प्रकल्प आला आहे, एमओयु मध्ये नसलेला विदर्भातील अदानी ग्रुपचा प्रकल्प असेल, केएसके चा प्रकल्प असेल, एम्कोचा प्रकल्प असेल. जे प्रकल्प एमओयु मध्ये नव्हते ते प्रकल्प एमओयु मध्ये आल्यानंतर रिलायन्स आणि टाटाच्या माध्यमातून किंवा अन्य प्रकल्पाच्या माध्यमातून वीज निर्मितीच्या संदर्भात केंद्र सरकारने 4 प्रकल्प जाहीर केले आहेत. 400 मे.वॅ. चा प्रकल्प गुजरात मध्ये उभा राहतो आहे. या प्रकल्पासाठी गुजरात सरकारने जागा सुध्दा दिलेली आहे तसेच बाकीच्या राज्यामध्ये सुध्दा जागा दिली गेली. एका बाजूला सभागृहात विजेच्या संदर्भात चिंता व्यक्त करतो आणि दुस-या बाजूला कोकणामध्ये रिलायन्स प्रकल्पाला, टाटा प्रकल्पाला, केंद्रसरकारच्या येणा-या प्रकल्पाला विरोध करण्याचे काम सगळे राजकीय पक्ष रस्त्यावर उतरुन करीत आहोत. या ठिकाणी मला राजकीय भूमिका अजिबात मांडावयाची नाही. परंतु एका बाजूला विदर्भामध्ये येणारे सगळे प्रकल्प, त्या परिसरामध्ये असणारा कोळसा आणि जेव्हा फयूअलच्या संदर्भात जेव्हा अडचणी निर्माण होतील तेव्हा आपल्याला आयात केलेला कोल किंवा गॅस या शिवाय दुसरा पर्याय आपल्या समोर नाही. आयात केलेल्या कोलवरील प्रकल्प करावयाचे असतील तर आपल्याला ते समुद्र किनारीच घ्यावे लागतील. कोकणातील आंबे नष्ट झाले पाहिजेत, कोकणातील सृष्टी सौंदर्य नष्ट झाले पाहिजे अशी, भूमिका आमच्या कोणाच्याही मनात नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ...

त्या ठिकाणी जे काही प्रकल्प येणार आहेत त्या बाबतीत आपले राजकीय अभिनिवेष बाजूला ठेवले पाहिजेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कृषि महाविद्यालयाच्या माध्यमातून यासबंधीची तपासणी केली आणि त्यातून जर नागरिकांचे समाधान करण्यात आले तर अधिक बरे होईल, मला त्याबाबतीत त्यांना असे सांगावयाचे आहे की, " नागरिकांचे समाधान करीत असतांना, लोकांचे समाधान करीत असतांना सभागृहात बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी तरी एका सुरात बोलले पाहिजे. आत मध्ये एक भूमिका मांडावयाची आणि बाहेर गेल्यानंतर दुसरी भूमिका मांडावयाची ही गोष्ट बरोबर नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील या ठिकाणी उपस्थित नाहीत. परंतु रायगड जिल्हयामध्ये येणा-या प्रकल्पाच्या संदर्भात मदत करण्याची भूमिका जर त्यांनी घेतली तर हया प्रकल्पाची प्रगती होईल अशी माझी खात्री आहे. परंतु आज श्रीमती मेधा पाटकर यांच्या सारखे अनेक लोक येतात आणि प्रश्न मांडत असतात. राज्यामध्ये एस.ई.झेड येत आहेत, धरणे बांधली जात आहेत ,नवीन उद्योग येत आहेत, नागरीकरण वाढत आहे. या सर्व गोष्टींना वीज लागणार असून ती पुरविण्याच्या बाबतीत राज्य सरकारने भूमिका घेतलेली आहे. केन्द्रच्या माध्यमातून येणारी वीज आणि राज्याच्या माध्यमातून येणारी वीज या सगळया विजेच्या संदर्भात निश्चितपणे उद्याच्या काळात या राज्यात चांगल्या प्रकारची कामगिरी आपल्याला करुन दाखवावयाची आहे. या प्रस्तावावर अधिक बोलून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु जे प्रश्न या सभागृहात उपस्थित करण्यात आलेले आहेत त्याबाबतीत थोडक्यात खुलासा करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की विजेच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढण्यात आली पाहिजे तसेच नागरिकांची सनद दिली पाहिजे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, श्वेतपत्रिका काढली असून नागरिकांच्या सनदेची प्रत मी आपल्याला अगोदर दिलेली आहेच. अन्य सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता ती प्रत पुन्हा एकदा देण्यात येईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, नागरिकांचे हक्क, कर्तव्य आणि अधिकाराच्या संदर्भात नागरिकांच्या सनदेमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. या राज्यामध्ये कंझ्युमर्स ग्रिव्हन्सेस रिड्रेसल फोरम स्थापन करण्यात आला असून अकरा झोनमध्ये या फोरमच्या मार्फत काम केलेले जात आहे नागरिकांच्या ज्या तक्रारी आहेत त्या तक्रारी सोडविण्याच्या संदर्भात प्रोव्हिजन उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ...

सभापती महोदय, दाभोळची वीज महागडया दराने मिळेल अशा प्रकारची चिंता करण्याचे काहीही कारण नाही. दाभोळ प्रकल्पाला लागणारा गॅस उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत आपण निश्चितपणे प्रयत्न केलेला आहे. मागच्या वेळी गॅसच्या संदर्भात अडचण आली होती. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी विनंती केली होती की, गुजराथ सरकार बरोबर बोलून महाराष्ट्राच्या बाबतीत सामंजस्याची भूमिका घेण्याच्या बाबतीत मदत करण्याची भूमिका आपण घ्यावी त्यानुसार त्यांनी देखील मदत करण्याची भूमिका घेतली होती.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. ट्रान्समिशन कंपनीच्या माध्यमातून या राज्यामध्ये काही कार्यक्रम हातामध्ये घेतलेले आहेत .मी आपल्याला सांगू इच्छितो की, 132 आणि 220 के.व्ही.ची सब स्टेशन्स आहेत त्यामध्ये 2006-2007 मध्ये नवीन 25 सब स्टेशन्सची कॅपेसिटी ॲडिशन केलेली आहे आणि 2007-2008 मध्ये 14 सब स्टेशन्सची कॅपेसिटी ॲडिशन केलेली आहे. त्याचबरोबर एच.व्ही. लाईन्स जवळपास 599 आणि 660 किलोमिटर्स आणि ट्रान्समिशन कॅपेसिटी वाढविण्याच्या बाबतीत 1954 आणि 3817 एम.व्ही.ए.इतकी कॅपेसिटी वाढविण्याचे काम आपण केलेले आहे.चार पाच वर्षाच्या कालावधीमध्ये आणखी 130 नवीन सब स्टेशन्स उभारण्याच्या संदर्भात आपण कार्यक्रम तयार केलेला आहे. मी उर्जा मंत्री असेल अथवा नसेल परंतु जो कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे त्याला ब्लु प्रिन्ट म्हटले तरी चालेल. आपण जो काही कार्यक्रम तयार केलेला आहे तो जसाच्या तसा या राज्यात अंमलात आणला जाईल त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. या कार्यक्रमानुसार 130 नवीन सब स्टेशन्स तयार करण्यात येणार असून 18, 513 किलोमिटर्स सर्किट किलोव्हेट एच.व्ही. लाईन, 20,912 एम.व्ही.ए.चे नवीन सब स्टेशनच्या अपग्रेडेशनच्या माध्यमातून ॲडिशनल ट्रान्सफारमर्स आणि ट्रान्सफारमर्स ऑगमेन्टेशनच्या माध्यमातून ट्रान्समिशनच्या क्षेत्रात मोठे काम आपण हातामध्ये घेतलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मला त्याना असे सांगावयाचे आहे की, ही सर्व कामे पूर्ण करण्यासाठी अजून थोडासा कालावधी लागेल हे मला माहीत आहे परंतु या राज्यामध्ये फिडर सेपरेशन आणि सिंगल फेजिंगचा कार्यक्रम डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यापर्यंत पूर्ण झाल्यानंतर भार नियमनाच्या बाबतीत महाराष्ट्रात जी तीव्रता होती ती तीव्रता तितकीशी राहणार नाही. या दृष्टीकोनातूनसुध्दा शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ...

निश्चितपणे प्रयत्न करीत आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी एक मुद्दा मांडला होता परंतु त्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल आला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु ए.पी.डी.आर.पी.च्या अंतर्गत रत्नागिरीसाठी ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

25 कोटी रूपये आले आणि ते व्यवस्थितपणे खर्च झाले नाहीत, त्यात कमी-जास्तपणा झाला असेल तर त्या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. त्यामध्ये संपूर्ण चौकशी करून संबंधित दोषींविरूद्ध कारवाई करून आपल्याला ती अवगत केली जाईल आणि यातून मार्ग काढला जाईल. सभापती महोदय, मला वाटते विजेच्या प्रश्नाविषयी आणखी कोणाचे काही प्रश्न राहिले असतील तर त्यावर उत्तर देण्यास मी तयार आहे. परंतु या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेता आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी अतिशय चांगल्या दर्जाची चर्चा घडवून आणली आहे, अतिशय उंचीची चर्चा कदाचित आणखी थोडा वेळ यासाठी मिळाला असता तर आणखीही चांगल्या सूचनांच्या माध्यमातून मला शिकायला मिळाले असते. अशा चर्चांच्या माध्यमातूनच माझ्या सारख्याला काही इन्पुटस् मिळत असतात आणि मला सुधारणा करण्यास शक्ती मिळत असते. आपण सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आपणा सगळ्यांचे आभार मानतो आणि या राज्याला अडचणीच्या परिस्थितीतून मी बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही असा निर्धार व्यक्त करून आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

***

...... 3ओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी आमच्या प्रस्तावावर दिलेले उत्तर अत्यंत लक्षपूर्वक ऐकले. तसे पाहिले तर दर अधिवेशनामध्ये वीज मंडळाच्या संबंधात चर्चा येथे उपस्थित केली जाते आणि ही चर्चा काही आम्ही जाणीवपूर्वक उपस्थित करीत नाही. राज्यात जसजशी विजेची टंचाई निर्माण होत आहे आणि राज्यातील सर्व सामान्य माणूस त्या टंचाईत होरपळून निघतो आहे त्याचे वस्तुनिष्ठ दिग्दर्शन येथे झ ाले पाहिजे या हेतूनेच आम्ही या चर्चा उपस्थित करीत असतो. आम्ही येथे टीकेसाठी टीका करण्यासाठी बसलो नाही आणि माझा स्वभावही मी टीका करावी अशातील नाही हेही माननीय मंत्री महोदयांनी समजून असावे. सभापती महोदय, आम्ही ग्रामीण भागातून येतो. आज ग्रामीण भागामध्ये विजेची जी स्थिती आहे ती आम्ही येथे मांडली नाही आणि सरकारच्या नजरेस ते चित्र आणले नाही तर आमच्याही दृष्टीने ते योग्य होत नाही. म्हणून ही चर्चा येथे आम्ही उपस्थित केली. या चर्चेत भाग घेऊन अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार चांगल्या पद्धतीने मांडताना काही चांगल्या सूचनाही केल्या आहेत. सभापती महोदय, हे कोणीही नाकारीत नाही की, महाराष्ट्रातच केवळ ही वीज टंचाई आहे असे नाही तर देशातील प्रत्येक राज्यात विजेची टंचाई आहे आणि हे सगळ्यांनीच मान्य केले आहे, मी देखील माझ्या भाषणात मान्य करून गुजरातचे उदाहरण येथे सांगितले. परंतु आपण एका वीज मंडळाच्या तीन कंपन्या करूनही आपल्याकडे आहे त्या विजेचे नीट नियोजन राज्यात होत नाही.. खरे म्हणजे हाच या चर्चेचा मूळ हेतू होता. असलेल्या विजेचे योग्य नियोजन झाले असते, वेगळे फिडरचे, सिंगल फेजिंगच्या बाबतीत हा कार्यक्रम अधिक गतीने या तीन कंपन्यांच्या माध्यमातून सुरू केला असता तर किमान शेतकऱ्याला तरी या लोड शेडींगमधून दिलासा मिळाला असता. परंतु आपल्या राज्यात नेमके तेच होऊ शकले नाही त्यामुळे आपल्या राज्यात अनेक ठिकाणी अशी स्थिती आहेकी, रात्री 11 वाजता वीज घ्यावी लागते. दिवसभर मात्र वीज नसते. ही स्थिती दुरूस्त करण्याच्या बाबतीत मी विनंती केली होती. सभापती महोदय, कॅपॅसिटर्सच्या बाबतीत देखील मी एक प्रश्न 24 तारखेला विचारला होता. त्याचे उत्तर आपण या ठिकाणी असे दिले होते की, एसएन इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने 34,999 कॅपॅसिटर्सचा पुरवठा केला असता त्यातील 29629 कॅपॅसिटर्स नादुरूस्त वा बंद असल्याचे आढळून आले. ही आपली स्थिती आहे हे मान्य करणार आहात की नाही ? आम्ही जे कॅपॅसिटर्स खरेदी केले त्यातील

...... 3ओ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 17:05

श्री.फुंडकर ....

29629 कपॅसिटर्स नादुरूस्त वा बंद स्थितीत आढळून आले आणि या सदोष कंपनीला आपण दंड काय केला ....

( यानंतर सौ.रणदिवे .... 3पी 1 ..

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

त्याच्या त्रैमासिकाच्या 8.14 कोटी रुपयांच्या देयकापैकी 5.45 कोटी रुपये अदा करण्यात आले आणि बाकीची रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे. ही रक्कम रोखून ठेवण्याबाबतची कार्यवाही झाली हे खरे आहे काय ? ज्या कंपनीने, कंपनीच्या ज्या लोकांनी चूक केली आहे, त्याबाबतीत त्यांची केवळ रक्कम रोखून ठेवणे एवढी शिक्षा पुरेशी नाही. कारण ते शासनाला बदनाम करीत आहेत. शेतकऱ्यांना अडचणीमध्ये आणत आहेत. खरे म्हणजे असे जे गुन्हेगार आहेत. मेलेल्या लोकांच्या टाळूवरील लोणी खाणारी ही जी माणसे आहेत. त्या लोकांनी सरकारला अडचणीमध्ये आणण्यामध्ये सुध्दा मागे-पुढे पाहिलेले नाही. या राज्यामध्ये अशा लोकांना तुरुंगामध्ये टाकण्याच्या बाबतीत कारवाई का होत नाही ? असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी डिसेंबरमधील हिवाळी अधिवेशनामध्ये ट्रान्सफॉर्मरच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. सदोष ट्रान्सफॉर्मर खरेदी केले आणि आपण ते मान्य देखील केले आहे. याठिकाणी या कंपन्यांची नावेही सांगितली होती. 1) विजयलक्ष्मी इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि.नागपूर 2) रामकृष्ण इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि.,नागपूर 3) स्टार डेल्टा, ट्रान्सफॉर्मर, भोपाळ 4) भोपाळ वायर्स् प्रा.लि.भोपाळ 5) राजस्थान ट्रान्सफॉर्मर्स् ॲण्ड स्वीच गिअर्स, जयपूर 6) फेअर डिल इलेक्ट्रीकल्स् ॲण्ड इंजिनिअर्स्, नाशिक. याबाबतीत आपण उत्तर देताना सांगितले आहे की, या कंपन्यांकडून 83.80 लाख रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. 40 टक्के ट्रान्सफॉर्मर हे सदोष आहेत. माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटीलसाहेबांना मी विचारु इच्छितो की, आज शेतकरी अडचणीमध्ये का आहे ? कारण ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर आपल्या वीज मंडळाचे अधिकारी त्या शेतकऱ्याकडे 50-50 हजार रुपयांची मागणी करतात. एकदा ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर दोन-दोन महिने दुसरा ट्रान्सफॉर्मर बसविला जात नाही. जर नवीन ट्रान्सफॉर्मर बसविला तर तो पुन्हा 15 दिवसामध्ये जळून जातो. हे सदोष ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर ते 15 दिवसांनी जळाले तर प्रत्येक वेळी 15-15 दिवसांनी त्या शेतकऱ्यांनी 50-50 हजार रुपये कुठून आणावयाचे ? माननीय श्री.दिलीप वळसे-पाटीलसाहेब, वीज वितरण कंपनी किंवा वीज विभाग कशामुळे बदनाम होत आहे? तर खरे म्हणजे यामुळेच वीज खाते बदनाम होत आहे. हे दुरुस्त करण्याची गरज आहे. आम्हाला हे मान्य आहे की, आज राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे आणि यामध्ये सुधारणा व्हावी यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात हे मानणाऱ्यांपैकी मी देखील एक आहे. मी

. . . .3 पी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

माझ्या सुरुवातीच्या भाषणामध्ये सांगितले होते की, पारस येथील वीज केंद्र बंद आहे. पण मी असे का सांगितले तर मी 10 मार्च पूर्वी पारस येथे गेलो होतो. तेव्हा ते केंद्र सुरु झालेले नव्हते. म्हणून मी त्यावेळी असे वक्तव्य केले होते की, अजूनही पारस येथील केंद्र सुरु झालेले नाही. माझ्या गावापासून पारस 20 कि.मी.अंतरावर आहे. पण मघाशी आपण उत्तराच्या भाषणाच्या वेळी सांगितले की, 10 मार्चपासून पारस येथील पहिल्या टप्प्याची वीज सुरु झाली. परळी येथे देखील पहिल्या टप्प्याची सुरु झाली आहे. आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात. विजेच्या टंचाईच्या बाबतीत मी सगळे पाप आपल्या डोक्यावर टाकू इच्छित नाही. खरे म्हणजे तुम्ही आमच्या विदर्भाचे जावई आहात आणि जावई प्रामाणिक असला पाहिजे. जावयाने प्रामाणिकपणे उत्तर दिले पाहिजे आणि जी वस्तुस्थिती आहे, ती सर्वांसमोर मांडली पाहिजे अशी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे. या अपेक्षेनुसार प्रामाणिकपणे राज्यामध्ये विजेच्या बाबतीत जी परिस्थिती आहे, ती आपण सांगितली. पण जे सांगितले, जे ठरविले आहे त्याप्रमाणे घडले पाहिजे. मघाशी याठिकाणी सांगितले की, केंद्र शासनाने सांगितल्याप्रमाणे राज्यांनी चार प्रकल्प सुरु केले. पण तुम्ही कोकणवासियांवर आरोप केला की, कोकणवासीय जागा देत नाहीत म्हणून तेथे समुद्रकिनारी प्रकल्प सुरु झालेला नाही. मी गुजराथ येथील मुंद्र्याचा प्रकल्प पाहिलेला आहे. त्याठिकाणी गुजराथ सरकारने संबंधित लोकांना जागा दिली आणि तेथे 4 हजार मे.वॅ.चा मोठा वीज प्रकल्प सुरु झाला आहे. हे खरे आहे की, कोकणामध्ये जागा उपलब्ध झाली नाही म्हणून आपण तेथे प्रकल्प सुरु करु शकला नाहीत. पण ज्या प्रकल्पांच्या बाबतीत करार झालेले आहेत, सर्व कागदपत्रे पूर्ण झालेले असून त्याबाबतीत कोणतीही अडचण शिल्लक राहिलेली नाही अशा प्रकल्पांच्या कामांना ताबडतोब गती देण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. ज्या अडचणी येतील त्या दूर केल्या पाहिजेत. तसेच शेतकऱ्यांच्या बाबतीत विजेचे नीट नियोजन करुन, शेतकऱ्यांसाठी वेगळे फीडर आणि सिंगल फेज योजना याला अधिक गती देऊन सक्षमपणे काम झाले तर मला असे वाटते की, काही दिवसामध्ये विजेचा प्रश्न निश्चितपणे दूर होऊ शकतो. पण प्रामाणिकता आणि वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांची लोकांशी जी वागणूक आहे, ती देखील सौजन्याची, चांगली असली पाहिजे. तसे झाले नाही तर सातेगावच्या शेतकऱ्यांप्रमाणे अनेक शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतील असा मी आपल्याला काल इशारा दिला आहे. तसेच आणखी एक मुद्दा असा आहे की, जे विजेचे बिल आकारले जाते, त्यापेक्षा जास्त दंड आकारला जातो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

विजेचे बिल 2 हजार रुपये असताना दंड 4 हजार रुपये आकारण्यात आलेला आहे. हे कोणते गणित आहे ते मला तर काही समजत नाही. जेवढे बिल असेल त्याच्या किमान प्रमाणात दंड आकारला गेला पाहिजे. असे झाले नाही तर शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतील. या करिता शासन काही उपाययोजना करणार आहे की नाही ? धनगरांच्या वाडया व पाडया या साठी किती खर्च शासन करणार आहे असा प्रश्न मधाशी येथे विचारण्यात आला होता. या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे एवढी विनंती मी या ठिकाणी करतो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उल्लेख केला आहे की, कोकणामध्ये अनेक नवीन प्रकल्प येऊ घातलेले आहेत परंतु कोकणातील जनतेची मानसिकता या प्रकल्पांना विरोध करण्याचीच असते असे वक्तव्य माननीय मंत्री महोदयांनी केले आहे. या संदर्भात मी त्यांना उदाहरण देऊ इच्छितो की, एन्रॉन प्रकल्प कोकणात आला त्यावेळी हा प्रकल्प येऊ नये याकरिता प्रयत्न करण्यात आले होते. परंतु त्या वेळी जे प्रश्न जनतेकडून उपस्थित करण्यात आले होते त्यांची उत्तरे त्यांना मिळाल्यामुळे त्यांनी विरोध मागे घेतला होता. या कंपनीमुळे आंब्याच्या पिकावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही. मत्स्य शेतीवर काहीही दुष्परिणाम होणार नाही या बाबी जनतेला पटवून दिल्यामुळे त्यांनी विरोध मागे घेतला आहे. यामुळेच हा प्रकल्प आज तेथे उभा राहू शकला आहे. सन्माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, नवीन सुरु होणाऱ्या प्रकल्पाच्या संदर्भात शासनाचे अधिकारी जनतेला योग्य माहिती देत नाहीत. त्यामुळे गावामध्ये अफवा निर्माण होतात व गावातील सर्व लोक एकत्र येऊन आंदोलन करतात. रत्नागिरी जिल्हयातील एका घटनेचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी या ठिकाणी केलेला आहे. तेथे मोठया प्रमाणात आंदोलन करण्यात आले होते. त्यामुळे जनतेला अधिकाऱ्यांच्या माध्यमातून लोकशिक्षण दिले गेले पाहिजे. मग तेथील स्थानिक जनता अशा प्रकल्पांना विरोध करणार नाही.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपला प्रश्न विचारावा. आताच माननीय मंत्री महोदयांनी या विषया संदर्भात सविस्तर उत्तर दिलेले आहे.

2

अ सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना दोनच प्रश्न विचारु इच्छितो. वीज चोरीसंदर्भात विचारु इच्छितो की, एक टक्का म्हणजे किती कोटीचे नुकसान शासनास होते याची कृपया मंत्री महोदयांनी माहिती द्यावी तसेच फयुएल एडजस्टमेंट मधील चोरीचा आर्थिक बोला हा सर्वसामान्य नागरिकांवर का लादण्यात येत आहे ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, चोरी व गळती यामुळे होणारे नुकसान सर्वसामान्य शेतकरी व जनतेवर का लादण्यात येत आहे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा तसेच आज महाराष्ट्र राज्यावर दीड लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे त्यापैकी किती कोटी वीज मंडळाच्या वाटयाला आलेले आहे याची माहिती द्यावी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शोरुम मध्ये प्रचंड प्रमाणात वीज वापरली जात असते. त्यामुळे अशा शोरुम मधील रात्री 12 नंतर चालू असणारे दिवे बंद केले जाणार आहे काय ?

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, टेक्निशियन नसल्यामुळे व पूर्वीच्या कर्मचाऱ्यांनी निवृत्ती घेतल्यामुळे, वीज पुरवठयामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. नवीन भरती केली जात नाही या संदर्भात माननीय मंत्री महोदय काही उपाययोजना करणार आहेत काय ?

श्री. सुरेश देखमुख : सभापती महोदय, परभणी जिल्हयामध्ये 70 कोटी रुपये अनुशेषामधून प्राप्त झालेले आहेत. त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी एक बैठक घेतली होती. चीफ इंजिनियर, अधीक्षक इंजिनीयर यांना माननीय मंत्री महोदयांनी सूचना दिल्या होत्या. या अधिकाऱ्यांना निलंबित का करु नये यावर चर्चा करण्यात आली होती. या बैठकीचे मिनिटस देखील आहेत. निधी शिल्लक असून देखील खर्च केला जात नाही, अशा अधिका-यांवर ताबडतोबीने कारवाई शासनाकडून करण्यात येणार आहे काय एवढेच मी या ठिकाणी विचारु इच्छितो.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जामा : सभापति महोदय, एन.टी.पी.सी. का एक हजार मेगावाट का प्रोजक्ट मौदा में आने वाला है. इसके लिए लँड एक्वीजीशन का काम चालू है. मेरा प्रश्न यह है कि सरकार इस प्रोजक्ट को आगे बढ़ाने के लिए क्या कर रही है ?

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मुलुंड, भांडूप, कांजूरमार्ग या ठिकाणी लोडशेडींग बंद होणार आहे काय आणि त्यादृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली आहे ?

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, भारनियमनाच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. माझा प्रश्न विद्यार्थ्यांच्या संदर्भात आहे. सभापती महोदय, आपणही निर्देश दिले होते. शेवटी हे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले. आता न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, किमान पुढच्या वर्षामध्ये अंधारात परीक्षा होऊ नये. यासंदर्भात शासन पुढच्या वर्षी काय उपाययोजना करणार आहे ?

**उपसभापती** : अंधारात परीक्षा होऊ नये म्हणून सायंकाळी 7.00 नंतर परीक्षा घेणार नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण जे निर्देश दिले होते त्याचे काय झाले ? आपल्या निर्देशला कोणती केराची टोपली दाखवली ?

**उपसभापती** : त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, जे जमत नाही ते लोक करत नाहीत. लोक पहिल्या सारख्या चोऱ्या करीत नाहीत. कृषी संजीवनीमध्ये जे लोक शिल्लक राहिले आहेत त्यांना सुविधा द्यावी. ज्या कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले त्यांना बक्षीस द्यावे आणि ज्यांनी वाईट काम केले त्यांना शिक्षा द्यावी. पारस आणि परळी येथे 250 मेगावॅटची क्षमता आहे परंतु ते पूर्ण क्षमतेने चालत नाहीत. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, वाड्या आणि वस्त्यांसाठी 716 कोटी रुपयांची योजना केंद्र शासनाने मंजूर केली आहे. या धनगर आणि विमुक्तांच्या ज्या वाड्या-वस्त्या आहेत त्यासाठी एकंदर किती निधी प्रस्तावित आहे आणि जो शिल्लक राहिलेला निधी आहे त्याबाबतीत शासन काय करणार ?

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जे प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आले त्यामध्ये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एशियन कंपनीच्या संदर्भात कॅपॅसिटर्सच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला. या कंपनीवर फौजदारी स्वरुपाची कारवाई केलेली आहे आणि त्यांचे बिल रोखून ठेवण्याच्या संदर्भात प्रयत्न केलेला आहे. ट्रान्सफार्मरच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, विजेच्या क्षेत्रात संपूर्ण देशामध्ये अशी परिस्थिती आहे. मोठ्या ट्रान्सफार्मच्या बाबतीत एक ते दीड वर्ष ऑर्डर मिळण्यासाठी लागतात. पण 63 केव्हीए आणि 100 केव्हीएचे ट्रान्सफार्मर्स जास्तीत जास्त उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात प्रयत्न करीत आहोत. जे फेल झालेले ट्रान्सफार्मर्स असतील ते दुरुस्त करण्याच्या संदर्भात मुख्य अभियंत्यांच्या पातळीवर, अधीक्षक अभियंत्यांच्या पातळीवर टेंडर काढून एजन्सीव्दारे दुरुस्ती चालू असते. त्यामध्ये कोणत्याही कर्मचाऱ्याने 50 हजार रुपये मागावेत आणि कोणीही ते द्यावेत अशी अपेक्षा नाही. दूरदर्शनवर जाहिरात करुन आमचा कोणताही कर्मचारी लाच मागत असेल किंवा घेत असेल तर अमुक अमुक नंबरवर कळवावे अशी जाहिरात करणारी कदाचित महावितरण कंपनी पहिलीच कंपनी असेल. त्यामध्ये सुध्दा अधिकाधिक सुधारणा करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा प्रश्न विचारण्याचा रोख असा होता की, शेतकऱ्याच्या शेतावरील वीज पुरवठा ज्या ट्रान्सफार्मरवरुन असतो तो ट्रान्सफार्मर जळाल्यानंतर 15 दिवसाच्या आत नवीन ट्रान्सफार्मर त्या ठिकाणी बसवला जाईल का ? जे अधिकारी तो ट्रान्सफार्मर बसवून देणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : आपल्याला असा नियम करता येईल की, ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर तो 15 दिवसात बदलून देता आला पाहिजे. परंतु उपलब्धी हा एक प्रश्न असतो. पण त्यामध्ये नक्की मेकॅनिझम करुन आणि 15 दिवसात तो बदलून दिला नाही तर तो का दिला नाही त्यासंबंधी संबंधित अधिका-यांना विचारले जाईल. त्यात जर का त्यांनी काम चुकारपणा केला असेल तर त्या अधिका-याविरुध्द कारवाई केली जाईल. जेथे अडचण असेल त्याचा निर्णय एम.डी.स्तरावर घेतला जाईल, त्याच्या खालच्या स्तरावर घेतला जाणार नाही. हे अल्ट्रा मेगा प्रोजेक्टस् आहेत. कोकणातील जनतेला तसेच ठेवण्याचा शासनाचे प्रयत्न नाहीत. परंतु एवढया मोठया प्रमाणावर राज्यात गुंतवणूक येणार आहे त्यासंबंधी माझे असे म्हणणे होते की, लोकांच्या मनामध्ये वेगवेगळे विचार असतील, त्यावेळी राजकीय पक्षाच्या प्रमुख नेते मंडळींनी एक सुरात बोलले पाहिजे. शेवटी राज्याची ही गरज आहे. त्या प्रकल्पासाठी लागणारी जागा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने निर्णय घेणे गरजेचे आहे. बिल, दंड आणि व्याज याचे प्रमाण जास्त आहे असे माझ्या सारख्याच्या मनात प्रश्न होता. त्यासाठी एमइआरसीने सूत्र ठरविले आहे. त्यामध्ये बदल करुन बाजारात स्वस्त वीज निर्माण होते त्यामुळे दंडाची रक्कम 14 टक्के वा 18 टक्के असता कामा नये. त्याऐवजी किफायतशीर दंडाची रक्कम लावली पाहिजे, यासंबंधी सूचना दिल्या जातील.

सन्माननीय सदस्य डॉ.सावंत यांनी रात्रीच्या दिव्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. मुंबई व पुणे यासारख्या शहराला टाटा वीज कंपनी वीज पुरवठा करते. त्यावेळी रेग्यूलरेटरी म्हणून शासनाचा रोल होता. तो अधिकार आता वीज नियामक आयोगाकडे दिलेला आहे. आता शासनाकडे जो अधिकार आहे तो एनर्जी कॉन्झर्व्हेशन ॲक्टनुसार मिळाला आहे. त्या कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी मेडाला नेमले होते. परंतु मागील 1-2 वर्षात मेडाकडून फारसे काम झ ाालेले नाही म्हणून मेडाची एजन्सी रद्द करुन महावितरण कंपनीला एजन्सी म्हणून नेमले आहे. त्यामध्ये एनर्जी कॉन्झर्व्हेशन ॲक्टमधील तरतुदीप्रमाणे जी कारवाई करावयाची आहे ती करण्यासाठी महावितरण कंपनी अंतर्गत स्वतंत्र सेल केला जाईल. मग मुंबई, पुणे यासंबंधी एनर्जी कॉन्झर्व्हेशन मधील तरतुदी लॉंच करता येतील. मग शाळा, महाविद्यालय, नागरिक यासंबंधी जेवढी वाढ करता येईल तेवढी वाढविता येईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील......

सभापती महोदय, ट्रान्समिशन आणि जनरेशन कंपनीत लाईनमन पदाची भरती करावयाची होती. त्याबाबत वीज नियामक आयोगाने निर्णय दिला आहे. पण महावितरण कंपनीतील लाईनमनची पदे भरण्याबाबतची बंदी उठविलेली नाही. पण बंदी असली तरी लाईनमनची आवश्यकता लक्षात घेऊन ती पदे भरण्यासंबंधी जरुर कार्यवाही केली जाईल. परभणी जिल्हयात अनुशेष अंतर्गत रक्कम मिळाली, पण ती खर्च झाली नाही, त्यामुळे तेथील अधीक्षक अभियंता यांच्याविरुध्द कारवाई करण्याच्या मी सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी झाली नसेल तर त्यासंबंधीची कार्यवाही करुन सभागृहाला अवगत केले जाईल.

मौदा प्रकल्पासंबंधी याठिकाणी बोलले गेले. तत्कालीन ऊर्जा मंत्री श्री.अनंत गिते यांच्याशी मी या प्रकल्पासंबंधी चर्चा केली होती. परंतु त्यावेळी श्री.गिते यांनी या प्रकल्पाचा अभ्यास करण्यास सांगितले होते. या प्रकल्पाबाबत लोकांची वेगळी मानसिकता होती. आता नुकतेच केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी मौदा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत केला जाईल अशी घोषणा केली आहे. त्याला अनुसरुन भूसंपादनाचे काम सुरु झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी मुलुंड आणि भांडुप याठिकाणचा मुद्दा मांडला होता.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:30

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबई आणि त्यासंदर्भातील लॉजिस्टिक या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ग्रामीण भागामध्ये भार नियमन करीत होतो. शहरी भागामध्ये उंच इमारती असतात, त्यांना पाणी चढवायचे असते, लिफ्ट असतात या सर्व गोष्टी लक्षात घेता मुंबई शहरामध्ये भार नियमन केले जात नव्हते. मध्यंतरी नागपूर मधील काही लोक हायकोर्टामध्ये गेले आणि वेगळया शहरांना वेगळे स्टेटस का, बाकीच्या शहरांना तेच स्टेटस का नाही अशी जनहित याचिका दाखल केली. त्यासंदर्भात उच्च न्यायालयाने असे आदेश दिले की, जेवढी वीज उपलब्ध असेल तेवढी ती समान तत्वावर सर्वांनास पुरवावी आणि उर्वरित विजेच्या बाबतीत भारनियमन करावे. भारनियमानाच्या संदर्भात पुण्याचे नागरिक पुढे आले. पुण्यामध्ये भारनियमन करुन जेवढी वीज वाचणार आहे तेवढी वीज उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याचे चार्ज आम्ही भरतो असे सांगून पुण्यातील नागरिकांनी स्वत: भारनियमन दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी लागणारी अतिरिक्त रक्कम पुण्यातील नागरिक भरण्यास तयार आहेत. यापूर्वी पुण्यातील नागरिक 43 पैसे युनिट इतके जादा पैसे भरत होते. आता पुन्हा हे टर्मिनेट होणार असल्यामुळे पुन्हा एकदा बाकीच्या संघटना पुढे आलेल्या आहेत. टाटा पॉवर कंपनी पुढे आली आहे. टाटा ट्रेडिंग कंपनीने वीज उपलब्ध करुन देण्याचे ठरविलेले आहे आणि त्यामुळे पुन्हा पुण्याचे भारनियमन दूर करण्याचा प्रयत्न झालेला आहे. देशातून आणि राज्यातून जेथून जेथून वीज मिळेल तेथून ती घेण्याचा आमचा प्रयत्न राहील. भिवंडी, ठाणे, नवी मुंबई हे मुंबईचाच भाग आहेत. त्या ठिकाणी वीज वितरण कंपनी मार्फत वीज पुरवठा केला जात असून देखील तेथे भारनियमन करावे लागते हे शल्य माझ्या मनामध्ये आहे. परंतु ही परिस्थिती टाळता येऊ शकते. म्हणून याबाबतीत एखादी संघटना किंवा फ्रॅंचायजी यांनी तसा प्रयत्न केला तर तेथे देखील पुणे शहरासारखा मार्ग काढता येईल. राजीव गांधी विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत वाडया-वस्त्यांना केलेल्या विद्युतीकरणाची यादी मी पटलावर ठेवतो. जेणे करुन जिल्ह्यातील कोणकोणत्या वाड्यावस्त्यांचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे याची माहिती सन्माननीय सदस्यांना मिळू शकेल. या कार्यक्रमांतर्गत आपण 716 कोटी रु. वनटाईम खर्च करणार आहोत. हे पैसे आपल्याला केन्द्र सरकारने दिलेले आहेत. जेथे डोंगरकपा-याचा भाग आहे

..2..

(श्री. दिलीप वळसे-पाटील....

जेथे वीज जाऊ शकत नाही अशा ठिकाणी पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या माध्यमातून वीज जोडणीचा प्रयत्न आपण करीत आहोत.

शाळांच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या वर्षीच्या परीक्षा जवळपास संपलेल्या आहेत. परंतु वीज, पाणी या गोष्टींची प्रोव्हिजन केल्यानंतरच त्याठिकाणी सेंटर उघडण्यास परवानगी दिली जाते. या संदर्भात शालेय शिक्षण विभाग आणि ऊर्जा विभाग एकत्र बसून विद्यार्थ्यांना काय रिलिफ देता येईल यादृष्टीने निश्चित प्रयत्नशील राहील. माननीय उपसभापतींनी दिलेल्या आदेशांचे पालन या वर्षी झाले नाही तरी ते पुढील वर्षी करण्यात येईल...(अडथळा)...

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी कृषी संजीवनी योजनेबाबत आपले विचार मांडले. कृषी संजीवनी योजनेंतर्गत या राज्यातील थकलेल्या वीज बिलांसाठी सरकारने मदत केली आहे. काही रक्कम शेतक-यांनी भरावी आणि काही रक्कम सरकारने महावितरण कंपनीला भरावी अशा प्रकारची ही योजना यापूर्वी सुरु केली होती. त्या योजनेचा अनेक शेतक-यांनी लाभ घेतलेला आहे. आता पुन्हा अशा प्रकारची योजना आणण्यासाठी पुनश्च मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. कारण यामध्ये आर्थिक भार सांभाळण्याची जबाबदारी घ्यावयाची आहे. मंत्रिमंडळाने मान्य केले तर वन टाईम लाभ देण्याच्या संदर्भात माझा प्रयत्न आहे. परंतु अंतिम निर्णय हा मंत्रिमंडळाचा आहे. सभापती महोदय, या प्रस्तावावरील सर्व मुद्यांना मी उत्तरे दिलेली आहेत.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 17:35

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझी एक सूचना आहे. आता जो प्रस्ताव चर्चेला घेण्यात येणार आहे त्यासंदर्भात सदस्यांना वेळ वाटून द्यावा. चर्चेच्या सुरुवातीचे वक्ते बरेच बोलून जातात, जे वक्ते शेवटी राहतात त्यांना आपले विचार पाच-पाच मिनिटात मांडावे लागतात.

**उपसभापती** : अशा प्रस्तावाच्या बाबतीत सत्ताधारी पक्षाला आणि विरोधी पक्षाला ठराविक वेळ देण्यात येतो. विरोधी पक्षाच्या वाटेला जेवढा वेळ येतो, त्या वेळेचे वाटप विरोधी पक्षातील घटक पक्षांनी एकत्रित बसून करुन घ्यावे. पूर्वीपासून वेळ वाटपाची जी पध्दत आहे, ती तशीच चालू राहील. त्याप्रमाणे सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या प्रतोदांनी वेळेचे वाटप सन्माननीय सदस्यांना करुन द्यावे. आता पुढील प्रस्तावाच्या चर्चेस सुरुवात होईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : गिरणी कामगारांच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश

**मु.शी.**: गिरणी कामगारांच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री. मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनींचा विकास करण्याकरिता शासनाने गिरणी मालकांना परवानगी देणे, यासाठी मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 57 अन्वये काही अटींचा समावेश करण्यात येणे, ज्या बिरण्यांच्या जमिनीचा विकास करावयाचा आहे त्यांच्या जमिनीतील 1/3 भाग मुंबई महानगरपालिकेसाठी, 1/3 भाग मध्यमवर्गीयांना घरे बांधून देण्यासाठी म्हाडाला व उर्वरित 1/3 भाग गिरणी मालकांना व्यावसायिक वापरासाठी देण्याची अट घालण्यात येणे, तथापि, गिरणी मालकांनी या अटींची पूर्तता करण्याऐवजी फक्त स्वत:च्या व्यापारी संकुलासाठीची जागा घेऊन त्यांचे बांधकाम करणे, ते करताना गिरण्यांच्या जमीन व्यवहारात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होणे, गिरण्यांच्या जमिनीवर मध्यमवर्गीयांना घरे, हे गिरणी कामगारांसाठी स्वप्नच रहाणे, त्यांच्या हक्काची देय असलेली थकीत देणीही त्यांना न मिळणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबियावर ओढवलेले उपासमारीचे संकट, अनेक गिरणी कामगार या संकटाचा सामना करण्यास असमर्थ ठरल्यामुळे त्यांनी केलेल्या आत्महत्या, गिरणी कामगारांच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश, या प्रकरणी शासनाची दिसून येणारी निष्क्रियता व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, गिरणी कामगार आणि त्यांच्या व्यथा, त्या बाबतीत अनेक तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा अशा विविध आयुधांमार्फत या सभागृहात चर्चा झाली आहे. दुर्देवाने प्रत्येक वेळेला सभागृहात या प्रश्नाच्या बाबतीत लक्ष घातले जाईल असे सांगितले जाते, मात्र शासनाकडून काही केले जात नाही, ती व्यथा मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मुंबईतील गिरण्या गेल्या, त्यांच्या जमिनी गेल्या. त्यामुळे पुनर्वसन विषयाच्या बाबतीत मी बोलण्याचे ठरविले आहे. मला या सदनात नाईलाजाने म्हणावेसे वाटते् की, मराठीत असे म्हणतो की, " कोडग्या कोडग्या लाज नाही " तशी अवस्था गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत शासनाची झाली आहे. तुम्ही कितीही ओरडा, कितीही सांगा, सरकारकडून फक्त केले असे सांगितले जाते. ही परिस्थिती वारंवार अनुभवास आलेली आहे. विरोधी पक्ष म्हणून प्रामाणिकपणे एखाद्या भूमिकेवर बोलण्याचा प्रयत्न केला जातो. मागच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या सदनात गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी चर्चा उपस्थित केली होती. ती चर्चा उपस्थित करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी हे बरीच कागदपत्रे सभागृहात घेऊन आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी या विषयाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली होती, त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ठीक आहे. 2002 या वर्षी डी.सी.रुल बदलला आहे. त्यातून जी जमीन उपलब्ध व्हावयास पाहिजे होती, ती उपलब्ध होऊ शकली नाही. तरी सुध्दा आम्ही गिरणी कामगारांच्या मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनासंदर्भात काय काय करता येईल याची 2002 मध्ये जंत्री वाचून दाखविली.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, 2008 मध्ये देखील शासनाने फक्त सांगितले परंतु काहीच केले नाही. फक्त कागदी घोडे नाचवले आणि ते कसे नाचवले ते सांगण्यासाठी मी उभा आहे.ही सर्व जनता महाराष्ट्रातील आहे आणि मूळ मुंबईकर आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये आम्ही येथे बसलो आहोत ते मुंबईच्या लढयासाठी ज्यांनी रक्त सांडले ते हे गिरणी कामगार आहेत. महाराष्ट्र निर्मितीचा मंगल कलश ज्या कै. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आणला त्या कलशामागच्या भावना आहेत संघर्ष आहे तो गिरणी कामगारांचा आहे. वारंवार मुंबईला हिणवले जाते की परप्रांतीयांचा मुंबई उभारणीमध्ये हात आहे त्या गिरणी कामगारांची मुंबई होती आता नाही. ही गिरणी कामगारांची मुंबई म्हणून सर्व जगात ओळखली जात होती ती आता परप्रांतीयांच्या श्रमातील मुंबई म्हणून छातीठोकपणे सांगितले जाते हे ऐकून व्यथित व्हायला होते आणि त्या गिरणी कामगारांचे काय करणार हा प्रश्न विचारण्यासाठी मी उभा आहे. मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, सरकारच्या या निष्क्रियतेची दखल न्यायालयाने घेतली आणि न्यायालयामध्ये गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघटनेने याचिका दाखल केली त्याबाबतीत महाराष्ट्र राज्य आणि इतर जे होते त्याबाबतीत न्यायालयाने 15 मार्च 2007 रोजी निर्णय दिला. 2001 मध्ये विधिमंडळामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी पुनर्वसनातील अनेक बाबी सांगितल्या. परंतु त्याबाबतीत काहीच केले नाही म्हणून नाईलाजाने न्यायालयाने 15 मार्च 2007 रोजी निकाल दिला. न्यायालयाने सांगितले की अवर सचिव श्री. गिरकर यांनी जे ॲफेडेव्हीट केले होते ते अवर सचिव किंवा उप सचिव नको तर प्रमुख सचिवांचे ॲफेडेव्हीट पाहिजे. कारण शासन थातूर-मातूर लिहून देते आणि कोर्टाची फसवणूक करते अशी कोर्टाची भूमिका झाली. म्हणून कोर्टाने सांगितले की, "We want at least Additional Chief Secretary, Urban Land Ceiling Department, if not the Chief Secretary of the Department." मुख्य सचिवांना करता येत नसेल तर त्या खात्याच्या प्रमुख सचिवांनी न्यायालयाला प्रतिज्ञापत्र द्यावे अशा प्रकारे न्यायालयाने या सरकारला बजावले. त्याच निर्णयामध्ये सरकारच्या या भूमिकेची गंभीर दखल घेऊन न्यायालयाने म्हटले की, "Considering the seriousness of the grievances made in the Petition of the Mill Workers." कामगारांच्या या गंभीर तक्रारीची कोर्ट दखल घेत आहे. म्हणून मग कोर्टाने सरकारला सांगितले





श्री. दिवाकर रावते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, इतके वर्षे झाली योजना द्या. "In the form of Scheme, you come before this Court" योजनेसहित न्यायालयासमोर या. त्याचवेळी न्यायालयाने सहा आठवडयांचा वेळ देत सरकारच्या या प्रवृत्तीची दखल घेतली. न्यायालयाने सहा आठवडयांचा वेळ दिला तरी सरकारने काही कळविले नाही म्हणून न्यायालयाने सरकारला ठणकावून सांगितले की, "Time granted by way of last chance to the Government, the SO Six Weeks. The Affidavit should be filed at least two weeks before the adjourn date and a copy of the same be furnished to the learned counsel for the Petitioner." सहा आठवडयांनी वकील उभे राहतात मला सरकारकडून अजून काही कळले नाही असे सांगतो आणि पुढची तारीख घेतो असे होऊ नये म्हणून कोर्टाने सांगितले की, दोन आठवडे अगोदर सरकारचे म्हणणे मांडा. सरकारच्या नकारात्मक प्रवृत्तीची दखल घेतली आणि नंतर प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी यांनी कोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यामध्ये अनेक गोष्टी सांगितल्या. संपूर्ण प्रतिज्ञापत्र मी वाचणार नाही या प्रतिज्ञापत्रात असे सांगितले होते की, "Accordingly the relaxation was issued under section 37 of the said Act of MCGB to modify the DCR to incorporate the proviso that the mill land shall not be allowed" आणि सर्वात महत्वाचे म्हणजे "The Mill land shall not be allowed to develop or redevelop unless the proposal of the rehabilitation of an occupant is provided therein.".........

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

शासनाच्या निर्णयाची नोंद घ्यावी यासंदर्भात तिवारी साहेबांनी कोर्टात प्रतिज्ञापत्र करुन दिलेले आहे. जोपर्यंत पुनर्वसनाचा विषय येत नाही तोपर्यंत कुठल्याही मिलला परवानगी देणार नाही असेही म्हटलेले आहे. त्या प्रतिज्ञापत्रात पुढे असे म्हटलेले आहे की, कुटुंबातील एका तरी व्यक्तीला नोकरी दिली जाईल अशा प्रकारे लक्ष देऊ असे आपण आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलेले आहे. "At least one member of the family of the worker, in the employment of the Mill on 1.1.2000." नोकरी द्यावयाची झाली तर काय करावे? ते प्रशिक्षित नाही म्हणून "Government has passed Resolution dated 13.01.2007 to set up vocational training schools for Mill Workers with the help of recognised institutions to give training of relevant skill to the Mill worker or one Member of the family of the Mill Worker, so as to enable them to seek employment in other sector." प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात सुध्दा आपण कोर्टात सांगितलेले आहे. मुख्य सचिवांच्या नेतृत्त्वाखाली योजना करण्याचे आपण न्यायालयात सांगितलेले आहे. The Chief Secretary of Government of Maharashtra to formulate a Scheme. केंद्रसरकारच्या मोठया कंपनीकडे ट्रेनिंग देण्याच्या संदर्भात सांगण्यात आलेले आहे. कोर्टात सांगण्यात आले होते की, 3 महिन्याच्या आत ही योजना काय आहे? यासंदर्भात मिटकॉन कंपनीकडून सर्व माहिती मागवून घेऊ असे 15 मार्च, 2007 रोजी सांगितलेले आहे. या गोष्टीला एक वर्ष होऊन गेलेले आहे. याच प्रतिज्ञापत्रात त्यांनी असेही सांगितले आहे की, एनटीसीने त्यांच्या गिरण्यांमध्ये काम करणा-या कामगांराना आम्ही पैसे वगैरे सर्व काही दिलेले आहे त्यामुळे पुढील जबाबदारी आमच्यावर नाही. त्या प्रतिज्ञापत्रात असेही लिहिले आहे की, त्या मिलने आपली जबाबदारी झटकनू टाकली. रुबी मिलच्या संदर्भात असे सांगितले आहे की, रुबी मिलने आपला व्यवसाय रायगड मध्ये आणला आणि मग त्या ठिकाणच्या लोकांना रागडमधील रुबी मिलमध्ये येण्यास सांगितले . या ठिकाणी फक्त 27 कर्मचारी गेले. केवळ या म्हणाले म्हणजे गिरणी कामगार कसा काय तेथे जाणार आहे ? रायगड मध्ये गिरणी कामगाराला घर,दार नाही आणि नव्याने घर उभे करण्याची त्या गिरणी कामगारांची ऐपत आहे काय? रुबी गिरणी मालक नोकरी देईल परंतु गिरणी कामगार राहणार कोठे याचा कधी विचार केला आहे काय ? हे सर्व बाजूलाच राहिले आणि तुम्ही कोर्टात प्रतिज्ञापत्र करुन

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मोकळे झाले की, 27 कामगार नोकरी करण्यास तयार झाले परंतु सभापती महोदय, बाकीचे कामगार या ठिकाणी येण्यास का तयार झाले नाही याचा तुम्ही विचार केला आहे काय? यासंदर्भात मिटकॉनने सांगितले की, आम्ही एक महिन्यात सर्व्हे करु. मिटकॉनची काय जबाबदारी होती, त्यांच्याकडून काय अपेक्षा होत्या? The Annexure to Urban Development Department Letter dated 06.04.2007. Number of Persons to be trained-33,000. 33 हजार लोकांना त्यांनी ट्रेनिंग द्यावे. DCR requires that if not the workers, one Member of the family has to be given job. Jobs are to be provided in diversified industry or in the relocated Mill. आता डायव्हर्सीफाई इंडस्ट्रीची व्याख्याही करणे बाकी आहे. They are to be equipped for new jobs in the diversified industry or relocated mills. सभापती महोदय, मी हे यासाठी वाचून दाखवले आहे की, मूळ विषय हा मिल कामगारांच्या पुनर्वसनासंबंधिचा आहे. आपण हे करीत आहात काय ? नाही. कारण हे करण्यासाठी त्याला राजकीय इच्छाशक्ती असावी लागते. मला हे करावयाचे आहे यासाठी निर्धार असावा लागतो, ही माझी जनता आहे, या महाराष्ट्रातील आहेत ते उध्वस्त झालेले आहेत त्यामुळे त्यांच्यासाठी काही करावयाचे आहे यासाठी इच्छाशक्ती असावी लागते. ही इच्छाशक्ती तुमच्यात नव्हतीच फक्त ती कै. शंकरराव चव्हाण यांच्याकडेच होती. मिलच्या जमिनी कोणी विकल्या, का विकल्या याचा आपण कधी विचार केला आहे काय ? अग्रलेखाचे बादशहा श्री. निळकंठ खाडिलकर यांनी "टॉवर्स" या पुस्तकात मुंबईतील गिरण्यांबाबत उल्लेख केलेला आहे. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्या कारणाने मिल कामगार आजही रस्त्यावर आहेत. आमचे काही करता का हो यासाठी हे मिल कामगार आजही सरकारच्या दरवाजात उभे आहेत. ज्यावेळेस निळकंठ खाडीलकर यांनी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांची भेट मागितली तेव्हा त्यांनी त्याच रात्री भेट दिली. निळकंठ खाडिलकरांनी माननीय शंकरराव चव्हाण यांना सांगितले, "आमचे आंदोलन अहिंसक आहे, पोलीस आमच्यावर अत्याचार करीत आहेत अशा प्रकारची मिल मालकांच्या संदर्भात तक्रार मांडली.

यानंतर श्री. गायकवाड....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

तेव्हा त्यांनी असे विचारले की, " यामध्ये आमचे काही चुकले आहे काय ?" शंकररावांनी त्यांना असे सागितले की, " यामध्ये तुमचे काहीही चुकलेले नाही. तुमचे सगळे काही बरोबर आहे. उलट आमचेच चुकलेले आहे, आमच्या सरकारने गिरणी मालकांना फार लाडावून ठेवले आहे ". अशा प्रकारचे उद्‌गार कै.शंकरराव चव्हाण यांनी त्यावेळी काढले होते आणि त्याची नोंद या पुस्तकामध्ये करण्यात आलेली आहे. या आंदोलनामध्ये ज्यांनी भाग घेतला होता त्यांच्यावरील केसेस मागे घेण्यात याव्यात अशी मी माननीय उप मुख्यमंत्र्याकडे मागणी केली होती तेव्हा त्यांनी मला असे सागितले की, " त्याबाबतीत अर्ज देण्यात यावा." म्हणजे अर्ज दिल्यानंतर ते संबंधित अधिका-यांना सांगतील , त्यानंतर संबधित अधिकारी खालच्या डेस्क ऑफिसरकडे तो अर्ज पाठवून देईन. त्यामध्ये बराच वेळ जाईल. त्यामुळे या कार्यकर्त्यावर दाखल करण्यात आलेल्या केसेस कधी निघतील हे माहीत नाही. परंतु त्यावेळी या कामगारांच्या संदर्भात कै..शंकरराव चव्हाण यांनी तातडीने निर्णय घेतला होता म्हणून "मराठवाडयाचा भगिरथ पूत्र" असा मी त्यांचा नेहमीच उल्लेख करीत असतो. मराठवाडयातील जाहीर भाषणामध्ये मी नेहमीच त्यांचे कौतुक करीत असतो.. त्यावेळी कै.शंकरराव चव्हाण यांनी पोलीस आयुक्तांना फोन जोडून द्यावयाला सागितले होते. त्या नंतर त्यांनी अत्यंत स्पष्ट शब्दात त्यांना सांगितले होते की, " गांधीजीच्या अहिंसक आंदोलनात ब्रिटिशांनी जे केलेले नव्हते ते तुम्ही करु नका . आंदोलन करणारे गुन्हेगार नाहीत तर गिरणी मालकच गुन्हेगार आहेत." या गिरणी कामगारांची किती देणी आहेत असे त्यांनी विचारले होते तेव्हा सर्वाच्या वतीने कै. निळूभाऊ खाडीलकर यांनी सागितले की, "संपात कामगार वर्ग मोडला आणि गिरणी कामगारांचा प्रॉव्हीडंड फंडसुध्दा गिळला, या संदर्भात तुम्हाला एक कमिटी नेमावी लागेल. गिरणी कामगारांची किती देणी द्यावयाची आहेत, त्याचा अहवाल देण्यास त्या कमिटीला सांगण्यात यावे." या बाबतीत पंधरा मिनिटे बोलणी झाल्यानंतर कै.शंकरराव चव्हाण यांनी दुस-या दिवशी पुन्हा त्यांना बोलावले होते आणि त्यांना सांगितले की, "तुम्ही सांगितलेली प्रत्येक गोष्ट खरी आहे,त्याबाबतीत मी खात्री करुन घेतलेली आहे. " इलेस्टेटेड विकली " या वर्तमानपत्रात आलेला लेखसुध्दा मी वाचला आहे.तो लेख फार छान आहे. गिरणी कामगारांची कायदेशीर देणी किती आहेत हे नक्की करण्यासाठी मी समिती नेमत आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या समितीचे अध्यक्ष कोण असावे हे देखील मी ठरविले असून श्री.मनोहर कोतवाल हे त्या समितीचे अध्यक्ष राहतील , गिरणी मालकाना देख्रील त्या समितीमध्ये प्रतिनिधित्व असेल. अजून एक प्रतिनिधी ठरवावयाचा असून तुम्ही सांगाल तो प्रतिनिधी ठरविण्यात येईल." त्याप्रमाणे श्री.जी.एल.रेड्डी यांचे नाव कै.निळूभाऊ खाडीलकर यांनी दिले होते. अशा प्रकारे तीन सदस्यांची एक समिती नेमण्यात आली होती.या प्रश्नाच्या बाबतीत कै.शंकरराव चव्हाण यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा चर्चा करण्यासाठी दुस-या दिवशी बोलावले होते व त्याच दिवशी कै.शंकरराव चव्हाण यांनी अभ्यास केला आणि समिती नेमली होती. यालाच राजकीय इच्छा शक्ती असे म्हणतात. त्या लेखात पुढे असे म्हटलेले आहे की, " मी शंकररावांना असे म्हणालो की दोन गोष्टी करा. गिरणी मालकांना गिरणी सुरु करण्यासाठी वा चालविण्यासाठी फार पूर्वी क्षुल्लक भावाने सरकारने जमिनी दिल्या होत्या त्यांना आता या जमिनी विकून लाखो रुपयांचा काळा पैसा कमविण्याचा काय अधिकार आहे ? तुमच्या सरकारने ही सारी जमीन ताब्यात घ्यावी जितक्या क्षुल्लक किंमतीत त्यांना जमीन दिली होती तितक्याच क्षुल्लक किंमतीत ही जमीन परत घ्यावी, शंकरराव तुमचे नाव क्रांतिकारक मुख्यमंत्री म्हणून अमर होईल. माझे म्हणण्यात काय चूक आहे ? " त्यानंतर पुढे असाही उल्लेख करण्यात आला होता की," श्रीनिवास मिल ताब्यात घेण्याचा विचार करीन असा शब्द शंकररावांनी दिला होता. अग्रलेखाचे बादशहा कै. निळूभाऊ खाडीलकर यांच्या "टॉवर" या पुस्तकात हा उल्लेख करण्यात आला आहे.

सभापती महोदय, त्यानंतर या पुस्तकात पुढे असाही उल्लेख करण्यात आला होता की. कै. निळुभाऊ खाडीलकर यांनी असे सांगितले की,"ही जमीन विकायला देणार नाही. असे जर जाहीर केले तर महाराष्ट्राचे राजकारण बदलेल. त्यानंतर शंकरराव यांनी श्रीनिवास मिल बाबत व गिरण्यांच्या जमिनी बाबत घोषणा करुन जाहीर सभेत धमाल उडवून दिली होती. माननीय मुख्यमंत्री कामगार सभेमध्ये गेले आणि त्यांनी सागितले की या गिरणीची जमीन मी विकू देणार नाही." ही क्रांतिकारक घोषणा त्यावेळी त्यांनी केली होती. या पुस्तकात असाही उल्लेख करण्यात आला होता की, "कोतवाल समितीचा अहवाल प्रसिध्द करण्यात आला होता . त्यात गिरणी कामगारांचे 27 कोटी रुपयांचे कायदेशीर देणी द्यावयाचे प्रकाशित करण्यात आले होते. त्या

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

अहवालावर गिरणी मालकाच्या प्रतिनिधीनी सही केली होती . हा त्या कामगारांच्या लढयाचा प्रचंड विजय होता. थकबाकी पैकी गिरणी मालकांना नऊ कोटी रुपये कामगारांचे देण्यास आम्ही भाग पाडले . गिरणी कामगारांचा एकही पैसा न घेता गिरणी कामगारांना नऊ कोटी रुपये मिळवून दिले होते . हे पैसे गिरणी कामगारांच्या पदरात पडले होते. मी गिरणी मालकाची एक इंच देखील जमीन विकू देणार नाही परंतु पंतप्रधान कै..राजीव गांधी यांनी सागितले तर मात्र मला त्यांचे ऐकावे लागेल " मी गिरणीची एक इंचही जमीन विकू देणार नाही अशा प्रकारचा निर्धार त्यांनी त्यावेळी व्यक्त केला होता परतु मला जर दिल्लीहून सांगण्यात आले तर मला त्यांचे ऐकावे लागेल अशा प्रकारे त्यांच्यामध्ये स्पष्टोक्तेपणा होता म्हणून त्यांना लोक "हेड मास्तर" म्हणावयाचे. परंतु या बाबतीत नंतर पुढे काय झाले.? गिरणी मालकाची जमीन विकू देणार नाही असे म्हणणा-या शंकररावांना ताबडतोब बदलण्यात आले व त्यांच्या जागा श्री.शरद पवार मुख्यमंत्री म्हणून आले. आता मी जे काही वाचून दाखविलेले आहेत ते कै. निळूभाऊ खाडीलकर यांनी छापलेले आहे हे माझे मत नाही.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 17:55

श्री. रावते ....

तेव्हा माझ्या अंगावर उगीचच याल. हे सारे निळूभाऊ खाडीलकर यांनी लिहिलेले आहे, तेव्हा मोर्चा घेऊन जायचेच असेल तर तुम्ही निळूभाऊंकडे जा. पण त्यांनी जे काही लिहिलेले आहे, ज्या घटना लिहिलेल्या आहेत त्यानुसार निळूभाऊ हा प्रश्न घेऊन श्री.शरद पवार यांच्याकडे गेले. त्यांनी देखील निळूभाऊना चांगल्या प्रकारे विचारले की, या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी किती आहेत ? त्यावर निळूभाऊंनी त्यांना सांगितले की, पगार, ग्रॅच्युईटी, प्रॉविडंट फंड वगैरे सर्व देणी मिळून 27 कोटी रूपये आहेत. त्यातील 9 कोटी रूपये या कामगारांना श्री.शंकरराव चव्हाण यांनी मिळवून दिलेले आहेत आणि आता उरलेले 18 कोटी तुम्ही या कामगारांना मिळवून द्या. त्यावर श्री.शरद पवार नेहमी प्रमाणे म्हणाले की, उरलेली सर्व देणी या कामगारांना देऊन टाकू या. पुढे ते असेही म्हणाले की, ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांना न्याय देणे हेच राजकारण आहे. त्यानंतर पुढे ते म्हणाले की, ही अडकलेले, उरलेले 18 कोटी रूपये देण्यास गिरणी मालकदेखील तयार आहेत. मात्र त्यांना त्यासाठी गिरणीची जादा जमीन विकण्यास परवानगी द्यावी लागेल. त्याला आपण सर्वांनी मान्यता द्यावी. निळूभाऊ याबाबत पुढे लिहितात की, मी त्यांच्या या सूचनेवर चकितच झालो. म्हणजे गिरणी मालकांचा गिरण्यांची जमीन विकण्याचा प्रस्ताव हा श्री.शरद पवार यांनी त्यावेळेस प्रथम आणला आणि तेव्हा पासून कामगारांच्या दुर्दशेला सुरूवात झाली. दुर्दशेची सुरूवात ही इकडे आहे, अगदी नामदेवाची पायरीच जणू काही. यामध्ये श्री.शरद पवारांची पायरी अपवित्र आहे असे मी म्हणू शकत नाही. पण त्यावर निळूभाऊ म्हणाले की, पगार, ग्रॅच्युईटी, प्रॉविडंट फंड इ. कामगारांची कायदेशीर देणी ही दिलीच पाहिजे असे म्हणता तर मग त्यासाठी या अटी कशासाठी ? त्यावर त्यांनी आपल्या सेक्रेटरी वगैरेंना बाहेर जाण्यास सांगितले आणि त्या दोघांमध्ये जे काही बोलणे झाले ते न छापण्यासाठी होते, पण निळूभाऊंनी आता ते यात छापले आहे. त्यावर श्री.शरद पवार असे म्हणले की, गिरणी मालक राजीव गांधींकडे गेले आणि त्यांनी त्यांच्याकडे तुमच्या आंदोलनाबद्दल तक्रार केली. मी तुमच्या बाजूने बोललो, पण त्यांनी गिरणी मालकांची बाजू घेतली आणि गिरण्यांची जमीन विकण्यास परवानगी देण्याबद्दल सांगितले. त्यासाठी इतर नेते गप्प बसतील. आंदोलन करणार नाहीत आणि त्याला पाठिंबाही देणार नाहीत वगैरेही सांगितले. शेवटी त्यावर तडजोड झाली आणि गिरणी विकली गेली नंतर आज आम्हाला येथे भाषणासाठी प्रश्न मिळाले. मी त्याबद्दल श्री.शरद पवारांचा आभारी आहे, ज्यांनी हे मुंबई शहर उभे

.....3वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

केले तेच आज त्यांच्या त्या निर्णयामुळे, मसलतीमुळे भुईसपाट झाले आहेत. हा प्रश्न कोणी निर्माण केला तो वादाचा मुद्दा जरूर आहे, पण हे जे काही या पुस्तकात छापले गेले आहे ते मी येथे वाचून दाखविले आहे. पण हे सत्य आहे. गिरण्यांच्या जमिनी विकण्यास परवानगी दिली आणि त्या ठिकाणी मॉल, टॉवर वगैरे उभे राहिले, सगळे काही उभे राहिले आणि कामगारांच्या पुनर्वसनाचा विषय आला आणि ते का करीत नाही हा प्रश्न घेऊन आम्ही तुमच्यापुढे उभे आहोत. मला अतिशय खेदाने म्हणावेसे वाटते की, तेथे 6 गिरण्या होत्या. त्यात प्रकाश मिल, रूबी मिल होती. पैकी प्रकाश मिल खाजगी होती ती बंद झाली. रूबी मिल अंशत: चालू आहे. त्यातील एक भाग सुरू केला आहे. आपल्या डीसी रूल नुसार जो भाग मोकळा सोडायचा होता आणि म्हाडा, महापालिका यांना द्यायचा होता तेथेच काम सुरू ठेवले आहे आणि हळूहळू तोही भाग दिला जाणार नाही हे उघड आहे. तर रूबी मिल, इंदू मिल, कोहिनूर मिल नं.3, अशा अन्य गिरण्या आता बंद झाल्या आहेत. त्यातील एका गिरणीमध्ये 1500 कामगार होते तेथे आता केवळ 15 कामगार ठेवलेले आहेत, अगदी नावापुरते, दाखविण्यापुरते. एनटीसीच्या पाचही कापड गिरण्या, त्यात इंदू मिल, रूबी मिल, वगैरे मध्ये आज कंत्राटी पद्धतीने काम चालू आहेत. कामगार नाहीत, कामगार सारे संपले आहेत. न्यू हिंद, कोहिनूर नं.3, वगैरे गिरण्यांचा विकास आराखडा मंजूर होऊन गेला. न्यू हिंद मधील एक भाग दिला. केंद्र सरकारच्या खाजगीकरणाच्या नावे आणि कामगारांना देणी देण्याच्या बाबतीत कोर्टात सांगितले गेले की, यांची देणी देण्यात आलेली आहेत. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 3झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, या सर्व जमिनी भाडे तत्वावर दिल्या होत्या. मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, 999 वर्षाच्या भाडेतत्वावर दिलेली जागा मोठया लिजवर आहे. ती एक हजार वर्षासाठी आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी सांगू शकतील. या जमिनी कापड उद्योगासाठी दिल्या होत्या आणि तेथील उद्योग बदलल्यानंतर ज्या कारणासाठी लिजवर जमिनी दिल्या होत्या, ते लिज रद्द होते काय ? मला याबद्दलच्या क्लॉजची माहिती नाही. पण सिम्प्लेक्स मिलच्या बाबतीत सांगावयाचे तर दि.12-1-1983 रोजी लिज पूर्ण झालेले असून आता जमीन मोकळी झालेली आहे आणि आज 2008 सुरु आहे. मग ती जमीन ताब्यात का घेण्यात आली नाही याचे उत्तर मिळत नाही. कारण स्मॉल कॉज कोर्टा मध्ये याचे भाडे किती ठरवावे यासाठी जी केस सुरु आहे, ती अजून तशीच पडून आहे.शासनाने ही जमीन अजूनपर्यंत ताब्यात का घेतली नाही ? याचे उत्तर मिळत नाही. तुमचे मालकांच्या बरोबर काय साटेलोटे आहे आणि आतून काय देणे-घेणे आहे ? ज्यामुळे आपण त्यांच्यावर मेहेरनजर करीत आहात. 1983 मध्ये लिज संपलेले असताना सुध्दा ती जागा ताब्यात का घेत नाही ? 2005 मध्ये खटाव मिलचे लिज संपलेले आहे. पण अजून जमीन ताब्यात घेतलेली नाही. ही ताब्यात का घेतली नाही ? तसेच मफतलाल गिरणीसाठी जी जागा दिलेली आहे, त्याचे लिज 2010 मध्ये संपणार आहे. पण त्यावेळी काय करणार आहात ? ती जागा ताब्यात घेणार आहात की नाही ? त्यांचे लिज संपविणार आहात की नाही ? ज्या गिरण्यांच्या जमिनीच्या लिजची मुदत संपलेली आहे. तुम्ही त्यांच्यावरही विकासाच्या बाबतीत मेहेरनजर करणार आहात काय ? असा मी प्रश्न उपस्थित करीत आहे. कारण कामगारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लोंबकळत असताना, आपल्या सरकारची गिरणी मालकांवर मेहेरनजर करण्याची जी प्रवृत्ती आहे, ती फार गंभीर आहे. दि.12 ऑक्टोबर 2000 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी वार्ताहर परिषद घेतली होती. तसेच सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी असे जाहीर केले होते की, 60 दिवसांची स्वेच्छा निवृत्ती वेतन, उध्वस्त गिरणी कामगारांना घरे आणि 1 जानेवारी 2000 रोजी हजेरीपटावर असणाऱ्या कामगारांना किंवा त्यांच्या वारसांना नोकऱ्या देणार आहोत. याबाबतीत आपण निर्णय घेतला. पण गेल्या सात वर्षामध्ये शासनाने यादृष्टीने कोणतीही हालचाल केली नाही असे मी सांगू इच्छितो. मी येथे शासनाच्या नकारात्मक भूमिका मांडत असताना दिनांक 23 मार्च 2000 नंतर एकाही गिरणी .....

. . . .3 झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

कामगाराला आजपर्यंत घर मिळालेले नाही. या मुंबई शहरामध्ये सामान्य लोकांसाठी 5 लाख घर बांधणीचा संकल्प केलेला आहे. पण गिरणी कामगारांसाठी घर बांधण्याच्या कार्यक्रमाचा उल्लेख या शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये कुठेही केलेला नाही. 1991 च्या विकास आराखडयामधून 162.04 हेक्टर जमीन उपलब्ध होणार होती. त्यामध्ये आपण बदल केला. यामध्ये तुमच्यावर गिरणी मालकांनी काय जादू केली, ते तुम्हाला कुठे भेटले ? बैठकीमध्ये काय झाले ? हे मला माहिती नाही. पण त्यानंतर 2001 मध्ये डी.सी.रुल मध्ये बदल केला. त्या नुसार आता फक्त 19 हेक्टर जमीन उपलब्ध होणार म्हणजे उर्वरित ओपन स्पसेच्या 1/3. तुम्ही त्यामध्ये अशी मेख मारली की, पूर्वी मिळणार होती, त्यापेक्षा किती तरी जमीन मिळणार आहे. मग या 19 हेक्टर जमिनीवर 2000 मधील जे 55 हजार कामगार आहेत, त्यांना घरे कशी देणार आहात याचे उत्तर आज दिले पाहिजे. कारण तुम्ही निर्णय घेतलेला आहे आणि तुमच्या निर्णयानुसार जमीन मिळत नसेल तर परवा अर्बन लॅण्ड सिलींग ॲक्टनुसार जी 1332 हेक्टर जमीन तुमच्या ताब्यात आली आहे. त्यातला हिस्सा देणार आहात काय ? आज तुम्हाला हा निर्णय जाहीर करावयाचा आहे. यामधून हिस्सा देता येत नसेल, कारण तुम्ही मालकांच्या पदरात दान टाकावयाचे ठरविले आहे, त्याप्रमाणे ते टाकले. मग हे पाप केले की पुण्य केले ते तुम्हाला माहिती. पण गिरणी कामगारांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर त्यांना जी घरे मिळण्याची आशा होती, ती नाहिशी झाली अशी स्थिती आहे. मग आता अर्बन लॅण्ड सिलींग ॲक्ट रद्द झाल्यानंतर आता सगळया जागा मोकळया झाल्या आहेत. पण घरे स्वस्त होतील की नाही हा नंतरचा विषय आहे. पण तुम्ही गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी यातील जागेचा हिस्सा देणार आहात काय ? आज या प्रश्नाचे उत्तरे द्यावे लागणार आहे. सरकारचे आदेश टोपलीत टाकणाऱ्या म्हणजे न मानणाऱ्या सुधारित विकास नियम 58 प्रमाणे 32 गिरण्यांच्या विकासाला परवानगी देण्यात आली आहे. या गिरण्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ 15,60,633 चौ.मी.आहे. या 32 गिरण्यांच्या जमिनीपैकी नियमाप्रमाणे 1,35,434 चौ.मी.जागा म्हाडाला मिळावयास पाहिजे होती. मातुल्य, स्वदेशी, मॉर्डन अशा काही गिरण्या सोडल्या तर खाजगी गिरणी मालकांनी म्हाडाच्या ताब्यामध्ये जमिनी दिलेल्या नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी मला सांगावे की, आपण त्यांच्या जमिनी कधी घेणार आहात ? कशा प्रकारे घेणार आहात ? की त्यांच्याकडून जो विकास केला जात आहे, तो ताबडतोब थांबविणार आहात काय ?

. . . .3 झेड-3

श्री.दिवाकर रावते . . . .

रघुवंशी, फिनिक्स, कमला, रुबी, प्रकाश, व्हिक्टोरिया इ.गिरणी मालकांचे म्हणणे आहे की, या गिरण्यांच्या जमिनीपैकी कोणताही हिस्सा म्हाडास देणे आमच्यावर बंधनकारक नाही अशी त्यांनी जाहीर भूमिका घेतलेली आहे. आज गिरणी मालक शासनाशी दादागिरी करावयास लागले आहेत. आम्ही देत नाही, काय करता ते पहातो.

यानंतर कु.धनश्री . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे 18:05

श्री. दिवाकर रावते ...

माननीय मंत्री महोदय श्री. आर.आर पाटील यांनी या संदर्भात एक गोष्ट मला सांगितली होती. आपण त्यावेळी उपस्थित नव्हता म्हणून मी आपणास ती गोष्ट सांगू इच्छितो. "शनि महाराजांनी विचारले की, मी कधी चांगला दिसतो, व लक्ष्मीने विचारले की मी कधी चांगली दिसते ? यावर असे उत्तर देण्यात आले की, शनि महाराज जाताना चांगले दिसतात व लक्ष्मी येताना चांगली दिसते." लक्ष्मी येताना चांगली दिसते अशी शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय हे गिरणी मालक कशाच्या जोरावर याठिकाणी दादागिरी करीत आहेत याचे उत्तर मिळाले पाहिजे. या संदर्भात शासन काय करणार आहे ? यांना कसे काय वठणीवर आणणार आहे ? देणार नाही असे सांगण्याची त्यांची हिंमत कशी काय होत आहे? सरकार मात्र लाचारासारखे त्यांच्या मागे फिरत आहे. देता का, अशी मागणी करीत व भजन करीत फिरण्याची पाळी आज शासनावर आलेली आहे. रघुवंशी, फिनिक्स, कमला, प्रकाश, रुबी, व्हिक्टोरिया या गिरण्यांमधील कामगारांची आज काय अवस्था झालेली आहे ? येथील गिरणी मालक सरकारवर दमदाटी करीत आहेत. आज आमच्या कामगारांना त्यांनी उद्ध्वस्त केलेले आहे. तुमचा काही तरी हात अडकला असेल म्हणून आज हे लोक अशा पद्धतीने वागत आहेत.

सभापती महोदय, म्हाडा गिरणी कामगारांना 225 चौ. फूट जागा देणार आहे अशा घोषणा केल्या जातात. हे ऐकून मला अतिशय वाईट वाटते. जनतेबद्दल शासनाच्या काय भावना आहेत ? 3800 खोल्या बांधल्या जाणार आहेत असे जाहीर करण्यात आले होते. कोणत्या तरी नेत्याने असे सांगितले होते की, गिरणी कामगारांनी टॉवरमध्ये राहू नये काय ? त्यांना मी सांगू इच्छितो की, 25 मजली इमारतीत 25 व्या मजल्यावर राहणाऱ्या लोकांचा पाईप तुंबल्यास तो दुरुस्त करण्याकरिता 10 ते 15 हाजार रुपये खर्च येतो. कोण दुरुस्त करणार आहे ? मुंबईची हवा खारी असल्यामुळे लोखंडाच्या वस्तु लवकर खराब होण्याची शक्यता असते. अशा वेळी जर लिफ्ट खराब झाली तर लिफ्ट दुरुस्तीकरता लागणारा खर्च सर्वसामान्य माणसांना परवडणारा आहे काय ? या गरीब कामगाराची मग काय अवस्था होणार आहे ? 250 स्के.फूटाचे 32 मजली टॉवर बांधण्यात येत आहेत. सर्वसामान्य माणसाला टॉवरचा मेंटेनन्सचा खर्च देखील परवडणारा नाही. पाच मजल्यापर्यंत माणूस चालत जाऊ शकतो. 35 मजल्यापर्यंत तो कसा काय जाणर आहे ? मी

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

12 मजली इमारतीमध्ये राहात आहे. तेथे मेंटेनन्स देणे मला जड जात आहे.एकेका लिफटचा मेंटेनन्स वर्षाला एक लाख रुपये मागतात. मग हे सामान्य कामगार इतके पैसे कोठून आणणार आहेत ?

सभापती महोदय, या गरीब गिरणी कामगारांकरिता चार ते पाच मजली इमारती बांधाव्यात. या चाळीमधील संडास तुंबला तर त्यातील मैला काढणे त्यांच्या आवाक्यात तरी असू शकेल. 35 मजली इमरीतीतील मैला काढणे त्याच्या आवाक्यात तरी असणार आहे काय ? आपण काय बोलत आहेत, जनतेला कसली स्वप्ने दाखवित आहोत ? या टॉवरचा रंग काढायचा झाला तर तो देखील या गिरणी कामगाराला परवडण्यासारखा नाही. शासन केवळ या गरीब जनतेला स्वप्ने दाखवित आहे. हे सर्व " मुंगेरीलाल के हसीन सप्ने" आहेत. 250 चौ. फूटाची चार घरे एकत्र करावयाची व त्यानंतर ती एखाद्या श्रीमंत माणसाला विकण्याचीच शक्यता अधिक आहे असे मला वाटते. 250 फूट घर देण्याच्या योजनेचे भूमिपूजन देखील करण्यात आले आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

श्री. रामानंद तिवारी यांनी सांगितले. त्यांचे ते वाक्य आहे. ते घरी गेले. सभापती महोदय, 7 गिरण्याच्या 11 हजार कामगारांपैकी राहिलेल्या 7 हजार कामगारांना घरे कोण देणार ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. ही घरे विनामूल्य मिळावीत अशी कामगारांची अपेक्षा आहे. आपण त्यांच्याकडून पैसे घेणार आहात काय ? याबाबत नक्की धोरण काय आहे ते जाहीर करावे. त्या घरासाठी कोणत्या पध्दतीच्या अटी आहेत, हे आज जाहीर करावे. त्याची वितरण व्यवस्था आपण कशी करणार ? 55 हजार कामगार आहेत. आपण आता बांद्रा येथे 3800 घरे धेतलेली आहेत. त्याचे वितरण कसे करणार ? त्याबाबतीत काय निकष आहेत हे आपण जाहीर करावे. 4000 घरांची घोषणा करुन 3800 घरे बांधावयास घेतलेली आहेत, बाकीच्या कामगारांना घरे कशी मिळणार याबाबतचे आपले धोरण आम्हाला कसे समजणार हा प्रश्न मी आज पुनर्वसनाच्या बाबतीत विचारत आहे.

**तालिका सभापती ( श्री. अरविंद सावंत )** : आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गिरणी कामगारांची व्यथा परत मांडली जाईल की नाही हे माहीत नाही. तेही कंटाळलेले आहेत, आपणही कंटाळलेलो आहोत. किती होते, काय होते त्यापेक्षा आज आपण सर्वांनी गिरणी कामगारांचे दु:ख मनसोक्त रडून घ्यावे. कारण 1 मे नंतर हुतात्म्यांना वंदन करुन हे गिरणी कामगार पुन्हा मैदानात उतरतील. त्यावेळी तुम्हाआम्हाला त्यांच्या लढ्यामध्ये उतरुन त्यांना साथ द्यावी लागेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हाडाला उपलब्ध होणाऱ्या जागांपैकी काही जागा संक्रमण शिबिराला वापरण्याचे धोरण जाहीर केले आहे. गिरणी कामगारांची जागा संक्रमण शिबिराला देणार आहेत. सभापती महोदय, श्री. टी. चंद्रशेखर हे म्हाडामध्ये आहेत. आता बृहन्मुंबई विकास नियमावली 1991 नियम 58 (7) अन्वये 25 मार्च, 2001 च्या तरतुदीप्रमाणे अंमलबजावणी करण्याकरिता निमंत्रक म्हणून श्री. व्ही.बी.चव्हाण यांना नेमले आहे त्यांनी असमर्थता प्रगट केलेली आहे. या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही असमर्थ आहोत असे उद्‌गार श्री. व्ही. बी. चव्हाण यांनी संनियंत्रण समितीच्या बैठकीत काढले. 2 जून, 2007 पासून सतत पत्रव्यवहार करुन सुध्दा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

महाराष्ट्र शासनाने नियम 58(7) मधील डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजची व्याख्या अजून सांगितलेली नाही मी मघाशी म्हणालो की, डायव्हर्सिफाय इंडस्ट्रीजची व्याख्या काय आहे ते आपण अजून सांगितलेले नाही. ती व्याख्या आपण सांगावी. डायव्हर्सिफाय इंडस्ट्रीजची जी व्याख्या करावयाची आहे ती कधी करणार हे आपण सांगावे. श्री. व्ही. बी. चव्हाण कंटाळले. ते म्हणाले मी आता राजीनामाच देतो. गिरणी कामगारांच्या कर्मचारी कल्याण संघाने उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्रमांक 134/2006 ही ऑगस्ट, 2006 मध्ये दाखल केली होती. त्यांनी न्यायालयाचा आधार घेतलेला आहे. यासंदर्भात डी.सी.रुल्स, 1991 मधील नियम 58 मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे व यासंदर्भात शासनाकडून जाहीर पॉझिटिव्ह विचार करण्याची गरज आहे असे न्यायालयाने सांगितले.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत, नोकरी मिळण्याच्या बाबतीत जी जबाबदारी आहे ती मिटकॉनकडे द्यावयाची आहे. त्याच्या संदर्भात जे ॲफिडेव्हिट कोर्टामध्ये करण्यात आले ते करणारे श्री. रामानंद तिवारी निवृत्त झाले. त्यामध्ये त्यांनी अशी अट घातली की, मिटकॉनने जे ट्रेनिंग द्यावयाचे आहे त्याचा खर्च गिरणी मालकांनी करावयाचा आहे. त्यांनी त्यांच्याकडून खर्च घ्यावा असे सांगितले. मला एक कळत नाही की, जे गिरणी मालक आपल्याला बधत नाहीत, आपल्याला दम देतात, आपल्याला जमीन देत नाहीत, ते मिटकॉनला ट्रेनिंगचे पैसे देतील असे आपल्याला वाटते काय ? ही जबाबदारी कोण घेणार ? गिरणी मालकांनी मिटकॉनकडे ट्रेनिंगचे पैसे भरावयाचे आहेत. ते पैसे कोण देणार ? कसे देणार ? आपण पत्र लिहून टाकले. श्री. तिवारीसाहेब पत्र लिहून निवृत्त झाले. हे पैसे कोण देणार आणि कसे देणार ? या गिरणी कामगारांनी मालकाच्या दरवाजामध्ये जाऊन ऐना का बैना, घेतल्याशिवाय जाईना असे होळी सारखे टाळ वाजवत जावयाचे काय ? मला शिकावयाचे आहे, मला नोकरी मिळवाचाचे आहे, पैसे देता का असे त्यांनी पैसे मागावयाचे काय ? आपण कामगारांना भीक मागावयास लावणार काय ? ही अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे. त्यांनी पत्र लिहून टाकले. ते गेले हे माहीत नव्हते. नाही तर त्यांना

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

ठोकून काढावयास पाहिजे होते. गिरणी कामगारांच्या प्रशिक्षणाचे पैसे मिटकॉनने मालकांकडून घ्यावे असे लिहिले. जे सरकारला बधत नाहीत, जे सरकारला आपल्या बंडीच्या खिशात ठेवतात ते कामगारांच्या पैसे देण्यास बधतील काय ? कशासाठी हे करावयाचे ? हे सुध्दा त्यांनी 7 वर्षानंतर सांगितले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, कामगारांना नोकरी देण्याची कोणतीही यंत्रणा कार्यान्वित केली नाही, मिटकॉनवर जबाबदारी टाकून हे हात झटकून मोकळे झालेले आहेत. एक नवीन अणू करार या देशात तयार झालेला आहे. गिरण्या बंद झाल्या आहेत. या गिरणी कामगारांचे निवृत्तीचे वय 58 आहे. म्हणजे पेन्शन 58 वर्षानंतर मिळणार. गिरण्या बंद झाल्यामुळे कोणी चाळीसाव्या वर्षी निवृत्त झाला, कोणी बेचाळीसाव्या वर्षी झाला, कोणी 50 वर्षी झाला. त्यानुसार He is eligible for pension after 60 years. म्हणजे 2-3 वर्षे त्यांनी त्यांच्या जीवनात काय करायचे ? त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनाची नाही काय ? फक्त एनओसी देऊन टॉवर बांधण्यास परवानगी देणे केवळ ही सरकारची जबाबदारी आहे ? गिरणीच्या मालकांना जमीन विकण्यास मुभा द्यावयाची ही सरकारची जबाबदारी आहे ? हे सगळे करीत असताना जे उद्ध्वस्त होत आहेत त्यांची कोण जबाबदारी घेणार ? पश्चिम बंगालमध्ये एनटीसीच्या गिरण्या होत्या. त्यांची दादागिरी किती आहे ते सांगतो. पण गुडघे रोग झालेले हे सरकार आहे. काही झाले तरी दिल्ली दरबारात जातात, गुडघे टेकून येतात. हया सरकारची मला लाज वाटते. एनटीसीच्या सर्व गिरण्या बंद झाल्यावर सरकारच्या अधिका-यांनी सरळ सरळ लिहून कळवून टाकले की, आमचे काही देणे घेणे नाही, आम्ही पैसे दिले आहेत, आम्ही काही बघणार नाही. पश्चिम बंगालमधील एनटीसीच्या गिरण्या बंद झाल्या. केंद्र सरकारमध्ये असलेल्यांनी त्या गिरणी कामगारांना बसून पगार द्यावा असा दम दिला. हा नवीन अणू करार आहे. केंद्र सरकारला आम्ही बाहेरुन पाठिंबा दिला आहे, हे सरकार वाचवावयाचे आहे का ? पश्चिम बंगालमधील एनटीसीच्या गिरणी कामगारांना एक न्याय दिला जातो. कारण ते कणखर सरकार आहे. पण महाराष्ट्रातील एनटीसीच्या गिरणी कामगारांना दुसरा न्याय दिला जातो, कारण हे गुडघे रोग झालेले सरकार आहे. तिकडे बेकार झालेल्या गिरणी कामगारांना 1 हजार रुपये भत्ता दिला जातो. हा भत्ता तुम्ही देणार आहे की नाही हा प्रश्न आहे. एका ठिकाणी एक सरकार आपल्या कामगारांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहते, केंद्र सरकारला ठणकावून सांगते, की जमणार नाही, त्या गिरण्याच्या जमिनीच्या आवारात पाऊल टाकू देणार नाही. आमच्याकडील गिरणी कामगार देशोधडीला लागले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आहेत. तरीही हे सरकार गप्प बसले आहे. पश्चिम बंगालमधील कामगारांना जसा भत्ता मिळतो तसा राज्यातील गिरणी कामगारांना भत्ता देणार किंवा नाही हे सांगावे. माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मे, 2006 रोजी बैठक झाली त्यावेळी या मागणीला तत्वत: मान्यता देण्यात आली. श्रीनिवास, स्वदेशी, मफतलाल, हिंदुस्थान, ब्रॅडबेरी या मिलच्या कामगारांना अजूनही देणी मिळालेली नाहीत. त्या मिल्सना कामगारांचे देणे देण्यास भाग पाडले पाहिजे. त्या कामगारांना दरमहा 1 हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यास भाग पाडले पाहिजे. माननीय श्री.आर.आर.पाटील हे नेहमी सर्व गोष्टीला होकार दर्शवितात. दिनांक 17.3.2000 रोजी विधिमंडळात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या निवेदनात ही वस्तुस्थिती मान्य केली आहे. दिनांक 28.6.2007 रोजी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत या मागणीला तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. म्हणजे नगरविकास राज्यमंत्री म्हणून आपण, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री या मागणीशी ज्ञात आहेत. या संदर्भात सरकारने कोणता निर्णय घेतला आहे त्याचे मला उत्तर हवे आहे. मग मे, 2006 ते 2008 पर्यंत म्हणजे साधारणपणे दीड वर्षात या कामगारांना दरमहा 1000 रुपये भत्ता देण्यासंबंधी कोणती मानसिकता निर्माण केली आहे ते सांगावे. तत्वत: ही मागणी मान्य केली असेल तर त्यानुसार त्यांना भत्ता देणार की नाही ते सांगावे. 1984 पासून श्रीनिवास गिरणी बंद झालेली आहे, त्या गिरणीतील 6 हजार कामगार बेकार झाले त्याचे अत्यंत वाईट वाटते. 1998 पासून या मिलची मालमत्ता मुंबई उच्च न्यायालयाच्या ताब्यात आहे. ब्रॅडबेरी मिल 1984 पासून बंद आहे, त्या मिलच्या 3 हजार कामगारांना सुध्दा 1984 पासून एकही पैसा मिळालेला नाही. सर्व मालमत्ता मुंबई उच्च न्यायालयाच्या ताब्यात आहे. खटाव, हिंदुस्थान, मफतलाल या गिरण्यांची प्रकरणे अनेक कारणांमुळे न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या कामगारांना पूर्ण देणी मिळालेली नाहीत. सरकार यासंबंधी सॉलिसिटर उभा करणार काय ? सरकारने कामगारांचे हित पहावे. गिरणी मालकांनी बाकी सर्व विकण्याचे ठरविले आहे, सरकारने गिरणी मालकांचे भले करण्याचे ठरविलेले आहेच. जे काय करावयाचे ते करावे, पण कामगारांच्या भवितव्याबाबत काय करणार आहात ते विचारण्यासाठी या पुनर्वसनाच्या मुद्याच्या निमित्ताने मी उभा आहे.

नंतर श्री.शिगम



(श्री. दिवाकर रावते....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने न्यायालयामध्ये चांगले वकील उभे करावेत. सगळयाच बाबतीत आपल्याला अपयश का येते ? नांदेड येथील धरणाच्या संदर्भातील प्रश्न कोर्टात गेला, तेथे राज्य सरकारला अपयश आले. सीमा प्रश्न कोर्टात गेला, तेथे आपल्याला अपयश आले. कमीत कमी चांगले वकील तरी शासनाने उभे करावेत. विधी व न्याय खात्याचे अधिकारी काय करतात ? सभापती महोदय, फार दुर्दैवी परिस्थिती आहे. 2006मध्ये कापड गिरण्यांच्या जमिनींचा पूर्वप्राधान्य विकास प्रस्ताव प्राप्त झाला. 8 कापड गिरण्यातील कामगारांची थकीत देणी प्राधान्याने देण्यात येतील अशा बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्या. पण कामगारांना काहीही मिळाले नाही. सगळी वाऱ्यावरची वरात. म्हणून या उद्ध्वस्त झालेल्या कामगारांना निर्वाह भत्ता देण्याची शासनाची जबाबदारी आहे आणि ही मागणी तत्वत: मान्य देखील केलेली आहे. अशा त-हेने दुर्दैवाने दरवाजामध्ये करवंटी घेऊन या गिरणी कामगाराला उभे केलेले आहे. सभापती महोदय, आज या मुंबईचे जे वैभव आपण पहात आहोत ती मुंबई या गिरणी कामगारांनी घडविली. ही मुंबई परप्रांतीयांनी घडविलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी या मुंबईतील गिरणी कामगारांनी ब्रिटीशांशी लढा दिला, तो परप्रांतीयांनी दिलेला नाही. बाबू गेनूची आठवण आपल्याला सातत्याने होते ना. ज्या कामगारांनी आपले रक्त शिंपडून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे काम केले, मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली अशा गिरणी कामगारांवर आज करवंटी घेऊन या शासनाकडे दयेची याचना करावी लागत आहे. या गिरणी कामगारांच्या संदर्भात एक छोटासा निर्णय सरकारला घ्यावयाचा आहे. सभापती महोदय, आज कोण कोणाला काय काय देत आहे ते पहा. सच्चरच्या नावाखाली मियाँची दाढी खाजविण्याकरिता सेल निर्माण करण्यात आला. श्री. शरद पवार यांनी मौलाना आझाद महामंडळ जाहीर केले. त्यासाठी 50 कोटी रु. देऊ केले. त्या समाजातील तरुणांना तुम्ही उभे करा. आमचे काही म्हणणे नाही. परंतु या देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडणा-या आणि या मुंबईची जडणघडण करणा-या गिरणी कामगाराला निवृत्ती वेतन भत्ता द्याल की नाही ? त्याला केवळ एक वेळची भाजी-पोळी खाण्याची संधी द्याल की नाही ?

सभापती महोदय, आणखी दोन-तीन मुद्यावर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. मला वाईट वाटते ते याचे की, या गिरणी कामगारांना एम्प्लॉयमेंटच्या संदर्भातील प्रॉव्हिडंट फंडाच्या संदर्भातील नियम सुध्दा लागू केलेले नाहीत, ते त्यांना लागू करणार आहात की नाहीत ? पेन्शनचे

..2..



(श्री. दिवाकर रावते....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम लागू करणार आहात की  नाही ? गिरणी बंद पडून आता ते 58 वर्षाचे झाल्यानंतर त्यांना निवृत्ती वेतन अनुदान देऊन जगविणार आहात की नाही ? तसेच अपंग झालेल्या गिरणी कामगारांची शासन काय व्यवस्था करणार आहे ? एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला फॅमिली पेन्शन मिळते, तशी पेन्शन ज्या गिरणी कामगारांचे निधन झालेले आहे त्यांच्या पत्नीला देण्याची काय व्यवस्था करणार आहात ? अनेक गिरणी कामगारांचे मृत्यू झालेले आहेत. त्यांच्या फॅमिली पेन्शनचा प्रश्न कसा सोडविणार आहात ? त्याच प्रमाणे जे आजारी पडलेले कामगार आहेत त्यांच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात ? ईएसआयएसच्या कलम 58 मध्ये "provision for the treatment by the State Govt. अशी तरतूद आहे. ही तरतूद तुम्ही कशी लागू करणार ? या सर्व गिरणी कामगारांना कशा प्रकारे मदत करणार ? कामावर असताना अपघात झाल्यामुळे नोकरी गेलेल्या कामगारांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी देण्यासंबंधीचा नियम आहे. या नियमांतर्गत अपघातात नोकरी गेलेल्या कामगाराला न्याय कसा मिळणार ? विकलांग कामगारांच्या संदर्भातील, त्यांच्या पुनर्वसनाच्या संदर्भातील कायद्यातील तरतुदी मी सांगितल्या. आता या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, या गिरणी कामगाराला बीपीएल योजना लागू करा. बीपीएलचे निकष काय आहेत याची आपणास कल्पना आहे. ज्याच्या घरात गॅस, पंखा आहे त्याचा बीपीएलमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. परंतु या मुंबईतील गिरणी कामगारांना बीपीएलमध्ये आणण्यासाठी बीपीएलच्या नियमामध्ये बदल करा, अशी माझी आपणास विनंती आहे. सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाचा विषय मी मांडलेला आहे. ज्यांनी ही मुंबई या महाराष्ट्राला मिळवून दिली, ज्यांनी या मुंबईसाठी रक्त सांडले, ज्यांनी ही मुंबई घडविली, त्या गिरणी कामगारांचे हे शासन काय करणार आहे ? या प्रसंगी बाबू गेनूची प्रकर्षाने आठवण होते. श्री. शरद पवार यांनी जमिनी विकायला काढल्या, त्यांच्या पाठिमागे तुम्ही  राहिलात.. मी ठामपणे सांगू इच्छितो की, एकदा का हा गिरणी कामगार चिडला तर तो सर्वांना भस्मसात केल्या शिवाय राहाणार नाही, आणि तसा इतिहास आहे. तेव्हा कृपा करुन या उद्ध्वस्त गिरणी कामगाराला हातात कटोरी घेऊन फिरायला लावू नका, त्याला हक्काने जगण्याचे  सामर्थ्य  द्या एवढे बोलून,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



(श्री. दिवाकर रावते....)

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्ती ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी म.वि.नियम 260 अन्वये मुंबईतील गिरणी कामगारांच्या व्यथा, त्यांचे प्रश्न आणि राज्य शासनाने या संदर्भात काही महत्वाचे निर्णय घेणे आवश्यक होते, ते निर्णय न घेतल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती या विषयाच्या बाबतीत या सदनात चर्चा उपस्थित केलेली आहे. मी पूर्ण अर्थाने नाही, पण बहुतांशी त्यांच्या मताशी मी सहमत आहे. या राज्यातील स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास गिरणी कामगाराच्या योगदानाचा उल्लेख केल्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. या देशाचे थोर सेनानी बाळ गंगाधर टिळक ज्यांचे नेतृत्व या शहरामध्ये, या राज्यामध्ये, या देशामध्ये वाढविण्यामागे गिरणी कामगारांचा प्रमुख हात आहे. मुंबईतील गिरणी कामगारांनी देखील स्वातंत्र्य प्राप्तीसाठी मोठे योगदान दिले आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ D/ MMP/ KTG/ 18:30

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

स्वातंत्र्य संग्रामासाठी ज्या ज्या वेळी लढा देण्याची वेळ आली त्या त्या वेळी गिरणी कामगारांनी प्रमुख भूमिका बजावली. अशा प्रकारे देशाला स्वातंत्र्य मिळत असताना कमी वेतनामध्ये जास्त काम असून सुध्दा गिरणी कामगारांनी गिरण्याही वाचविल्या आणि वाढविल्या तसेच आपले अस्तित्व कायम ठेवले हा इतिहास आहे आणि वस्तुस्थितीही आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांचा लढा हा नेहमी कम्युनिस्टांनी दिलेला आहे. कॉ.एस.अे.डांगे यांनी ......

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांच्या संदर्भात गांभीर्याने चर्चा सुरु आहे. सत्तारुढ आणि विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांची संख्या पाहिली तर सभागृहात गणपूर्ती सुध्दा नाही. अशा पध्दतीने सदनाचे कामकाज चालू ठेवणे कितपत उचित आहे हा महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. आज गिरणी कामगार उद्ध्वस्त व्हायला निघाला आहे. यासंदर्भातील महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होत असताना संबंधित खात्यांचे मंत्री उपस्थित नाहीत. नोंद कोण घेणार आहे हे मला माहीत नाही. मग ही चर्चा कशासाठी ? कामगार क्षेत्रातील प्रश्न असल्यामुळे कामगार मंत्री उपस्थित राहणे आवश्यक आहे. उद्योगमंत्री उपस्थित राहणे आवश्यक आहे. तेही उपस्थित नाहीत. आपण केवळ औपचारिकता पूर्ण करीत आहोत. म्हणून माझी विनंती आहे की गणपूर्ती होईपर्यंत सदनाचे कामकाज तहकूब करावे.

श्री. अनिस अहमद : सभापती महोदय, खालच्या सदनामध्ये मागण्यांवर चर्चा असल्यामुळे अनेक मंत्री खालच्या सदनामध्ये उपस्थित आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबईच्या गिरणी कामगारांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. नगरविकास खात्याचे राज्यमंत्री उपस्थित आहेत. परंतु त्यांच्याबद्दल सन्मान ठेवून मी सांगू इच्छितो की, खरे पाहता माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. कामगारमंत्री देखील नाहीत. सदनातील एकंदरीत वातावरण पाहता सभागृहाचे कामकाज आता तहकूब करावे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी उद्या नव्याने भाषण करतील. परंतु उद्या या विषयावर चर्चा सुरु करताना संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित राहतील याची काळजी शासनाने घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2

**तालिका सभापती** (श्री. अरविंद सावंत) : सभापती महोदय, आज सकाळी ही चर्चा पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे. रोज रोज जर चर्चा पुढे ढकलत राहिलो तर सदनाचे काम पूर्ण होणार नाही. या विषयाबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सन्माननीय सदस्यांना आत्मीयता आणि कळकळ असेल याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मला स्वत:ला देखील असे वाटते की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेच्या वेळी उपस्थित असावयास पाहिजे. तरीसुध्दा सन्माननीय राज्यमंत्री याठिकाणी चर्चेची नोंद घेत आहेत. आता ही चर्चा सकाळी ठरल्याप्रमाणे पुढे चालू राहू द्या. सुरुवातीला अडीच तासाची चर्चा ठरविण्यात आली होती. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विनंती केली की, वेळ विभागून द्या. त्याप्रमाणे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यामध्ये वेळ विभागून देण्यात आली. गिरणी कामगारांच्या जीवन-मरणाचा हा प्रश्न आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाम सल्लागार समितीमध्ये असे ठरले आहे की, सदनाचे कामकाज संध्याकाळी 6.00 पर्यंत चालू ठेवावे. सदन सकाळी 10.30 वाजता सुरु झालेले आहे. आता 6.30 झालेले आहेत.

**तालिका सभापती** : मला वाटते की, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांचे भाषण संपेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवावे. अशा परिस्थितीमध्ये आणखी चर्चा करणे बरोबर वाटत नाही. माझी सुध्दा गिरणी कामगारांच्या भागामध्ये 50 वर्षे गेलेली आहेत. गिरणीच्या बाजूला मी रहात असलेली बिल्डींग आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सदनाचे कामकाज कशा पध्दतीने चालावे यासंबंधात नियम आहेत. सदनाचे नियम काय आहेत त्याचा सन्मान करणार की नाही ? शेवटी हे वरिष्ठ सभागृह आहे.

**तालिका सभापती** : सभापती महोदय, यासंदर्भात पुन्हा एकदा सन्माननीय सभापतींबरोबर बसून जो निर्णय होईल त्याची अंमलबजावणी व्हावयाला पाहिजे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत)...........

सायंकाळी 5.35 वाजता या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली त्यावेळी सभापतीस्थानी माननीय उपसभापती होते. त्यावेळी असे ठरले की, अडीच तास या प्रस्तावावरील चर्चेसाठी वेळ देण्यात येईल. म्हणजे साधारणपणे रात्री 8.00 वाजेपर्यंत ही चर्चा चालेल.

श्री.नितीन गडकरी : त्यानंतर माननीय सभापतींनी आजचे कामकाज रात्री 7.00 वाजेपर्यंत चालेल असे जाहीर केले होते.

**तालिका सभापती** : असे जाहीर केले असेल तर त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी भाषण सुरु करावे. 7.00 वाजता सभागृहाची बैठक स्थगित केली जाईल. सन्माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण न झाल्यास ते ऑन लेग राहतील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, गिरणी कामगारांचे लढे या मुंबई शहरामध्ये नेहमीच कम्युनिस्टांनी दिले. हे लढे कम्युनिस्ट देत असताना मग कामगारांच्या वेतनामध्ये वाढ करण्याचा प्रश्न असेल, निरनिराळया प्रश्नावर गिरणी कामगारांचे लढे देण्याचे काम कॉ.डांगेंच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट पक्षाने मुंबई शहरामध्ये पार पाडले. त्यावेळी ॲग्रीमेंटची व्यवस्था होती. गिरणी कामगारांच्या वेतनवाढीविषयी राष्ट्रीय मिल मजदूर संधाच्या नेतृत्वाखालील समितीच्या अध्यक्षांबरोबर ॲग्रीमेंट होत असे, हा या शहराचा आणि गिरणी कामगाराविषयीचा इतिहास आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता)**

त्या काळी राज्य शासन हे कॉंग्रेस पक्षाचे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ ही संघटना कॉंग्रेसप्रणीत आणि गिरणी कामगारांचे लढे देण्याचे काम कम्युनिस्टांचे असे समीकरण वर्षानुवर्षे मुंबई शहराला पहावयास मिळाले. दुर्दैवाने या संपूर्ण परिस्थितीत बदल झाले. मुंबई शहरातील कम्युनिस्टांच्या हातामधील ही व्यवस्था बाहेर यायला हवी, कॉंग्रेसप्रणीत राष्ट्रीय मिल मजदूर संघाचा कोणताही प्रभाव गिरणी कामगारांवर राहता कामा नये आणि मिल कामगारांची वेगळी राजकीय संघटना ताब्यात घेण्याचा प्रयत्न या मुंबई शहरामध्ये झाला. आज ते कामगारनेते हयात नाहीत. स्व.दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांचा लढा मुंबई शहरात उभा राहिला. शेवटी कम्युनिस्टांचे राजकारण, कम्युनिस्टांच्या लढाया या गिरणी कामगारांच्या संदर्भात होत असत. कुठपर्यंत ताणायचे आणि किती मिळवायचे हे प्रमाण ठरलेले असायचे, त्यामुळे गिरणी कामगार





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..........

देशोधडीला लागेल अशा प्रकारची कोणतीही पावले कम्युनिस्टांनी उचलली नव्हती. अशी ही व्यवस्था सुरु असताना स्व.दत्ता सामंत यांनी हा लढा आपल्या ताब्यात घेतला. दुर्दैवाने हा लढा कुठपर्यंत चालवायचा, हे आंदोलन कुठपर्यंत चालवायचे याची कोणतीही दिशा निश्चित नसल्यामुळे दिशाहीन वातावरणात ही मोहीम चालविण्याचा प्रयत्न झाला. दुर्दैवाने मुंबई शहरामध्ये आज जी मंडळी याठिकाणी गिरणी कामगारांची व्यथा मांडण्याचा प्रयत्न करतात, दुर्दैवाने त्या पक्षाने सुध्दा स्व.दत्ता सामंत आणि त्यांच्या त्यावेळच्या मोहीमेचे व आघाडीचे समर्थन केले होते, हा इतिहास कधीही विसरता येणार नाही.

सभापती महोदय, लक्षावधी गिरणी कामगार मुंबई शहरातील निरनिराळ्या गिरण्यांमध्ये काम करीत होते. दुर्दैवाने अशी परिस्थिती निर्माण झाली की, वर्ष-वर्ष, दीड-दीड वर्ष आंदोलन छेडले गेले.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

मिलकामगारांनी एक एक वर्ष दीड दीड वर्ष संप केले आणि त्या संपाचा परिणाम असा झाला की, मुंबईतील गिरणी व्यवस्था पूर्णपणे कोलमडून गेली. गिरण्या चालविण्यास गिरणी मालक तयार आहेत परंतु गिरणी कामगार काम करण्यास तयार नाहीत असे वातावरण संपूर्ण महाराष्ट्रात तयार झाले. मुंबईतील गिरण्यांमध्ये काही वर्षापूर्वी 2.5 लाख गिरणी कामगार काम करीत होते, मुंबईतील गिरणी कामगार हे मुबईचे वैभव होते परंतु या संपामुळे गिरणी कामगार पूर्णपणे देशोधडीला लागले. आता मुंबईतील गिरण्यांमध्ये फक्त 10 ते 12 हजार गिरणी कामगार काम करीत आहेत. मिल बंद झाल्यामुळे गिरणी कामगार उध्वस्त झाले, त्यांची मुले उध्वस्त झाली, आपले घर-दार विकून गिरणी कामगार मुंबईतून निघून गेले, गिरणी कामगारांची मुले बेकार होऊन रस्त्यांमध्ये वण-वण भटकत आहेत अशी परिस्थिती गिरणी कामगारांची झालेली आहे. खरे म्हणजे गिरण्यांचा विषय हा माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कक्षेत येतो त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या चर्चेसाठी सभागृहात उपस्थित राहावयास पाहिजे होते. या विषयावर या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे आणि शासनाने उत्तरेही दिलेली आहेत. या सभागृहात गिरणी कामगारांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना तसेच इतर माध्यमांच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणण्यात आलेली आहे. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाला शासनाकडून प्रभावीपणे उत्तर मिळू शकलेली नाही ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारुन चालणार नाही. गिरण्यांच्या जमिनीच्या संदर्भात डी.सी. रुलच्या अंतर्गत निर्णय झालेले आहेत. गिरण्यांच्या जमिनीपैकी 1/3 जमीन ही मालकाला दिली जाईल, 1/3 जमीन म्हाडाला दिली जाईल, 1/3 जमीन महानगरपालिकेला दिली जाईल अशा प्रकारचा निर्णय झाला होता. परंतु या डि.सी. रुलला कोणत्याही गिरणी मालकाने मान्यता दिली नाही. फिनिक्स मिलच्या मालकाने गिरणीच्या कंपाऊडला लागून मोठ मोठया भिंती उभ्या केल्या आणि गिरण्यांमधील मशीनरी बाहेर काढल्या आणि नको ते उद्योग करुन डी.सी. रुलची ऐसी की तैसी करण्याचे पहिले काम या फिनिक्स कपंनीने केले. या कंपनीने जी युक्ती वापरली तशाच प्रकारची युक्ती इतर कंपन्यांनी सुध्दा वापरलेली आहे. डी.सी. रुल प्रमाणे गिरणीची 1/3 जमीन गिरणी मालकाला द्यावयाची, 1/3 जमीन म्हाडाला द्यावयाची आणि 1/3 जमीन महानगरपालिकेला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकणी ....

द्यावयाची हा निर्णय मान्य न करता त्यांनी सुप्रिम कोर्टात धाव घेतली आणि सांगितले की, आम्हाला डी.सी. रुल मान्य नाही त्यामुळे आम्हाला दुसरी व्यवस्था निर्माण करुन द्या. या व्यवस्थेमध्ये स्ट्रक्चर सोडून मिलची 1/3, 1/3जमीन वाटण्याचा निर्णय झाला. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, ही व्यवस्था होऊन सुध्दा आज किती गिरणी मालकांनी 1/3 जागा सरकारला दिलेली आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी..

सभापती महोदय, गिरण्याच्या संदर्भातील प्रश्न गिरणी कामगारांनी हायकोर्टात नेला होता. त्यानंतर हायकोर्टाने जो काही निर्णय दिला होता तो सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी येथे वाचून दाखविला आहे. ज्या गिरण्या बंद पडल्या वा कारखाने बंद पडले त्यामुळे कामगारांना नोक-या नाहीत, दुसरा उद्योग नाही त्यामुळे पुढच्या तरुण पिढीचे काय होणार आहे,त्यांच्या मुलांचे काय होणार आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा या मुलांचे कशा पध्दतीने पुनर्वसन करावयाचे याचा विचार सुरु झाला असताना त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी संस्था स्थापन करण्यात येणार होत्या तेव्हा या प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत काय , किती मुलांना या संस्थांमधून प्रशिक्षण देण्यात आले होते आणि किती मुलांना हे प्रशिक्षण दिल्यानंतर त्या गिरण्यांच्या जागेवर जे उद्योग उभे राहिले होते त्या उद्योगांमध्ये नोक-या दिल्या गेल्या ? यासंबंधीची माहिती सन्माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला दिली पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 1.1.1995 रोजी देशातील जी मंडळी या मुंबई शहरात आली होती त्यांना मोफत घरे देण्यात येतील असा निर्णय राज्य सरकारने घेतला होता व त्या निर्णयाची अंमलबजावणी केली जात आहे. परंतु मुंबई शहरातील ज्या कापड गिरण्यांच्या जागावर 40 - 40 वर्षानपासून भाडेकरु राहतात किंवा कामगार राहतात त्यांना घर देण्याची जबाबदारी शासनाची नाही असे सांगण्यात आले आहे. या कामगारांना घरे देण्याची जबाबदारी नेमकी कोणाची आहे हा प्रश्न जेव्हा सभागृहात चर्चेसाठी आला होता तेव्हा असे उत्तर देण्यात आले होते की ,"गिरण्यांच्या चाळीमध्ये राहणारे जे लोक आहेत त्यांना घरे देण्याची जबबदारी शासनाची नाही." दिनांक 1.1.1995 रोजी राज्याच्या बाहेरुन जी मंडळी मुंबई शहरात रहावयास आली होती जे झोपडपट्टयामध्ये राहत होते त्यांना मोफत घरे देण्यासाठी 1.1.1995 ही तारीख बेस धरुन मोफत घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे परंतु वर्षानुवर्षे गिरणीच्या चाळीत राहणारा जो कामगार आहे , जो भाडेकरु आहे त्यांना घरे न देण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे तेव्हा ही भूमिका कितपत योग्य आहे यासबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा असे मला त्यांना सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी..

सभापती महोदय, आपल्या मार्फत मला माननीय मंत्री महोदयांकडे अशी मागणी करावयाची आहे की, मुंबईतील कापड गिरण्या वा कारखाने बंद पडल्यामुळे त्या ठिकाणी काम करणारा कामगार व त्यांची मुले नोकरी मिळविण्यासाठी आज वणवण भटकत आहेत तेव्हा त्यांना नोकरी मिळेल, काम मिळेल तसेच सरकारच्या मार्फत त्यांचे पुनर्वसन केले जाईल या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे आणि हा प्रश्न पोटतिडकीने सोडवावा.

सभापती महोदय, मुबईतील सेंचुरी मिलमध्ये साडेसात हजार कामगार काम करीत होते त्यांची जी देणी द्यावयाची होती ती त्यांना दिलेली आहे आता 350 कामगार राहिलेले आहेत त्यांना अजूनही असे वाटते की आपले पुनर्वसन केले जाईल . हे कामगार कोर्टात गेले असून कोर्टाने त्यांच्या प्रकरणाला स्थगिती दिली आहे. सेंचुरी मिल बंद करण्यासाठी मिल मालक हाय कोर्टात गेले होते आणि हाय कोर्टाने त्यांना परवानगी दिली होती. तेव्हा सेंचुरी मिलमध्ये काम करणा-या ज्या कामगारांचे अजून पुनर्वसन व्हावयाचे आहे त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे या संबंधी शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. गिरणी कामगारांच्या संदर्भातील प्रश्न हा अत्यंत ज्वलंत व महत्वाचा आहे म्हणून हा प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात शासनाने नेहमी प्रमाणे थिऑरिटकली उत्तर दिले तर त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान होणार नाही .तेव्हा या गिरणी काममगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी नक्की काय कार्यवाही करण्यात येणार आहे , कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे, त्यांचे पुनर्वसन कसे करण्यात येणार आहे याबाबतीत शासानाने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मी सभापती महोदय, आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांकडे मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

----

नंतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 18:50

**तालिका सभापती** (श्री.जगदीश गुप्ता) : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे भाषण करतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आता 7 वाजण्यास 10 मिनिटे बाकी आहेत. ...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरू करावे, 10 मिनिटांनी, 7 वाजता सभागृहाची बैठक आपल्याला थांबविता येईल. त्यानंतर उद्या त्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरू करावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अशा प्रकारे या विषयावर मला बोलणे उचित वाटत नाही, त्यापेक्षा मी या विषयावर बोलूच इच्छित नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले भाषण सुरू करावे, सभागृह स्थगितीच्या वेळेस त्यांचे भाषण अपूर्ण राहिल्यास त्यांना उद्या आपले भाषण पुढे सुरू करता येईल. ...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना जरूर बोलू द्यावे. मात्र त्यांनी आता अशा स्थितीत न बोलण्याचा निर्णय घेतला आहे तो तसा उचितच म्हणावा लागेल कारण अशा प्रकारे भाषण आणि तेही मुंबईतील गिरणी कामगारांच्या संबंधातील ज्वलंत आणि गंभीर प्रश्नावर करताना अशा प्रकारे त्यांना थांबविल्यास त्यांच्या विचारांची लिंक मध्येच तुटते आणि मग ती पुन्हा उद्या जुळणे कठीण जाते. तरी याचाही आपण विचार करावा.

श्री. मधकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जो विषय या प्रस्तावाच्या स्वरूपात येथे मांडला आहे तो इतका गंभीर असतानाही शासनाने तो दुर्लक्षित केल्यासारखा घ्यावा हे बरोबर वाटत नाही. ...

श्री. नितीन गडकरी : शासनाला या विषयाचे गांभीर्यच वाटत नाही. आता पहा, कॅबिनेट मंत्री सभागृहातून बाहेर गेले आहेत .... आता ते परत येत आहेत हा भाग वेगळा. ... पण याचे गांभीर्यच शासनाला किती आहे हे यातून दिसून येते.

**तालिका सभापती** : ही गोष्ट बरोबर आहे की, कॅबिनेट मंत्री सभागृहात नसणे हा विषय आतापर्यंत तीन वेळा झालेला आहे. ... शासनाने याचे गांभीर्य लक्षात घ्यावे. तसेच एकूण परिस्थितीचा विचार करता मी सभागृहाची बैठक आता येथे स्थगित करीत आहे. सभागृहामध्ये सुरू असलेली नियम 260 खालील प्रस्तावावरील चर्चा उद्या घेण्यात येईल.

...... 4जे 2 ...



**तालिका सभापती** .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे आणि आता सुरू असलेली चर्चा उद्याच्या कामकाज पत्रिकेवर दाखविली जाईल.

सभागृहाची विशेष बैठक उद्या मंगळवार, दिनांक 8 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत वाजता पुन्हा भरेल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता सुरू होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 52 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 8 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही